वर्ष ३९, अंक २५, ६ रुपये, शहर आवृत्ती, पृष्ठे १६ + चतुरंग

शनिवारचे संपादकीय

**प्लास्टिकचा पापभंग**

प्लास्टिक प्रदूषणावर मात करण्यासाठी सध्या सुरू असलेले प्रयत्न हे जंगलाला लागलेली आग विझवण्यासाठी एखादा चमचाभर पाणी घेऊन रमतगमत जाण्यासारखे आहेत...

नागपूर, शनिवार, १५ ऑगस्ट २०२६ WWW.LOKSATTA.COM

# लोकसत्ता

नागपूर, मुंबई, पुणे, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकमान्य, लोकशक्ती!

स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा




**तापमान**

| कमाल | किमान |
|---|---|
| ३०.४°से | २३.६°से |

**हवामानाचा अंदाज**
आकाश ढगाळलेले राहील. पावसाची शक्यता.

**लोकसत्ता**

**उद्या अंक नाही**

आज स्वातंत्र्य दिनानिमित्त 'लोकसत्ता' कार्यालयाला सुटी असल्याने उद्या, रविवार १६ ऑगस्टचा अंक प्रकाशित होणार नाही, याची वाचक, विक्रेते, वितरक आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. - **व्यवस्थापक**

**काय चाललंय काय!**

प्रशांत कुलकर्णी



# ओबीसीशिवाय जातगणना

## जनगणनेसाठी ४० प्रश्नांची यादी जाहीर | अनुसूचित जाती-जमातींचाच समावेश

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

**केंद्र सरकारने** जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात नागरिकांना विचारल्या जाणाऱ्या ४० प्रश्नांची यादी शुक्रवारी जाहीर केली. स्वातंत्र्यानंतर प्रथमच सर्वसमावेश जातीनिहाय जनगणना करणार असल्याचे सरकारकडून सांगण्यात आले. प्रश्नावलीत अनुसूचित जाती व जमातींचाच उल्लेख आहे. ओबीसी समाजासाठी कोणताही स्वतंत्र रकाना देण्यात आला नसल्याने राजकीय वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील राजकीय घडामोडींवरील मंत्रिमंडळ समितीने (सीसीपीए) गेल्या वर्षी ३० एप्रिल रोजी 'जनगणना २०२७'मध्ये जातीय गणना समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार देशाचे महानिबंधक व जनगणना आयुक्त मृत्युंजय कुमार नारायण यांनी शुक्रवारी आदेश जारी केले. संबंधित व्यक्ती अनुसूचित जातीची किंवा अनुसूचित जमातीची *(पान ५वर)*



**प्रश्नावलीत काय?**

- व्यक्तीचे नाव, घरप्रमुखाशी नाते, लिंग, जन्मतारीख आणि वय, वैवाहिक स्थिती, लग्नाचे वय आणि जोडीदाराचे नाव.
- राष्ट्रीयत्व, धर्म, जात, पालकांचा तपशील, अपंगत्व, मातृभाषा आणि इतर ज्ञात भाषा, साक्षरता आणि डिजिटल साक्षरता, शिक्षण.
- रोजगाराशी संबंधित प्रश्नसंचात, गेल्या वर्षी व्यक्तीने काम केले आहे का, आर्थिक स्रोत, व्यवसाय, उद्योग/ व्यापार/ सेवेचे स्वरूप, कामगारांचा वर्ग आदींचा समावेश. एखादी व्यक्ती काम शोधत आहे का किंवा कामासाठी उपलब्ध आहे का आणि कामाच्या ठिकाणी जाण्यासाठी प्रवासाचे साधन याबाबतच्या प्रश्नांचा समावेश.
- स्थलांतरासंबंधी माहितीमध्ये जन्मस्थान, शेवटच्या निवासाचे ठिकाण, स्थलांतराचे कारण, शेवटच्या स्थलांतरानंतर सध्याच्या गावात किंवा शहरात राहण्याचा कालावधी आणि कायमचा निवासी पत्ता यांचा समावेश.
- विशिष्ट श्रेणीतील महिलांसाठी हयात असलेल्या मुलांची संख्या, जन्मलेल्या एकूण मुलांची संख्या आणि गेल्या वर्षभरात जन्मलेल्या मुलांची संख्या.
- करोना लसीकरणाचे ठिकाण, एकूण बँक खात्यांची संख्या, मोबाइल क्रमांक, आधार क्रमांक, मतदार ओळखपत्र क्रमांक, पारपत्रधारकांसाठी पारपत्र क्रमांक आणि वाहनचालक परवाना उपलब्धता.

**ओबीसी नेत्यांमध्ये संताप :** जातनिहाय जनगणनेच्या प्रश्नावलीत ओबीसींसाठी स्वतंत्र रकाना नसल्याचे स्पष्ट झाल्याने राज्यातील ओबीसी नेत्यांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली. ओबीसींची जनगणना करणार असल्याचे सांगून प्रत्यक्षात ती न करणे, ही ओबीसी समाजाची फसवणूक असल्याची टीका काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. - **पान ५**

# ज्येष्ठ कवी द. भा. धामणस्कर कालवश

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**डोंबिवली :** निसर्गाची बहुविध रूपे आणि मानवी जाणिवांचे संदर्भ भावोत्कट तरीही सहज शब्दांत मांडणारे ज्येष्ठ कवी दत्तात्रय भास्कर धामणस्कर यांचे शुक्रवारी सकाळी डोंबिवली येथे वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९६ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, दोन मुली, सून आणि नातवंडे असा परिवार आहे.

वृद्धापकाळाच्या आजाराने धामणस्कर हे गेल्या आठवड्यापासून डोंबिवलीतील खासगी रुग्णालयात उपचार घेत होते. तिथेच त्यांची प्राणज्योत मालवली. शहरातील वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.



१९३०- २०२६

**विराटाच्या वाटेवरची...**

- विशेष लेख / २

निसर्गाच्या तऱ्हा, सजीवसृष्टीतील स्थित्यंतरे अलगद वेचून धामणस्करांनी मुक्तछंदात कविता पेरल्या. त्यातून 'प्राक्तनाचे संदर्भ', 'बरेच काही उगवून आलेले...', 'भरून आलेले आकाश' असे एकाहून एक दर्जेदार कवितासंग्रह निर्माण झाले. 'मौज', 'सत्यकथा', 'हंस' अशा असंख्य दिवाळी अंक आणि मासिकांतून त्यांच्या कविता रसिकांना भेटत राहिल्या. मानवी हिंसा, क्रौर्य, असंमजसपणाची व्यथाही त्यांच्या कवितांमधून व्यक्त झाली. 'कविता दशकांची' या संग्रहासाठी १९८० ते १९९० च्या दशकात महाराष्ट्रातून १९८० मध्ये जे उत्तमोत्तम प्रतिभावान दहा कवी निवडले गेले. त्यामध्ये धामणस्कर यांचा समावेश होता.

'ज्ञानपीठ'तर्फे १९८३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या कवितांमध्ये धामणस्कर *(पान ५वर)*

## राहुल गांधींविरोधात मानहानी तक्रार रद्द



**नवी दिल्ली :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबद्दल केलेल्या टिप्पणीप्रकरणी त्यांच्याविरोधातील फौजदारी मानहानी तक्रार सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी फेटाळली. तसेच राहुल यांच्याविरोधात कनिष्ठ न्यायालयाने बजावलेले समन्सही न्या. दीपंकर दत्ता आणि न्या. शील नेगू यांच्या खंडपीठाने रद्द केले. यासाठी कायद्याने आवश्यक मंजुरी घेतली गेली नव्हती, असे न्यायालयाने निकाल देताना स्पष्ट केले. **– पान ४**

## उद्योगांत महाराष्ट्रच अग्रस्थानी

**मुंबई :** नवीन कंपन्या, परदेशी गुंतवणूक आणि उद्योगधंद्यांच्या बाबतीत महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर असून यापुढेही कायम राहील, असा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी केला. चाकणमधील उद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठी आराखडा निश्चित करण्यात आला असून एकही उद्योग तेथून बाहेर जाणार नाही, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. **– पान ५**






# विशेष





निसर्गातील रंग-रूप-आकारांबद्दलची स्वीकारशील भावोत्कटता मांडणारी, माणसातील क्रौर्य, हिंसा पाहून करुणार्त होणारी कविता लिहिणारे ज्येष्ठ कवी द. भा. धामणस्कर यांच्या नव्वदीच्या निमित्ताने गिरीश कुबेर यांनी ऑक्टोबर २०२० मध्ये लिहिलेल्या लेखाचा संपादित अंश.

# विराटाच्या वाटेवरची...

**'कवी तो दिसतो** कसा आननी' असा प्रश्न ऐंशी-नव्वदच्या दशकांत डोंबिवलीकरांना कधीही पडला नाही. इतके कवी डोंबिवलीत दिसत की निर्धार करूनही त्यांना टाळणं शक्य नव्हतं त्या वेळी. बरं ते शहर पु. भा. भावे, शं. ना. नवरे, गोविंदराव तळवलकर वगैरेंसाठी ओळखलं जायचं. त्यामुळे त्या शहरातल्या प्रत्येक बोरूबहाद्दरास आपण लवकरच यांच्या पंगतीला जाऊन बसणार आहोत, असं वाटायचं. या त्याच्या वाटण्यावर त्या वेळी डोंबिवलीकरांचाही विश्वास बसत असणार. त्याशिवाय इतक्या कवींना गोड मानून घेणं शक्यच नाही. कवी/लेखकांच्या इतक्या सकल शहरी उत्पादनामुळे काव्यशास्त्रविनोदाचा बारमाही जल्लोष असायचा त्या शहरात.

द. भा. धामणस्कर त्या गर्दीत आपल्या कवितेला घेऊन मिरवायला कधीही गेले नाहीत. त्यामुळे त्यांची कविता खूप उशिरा भेटली. इनग्रिड बर्गमनच्या 'व्हेन यू हॅव फिनिशड् विथ अदर्स, दॅट इज माय टाइम' या वाक्याप्रमाणे. मराठी वाङ्मयातच मुळात हे असं होणं हे अप्रूप. डोंबिवली/ पुण्यात/ पार्ल्यात वगैरे एखादा राहतोय, 'सत्यकथा'त काही त्याचं प्रसिद्ध होतंय आणि तरीही तो हे मिरवत नाहीये.. हे सत्य उमगेपर्यंत बराच वेळ गेला. त्या वेळी डोंबिवली सांस्कृतिकदृष्ट्या (च) इतकी उत्सवी असायची, की नाव झालेला/ होऊ घातलेला/ होईल अशी आशा असलेला कवी-लेखक त्या शहरातल्या मुशायऱ्यात स्वतःच्या निर्मितीचं पाणी जोखून गेलेला नसणं अगदीच अशक्य. पण डोंबिवलीचे रहिवासी असूनही धामणस्कर कवितांचा रतीब घालत हिंडले नाहीत. हे असं व्रतस्थपणा न मिरवताही 'दास डोंगरी राहतो'सारखं व्रतस्थ असणं हे धामणस्करांचं आणि त्यांच्या कवितेचं मोठेपण.

ते कवितेसाठी वगैरे जगले नाहीत. ते कोणत्याही अन्य सामान्य डोंबिवलीकरांसारखेच दररोजचं जगणं सहन करत होते. हे असं जगताना कवी/कलाकार आपलं कवी/कलाकारपण नकळतपणे का असेना, पण मिरवतातच. एखाद्याला मधुमेह झाला की जवळचा नातेवाईक आपल्याला त्याची कशी काळजी आहे हे दाखवण्यासाठी मुद्दाम चारचौघांत 'तुझ्या चहात साखर घातली नाहीये बरं का' असं बोलून दाखवतो, तसं ही कलाकार मंडळी 'आम्ही तुम्हा मर्त्यांपेक्षा काही वेगळे आहोत' असं नेहमी दाखवून सर्वसामान्यास ओशाळं करतात. धामणस्करांनी असं केल्याचा एकही दाखला मिळणार नाही. इतक्या सहजपणे त्यांनी कविता आपल्यात जोजवली, की ती ओळखीची झाल्यावर आपण त्या वेळी धामणस्करांना ओळखू शकलो नाही, याची अनेकांना आता मनःपूर्वक लाज वाटत असेल. यात प्रस्तुत लेखकही आहे. एखाद्या सरकारी कारकुनाप्रमाणे निष्प्रभ असा धामणस्करांचा वावर असायचा. डोंबिवलीतल्या सीकेपी हॉल परिसरातल्या बँक कॉलनीत संध्याकाळी अन्य अनेक नोकरदारांप्रमाणे मान खाली घालून



आपल्याच तंद्रीत घरी परतणारे धामणस्कर अनेकांनी पाहिले असतील. आता ते दृश्य आठवलं की वाटतं.. त्या वेळी धामणस्करांना रस्त्यात अडवून त्यांची अथांग कविता लिहिणारे हात एकदा तरी हाती घ्यायला हवे होते..

*जास्वंदीची डहाळी*
*हातात फूल घेऊन*
*गाणे गात गात*
*वर-खाली झुलू लागली की समजा :*
*एक पक्षी तिच्यावर येऊन बसला आहे.*
*कालांतराने ती निमूट झाली की समजा:*
*पोटार्थी पक्षी*
*फूल कुरतडून निघून गेला आहे..*

हे वाचल्यावर भीती वाटली होती की आपलंही कवितेवरचं प्रेम हे असंच पोटार्थी तर नाही? जसंजसं धामणस्करांना अधिकाधिक वाचत गेलो तसतशी ही भीती कमी होत गेली आणि धामणस्करांमधल्या सच्चा कवीचीही ओळख होत गेली. या आपल्यातील कवीपणाची 'वसुली' समाजाकडून धामणस्करांनी कधीही केली नाही, ही किती मोठी गोष्ट आहे इतकं तरी या व्यवसायात चार दशकं गेल्यानंतर कळलं. कवीनं आपल्याच मठीत असावं आणि फुलावरनं झाड शोधायची गरज वाटलीच तर समाजानं कवितेच्या पाऊलखुणांवरून कवीचा माग काढावा, यातला मोठेपणाही जाणवू लागलाय आताशा. बाजारपेठशरणता जणू प्राक्तनच असं मानत तिचा स्वीकार करण्याची स्पर्धा जोमात सुरू असताना आपल्या आनंदासाठी आपल्याला हवी तशी कविता करणारे धामणस्कर मोठे का, हेदेखील कळू लागलंय काहीसं.

खानोलकर, विंदा, मर्ढेकर, रॉय किणीकर अशा काही मोजक्यांच्या कवितेप्रमाणे धामणस्करांच्या 'बरेच काही उगवून आलेले...'नंदेखील बरीच खोलवर टोचणी लावली. त्याही वेळी त्यांचे 'प्राक्तनाचे संदर्भ' माहीत नाही यावरून बरेच कवीप्रेमी खजिलही झालो होतो. धाकटीवरनं थोरलीची ओळख करून घ्यायची गरज वाटावी तशी त्यांच्या दुसऱ्या काव्यसंग्रहानं पहिल्याची आस लावली. म्हणजे आधी 'बरेच काही उगवून आलेले..', नंतर 'प्राक्तनाचे संदर्भ' हाती लागले. त्यांच्या 'पत्रोत्तर', 'कंदील विकणारी मुले', 'परिपक्व झाडे', 'दुराव्यानंतर', 'फळ पिकू आले की' अशा अनेक कविता इतक्यांदा आतल्या आत वाचल्या गेल्यात की ते सांगताही येणार नाही. या कवितांचा आवाज कधीही वाढत नाही. गवगवा करणाऱ्या चारचौघांत एखादा पुटपुटणारा असला की त्याचं जसं कान देऊन ऐकावं लागतं तशी धामणस्करांची कविता मनातल्या मनात वाचत ऐकावी लागते. तीसुद्धा कान देऊन. कारण काहीही भूमिका न घेता ती अनेक मुद्द्यांवर भूमिका घेते.

*'हल्ली बागकाम मी फारच मनावर घेतलंय*
*रोज सकाळ संध्याकाळ फांद्या छाटून*
*झाडांना मनाजोगते आकार द्यायचे*

*बागेची अशी काळजी घेऊन तिला*
*वेळीच पाणी देत गेले की झाडे*
*छान तरारतातच;*
*पण आणखीही अद्भुत घडते :*
*आपण बागेत आलो की*

*झाडे पिंजऱ्यातील पाळीव पोपटासारखी*
*प्रेमळ शीळ घालतात. एखाद् दिवस*
*आपण दिसताच ती जागच्या जागी,*

*घरच्या पोपटासारखाच, आनंदाने*
*थयथयाटही करतील.. आपण अगदी*
*मनावरच घेतलं तर काय अशक्य*
*आहे?'*

असं जेव्हा धामणस्करांची कविता विचारते तेव्हा ती सामाजिक/ राजकीय भूमिका घेत नाही, असं म्हणण्याचा अधिकार आपल्याला राहात नाही. ही अशी संयतता त्यांच्या कवितेचं मोठेपण आहे.

*माझी चाहुल लागताच पक्षी*
*घाबरून आकाशात उडाला...*

*मी माझ्या सुभाषितांच्या वहीत*
*एक नवीन वाक्य लिहिले :*
*क्षुद्रांकडून धोका संभवताच शहाणे*
*विराटाकडे धाव घेतात..*

त्यांच्या कवितेला अशा क्षुद्रांचा धोका नाही. पण तरीही जन्मतःच शहाणी असल्यानं ती कधीच विराटाच्या वाटेवर निघालेली आहे.

**त्या कवितेला अभिवादन!**

girish.kuber@ expressindia. com

द. भा. धामणस्कर यांच्या कवितेने मुक्तछंदाला वेगळे परिणाम दिले. आसपासची परिस्थिती झपाट्याने बदलत असतानाही आपल्या काव्य धर्माशी प्रतारणा न करता त्यांनी निष्ठेने काव्य लेखन केले. कवितेवर जीवापाड प्रेम करणारा एक प्रतिभासंपन्न कवी मराठी साहित्य विश्वाने गमावला आहे.

– **प्रा. मिलिंद जोशी,** ज्येष्ठ लेखक व वक्ते

■■■

मराठी कवितेतला देवमाणूस आणि मुक्तछंदाचा देव गेला. त्यांच्या इतका प्रभावी मुक्तछंद मी तरी मराठीत कुणाचा वाचला नाही. त्यांचे फक्त तीन काव्यसंग्रह आले, पण मराठीतले सगळे कवी त्यांना गुरूस्थानी मानायचे. कधी त्यांना भेटायला गेलो तर स्वतःच्या कवितांविषयी कधीच बोलायचे नाहीत. काव्य रसिक मंडळाचा एक आधारस्तंभ गेला.

– **आनंद पेंढारकर,** ज्येष्ठ कवी

■■■

आदर्श चारित्र्य, नैतिकता आणि कवितेमधील पावित्र्य जपणारा हा मोठ्या मनाचा कवी होता. संवाद साधणारा हा कवी होता. आपल्या घरातल्या माणसासारखा आपणास समजून घेणारा, आपल्या भावना व्यक्त कराव्यात असा हा उंची मनाचा कवी होता. द. भा. धामणस्कर यांच्या जाण्याने काव्य जगतात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

– **प्रा. राजीव जोशी,** ज्येष्ठ कवी

■■■

ज्येष्ठ साहित्यिक पु. भा. भावे, शं. ना. नवरे, त्यानंतर द. भा. धामणस्कर या साहित्यिकांमुळे डोंबिवलीची ओळख साहित्य नगरी अशी झाली. 'प्राक्तनाचे संदर्भ' हा काव्यसंग्रह त्यांच्या ज्येष्ठ कवित्वाची साक्ष आहे. आता त्यांच्या कविता फक्त आमच्याबरोबर असतील. ती मूर्ती पुन्हा दिसणार नाही, याचे दुःख सगळ्यांच्या मनात खोलवर दाटून आले आहे.

– **उज्ज्वला लुकतुके,** ज्येष्ठ कवयित्री






## आत्मचरित्र प्रकाशन राहूनच गेले...

**डोंबिवली :** ज्येष्ठ कवी द. भा. धामणस्कर यांनी आठवणीतील जुने काव्यानुभव, आपल्या काव्यमय प्रवासातील जुनी शिदोरी कागदावर उतरवून स्वतःचे आत्मचरित्र लिहिले होते. वर्ष, दीड वर्ष ते मेहनत घेत होते. आत्मचरित्राचे काम अगदी अंतिम टप्प्यात आले असताना, अगदी उंबरठ्यावर म्हणजे १२ सप्टेंबर रोजी या आत्मचरित्राचे प्रकाशन करण्याची तयारी सुरू असताना अचानक 'दभा' निघून गेले. त्यांच्या अचानक जाण्याने आत्मचरित्राच्या प्रकाशनाची तयारी करणाऱ्या आयोजकांना धक्का बसला आहे. आत्मचरित्र, कविता प्रकाशित होतील, पण त्या आता आपल्या आबांच्या अनुपस्थितीत, याची रूखरूख कुटुंबीयांना आहे.







टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
प्रस्तुत


लोकसत्ता यशस्वी भव! ६१






# एस.एस.सी. मार्गदर्शन - Mathematics Part I

## QUADRATIC EQUATION

Dear students, we already have done two methods of quadratic equation Let us move we will proced ahead to the next method .The Formula Method

Formula for solving a Quadratic Equation

A quadratic equation is an equation of the form $ax^2+bx+c=0$ where $a \neq 0$

Sometimes a quadratic equation cannot be solved easily by factorisation or completing the square . In such cases we use a general formula which works for every quadratic equation

$$x = \frac{-b \pm \sqrt{b^2-4ac}}{2a}$$

The quadratic formula gives the value of directly when the coefficients are known

Why do we use the Quadratic Formula

- Works for all quadratic equations
- Useful when factorisation is difficult
- Gives exact roots of the equation

**Steps To Use The Formula**

- Write the equation in the standard form 0
- Identify the values of
- Substitute these values into the quadratic formula
- Simplify and find the root

The quadratic formula is used whenever a situation cannot be solved by factorisation or by perfect square method

- Sports & games

(a) When a ball is kicked ,thrown or hit its path forms a parabola ( quadratic curve ) .The quadratic equation helps us to find * When the ball hit the ground * the maximum height reached

**Architecture & Construction**

Engineers use quadratic equation while designing

- Bridges • Arches • Tunnels • Roofs

The formula helps determine the correct dimension and height

- Business & Economics
- Companies use quadratic models to study
- Profit & Loss
- Revenue Optimisation
- Cost Minimization
- Physics

**Quadratic Equation are used to calculate**

- Motion of objects
- Time taken by a moving object
- Height & distance travelled
- Agriculture
  Farmers & planners use quadratic equation to design
- Rectangular fields with maximum area
- Fencing arrangements
- Irrigation layouts
- The formula method provides a universal technique that works for every quadratic equation
- Works for all quadratic equation
- Gives exact values of the roots

Formula method is like using GPS ---it always guides you to the answer even when no shortcut is visible

$\alpha$ & $\beta$ are the symbols used to represent the two roots ( solution ) of the equation

$ax^2 + bx + c = 0$ has two roots then we denote them as $x = \alpha$ & $x = \beta$

The formula is $\alpha = \frac{-b+\sqrt{b^2-4ac}}{2a}$

$\beta = \frac{-b-\sqrt{b^2-4ac}}{2a}$

Important relation between $\alpha$ & $\beta$

$ax^2+bx+c=0$ then $\alpha+\beta = -\frac{b}{a}$ & $\alpha \times \beta = \frac{c}{a}$

Nature of root of Quadratic Equation

For a quadratic equation $ax^2+bx+c=0$

The nature of roots depends on the value of the discriminant $\Delta = b^2 - 4ac$

1) If $\Delta > 0$ Two distinct real roots
2) If $\Delta < 0$ Two equal real roots
3) If $\Delta = 0$ No real roots ( Imaginary roots )

When discriminant is + (positive ) Two different roots
When discriminant is 0 ( Zero ) Equal Roots
When discriminant is ( Negative ) No real roots

The discriminant helps us to distinguish ( discriminate ) the nature of the root without actually solving the equation.

It appears inside the quadratic form $x = \frac{-b \pm \sqrt{b^2-4ac}}{2a}$

If is a perfect square the roots are usually rational

The relation between the roots of the quadratic equation & coefficient

If $\alpha$ & $\beta$ are the roots of the equation $ax^2+bx+c=0$

Then ( $a \neq 0$ ) then the relation between the roots & coefficient is

** Sum of the roots $\alpha+\beta = -\frac{b}{a}$

** Products of roots $\alpha \times \beta = \frac{c}{a}$

**Points to remember**

- The sum of roots depends on the coefficients of
- The product of roots depend on the constant term
- The relation works even when the roots are irrational or repeated

**These relationships help in**

1) Finding roots quickly
2) Forming a quadratic equation when roots are given
3) Solving words problems in quadratic equation

- Roots are not just numbers They represent meaningful values in real life such as
- Time when an object reaches ground
- Quantity at which profit becomes zero
- Dimension of a field or garden
- Points where a bridge or arch meet the ground

**Common mistakes to be avoided**

1) Forgetting to write the equation in the standard form
2) Ignoring the sign while taking square root
3) Incorrect calculation of discriminant
4) Arithmetic error during factorisation
5) Forgetting to divide and reduce the co-efficient of as and when required

Use only the method specified in the question because this a common error committed

Check the variable substituting like if the question has variable " m"

use " m" only not "$x$"

**HOME WORK**

(1) Solve
1) $2x^2+3x-2=0$
2) $x^2+4x+1=0$
3) $4x^2-4x+1=0$

(2) A school has sold tickets for a charity show & collected ₹ 2100. Adult tickets cost ₹60 each & student ticket cost ₹ 30 each. If the number of adult tickets sold was 5 less than twice the number of student tickets. Find the number of each type of ticket.

(3) A car travels 180 km If its speed had been 15 km/hour faster the journey would have taken one hour less Find its original speed.

(4) The number of students in each row of an auditorium is 6 more than the number of rows If there are 160 students in all find the number of rows.

(5) A rope is bent into the shape of a rectangle . The length is 3 more than the width . If the enclosed area is 70 m square, find its dimensions .

(6) The product of a mothers present age and her sons present age is 336. Eight years ago, the mothers age was four times her sons age. Find their present ages.

(7) Solve $3x^2 - 5x - 2 = 0$

(8) If $\alpha$ & $\beta$ are the roots of $x^2-9x+20=0$ find $\alpha^2+\beta^2$

(9) If $\alpha, \beta$ are the roots of $5x^2-9x+2=0$ find $(\alpha-\beta)^2$

(10) The roots of a quadratic equation are $\alpha+2$ and $\beta+2$ where $\alpha, \beta$ are the roots of $x^2-7x+10=0$ Form the new quadratic equation.

(11) If $\alpha, \beta$ are the roots of $x^2-5x+6=0$ form the equation whose square roots are $\alpha^2$ & $\beta^2$

(12) If $\alpha+\beta = 9$ and $\alpha \times \beta = 20$, find $\alpha - \alpha\beta + \beta^2$

(13) If $\alpha, \beta$ are the roots of $2x^2-3x-5=0$ evaluate $\frac{\alpha^2+\beta^2}{\alpha\beta}$

रेखा शेषनाथ प्रभू
(आरटीडी) स्कूल एस.के. पंत. डब्ल्यू. एम. व्ही. कुर्ला

उद्याचा विषय : गणित भाग I (बीजगणित)

समन्वयक - सी. डी. वडके

# भिन्न नव्हे, चुकीचे मत रागास कारण!

आरोग्य वार्ता

**नवी दिल्ली :** लोक केवळ इतरांचे विचार वेगळे आहेत म्हणून अस्वस्थ होत नाहीत, तर ते विचार चुकीचे किंवा असत्य माहितीवर आधारित आहेत असे वाटल्यामुळे अधिक चिडतात, असा निष्कर्ष युनिव्हर्सिटी ऑफ मिशिगनचे अंद्रास मोल्नर आणि कार्नेगी मेलॉन युनिव्हर्सिटीचे जॉर्ज लोवेनस्टाईन या मानसशास्त्रज्ञांच्या नव्या संशोधनातून समोर आला आहे.

यासाठी २,००० पेक्षा जास्त अमेरिकन प्रौढांवर केलेल्या अभ्यासात असे दिसून आले की, जेव्हा एखाद्याचे मत केवळ भिन्न नसून तथ्यहीन किंवा चुकीचे मानले जाते, तेव्हा लोकांमध्ये अधिक राग व निराशा निर्माण होते. अशा वेळी लोक समोरच्या व्यक्तीवर अविश्वास दाखवणे, त्यांना टाळणे किंवा सोशल मीडियावर 'ब्लॉक' करणे पसंत करतात.

संशोधकांच्या मते, चुकीच्या विचारांमुळे वाईट निर्णय घेतले जाण्याची भीती असते. त्यामुळे सामूहिक भावनेला धक्का पोहोचू शकतो, अशा विचाराने हा विचार करणारा वा सांगणारा व्यक्ती अज्ञानाने किंवा पूर्वग्रहाने ग्रस्त आहे, असा निष्कर्ष काढला जातो. त्यामुळेच लस, हवामान बदल किंवा निवडणुकांशी संबंधित वाद अधिक तीव्र होतात.







# जुन्या इमारतींत सुविधांसाठी नव्या अटींचा भार

## राज्य सरकारचा निर्णय, महापालिका, नगरपालिकांवरील जबाबदारीत वाढ

**राजेश प्रायकर, लोकसत्ता**

**नागपूर :** जुन्या इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत राज्य सरकारने जाहीर केलेल्या शासन निर्णयात नव्या अटींची भर पडली आहे. जुन्या इमारतीत नळ व सांडपाणी वाहिनीची सुविधा देताना 'रेनवॉटर हार्वेस्टिंग' व घनकचरा व्यवस्थापन बंधनकारक करण्यात आले आहे. महापालिका, नगरपालिका, नगर पंचायतींनी याबाबत पडताळणी केल्यानंतरच जुन्या इमारतीत पाणी व सांडपाणी वाहिनीची सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

राज्यातील मुंबई, पुणे, नागपूरसह सर्वच मोठ्या शहरांमध्ये जुन्या इमारती आहेत. राज्य सरकारने १० ऑगस्टला या इमारतींमध्ये नळ किंवा सांडपाणी वाहिनीची सुविधा देताना अटीसंदर्भात शासन निर्णय जाहीर केला. जुन्या इमारतींमध्ये आधीच रिक्त जागेचा प्रश्न कायम आहे. त्यात आता अटीनुसार त्यांना 'रेनवॉटर हार्वेस्टिंग' तसेच घनकचरा व्यवस्थापनाच्या उपाययोजना कराव्या लागणार आहे. एवढेच नव्हे जुन्या इमारत मालकाला किंवा विकासकाला नळजोडणी, सांडपाणी वाहिनीसाठी अर्जासोबत इमारत बांधकाम परवानगी व वैध संरचनात्मक स्थिरता (स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी) प्रमाणपत्र सादर करावे लागणार आहे.

नागपुरात एक हजारावर जुन्या इमारती आहेत. मुंबईत ही संख्या ११ हजारांवर आहे. पुण्यातही जुने वाडे, इमारतींची संख्या हजारांमध्ये आहे. बहुतांश इमारतींचा पुनर्विकास करण्यात येत आहे. अशावेळी नळ, सांडपाणी वाहिनी क्षतिग्रस्त होते. त्यामुळे या इमारतींमध्ये नळजोडणी, सांडपाणी वाहिनी जोडणीसाठी महापालिका, नगरपालिकांकडे अर्ज करावा लागतो. विविध कारणांसाठी हे अर्ज प्रलंबित आहे. आता शासन निर्णयानुसार 'रेनवॉटर हार्वेस्टिंग' व घनकचरा व्यवस्थापनाचीही अट जोडण्यात आल्याने नळजोडणी, सांडपाणी वाहिनी जोडणीसाठी अडचणीत वाढ होणार आहे.



### महापालिकांवर ताण?

जुन्या इमारतींमध्ये नळजोडणी, सांडपाणी वाहिनीच्या जोडणीसाठी अर्ज आल्यानंतर महापालिका अभियंत्याला प्रत्यक्ष भेट देऊन अहवाल तयार करावा लागणार आहे. अर्जदाराने 'रेनवॉटर हार्वेस्टिंग' व घनकचरा व्यवस्थापनाची सुविधा केल्याचे प्रमाणपत्र दिल्यानंतर पुन्हा एकदा अभियंत्याला प्रत्यक्ष ठिकाणी भेट देऊन अहवाल तयार करावा लागणार आहे. दोन्ही अहवाल परवानगी देणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांकडे सादर करावा लागणार आहे. एकीकडे सर्वच पालिका अपुऱ्या मनुष्यबळाचा सामना करीत आहे. त्यात आता जुन्या इमारतींची पाहणी, वस्तुस्थितीदर्शक अहवाल तयार करण्याबाबत ताण वाढण्याची शक्यता आहे.

### अहवालात 'या' बाबींचा समावेश आवश्यक

- इमारत बांधकाम परवानगी आहे काय?
- इमारतीचे संरचनात्मक स्थिरता प्रमाणपत्र वैध आहे काय?
- 'रेनवॉटर हार्वेस्टिंग', घनकचरा व्यवस्थापन, जैव गाळ व्यवस्थापनासाठी पुरेशी जागा आहे काय? ते केल्यास इमारतीला किंवा परिसरातील इमारतीला धोका होऊ शकतो काय?
- इमारतीतील गॅसजोडणी, विद्युत जोडणीचे नुकसान होईल काय?

**MBBS**

Ministry Of Health Of Russia
**SMOLENSK STATE MEDICAL UNIVERSITY, RUSSIA**
**Invites Indian students for direct Government Admissions**
**Recognized by India, WHO, USA & UK, Min. Qual. 50% in XII in PCB**
**Satisfies all requirements of NMC of India**

**UNIVERSITY** – 106 years old Medical University. The University is situated in the center of the Smolensk city. Smolensk is situated 380 km west of Moscow. Very high standards of education, strict disciplinary system. **2400** Indian students (**1100** Girls) studying, **275** got degree in **2026.** Duration 6 years including internship and License. English Medium in all years, Closed type campus system, **8** attached hospitals (**9000** Beds).
**MCI SCREENING TEST** – Our graduates of **2008** to **2025** have given **BEST** results among graduates of all foreign medical colleges (Official web sites of Indian Embassy, Moscow and NBC conducting Screening Test confirm this).
**SPECIAL HOSTELS ONLY FOR INDIAN STUDENTS (BEST HOSTELS IN RUSSIA)** 2 and 4 seated big rooms, separate hostels for boys and girls.
**INDIAN MESS** - Mess with **Indian food** cooked by **Indian cooks**.
**Fee** (Tuition+Hostel+Med.Ins.) – **USD 6000** (Approx. Rs. 5,75,000/-) per year and one time payment of Rs.1,50,000/- (By Bank Draft only) which includes – Admission procedure, invitation letter, student visa, air ticket Delhi - Moscow.
**Scholarship to all Indian students.** Bank loans from Indian banks available.
Contact Foreign advisor to Chancellor: Dr.Alok Aeron+79605805555(Russia)
**Official web site: www.sgmu.info DM us on insta: @sgmu.info**
**Admission details: admission.sgmu.live**
**INFORMATION CENTERS (Parents of Students or Our Graduates):**
**Nagpur** - Mr. Durbule – 9673114020
**Yavatmal & Amravati** - Dr. Deshmukh – 9422865182
**Wardha** - Mr. Thool – 9922704127, **Chandrapur** - Mrs. Tajne – 8010868187
**Gadchiroli** - Mrs. Warbhe – 9096510675, **Akola:** Dr. Kulkarni – 9112255993

# हरित भारत अभियानाची उद्दिष्टे कागदावरच

## वनवाढीत ९८ टक्के तूट; 'कॅग'चा ठपका

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** देशातील वनक्षेत्र वाढवण्याच्या उद्देशाने राबवण्यात येणाऱ्या 'हरित भारत अभियाना'च्या अंमलबजावणीवर 'कॅग'ने गंभीर प्रश्न उपस्थित केले. २०१५-१६ ते २०२४-२५ या दहा वर्षांत वनक्षेत्राची गुणवत्ता सुधारण्याचे, वनाच्छादन वाढवण्याचे उद्दिष्ट मोठ्या प्रमाणात अपूर्ण राहिल्याचे 'कॅग'च्या कामगिरी लेखापरीक्षणातून स्पष्ट झाले. निर्धारित उद्दिष्टाच्या तुलनेत प्रत्यक्ष वनाच्छादनवाढ तब्बल ९८ टक्क्यांनी कमी आहे.

'कॅग'च्या अहवालानुसार, वनक्षेत्राची गुणवत्ता १४ लाख हेक्टरने सुधारण्याचे उद्दिष्ट असताना प्रत्यक्षात केवळ १.१ लाख हेक्टर क्षेत्रात सुधारणा झाल्याचे आढळले. म्हणजेच या उद्दिष्टात सुमारे ९२ टक्के तूट राहिली. त्याचप्रमाणे १४ लाख हेक्टर क्षेत्रात वनाच्छादन वाढवण्याचे लक्ष्य होते. प्रत्यक्षात केवळ ०.३ लाख हेक्टर क्षेत्रातच वाढ नोंदविण्यात आली. त्यामुळे या उद्दिष्टात तब्बल ९८ टक्के तूट राहिल्याचे 'कॅग'च्या अहवालात नमूद आहे. हवामान बदलाच्या दृष्टीने अधिक संवेदनशील क्षेत्रांना प्राधान्य देणे अपेक्षित असताना, त्याऐवजी कमी किंवा मध्यम प्राधान्याच्या क्षेत्रांची वृक्षलागवडीसाठी निवड करण्यात आल्याचे लेखापरीक्षणात आढळले. त्यामुळे अभियानाच्या मूळ उद्दिष्टालाच धक्का बसल्याचे 'कॅग'ने नमूद केले.

वनाच्छादन वाढवणे, वन आणि अवनत जमिनीची गुणवत्ता सुधारणे, जैवविविधता, जलसंधारण आणि कार्बन शोषणासारख्या परिसंस्था सेवा बळकट करणे, तसेच जंगलांवर अवलंबून असलेल्या कुटुंबांचे उत्पन्न वाढवणे, ही या अभियानाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. अभियानाच्या अंमलबजावणीतील आणखी एक गंभीर बाब लेखापरीक्षणातून समोर आली. भौगोलिक माहिती प्रणालीच्या आधारे करण्यात आलेल्या विश्लेषणात नमुना तपासणी केलेल्या सुमारे ७० टक्के ठिकाणी हरित भारत अभियानामुळे झालेला कोणताही लक्षणीय बदल दिसून आला नाही. उलट, काही ठिकाणी उपलब्ध आकडेवारीत वाढीव किंवा अतिशयोक्तीपूर्ण कामगिरी दाखवण्यात आल्याचेही 'कॅग'ने निदर्शनास आणले. अभियानाच्या देखरेखीतही त्रुटी आढळल्या. तब्बल १४ राज्यांनी आवश्यक सार्वजनिक संकेतस्थळांच्या दुव्यांची माहिती उपलब्ध करून दिली नाही. अभियानाच्या कामकाजाची पारदर्शकता, प्रत्यक्ष प्रगतीची पडताळणी यावरही प्रश्न निर्माण झाले. 'कॅग'ने २०१५-१६ ते २०२४-२५ या कालावधीतील अभियानाच्या नियोजन, अंमलबजावणी आणि देखरेखीचे १६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये परीक्षण केले. त्यात निधी व्यवस्थापनातील त्रुटी, विविध योजनांमध्ये अपेक्षित समन्वयाचा अभाव, हरित क्षेत्र वाढवण्यासाठी योजनांचे एकत्रीकरण न होणे, अपुरी देखरेख या बाबी समोर आल्या.







आपत्काले रक्षिष्यामि
GIC Re

प्रगतीला चालना देणारी आणि गतिची उभारणी करणारी कामगिरी



नक्त मूल्य: 30.06.2026: ₹53,124 कोटी; 30.06.2025: ₹45,275 कोटी
ढोबळ प्रिमियम: 30.06.2026: ₹13,475 कोटी; 30.06.2025: ₹12,388 कोटी
सॉल्व्हन्सी गुणोत्तर: 30.06.2026: 432%; 30.06.2025: 385%
करोत्तर नफा: 30.06.2026: 1,922 कोटी; 30.06.2025: 1,752 कोटी

30 जून 2026 रोजी संपलेल्या पहिल्या तिमाहीचे आर्थिक निष्कर्ष

(₹ कोटी मध्ये)

| अनु. क्र. | तपशील | स्टॅंडअलोन | | | एकत्रित | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संपलेली तिमाही (तीन महिने) (30.06.2026) पुनरावलोकित | आजच्या तारखेपर्यंत वर्षाचे आकडे (तीन महिने) (30.06.2026) पुनरावलोकित | आधीच्या वर्षात संपलेले तदनुरुप तीन महिने (30.06.2025) पुनरावलोकित | संपलेली तिमाही (तीन महिने) (30.06.2026) पुनरावलोकित | आजच्या तारखेपर्यंत वर्षाचे आकडे (तीन महिने) (30.06.2026) पुनरावलोकित | आधीच्या वर्षात संपलेले तदनुरुप तीन महिने (30.06.2025) पुनरावलोकित |
| 1. | कामकाजांतून एकूण उत्पन्न $ | 13,475 | 13,475 | 12,388 | 13,542 | 13,542 | 12,417 |
| 2. | कालावधीसाठी निव्वळ नफा /(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/किंवा असामान्य बाबीपूर्व#) | 2,490 | 2,490 | 2,244 | 2,192 | 2,192 | 2664 |
| 3. | कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असामान्य बाबींच्या पश्चात#) | 2,490 | 2,490 | 2,244 | 2,192 | 2,192 | 2,664 |
| 4. | कालावधीसाठी करपश्चात निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असामान्य बाबींच्या पश्चात#) | 1,922 | 1,922 | 1,752 | 1,744 | 1,744 | 2,531 |
| 5. | कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न कालावधीसाठी नफा(/तोटा) (करपश्चात) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करपश्चात) | 1,922 | 1,922 | 1,752 | 1,744 | 1,744 | 2,531 |
| 6. | समभाग भांडवल | 877 | 877 | 877 | 877 | 877 | 877 |
| 7. | आधीच्या वर्षांच्या लेखापरिक्षित ताळेबंद पत्रकात दाखवल्याप्रमाणे गंगाजळी (पूनर्मूल्यांकन गंगाजळी वगळून) | 54,845 | 54,845 | 46,240 | 60,127 | 60,127 | 51,010 |
| 8. | प्रति भाग (प्रत्येकी रु. 5/- च्या) अर्जन (चालू ठेवलेल्या आणि खंडित केलेल्या कामकाजांसाठी)- | | | | | | |
| | अ. पायाभूत | 10.96 | 10.96 | 9.99 | 9.94 | 9.94 | 14.42 |
| | ब. सौम्यीकृत | 10.96 | 10.96 | 9.99 | 9.94 | 9.94 | 14.42 |

टीप:
अ. उक्त हे सेबी (लिस्टिंग अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) नियमने, 2015 च्या नियमन 33 च्या अधीन स्टॉक एक्स्चेंजेसकडे दाखल केलेल्या तिमाही आणि आजच्या तारखेला वर्षांच्या आर्थिक निष्कर्षांच्या सविस्तर प्रारुपातील एक उतारा आहे. लेखापरिक्षकांच्या अहवालासह तिमाही आणि आजच्या तारखेला वर्षांच्या आर्थिक निष्कर्षांचे पूर्ण प्रारुप स्टॉक एक्स्चेंजेसच्या **(www.bseindia.com)** आणि **(www.nseindia.com)** वेबसाइटसवर उपलब्ध आहे आणि ते कॉर्पोरेशनच्या वेबसाइटवर **(https://www.gicre.in/images//2026/OutcomeofBM13thaugust2026f.pdf)** टाकण्यात आले आहेत आणि ते क्यूआर कोड स्कॅन करून पाहता येतील.
ब. $ कामकाजातून एकूण उत्पन्न ढोबळ लिखित प्रिमियम रिइन्शुरन्सचा ढोबळ आणि लागू असलेल्या करांच्या नक्त आहे.
क. # सध्या इंडियन अकाउंटिंग स्टॅंडर्डस् (इंड एएस) भारतातील इन्शुरन्स कंपन्यांना लागू नाही.

ठिकाण: मुंबई
दिनांक: 13.08.2026

वर प्रदर्शित केलेला जीआयसी आरई ट्रेड लोगो जीआयसी आरई च्या मालकीचा आहे आणि त्याचा वापर जीआयसी आरई द्वारे परवाना अधीन केला जात आहे, 'सुरक्षा', 170, जमशेडजी टाटा रोड, चर्चगेट, मुंबई - 400020, दूरध्वनी: +91 22 2286 7000
**CIN:** L67200MH1972GOI016133 IRDAI reg: 112 | website **www.gicre.in**

भारतीय सर्वसाधारण विमा महामंडळासाठी आणि वतीने
सही/-
**हितेश जोशी**
**अध्यक्ष सह व्यवस्थापकीय संचालक**
**डीआयएन: 09322218**

**भारतीय सर्वसाधारण विमा महामंडळ**
'सुरक्षा, 170, जमशेडजी टाटा रोड, चर्चगेट, मुंबई - 400020, भारत । दूरध्वनी (बोर्ड) +91 22 2286 7000 • इमेल आयडी: investors.gic@gicre.in
IRDAI Registration No.: 112 CIN No.: L67200MH1972GOI016133 www.gicre.in

# संक्षिप्त

## ‘राज्य सरकार नोकऱ्या देऊ शकत नाही का?’

**नवी दिल्ली :** तमिळनाडूच्या करूर येथे झालेल्या चेंगराचेंगरीत मृत्युमुखी पडलेल्यांच्या नातेवाइकांना सरकारी नोकऱ्या देण्याच्या तामिळनाडू सरकारच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी तूर्त दिलासा दिला. मद्रास उच्च न्यायालयाने मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांच्या नेतृत्वाखालील सरकारचा हा निर्णय रद्द केला होता. त्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली. न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने सरकारच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकाकर्त्यांना तसेच अन्य संबंधितांना नोटीस बजावली. सरकार आणि अन्य पक्षांनी उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देत सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

## समय रैनासह पाच जणांवरील गुन्हे रद्द

**नवी दिल्ली :** अपंग व्यक्तींविषयी आक्षेपार्ह वक्तव्ये केल्याप्रकरणी विनोदी कलाकार समय रैना आणि अन्य चार जणांविरोधातील कारवाई सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी रद्द केली. अपंगांच्या सन्मानासाठी आणि त्यांच्या समस्यांबाबत जनजागृती करण्यासाठी या पाच जणांनी केलेल्या प्रयत्नांचे न्यायालयाने कौतुक केले. रैना याच्यासह विनोदी कलाकार विपुल गोयल, बलराज परमजीतसिंग घई, सोनाली ठक्कर आणि निशांत जगदीश तन्वर यांच्याविरोधातील एफआयआर आणि त्याआधारे सुरू असलेली कारवाईही न्यायालयाने रद्द केली. सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. या पाच जणांनी मार्चमध्ये अपंगांसाठी बुद्धिबळ स्पर्धा आयोजित केली होती.

## विद्यार्थी आंदोलनाचा एकविसावा दिवस

**रांची :** झारखंडमधील स्पर्धा परीक्षांमधील गैरकारभाराविरोधात ‘जेपीएससी-जेएसएससी रिफॉर्म्स मंच’च्या बॅनरखाली विद्यार्थ्यांचे आंदोलन शुक्रवारी २१ व्या दिवशीही सुरूच राहिले. देशाच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त १५ ऑगस्टला ‘तिरंगा यात्रा’ काढून हे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा विद्यार्थ्यांनी दिला आहे. पारदर्शक परीक्षा, रद्द केलेल्या परीक्षा पुन्हा घेणे आणि सीबीआय किंवा बाहेरच्या राज्यातील निवृत्त न्यायाधीशांमार्फत स्वतंत्र चौकशी करण्याची प्रमुख मागणी आंदोलकांनी केली आहे.

## ‘ब्रिक्स’साठी इराणचे अध्यक्ष भारतात ?

**नवी दिल्ली :** इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान ‘ब्रिक्स’ देशांच्या शिखर परिषदेसाठी भारतात येणार असल्याची माहिती इराणमधील सूत्रांनी दिली. सप्टेंबर महिन्यात ही परिषद दिल्ली येथे होणार आहे. यंदाच्या शिखर परिषदेचे यजमानपद भारत भूषवीत आहे. यापूर्वी ऑक्टोबर २०२४मध्ये मसूद पेझेश्कियान यांनी ‘ब्रिक्स’ परिषदेपूर्वी रशियामध्ये कझान येथील परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती.

# प्रश्नपत्रिका फुटीविरोधात सर्वंकष सुधारणा

## स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपतींचे राष्ट्राला उद्देशून भाषण

**पीटीआय, नवी दिल्ली**

‘‘**प्रश्नपत्रिका फुटींचे** प्रकार आणि अनुचित मार्ग पूर्णपणे रोखण्यासाठी केंद्र सरकार सार्वजनिक परीक्षांमध्ये सुधारणा करण्यासाठी सर्वंकष पावले उचलत आहे,’’ असे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शुक्रवारी सांगितले. ‘नीट-यूजी’ परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्यापासून विद्यार्थ्यांमधील अस्वस्थता वाढीला लागली असून व्यवस्थेत आमूलाग्र बदल करण्यासाठी विद्यार्थी ठिकठिकाणी आंदोलने करत आहेत. त्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक परीक्षा पारदर्शक, सुरक्षित आणि विश्वासार्ह केली जाईल, असे आश्वासन मुर्मू यांनी विद्यार्थी आणि तरुणांना दिले.

देशाच्या ८०व्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला देशाला उद्देशून भाषण करताना राष्ट्रपतींनी विद्यार्थी हे भारताच्या भविष्याचे रचनाकार आहेत, असे नमूद केले. राष्ट्रीय सुरक्षा कायम राखण्यासाठी सरकार आणि समाज एकत्र आहेत, त्याचप्रमाणे प्रत्येकाने विद्यमान व भविष्यातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी संयुक्त आणि एकत्रित प्रयत्न केले पाहिजेत, असे आवाहन राष्ट्रपतींनी केले. तसेच तरुण आता रोजगारनिर्मिती करत आहेत, असे म्हणत त्यांनी तरुणाच्या उद्यमशीलतेचेही कौतुक केले. अनेक तरुण आता नोकऱ्या मागण्याऐवजी स्वतः नोकऱ्यांची निर्मिती करत आहेत, असे मुर्मू म्हणाल्या.



अनेक तरुण स्वयंरोजगाराच्या मार्गावर वाटचाल करत असताना रोजगारनिर्मितीची संस्कृती आपलीशी करत आहेत. तरुण उद्यमींच्या सहभागामुळे आपल्या देशात स्टार्टअपचे मजबूत जाळे निर्माण झाले आहे. भारतीय तरुणांची प्रतिभा आणि समर्पण यामुळे प्रमुख जागतिक उद्योग प्रभावित झाले आहेत.

**– द्रौपदी मुर्मू,** राष्ट्रपती

### भाषणापूर्वी संपूर्ण ‘वंदे मातरम’

राष्ट्रपतींच्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला केल्या जाणाऱ्या भाषणापूर्वी आणि नंतर पहिल्यांदाच ‘वंदे मातरम’ हे राष्ट्रीय गीत संपूर्ण स्वरूपात वाजवले गेले. त्यानंतर राष्ट्रगीत जन गण मन वाजवले गेले. भाषणातही राष्ट्रपतींनी या गीताने स्वातंत्र्य चळवळीत बजावलेल्या भूमिकेचे स्मरण केले.

### सर्वाधिक वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था

पश्चिम आशियातील युद्ध आणि अस्थिरतेमुळे जगातील अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांवर परिणाम होत असतानाही भारत आर्थिकदृष्ट्या भक्कमपणे पुढे आहे. जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून भारताची वाटचाल जोमाने सुरू आहे. भारताचा आर्थिक विकासदर जागतिक सरासरीच्या दुपटीपेक्षा अधिक राहण्याचा अंदाज आहे, असे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले.

### देशाच्या सुरक्षेवर भर

भाषणात राष्ट्रपतींनी कारगील विजय दिवस, ‘ऑपरेशन सिंदूर’ आणि नक्षलवादविरोधी मोहिमेची प्रशंसा केली. त्याबरोबरच धोरणात्मक निर्णय म्हणून सिंधू जलवाटप करार स्थगित करण्याच्या निर्णयाचे ‘निर्णायक पाऊल’ असे वर्णन केले.

# शौर्य पुरस्काराची घोषणा

## सैन्य दले आणि केंद्रीय सशस्त्र पोलीस दलांच्या सैनिक आणि अधिकाऱ्यांचा गौरव

**पीटीआय, नवी दिल्ली**

**राष्ट्रपती द्रौपदी** मुर्मू यांनी शुक्रवारी स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला सैन्य दले आणि केंद्रीय सशस्त्र पोलीस दलांच्या सैनिक आणि अधिकाऱ्यांना ७८ शौर्य पुरस्कार मंजूर केले, यापैकी १३ जणांना मरणोत्तर पुरस्कार दिले जाणार आहेत. पुरस्कारांमध्ये नऊ किर्ती चक्रे, १९ शौर्य चक्रे, एक बार टू शौर्य चक्र, पाच बार टू सेना पदके आणि ३६ सेना पदके, तीन नौसेना पदके, पाच वायूसेना पदके यांचा समावेश आहे. किर्ती चक्र हा शांतता काळातील कामगिरीसाठी दिला जाणारा अशोक चक्रानंतर दुसऱ्या क्रमांकाचा, तर शौर्य चक्र हा तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार आहे.

३६ राष्ट्रीय रायफल्सचे मेजर परमवीर, ५७ राष्ट्रीय रायफल्सचे मेजर तरुण वासुदेवन, १२ डोगरा रेजिमेंटचे मेजर केशव कुमार, २१ ग्रेनेडियर्सचे मेजर गौरव सिंग ब्रिजवाल, ११ राष्ट्रीय रायफल्सचे मेजर विपीन कुमार, ३ आसाम रायफल्सचे नायब सुभेदार शंकर राम आणि २१ पॅराचे (स्पेशल फोर्स) नायब सुभेदार डब्बल सिंग बिश्त, ४ पॅराचे (स्पेशल फोर्सेस) हवालदार जगत्तर सिंग, ९ राष्ट्रीय रायफल्सचे लान्स नाईक नरेंद्र सिंधू (मरणोत्तर), ११ राष्ट्रीय रायफल्सचे लान्स नाईक कपिल देव, ७ शीख लाइट इन्फंट्रीचे शिपाई जसविंदर सिंग, नौदलाचे लेफ्टनंट कमांडर शिवम कुमार, हवाई दलाचे स्क्वाड्रन लीडर सुधीर कुमार, डेप्युटी सुपरिटेन्डंट धीरज सिंग कटोच, इन्स्पेक्टर अजय सिंग चिब, डेप्युटी सुपरिटेन्डंट सुखवीर सिंग, असिस्टंट इन्स्पेक्टर नियाज अहमद, डेप्युटी कमांडंट अंजनी कुमार आणि कॉन्स्टेबल दीपक साह हे शौर्य चक्र पुरस्काराचे मानकरी आहेत. ४४ आसाम रायफल्सचे मेजर आदित्य प्रताप सिंह यांना दुसऱ्यांदा शौर्य चक्र पुरस्काराने गौरवण्यात येत आहे.

### नऊ जणांना कीर्ती चक्र

२१ पॅराचे (स्पेशल फोर्सेस) लेफ्टनंट जनरल मनोज फ्रान्सिस आणि २ पॅराचे (स्पेशल फोर्सेस) मेजर जितेंद्र राठी यांना शौर्य पुरस्कार जाहीर झाला. सात जणांना मरणोत्तर कीर्ती चक्र पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यामध्ये हवालदार गजेंद्र सिंग (२ पॅरा - स्पेशल फोर्सेस), जगबीर सिंग (हेड कॉन्स्टेबल), जसवंत सिंग (कॉन्स्टेबल), बलविंदर सिंग (कॉन्स्टेबल), तारिक हुसेन (कॉन्स्टेबल), बशीर अहमद (हेड कॉन्स्टेबल) आणि सुनील कुमार (इन्स्पेक्टर) यांचा समावेश आहे.

# मोदी असते तर फाळणी झाली नसती!

## योगी आदित्यनाथ यांचा दावा; भाजपकडून वेदनादायक स्मृतींना उजाळा

**पीटीआय, लखनऊ**

**नवी दिल्ली :** स्वातंत्र्य मिळाले तेव्हा नरेंद्र मोदी किंवा सरदार वल्लभभाई पटेल पंतप्रधान असते तर देशाचे विभाजन झाले नसते, असा दावा उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी शुक्रवारी केला. देशाच्या फाळणीला काँग्रेस जबाबदार असल्याचा आरोप त्यांनी केला.

केंद्र सरकारतर्फे २०२१ पासून १४ ऑगस्ट हा दिवस ‘फाळणी वेदना स्मृती दिन’ म्हणून पाळला जातो. यानिमित्त लखनऊमध्ये आयोजित कार्यक्रमात बोलताना योगी आदित्यनाथ म्हणाले, की ‘‘१९४७मध्ये पाकिस्तानने मागणी केलेली नसतानाही त्यांना सिंध, बंगाल आणि पंजाबचा हिंदूबहुल भाग देण्यात आला. त्यातही बंगालमधील बंगाली बहुल गावे बांगलादेशसाठी जबरदस्तीने रिकामी करायला लावण्यात आली. सत्तेसाठी अधीर झालेल्या काँग्रेसची ही लज्जास्पद कृती होती,’’ असा आरोप आदित्यनाथ यांनी केला.

भाजपतर्फेही विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. पक्षाचे अध्यक्ष नितीन नबीन, केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनीही फाळणीच्या स्मृतींना उजाळा दिल.

स्वातंत्र्याच्या वेळी नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान असते तर कोणालाही देशाचे थोडेही नुकसान करता आले नसते. सरदार वल्लभभाई पटेल यांच्यासारखी व्यक्ती पंतप्रधान असती तर कोणीही देशाची विभागणी करू शकले नसते. काँग्रेसच्या भ्याडपणामुळे देशाला किंमत चुकवावी लागली.

**– योगी आदित्यनाथ,** मुख्यमंत्री, उत्तर प्रदेश



**देशाच्या ८०व्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला नागरिकांमध्ये उत्साह आहे. चेहरा तिरंग्यात रंगवणे, तिरंगी साड्यांची खरेदी, राष्ट्रध्वज खरेदी करणे अशा विविध प्रकारे सर्व थरांतील आणि वयोगटातील लोक आनंद साजरा करत आहेत.**

### पंतप्रधानांकडून आदरांजली

फाळणीच्या वेळी झालेल्या हिंसाचारात मृत्युमुखी पडलेल्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही शुक्रवारी आदरांजली वाहिली. इतिहासातील हा असा क्षण होता की ज्याने अनेक कुटुंब उद्ध्वस्त झाली. अनेकांनी आपली जवळची माणसं गमावली, प्रचंड वेदना सहन केल्या. या भयंकर संकटाला सामोरे जाऊन लोकांनी पुन्हा शून्यातून उभारी घेतली आणि स्वतःबरोबरच देशाच्या प्रगतीमध्ये योगदान दिले, असे मोदी म्हणाले.

# ‘पंतप्रधानांवरील टीका ही छछोरगिरी’

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे राहुल गांधींना प्रत्युत्तर

**लोकसत्ता वार्ताहर**

**जालना :** दिल्लीतील ‘रचनात्मक काँग्रेस’च्या राष्ट्रीय अधिवेशनात गुरुवारी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी परराष्ट्र धोरणाच्या मुद्द्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केलेल्या टीकेची संभावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ‘छछोरगिरी’ या एका शब्दात केली आहे.

परदेशी नेत्यांना मिठ्या मारणे म्हणजे परराष्ट्र धोरण नव्हे, अशी नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करून राहुल गांधी यांनी ‘रचनात्मक काँग्रेस’चे प्रमुख संदीप दीक्षित यांना मिठी मारून यासंदर्भातील प्रात्यक्षिक दाखविले होते. यासंदर्भात प्रश्नावर उत्तर देताना फडणवीस म्हणाले, ‘‘आपल्या देशात अशी छछोरगिरी यापूर्वी कोणत्याही नेत्याने केलेली नाही. भारताचे पंतप्रधान आणि इटलीच्या महिला राष्ट्रप्रमुखांना खालच्या दर्जावर जाऊन राहुल गांधी यांनी अवमानित केल्याचे माझे मत आहे. राहुल गांधी आणि संदीप दीक्षित यांनी याप्रकरणी देशाची माफी मागितली पाहिजे.’’

### ‘आदर दाखवा,’ परराष्ट्र मंत्रालयाची प्रतिक्रिया

नवी दिल्ली : भारत आणि इटलीदरम्यान मजबूत संबंध असून सार्वजनिक मंचावर परस्परांविषयी आदर दाखवला पाहिजे, असे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल शुक्रवारी म्हणाले. काँग्रेस नेते राहुल गांधी आणि संदीप दीक्षित यांनी मोदींच्या परराष्ट्र धोरणाची खिल्ली उडवताना इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांच्याबद्दल टिप्पणी केली होती.

# राहुल गांधींविरोधात मानहानी तक्रार रद्द

## सावरकरांवरील टिप्पणीप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचा निकाल

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**



**काँग्रेस नेते** राहुल गांधी यांनी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्याबद्दल केलेल्या टिप्पणीप्रकरणी त्यांच्याविरोधातील फौजदारी मानहानी तक्रार सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी फेटाळली. तसेच राहुल यांच्याविरोधात कनिष्ठ न्यायालयाने बजावलेले समन्सही न्या. दीपंकर दत्ता आणि न्या. शील नेगू यांच्या खंडपीठाने रद्द केले. यासाठी कायद्याने आवश्यक मंजुरी घेतली गेली नव्हती, असे न्यायालयाने देताना स्पष्ट केले.

याप्रकरणी तक्रारदार ॲडव्होकेट नृपेंद्र पांडे यांनी राहुल गांधी हे सावरकर यांची बदनामी करून सामाजिक दुही पसरवत असल्याचा आरोप करत त्यांच्याविरोधात तक्रार दाखल होती. त्यावर, भारतीय दंड संहितेच्या १५३अ अंतर्गत (दोन गटांमध्ये शत्रुत्वाला प्रोत्साहन देणे) गुन्ह्याची दखल घेण्यासाठी राज्य सरकारची परवानगी घेणे हे फौजदारी दंड संहितेच्या कलम १९६अंतर्गत अनिवार्य आहे, असे न्यायाल्याने नमूद केले आणि तक्रारदारांकडे विचारणा केली. त्यावर परवानगी घेतली नसल्याचे अतिरिक्त महान्यायअभिकर्ता के एम. नटराज यांनी मान्य केले. तक्रारदाराचे वकील यांनी उत्तर प्रदेशात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रातही अशी मंजुरी घेतली नसल्याचे नमूद केले होते. त्यामुळे तक्रार आणि समन्स रद्द करत असल्याचे न्यायालयाने सांगितले.

**पूर्वपीठिका** राहुल गांधी यांनी ‘भारत जोडो यात्रे’दरम्यान १७ नोव्हेंबर २०२२ रोजी अकोला जिल्ह्यातील एका जाहीर सभेत सावरकरांबद्दल टिप्पणी केली होती. ‘सावरकर हे ब्रिटिशांचे नोकर होते आणि त्यांनी ब्रिटिशांकडून पेन्शन घेतली होती,’ असे राहुल म्हणाले होते. त्याबद्दल ॲडव्होकेट नृपेंद्र पांडे यांनी उत्तर प्रदेशातील एका न्यायालयात त्यांच्याविरोधात मानहानीची तक्रार दाखल केली. त्याविरोधात राहुल यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनऊ खंडपीठात याचिका दाखल केली होती. उच्च न्यायालयाने ४ एप्रिल २०२५ रोजी दिलेल्या निकालात राहुल यांना दिलासा द्यायला नकार देताना सत्र न्यायालयासमोर फेरविचार याचिका दाखल करण्यास सांगितले होते. त्याला राहुल यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले.

# चिनी उत्पादनांसाठी भारतातून ‘छुपा मार्ग’!

## अमेरिकी आयातशुल्क चुकवण्यासाठी सहभाग, व्हाइट हाऊसचा ठपका

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**



**अमेरिकेने लादलेले** भरमसाठ आयात शुल्क चुकवण्यासाठी चीनने भारतासह सुमारे ४० हून अधिक देशांना ‘छुप्या मार्गा’सारखे वापरल्याचा गंभीर आरोप व्हाईट हाऊसच्या ताज्या अहवालात करण्यात आला आहे. इतर देशांमध्ये थोडीफार प्रक्रिया आणि वेष्टनांत बदल करून, अमेरिकेत धाडल्या जाणाऱ्या चिनी वस्तूंद्वारे अब्जावधी डॉलरचे आयात शुल्क चुकवले गेल्याचे सांगणाऱ्या ‘ग्रेट ट्रान्सशिपमेंट स्कॅम’ असे नाव दिले गेलेल्या या अहवालात, भारताच्या भूमिकेवरही ठपका ठेवण्यात आला आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे सल्लागार पीटर नवारो यांच्या अंदाजानुसार, या बेकायदा व्यापार मार्गाच्या माध्यमातून ६,००० कोटी डॉलरच्या वस्तू अमेरिकेत आल्या. यामुळे अमेरिकी सरकारला अब्जावधी डॉलरच्या आयात शुल्कावर पाणी सोडावे लागले. अशा प्रकारे बेकायदा व्यापार मार्गामध्ये सहभागी असलेल्या देशांवर कठोर कारवाईची मागणी या अहवालात करण्यात आली आहे. या देशांविरोधात तातडीने प्रतिबंधात्मक कारवाई, दंडात्मक शुल्क आकारणी आणि बाजारपेठेत मनाई असे पाऊल उचलण्याची शिफारस अहवालात करण्यात आली आहे.

व्हाईट हाऊसच्या अहवालात छुप्या व्यापार मार्गाचे जाळे २०१८पासून सुरू झाल्याचा उल्लेख आहे. त्यावेळी चीनबरोबरच्या व्यापारात तूट असल्याने तत्कालीन ट्रम्प प्रशासनाने चिनी वस्तूंवर जादा आयातशुल्क आकारले होते. यानंतर आधी थेटपणे अमेरिकेत निर्यात होणारी चिनी उत्पादने इतर देशांमध्ये पाठविण्यात येऊ लागली. या देशांमध्ये या उत्पादनांवर किरकोळ प्रक्रियेनंतर ती पुन्हा अमेरिकेत निर्यात करण्यात आली. यामुळे या उत्पादनांच्या निर्यातीचा देश बदलला असला तरी मूळ उत्पादने चिनीच होती, असा अहवालाचा दावा आहे.

**भारतासमोर अडचणी वाढणार**

रशियाकडून खनिज तेल व वायूची खरेदी करणाऱ्या देशांवर १०० टक्के आयात शुल्क आकारणी करण्याचे विधेयक अमेरिकेच्या संसदेने गेल्या आठवड्यात मंजूर केले. या विधेयकात प्रमुख पाच देशांवर भर देण्यात आला असून, त्यात चीनसह भारत, स्लोव्हाकिया, हंगेरी, अझरबैजान यांचा समावेश आहे. भारत आणि अमेरिका यांच्यात व्यापार कराराच्या वाटाघाटी सुरू असून, नव्याने पुढे आलेल्या अहवालातून त्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.

**जगभरात ४० देशांचे जाळे**

जगभरात ४० देशांमध्ये या छुप्या व्यापार मार्गाचे जाळे विस्तारलेले आहे. या जाळ्याचा वापर करून चीन आपली उत्पादने इतर देशांच्या माध्यमातून अमेरिकेत पाठवत आहे. या उत्पादनांवर त्यामुळे कमी आयात शुल्क आकारले जाते.

### कथित व्यापार घोटाळ्याचे ‘पुणे कनेक्शन’

व्हाइट हाऊसच्या अहवालात भारतातील पुणे-गुजरात-चेन्नई या उत्पादनपट्ट्याचा उल्लेख आहे. पंप आणि कॉम्प्रेसर निर्मिती या पट्ट्यात होते. पुण्यातून चिनी पंप हे भारतीय उत्पादन म्हणून अमेरिकेत पाठविले गेले. ज्या परिणामी अमेरिकेतील सिनसिनाटी, डेटन आणि कोलंबस या क्षेत्रातील उद्योगांना फटका बसला, असा अहवालाचा रोख आहे.

## दिनदर्शिका

**शनिवार, १५ ऑगस्ट २०२६**

भारतीय सौर २४ श्रावण शके १९४८

मिती श्रावण शुक्ल पक्ष

तृतीया १७ : २९ पर्यंत.

नक्षत्र : उत्तरा फाल्गुनी

उत्तर पहाटे ०३ :२६ पर्यंत.

चंद्र : सिंह ०९ :३५ पर्यंत.

सूर्योदय - ०६ : २१

सूर्यास्त - १९ : ०६

- **मेष** : मोठ्यांचा आदर करा.
- **वृषभ** : नावलौकिक होईल.
- **मिथुन** : सुविधांचा उपभोग घ्याल.
- **कर्क** : नातेवाईकांशी भेटीगाठी.
- **सिंह** : व्यासपीठ गाजवाल.
- **कन्या** : दुपारनंतर उत्साह वाढेल.
- **तूळ** : व्यवहार जपून करा.
- **वृश्चिक** : ओळखीचा फायदा होईल.
- **धनू** : व्यावसायिक लाभ.
- **मकर** : दुपारनंतर दिवस शुभ.
- **कुंभ** : प्रकृती जपा.
- **मीन** : आरोग्य उत्तम राहील.

**शुभ राशी : वृषभ, कन्या**

## शब्दकोडे- ६६



**आडवे शब्द :** (१) ठरावीक मुदतीत परत करण्याच्या अटीवर, बोलीवर केलेली पैशांची किंवा वस्तूंची देवाणघेवाण (९) पुन्हा (१०) अकलेचा खंदक, मूर्ख माणूस (१२) पर्वत (१४) पावलाची मागील खालची बाजू (१५) शिरा, उपमा बनवण्यासाठी लागणारा मुख्य घटक (१८) मोठा, कर्कश (आवाज) (२१) व्याकरणातील क्रियापदाचा एक प्रकार (२५) कॉलम (२७) डावखोरा (२९) जखम भरून आल्यानंतर त्वचेवर राहिलेला डाग (३०) गुप्तकट, लुच्चेगिरी (३२) महाभारतातील खादाड राक्षस (३४) पदार्थाचा मऊ गोळा (३६) भांडण, मतभेद (३८) भूमी (४१) मामलेदार, तालुक्याचा मुख्य महसूल अधिकारी (४२) एक मराठी महिना

**उभे शब्द :** (१) हक्क नसताना अधिकाराच्या जागेवर आलेला (२) हत्यारांची तीक्ष्ण कड, प्रवाह (३) मौल्यवान पदार्थ (४) स्वकीय, नातेवाईक (५) दृष्टी (६) आठवड्यातील प्रत्येक दिवस (७) फटका (८) सोबतीण, मैत्रीण (११) मांडणी (१३) फळातील मगज (१६) गंध (१७) घाम (१९) करंजी, पुरी इत्यादीमधे भरावयाचा गोड किंवा तिखट पदार्थ (२०) दरोडा (२२) माकड (२३) जोर, तीव्रता (२४) अंगावर काटा आणणारा अनुभव (२६) जकात वसूल करण्याची जागा (२८) पृथ्वी (२९) मानवी वस्ती (३१) एक कडधान्य (३२) कर्नाटक राज्यातील बागलकोट जिल्ह्यातील एक शहर (३३) पांथस्थ, प्रवास करणारा (३५) अनेक वाद्यांचा एकत्रित नाद, घोष (३७) सैन्य, पाकळी (३९) फायदा (४०) एखाद्या विषयाचे आकलन

**- मनाली रानडे**

manalikode26@gmail.com

## सुडोकू - ६६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | | | ९ | | ५ | | | ८ |
| | | | | ८ | | | | |
| | २ | | | | | | ६ | |
| ३ | | | ६ | | ९ | | | ४ |
| ८ | | ५ | २ | | ३ | ६ | | १ |
| ६ | | | ८ | | ४ | | | ७ |
| | ६ | | | | | | ४ | |
| | | | | ९ | | | | |
| ९ | | | १ | | ८ | | | ६ |

### सुडोकू - ६५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ४ | ७ | ५ | ९ | १ | ६ | ३ | ८ |
| ५ | ८ | ३ | ७ | ६ | २ | १ | ९ | ४ |
| ६ | ९ | १ | ८ | ३ | ४ | ५ | ७ | २ |
| ८ | २ | ९ | ३ | १ | ५ | ७ | ४ | ६ |
| ४ | ३ | ५ | ९ | ७ | ६ | २ | ८ | १ |
| ७ | १ | ६ | २ | ४ | ८ | ९ | ५ | ३ |
| ९ | ७ | ८ | १ | २ | ३ | ४ | ६ | ५ |
| १ | ५ | ४ | ६ | ८ | ९ | ३ | २ | ७ |
| ३ | ६ | २ | ४ | ५ | ७ | ८ | १ | ९ |

### शब्दकोडे - ६५ चे उत्तर



# महानगरीच्या ऋणाची ‘गुलजार’ मुक्तता

बुक-अप

**गिरीश कुबेर**
girish.kuber@expressindia.com
@girishkuber

**मुंबईनं अनेकांना** मोठं केलं. पण आपल्या मोठेपणात मुंबईचा वाटा आहे असं मोकळेपणानं मान्य करणारे अगदी मोजकेच. पूर्वायुष्यात दुकानाच्या फळीवर, फुटपाथवर झोपण्याचा अनुभव घेतलेले महालात राहायला गेल्यावर मुंबईच्या नावे बोट मोडताना सर्रास आढळतात. पूर्वी ब्रिटिश उमराव नेटिवांविषयी ज्या सुरात बोलत, त्या सुरात हे आजचे उमराव मुंबईविषयी बोलतात. मुंबईला कृतज्ञ फार कमी मिळाले.

गुलजार- कवी, कथालेखक, चित्रपट निर्माते वगैरेची काही गरज नाही फक्त गुलजार- हे या मोजक्यांतले एक. त्यांचं नवं पुस्तक आलंय. ‘आमची मुंबई : माय सिटी इन स्टोरीज अँड पोएम्स’. भारत-पाक फाळणीनंतर संपूर्ण सिंग कालरा नावाचा तरुण जगण्यासाठी मुंबईत आला. वाटेल ती कामं केली आणि बघता बघता गुलजार झाला. हे असं गुलजार होण्याची ऊर्मी असणं हे संपूर्णसिंग कालरा या तरुणातलं मोठेपण. पण त्या तरुणाच्या गुलजार होण्याच्या ऊर्मीच्या बीजाला प्रेमानं वाढायला मोकळं आकाश दिलं ते मुंबईनं. या महानगरीचं आभाळाएवढं ऋण गुलजार या पुस्तकातनं व्यक्त करतात. एका कवीनं, कलाकारानं मुंबईला वाहिलेली आदरांजली म्हणजे हे पुस्तक.




**आमची मुंबई – माय सिटी इन स्टोरीज अँड पोएम्स**
**लेखक** – गुलजार
**अनुवाद** – रक्षांदा जलील
**प्रकाशक** – हार्पर कोलीन्स पब्लिशर्स इंडिया
**पृष्ठे** – ४९६, **मूल्य** – ३९९९ रु.

गुलजारांच्या सगळ्या सादरीकरणात एक कलासक्तता असते. मग हे त्यांचं स्वतःच तशरीफ घेऊन येणं असेल, एखाद्या मुशायऱ्यात एखादी नज्म सादर करणं असेल किंवा अगदी गद्य चर्चेत सहभागी होणं असेल. सगळं कसं ‘शुभ्र काही जीव घेणं’. त्यामुळे बऱ्याचदा होतं काय की लोक गुलजारांचे कैसे चालणे, गुलजारांचे कैसे बोलणे... यावर जीव टाकतात की त्यांच्या कलाकृतीचा आस्वाद घेण्याइतकी त्यांची तयारी झालेली असते हे कळेनासं होतं. बहुतेकदा यातलं पहिलं खरं अधिक. आणि अलीकडच्या काळात तर बोलायचीच सोय नाही. समाजमाध्यमांवर त्यांच्या नावचं काय काय फिरत असतं. ‘‘बऱ्याचदा बरंचसं त्यातलं माझं नसतंही...’’, तेच एकदा म्हणाले होते.




अशा वेळी त्यांचं मुंबईवरचं हे पुस्तक आलंय. देखणं सादरीकरण. मुंबईवर काही ना काही निमित्तानं त्यांनी जे काही लिहिलं... कविता... कथा वगैरे... असं सगळ्याचं संकलन. मांडणी अशी की डावीकडे मूळचं हिंदीतलं लिखाण आणि समोर लगेच त्याचा इंग्रजी तर्जुमा. इंग्रजी रूपांतरकार आहेत रक्षांदा जलील. लेखिका आणि कला इतिहासकार म्हणून त्या माहीत आहेतच. त्यांच्या इंग्रजी रूपांतरणाविषयी भाष्य करण्याची गरज नाही. पण मूळ हिंदीतलं गुलजारांच्या शब्दातनं वाचता येत असेल तर त्याचं भाषांतर वाचायची गरज काय... असा प्रश्न काहींना पडू शकतो. तो गैर नाही. कारण हिंदीत वाचण्याची जी गंमत आहे ती अर्थातच इंग्रजीत नाही.

याचं महत्त्वाचं कारण असं की गुलजारांचं हिंदी आपण वाचताना ते ‘ऐकायला’ येतं. ते आपण त्यांच्या घनगर्द आवाजात डोळ्यानं ‘वाचत’ असतो. त्यांच्यासारखेच पॉज घेतो. चष्म्याची एक काडी ओठांना लावतो... किंवा चष्मा डोक्यावर सरकवतो. इंग्रजी भाषांतर त्यांच्या आवाजात ऐकता येत नाही. अर्थात ही अडचण गुलजारांना खूप ऐकलेल्यांची असू शकेल. ज्यांना हिंदीचा गंध नाही वा देवनागरी लिपीशी सख्य नाही, त्यांच्यासाठी ही सोय महत्त्वाची. पुस्तकाविषयी दुसरा मुद्दा म्हणजे वाचायला सोपं. एकसलग वाचायला हवं असं अजिबात नाही. मुंबईवरची एखादी कविता वाचल्यानंतर गद्याकडेही सहज वळायची सोय. ‘मी मुंबईकर... मुंबई आमची’ असं म्हणतात गुलजार त्यात शेवटी.

आज गुलजारजी ९२ वर्षांचे आहेत. घरच्यांनी फ्रंटियर मेलमधून त्यांना मुंबईत पाठवून दिलं तेव्हा ते जेमतेम १६ वर्षांचे होते. ही १९५० सालची घटना. तेव्हापासून त्यांनी कधी मुंबईला अंतर दिलं नाही. मुंबईनंही त्यांना आपलंच मानलं. पुढच्या आठवड्यात शतायुष्याकडे ते आणखी एका वर्षाचं पाऊल टाकतील तेव्हा त्यांच्या मुंबईतल्या वास्तव्यालाही ७६ वर्षं होतील.

आजही मुंबई ‘तेव्हा’ होती तितकीच तरुण आहे... आणि मुंबईप्रमाणेच गुलजारजींनाही वार्धक्याचा स्पर्श झालेला नाही. मुंबईचंही हे गुलजारपण त्यांनी आपल्या अंगी मुरवलंय... !

# मुघलकाळाची गोष्टीरूप मीमांसा

**गायत्री लेले**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, मिठीबाई महाविद्यालय, मुंबई
gayatrilele0501@gmail.com

**या देशावर सुमारे पाचशे वर्षे राज्य करणाऱ्या मुघलांचा इतिहास पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचूच नये, असे प्रयत्न सुरू असण्याचा हा काळ. मुघलांच्या राजकारणाची, क्रौर्याची आणि त्यापलीकडे जाऊन त्यांच्या विद्वत्तेची, कला-कौशल्यांची, खासगी आयुष्यातील गणितांची मीमांसा करणारे हे पुस्तक महत्त्वाचे ठरते, ते त्यामुळेच...**



**कुठलाच इतिहास** हा एकरेषीय नसतो, भारताचा इतिहासही त्यास अपवाद नाही. त्यात अनेक खाचखळगे आहेत, हिंसा आहे, सत्तासंघर्ष आहे, अवघड वळणे आहेत आणि निर्णायक क्षण आहेत. भारतीय इतिहासातील असाच एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे मुघल साम्राज्य. बाबराने भारतात प्रवेश केल्यापासून औरंगजेबाच्या काळापर्यंत मुघलांनी जवळजवळ संपूर्ण भारतावर सत्ता प्रस्थापित केली होती. आत्ताच्या राजकीय वातावरणात मुघल साम्राज्याचा इतिहास सांगणे, शिकवणे, त्याचे टीकात्मक विवेचन करणे ही एक अवघड बाब झाली आहे. पाठ्यपुस्तकांमध्ये याविषयी समग्र माहिती मिळणार नाही आणि त्यामुळे सामान्यांची या इतिहासाशी कदाचित फारशी ओळखच होणार नाही, अशी परिस्थिती भविष्यात उद्भवू शकते. अशा वातावरणात तनुश्री पोद्दार यांच्या ‘शहेनशहाज, बेगम्स अँड शहाजादीज’ या पुस्तकाचे स्वागतच केले पाहिजे.

मुघलांनी या देशावर साधारण पाचशे वर्षे राज्य केले. त्यांचा इतिहास एका ग्रंथात मांडणे तसे कठीण काम. याआधीही असे प्रयत्न झाले आहेत. वेगवेगळ्या मुघल राजांची चरित्रे ब्रिटिशांपासून अनेकांनी लिहिली आहेत. मुघलकालीन स्त्रियांवरही लेखन झालेले आहे- जसे बाबराची कन्या गुलबदन किंवा शहाजहानची पत्नी मुमताज महल यांच्यावर स्वतंत्र कामे झालेली आहेत. मग या नव्या ग्रंथात नवीन काय सापडेल, याबाबत उत्सुकता वाटते. पुस्तकाच्या नावातच याचे उत्तर आहे. हा केवळ मुघल शहेनशहांचा दस्तावेज नाही, तर त्यांच्या बेगम आणि शहाजाद्यांचादेखील लेखाजोखा आहे. या सगळ्यांबद्दल समग्र माहिती हवी असल्यास हे पुस्तक एक उत्तम पर्याय आहे. तनुश्री या स्वतः इतिहासकार नाहीत. त्यामुळे त्यांच्या लेखनाची भाषा अकादमिक आणि बोजड नसून, सर्वसामान्य वाचकांना कळेल अशी सोपी आणि प्रवाही आहे. त्यामुळे मुघल राजे आणि त्यांच्या राण्यांची ज्यांना एकत्रितपणे सहज ओळख करून घ्यायची असेल, त्यांच्यासाठी हे पुस्तक उपयुक्त ठरेल.

पोद्दार यांनी पुस्तकाची रचना तीन भागांत केली आहे. पहिल्या भागात बाबर ते औरंगजेबापर्यंत सर्व सम्राटांची चरित्रे आहेत. दुसऱ्या भागात मुघल साम्राज्यातील जनानखान्यांची व्यवस्था, तसेच त्यात राहणाऱ्या विविध स्त्रियांची माहिती आहे. तिसऱ्या भागात मुघल परिवारांमधील संघर्ष आणि प्रेमकहाण्या यांचा थोडक्यात परामर्श आहे. या रचनेमुळे मुघलांचा गुंतागुंतीचा इतिहास सुटसुटीत आणि वाचनीय होण्यास मदत झाली आहे.

पहिल्या भागातील प्रत्येक प्रकरण काही उपभागांमध्ये विभागलेले आहे. प्रत्येक राजाचा थोडक्यात परिचय, त्याचे बालपण- शिक्षण, त्यांच्या साम्राज्याचा- सत्तेचा आवाका, त्याच्या पत्नी आणि बायका, त्यांची व्यसने आणि मृत्यू असा आढावा घेतला गेला आहे. यामध्ये बराचसा भाग चरित्रात्मक पद्धतीने लिहिला गेला असला, तरीही त्यातून अनेक रोचक गोष्टी समोर येतात. बाबराची साम्राज्यप्राप्तीची ओढ कशी वर्धित होत गेली, याची कथा यात आहे. त्याचा पूर्वज तैमूर याने कधीकाळी सत्ता गाजवलेली केंद्रे काबीज करून घ्यायची असा निर्धार करून बाबर समरकंद, तसेच पुढे भारताकडे कूच करतो आणि मुघलांनी गमावलेले वैभव काहीही करून हस्तगत करायचे हे ध्येय ठेवतो. याला कारणीभूत ठरते ती १११ वर्षांची एक स्त्री, जिच्याकडून बाबर त्याच्या पूर्वजांच्या कथा ऐकतो आणि प्रेरित होतो. त्यानंतर तो आगेकूच करतो आणि त्यातून हिंदुस्थानाचा नकाशा आणि नशीब दोन्ही बदलते.




**शहेनशहाज, बेगम्स अँड शहाजादीज**
**लेखिका** – तनुश्री पोद्दार
**प्रकाशक** – रूपा पब्लिकेशन्स
**पृष्ठे** – ४८२, **किंमत** – ९९५ रु.

परंतु सत्ता हस्तगत करून ती टिकवायची कशी, हा प्रत्येक राजासमोरचा एक महत्त्वाचा पेच होता. भारतातील प्रचंड उकाडा आणि रोगराई यांमुळे बाबराचे सैन्य ग्रासून गेले होते. बाबराने त्याच्या काही सैनिकांना काबूलला परत जाऊ दिले ते याच कारणासाठी. हिंदुस्तानची राजधानी दिल्ली असावी हे बाबराने त्याच्या ‘बाबरनाम्या’त लिहून ठेवले आहे. बाबराचा त्याचा मुलगा हुमायून याच्यावर असलेला जीव, हुमायून आणि हमीदा बेगम यांच्या पोटी जन्माला आलेला अकबर, अकबराने वाढवलेले साम्राज्य आणि त्याच काळात साम्राज्यात वाढलेला अविश्वास व हिंसा, अकबर आणि त्याचा पुत्र सलीम (जहांगीर) यांच्यात असणारी तेढ, परंतु त्याच वेळेस अकबर आणि त्याचा नातू खुर्रम (शहाजहाँ) यांच्यात असणारे प्रेमाचे नाते, मुलगा औरंगजेब याच्याशी शाहजहाँचे असलेले दुराव्याचे संबंध आणि औरंगजेबाची क्रूरता व अंत असा मोठा पट या प्रकरणांमध्ये प्रवाहीपणे उलगडला आहे. हा प्रवास शेवटचा मुघल राजा बहादूरशहा जफर याच्यापर्यंत येऊन थांबतो. बाबराने कमावलेले वैभव ते बहादूर शहा जफरचा कोणाला कळेल न कळेलसा अंत वाचकाला नक्कीच विचारप्रवृत्त करतो. सत्ता, संपत्ती आणि साम्राज्याच्या क्षणभंगुर स्वरूपाचे या प्रकरणांतून दर्शन होते.

बऱ्याच जणांना कदाचित ज्ञात असलेल्या माहितीबरोबरच (जसे बाबराने पानिपतच्या युद्धात इब्राहिम लोधीचा केलेला पराभव वगैरे), या राजांच्या जटिल आणि चमत्कारिक व्यक्तिमत्त्वांचाही आढावा घेतला गेला आहे. हे राजे आत्यंतिक क्रूर होते. दारू, अफू आणि स्त्रियांच्या आहारी गेलेले होते. सर्वांनाच कुटुंबाच्या आतच सत्तासंघर्षाला सामोरे जावे लागले. जवळच्या नातेवाईकांना, प्रसंगी अगदी वडील व भावंडांनाही शह द्यावा लागला, मार्गातून दूर करावे लागले. त्यामुळे परकीय सत्तेचे आक्रमण हा सततचा धोका होताच, पण स्वकीयांशी युद्ध आणि चढाओढ हे या मांदियाळीतील प्रत्येक राजाचे प्राक्तन होते. अशी दुहेरी टांगती तलवार घेऊन या मंडळींनी राज्य केले.

आक्रमणे आणि साम्राज्याचा विस्तार यापलीकडे जाऊन माणूस म्हणून या व्यक्तींचा विचार कमी वेळा केला जातो. तनुश्री यांनी तो विचार प्रत्येक प्रकरणात केला आहे. क्रूर आणि साम्राज्यवादी प्रवृत्ती असणाऱ्या राजांचे इतर अनेक मानवी कंगोरे संदर्भासहित मांडले आहेत. उदाहरणार्थ, बाबर एक अतिशय हळवा बाप होता. हुमायूनसाठी त्याने आपले प्राण पणास लावले होते. हुमायून हा भावंडांप्रति कनवाळू होता. ज्या भावांनी त्याची हत्या करण्याचा कट रचला होता, तो उघडकीस येऊनही त्यांना माफ करण्याचे मोठे मन त्याच्याकडे होते. दोघेही कविता करत असत आणि पुस्तकांचा मोठा संचय त्यांनी केला होता. अकबराची नवरत्ने सगळ्यांना ज्ञात आहेतच. परंतु अकबर हा कलासक्त तर होताच, शिवाय प्राणिजगताविषयी अत्यंत सूक्ष्म ज्ञान बाळगून होता याची माहिती मिळते. जहांगीरच्या काळात पर्शियन साहित्याची भरभराट झाली. तो असा राजा होता, जो हळवा होता आणि कुठेही कोणत्याही कारणासाठी तो सहज रडत असे, असे आश्चर्यकारक वाटावेत असे उल्लेख आढळतात. औरंगजेबाला अनेक भाषा अवगत होत्या, शिवाय तो उत्तम सुलेखन करत असे. त्याची कुराणाची हस्तलिखिते मक्का आणि मदिनेला पाठवली गेली होती, असाही उल्लेख येतो. थोडक्यात, सर्वसामान्यांना ज्ञात असलेल्या माहितीशिवाय वेगळे असे काही रंजकरीत्या समोर येते. त्यामुळे इतिहासाकडे वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून पाहण्यास वाचक प्रवृत्त होतात.

या सगळ्यांच्या आयुष्यातील स्त्रियांच्या स्थानाविषयीचा विचारही सहसा सखोलतेने होत नाही. या पुस्तकात मात्र लेखिकेने तो करायचा प्रयत्न केला आहे. मुघलांचे जनानखाने हे बंदिस्त आणि गोपनीय असत. तिथल्या स्त्रियांचे स्वतःचे राजकारण आणि सत्तासंघर्ष होता. सम्राटाच्या म्हणजेच सत्तेच्या अधिकाधिक जवळ जाण्यासाठी त्यांच्यात चढाओढ होती. प्रत्येक मुघल सम्राटाने जनानखाने बाळगले, अकबराच्या काळात तर तेथील स्त्रियांची संख्या पाच हजारांच्या वर गेली होती. म्हणजेच हे जनानखाने स्वतःतच लहान शहरे होती. तनुश्री आपल्या पुस्तकात या बायांचे जग केवळ काहीतरी अगम्य अथवा सुरसकथेसारखे रंगवत नाहीत. या सगळ्या हाडामांसाच्या, विचार करू शकणाऱ्या, स्वतःकडे ‘एजन्सी’ असणाऱ्या हुशार बायका म्हणून समोर येतात. अर्थात त्यांना अनेकानेक मर्यादा होत्या, आणि आपल्या छोट्यामोठ्या धाडसांसाठी त्यांना सतत किंमत चुकवावी लागली. त्यांचे आयुष्य कायम सम्राटाभोवतीच फिरत राहिले. परंतु त्यातल्या अनेकींमुळे मुघलांच्या राज्याचे रक्षण झाले आणि काहींमुळे त्यांचा इतिहास लिखित स्वरूपात शिल्लक राहिला हेही खरे.

जसे बाबराची मुलगी गुलबदन हिने स्वतःबद्दल तर लिहून ठेवले आहेच, शिवाय ‘हुमायूननामा’ या ग्रंथात तिने बाबर आणि हुमायून या दोघांच्या आयुष्यातील आठवणी टिपून ठेवल्या आहेत. अकबराने प्रोत्साहन दिल्यामुळे तिने हा ग्रंथ लिहिला. त्याद्वारे त्या काळाचा एक महत्त्वाचा लिखित पुरावा जगास उपलब्ध झाला. नूरजहाँ ही कपडे शिवण्यात पारंगत होती, शिवाय तिला स्थापत्यशास्त्राचे सूक्ष्म ज्ञान होते. औरंगजेबाची मुलगी झेबुन्निसा अनेकानेक विषयांत पारंगत होती. तिच्या वडिलांप्रमाणेच तिला सुलेखन अवगत होते, शिवाय ती युद्धकलेतही अव्वल होती असे उल्लेख सापडतात. थोडक्यात, मुघलकालीन स्त्रिया या केवळ पत्नी आणि आई नव्हत्या, तर सत्तेत भागीदारी घेऊ पाहणाऱ्या महत्त्वाच्या व्यक्ती होत्या असे चित्र उभे राहते.

वाचकांना मुघल काळाच्या पटलावर घेऊन जाण्यास हे पुस्तक नक्की यशस्वी झाले आहे, असे म्हणता येईल. उदाहरणार्थ, या पुस्तकात सम्राटांच्या प्रेमप्रकरणांचा, भावभावनांचा उल्लेख आहे, परंतु सिनेमा अथवा मालिकांमध्ये त्याचे जसे चित्रण होते तसे ते नाही. इतिहासातील घटना आपल्याला दाखवल्या जातात त्यापेक्षा फार वेगळ्या आणि गुंतागुंतीच्या असू शकतात, याचे भान वाचकांना येऊ शकते. जसे, मुघलांच्या काळातील लग्ने ही बहुतेकदा राजकीय हितसंबंध राखण्यासाठी होत असत. अत्यंत मुत्सद्दी असे ते निर्णय असत, आणि बऱ्याचदा प्रेमभावनेने घेतलेले नसत. ज्या प्रेमप्रकरणांचा पुस्तकात उल्लेख आहे, त्यातही राजकारण आणि भय-संशय पुरेपूर आहे. प्रेमभावना आणि राज्यकारभार यांचा अनेकदा संघर्ष झाला. परंतु त्या संघर्षावर सातत्याने नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्नही झाला.

पुस्तकात ही सगळी गुंतागुंत गोष्टरूपाने उलगडली आहे. परंतु काही भाग माहितीपर जास्त आहेत आणि त्यातले कथानक थोडे मागे पडले आहे. विशेषतः पहिल्या भागात, ज्यात सगळ्या सम्राटांचा पट मांडला आहे. ते एकत्रितरीत्या वाचताना काही काळाने त्यातली गोष्ट हरवून केवळ माहितीचा भडिमार होतो आहे की काय, असे वाटते. बेगम आणि शहाजाद्यांबद्दलचा दुसरा भाग अतिशय वाचनीय आहे आणि एकसंध कथा म्हणून तो भाग समोर येतो. तिसरा भाग थोडक्यात आटोपला आहे आणि त्यातही माहितीचा भाग अधिक आहे. मुघलकाळातील धर्म आणि धर्मांतरे यांवर मतमतांतरे आहेत आणि वादविवादही. या पुस्तकात लेखिकेने विविध सम्राटांच्या धार्मिक धोरणांविषयी माहिती दिली आहे. मुघल राजांच्या हिंदू पत्नींविषयीही माहिती आहे. त्यांपासून निर्माण झालेल्या वंशजांवरही लिहिले आहे. पण त्याचे सखोल विश्लेषण करणे मात्र टाळले आहे. त्या काळाच्या संदर्भात धर्मांतरे किंवा धर्मनिरपेक्षता या बाबींचा खरे तर अधिक अभ्यास व्हायला हवा. या पुस्तकात लेखिकेने तो करण्याची संधी गमावली असे वाटले. परंतु हे नमूद करायला हवे की, हे सारे लिहिताना अकादमिक शिस्तही पाळली आहे. पुस्तकाच्या शेवटी अनेक संदर्भ आहेत, संदर्भटिपा आहेत. त्यामुळे हे पुस्तक जरी प्रारंभिक वाचनासाठी जास्त उपयुक्त असले, तरी या विषयात रस असणाऱ्यांना पुढील वाचनासाठी दिशा मिळू शकते.

आधी म्हटल्याप्रमाणे, मुख्यप्रवाही ज्ञानचर्चेत मुघलांच्या दीर्घ कारकीर्दीकडे ठरवून काणाडोळा केला जाण्याच्या काळात, ‘शहेनशहाज, बेगम्स अँड शहाजादीज’सारख्या पुस्तकांचे स्वागत व्हायला हवे. त्याचे टीकात्मक विश्लेषणही व्हायला हवे.

बुकबातमी

## एआयनिर्मित चिंतेत भर...

**गेल्या काही** महिन्यांपासून साहित्य क्षेत्रात एआयच्या वापरामुळे वारंवार वादाचे प्रसंग उद्भवत आहेत. त्यामुळे पुस्तके मागे घेण्यापासून ते प्रकाशन करार मोडण्यापर्यंत वेळ आली आहे. साहित्यविश्वाला एआयने हादरवून सोडले असतानाच यासंदर्भातल्या एका नव्या अभ्यासाचा अहवाल पुढे आला आहे आणि त्याचे निष्कर्ष चिंताजनक आहेत.




‘जजमेंट अँड डिसिजन मेकिंग’ या ‘केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस’च्या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, जोपर्यंत वाचकांना हे माहीत नसतं की एखादी कथा एआय वापरून तयार केली आहे, तोपर्यंत त्यांना माणसांनी लिहिलेल्या कथांपेक्षा एआयच्या कथा अधिक आवडतात, मात्र एखादी कथा एआयने तयार केली आहे, हे कळलं की त्यांचं त्यातलं स्वारस्य संपतं. ‘बॉट ऑर नॉट : कॅन पीपल टेल द डिफरन्स बिट्वीन स्टोरीज रिटन बाय अ ह्युमन ऑर बाय ॲन एआय सिस्टम?’ असं त्या शोधनिबंधांचं शीर्षक आहे. व्हिलानोव्हा युनिव्हर्सिटीचे सिडनी सिअर्स आणि डॉ. दीना स्कोल्निक वेसबर्ग यांनी हा अभ्यास केला आहे. हा प्रयोग अमेरिकेतील तब्बल २,५८७ वाचकांवर केला गेला.

प्रसिद्ध नियतकालिकांत प्रकाशित झालेल्या तीन लघुकथांची तुलना ओपन एआयच्या, चॅटजीपीटी ४.०च्या मदतीने तयार केलेल्या तीन साधारण तशाच स्वरूपाच्या कथांशी करण्यात आली. संशोधकांच्या मते, वाचकांना एआयनिर्मित कथा आवडतात, मात्र त्यांचा एआयवर अद्याप विश्वास बसलेला नाही. अशा प्रकारे लिहिलेल्या कथा निकृष्ट असतात, अशी त्यांची मनोधारणा आहे. संशोधकांच्या असंही लक्षात आलं की प्रयोगात सहभागी झालेल्यांपैकी ज्यांनी भाषा आणि वैयक्तिक आवड यांसारख्या निकषांवर अवलंबून राहून अंदाज लावले, त्यांचे अंदाज चुकीचे ठरले. साहजिकच या अभ्यासातले निष्कर्ष आधीच एआयने ग्रासलेल्या साहित्यविश्वाच्या चिंतेत भर घालणारे ठरले आहेत.

बुक-नेट

## काश्मीरच्या साहित्यकळ्या...



**जम्मू-काश्मीरमध्ये बारा** वर्षांपूर्वीच्या पावसाळ्यात पुराने हाहाकार माजवला होता. त्या पुरातून सावरल्यानंतर तिथल्या लेखकांनी एक कथा-वाचनमंडळ सुरू केले. दर शनिवारी एका घरात जमून काश्मिरी किंवा ऊर्दू भाषेतील कथन साहित्य वाचायचे. त्यावर चर्चा-संवाद आणि टीका करायची. पुढल्या शनिवारी पुन्हा त्याच कथेचे इंग्रजी भाषांतर करून त्याचेही वाचन करायचे. या प्रयोगाचा ‘फ्रण्टलाइन’ने केलेला वृत्तलेख दखल घेण्याजोगा. भाषा आणि साहित्य टिकवायसाठी प्रयत्न म्हणून हा उपक्रम. पण आपलीच गोष्ट नव्या पिढीने अंगीकारलेल्या इंग्रजी पेहरावात कशी दिसते, तेही उमजून घेण्याची तयारी. सतत धगधगत्या बातम्यांसाठी परिचित असलेल्या शहरातील कथाप्रेम उमजून घेण्यासाठी हा दुवा पडताळून पाहा. ■ https:// tinyurl. com/ nav72 mk4

## कथा-निबंधखंडांची मुखपृष्ठे...



**मारिनर बुक्सतर्फे** (पूर्वाश्रमीची एचएमएच) निघणारे ‘बेस्ट अमेरिकन’ मालिकेतील कथा-निबंध, रहस्य-विज्ञान-पर्यटन आणि खाद्यविषयक लेखनाचे वार्षिक खंड यंदा २० ऑक्टोबर रोजी एकत्रित प्रकाशित होतील. अगदीच साध्या आणि एकसाची मुखपृष्ठांनी शंभराहून अधिक वर्षे हे खंड प्रकाशित झाले. पण गेल्या वर्षापासून प्रत्येक खंडाला आकर्षक चित्रांनी सजविण्यात येते. यंदाची सारी मुखपृष्ठे आधीच जाहीर करण्यात आलीत. व्हिएत थान न्युइन या व्हिएतनामी-अमेरिकी कादंबरीकाराचे संपादन यंदाच्या कथाखंडाला लाभलेय. त्याच्या मुखपृष्ठासह कथाखंडात कुणा-कुणाच्या वीस कथा निवडण्यात आल्यात त्याचा तपशील जाणून घेण्यासाठी खालील दुवे उपयुक्त.
■ https:// tinyurl. com/5 yh8 pvc4 ■ https:// tinyurl. com/5 yxtakpz

## शब्दकोशकार आणि रहस्यकथा...

**ऑक्सफर्ड प्रेसमध्ये** शब्दकोशाचे काम बरीच वर्षे केलेल्या सुझी डेण्ट या लेखिका रहस्यकादंबरीकार म्हणूनही ओळखल्या जातात. ब्रिटनमधील एका टीव्ही कार्यक्रमात त्या सातत्याने झळकतात- हा कार्यक्रम डोक्याला ताण देणारा... शब्द आणि गणिताची उकल करणारा! भाषा या विषयावरील अकथनात्मक पुस्तके देखील त्यांनी लिहिलीत. पण सध्या त्यांचे नाव चर्चेत आहे, ते ‘डेथ रिट लार्ज’ या कादंबरीसाठी. याच आठवड्यात कादंबरीचे प्रकाशन झाले. ‘ऑब्झर्व्हर’ने यानिमित्ताने गेल्या आठवड्यात त्यांची मुलाखत घेतली. शब्दकोशकारांना त्या एकप्रकारचे ‘डिटेक्टिव्ह’ मानतात. निरनिराळ्या शब्दांच्या अर्थासंबंधी ऑक्सफर्ड प्रेसमध्ये चालणाऱ्या प्रक्रियेला कथानकाचा भाग करतात. त्यांच्या कथानकातील शब्दकोशकार पोलिसांना गुन्हेउकलीस मदत करतात. या मुलाखतीत शब्दकोशकार म्हणून डेण्ट यांच्या कामाचा तपशील कळेल. नवीन शब्दांचा ‘डिक्शनरी’त सहभाग होताना काय रान घडू शकते, त्याची सोदाहरण चर्चा देखील इथे आलीय. ‘कोच पोटॅटो’ या शब्दावरून घडलेल्या वादाबद्दलही माहिती होईल. पण नुसते तेच का? शब्दांवर चिंतन असलेली त्यांची जुनी मुलाखत यूट्यूबवर पाहाता येईल. त्याचबरोबर लहान मुलांमध्ये शब्दार्थप्रेम कसे निर्माण करावे, हे सांगणारा टिपायुक्त लेख आपल्याकडच्या ताज्या पालकांनाही उपयुक्त ठरावा.



■ https:// tinyurl. com/2 z22 bv6 d
■ https:// tinyurl. com/ mtx4 c343
■ https:// tinyurl. com/4 w9 wwwxr

# प्लास्टिकचा पापभंग

## प्लास्टिक प्रदूषणावर मात करण्यासाठी सध्या सुरू असलेले प्रयत्न हे जंगलाला लागलेली आग विझवण्यासाठी एखादा चमचाभर पाणी घेऊन रमतगमत जाण्यासारखे आहेत...

**महाराष्ट्रातल्या भीमा** आणि उल्हास या दोन नद्यांच्या संदर्भात 'एन्व्हायर्नमेंटल पोल्यूशन' या संशोधनपत्रिकेत अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या शोधनिबंधातील निरीक्षणे गंभीर असली तरी धक्कादायक अजिबातच नाहीत. याचे कारण असे की एव्हाना कशाचेही धक्के बसण्यासाठीची संवेदनशीलता माणूसप्राण्याने आपल्या कर्तृत्वाने गमावली आहे. एखाद्या गोष्टीचा धक्का बसण्यासाठी ती पहिल्यांदाच झालेली असते किंवा ती प्रचंड प्रमाणात झालेली असते. पण माणूस करत असलेल्या प्लास्टिकच्या सर्वव्यापी वापराचा दुष्परिणाम सगळ्या सजीव सृष्टीला गिळंकृत करत आहे, या समस्येला हे दोन्ही निकष आता लागू होत नाहीत, या टप्प्यावर आपण येऊन ठेपलो आहोत. या शोधनिबंधातील निरीक्षणे खरेतर गेली काही वर्षे वेगवेगळ्या संदर्भात चहूबाजूंनी येऊन आपल्यावर आदळत आहेत. पण यावेळी त्यांची दखल घ्यायची ती यासाठी, की आता जे काही घडते आहे ते कुठे दूरवर नाही, तर थेट आपल्या अंगणात. आपणच निर्माण केलेल्या प्लास्टिकच्या भस्मासुराने मानवी जीवनच नाही, तर नद्या, जंगले, समुद्र एवढेच नाही तर अंतराळ ही निसर्गसंपदाही कशी वेढली आहे, आणि माणसाच्या हव्यासाचा त्रास सगळ्याच पातळीवरच्या सजीवसृष्टीला कसा भोगावा लागत आहे, हे पाहून मनुष्यप्राण्याचे आता तरी डोळे उघडायला हवे आहेत. पण तसे होत नाही, हे आपल्या दारातल्या दोन नद्याच सांगताहेत. ते तरी ऐकायला हवे.

भीमा आणि उल्हास या पश्चिम महाराष्ट्रातील दोन मोठ्या आणि महत्त्वाच्या नद्या. काही संशोधकांच्या चमूने या नद्यांमधील वरडोळा नावाच्या (शास्त्रीय नाव - ग्लोसोगोबियस गिरीस) माशांवर केलेल्या संशोधनात या माशांच्या पचनसंस्थेत सूक्ष्म म्हणजेच मायक्रो प्लास्टिकचे कण आढळून आले आहेत. उल्हास नदीमधल्या ३५.७१ टक्के तर भीमा नदीमधल्या ६५ टक्के वरडोळा माशांच्या पचनसंस्थेत अशा पद्धतीने पॉलीथिलीन आणि पॉलीप्रॉपलीन या प्रकारचे प्लास्टिककण मिळाले आहेत. हे सूक्ष्म प्लास्टिककण साधारणपणे एक नॅनोमीटर ते पाच मिमी एवढ्या आकाराचे असतात. मानवी कचऱ्याच्या विघटनातून ते तयार होतात. त्यांचा त्या त्या सजीवाच्या एकूण पचनसंस्थेवर, चयापचयावर परिणाम होऊ शकतो. आपण आधीच नद्या, समुद्र, जंगले हे नैसर्गिक स्रोत कचरा फेकण्याची सोय समजून प्रदूषित केले आहेत. या मानवी कचऱ्यातील प्लास्टिक हा इतरांच्या तुलनेत दीर्घ काळाने विघटित होणारा घटक या समस्येमधला सगळ्यात मोठा खलनायक आहे. तोच सगळ्या सजीव सृष्टीच्या जीवावर उठला आहे. वरडोळा हा मासा पाण्याच्या तळाशी गाळात आपले अन्न शोधतो. तिथे जमा झालेले हे प्लास्टिककण त्याच्या खाद्यामार्फत त्याच्या शरीरात प्रवेश करतात आणि पुढे पचनसंस्थेत पोहोचवले जातात. प्लास्टिकसारखा अत्यंत कृत्रिम घटक एखाद्या नदीमधल्या जेमतेम आकाराच्या आणि वजनाच्या माशाच्या पचनसंस्थेत आढळणे हे विकासाच्या मागे लागलेल्या माणसाच्या विविध उपद्व्यापांनी निसर्गाच्या व्यवस्थेत किती टोकाचा हस्तक्षेप केला आहे, याचे द्योतकच. संबंधित संशोधकांच्या मते अशा पद्धतीने माशांच्या पचनसंस्थेत प्लास्टिक आढळणे ही गोष्ट चिंताजनक आहे, कारण प्लास्टिकचे सूक्ष्म कण माशांच्या पचनसंस्थेत पोहोचतात, तेव्हा त्यांचे रूपांतर अतिसूक्ष्म प्लास्टिक कणांमध्ये झालेले असते. मासे हा माणसे, पक्षी यांच्या आहाराचा भाग असल्यामुळे अतिसूक्ष्म तेच प्लास्टिककण त्यांच्याही पचनसंस्थेत पोहोचतात. सगळी अन्नसाखळीच या पद्धतीने प्लास्टिकबाधित होऊ शकते.

खरेतर इथे 'होऊ शकते' असे म्हणण्याला तसा काही अर्थ नाही, कारण या आधी झालेल्या वेगवेगळ्या संशोधनांमधून वेगवेगळ्या प्राण्यांच्या पचनसंस्थेत प्लास्टिकचे सूक्ष्म कण आढळून आले होतेच. शेवटे, शिंपले किंवा बांगडा, मांदेली हे भारतीय मासे असोत की

**पण जंगलाला खरेच आग लागलेली आहे आणि ती विझवण्यासाठी समुद्रभर पाणी घेऊन जीव खाऊन धावण्याशिवाय दुसरा पर्याय नाही.**

व्हेल, डॉल्फिन, पोर्पोईस आणि सील हे सागरी सस्तन प्राणी. स्थलांतरित पक्षी तसेच उंदीर, बेडूक आणि कुत्र्यामांजरांसारख्या पाळीव प्राण्याच्या शरीरात संशोधकांना प्लास्टिकचे सूक्ष्म कण आढळले आहेत. प्लास्टिक वेगवेगळ्या कारणांनी विघटित होत जाऊन त्याचे प्लास्टिकचे सूक्ष्म कण तयार होतात. ते माणूस जिथे जिथे वावरतो, तिथे तिथे- अगदी हिमनद्यांपासून समुद्राच्या तळापर्यंत- ते पसरतात. हवा, नद्या, जंगल, जमीन, समुद्र, अंतरीक्ष अशा सगळ्या ठिकाणी आजघडीला प्लास्टिकचे सूक्ष्म कण आहेत. हवा, धूळ, पाणी, अन्न यांच्यामार्फत ते सजीवाच्या शरीरात प्रवेश करतात. संशोधकांना माणसाच्या शरीरात, गायीच्या तसेच इतर प्राण्याच्या दुधात प्लास्टिकचे सूक्ष्म कण सापडले आहेत. एका संशोधनानुसार मानवी शरीरात जवळपास सात ग्रॅम प्लास्टिक असल्याचे आढळले होते. आपल्या रोजच्या वापरात असलेल्या प्लास्टिकच्या वस्तूंमधील सूक्ष्मातिसूक्ष्म कण या ना त्या पद्धतीने माणसाच्या शरीरात प्रवेश करतात, असे कारण त्यामागे सांगितले गेले.

२०२० मध्ये २७ लाख टन सूक्ष्म प्लास्टिककण पर्यावरणात झिरपले, आणि २०४० पर्यंत हा आकडा दुप्पट होण्याची शक्यता आहे, ही संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण कार्यक्रमाची आकडेवारी हेच सांगते की माणूस आता प्लास्टिक अपरिहार्य समजतो आणि त्याच पद्धतीने ते वापरतो. तो या पद्धतीने थंड डोक्याने प्लास्टिक वापरत चालला असला तरी त्याचे परिणाम बाकी सगळ्या सजीवसृष्टीला भोगावे लागताना दिसतात. त्यामुळेच काही प्राण्यांच्या शरीरात जसे सूक्ष्म प्लास्टिककण सापडतात, तशाच गायीबैलांच्या पोटात चक्क प्लास्टिकच्या पिशव्याही सापडतात. माणसांनी त्यांना नको असलेले खाद्यपदार्थ प्लास्टिकच्या आवरणातून फेकून दिले की अन्नाच्या शोधात असलेले प्राणी ते खातात. त्यांना प्लास्टिक वेगळे करता येत नाही आणि ते वेगळे ओळखताही येत नाही. हेच समुद्री जीवांच्या बाबतीतही घडते. 'द जर्नल फॉर नेचर'च्या एका अहवालानुसार उत्तराखंडमध्ये हत्तीच्या विष्ठेत प्लास्टिक सापडले होते. हिमाचल प्रदेशच्या स्पिती व्हॅलीमध्ये कोल्ह्याच्या विष्ठेत तर चेन्नईमधल्या गिडी अभयारण्यात हरणांच्या पोटात प्लास्टिक सापडले होते. प्लास्टिकची पाण्याची बाटली घेऊन जात असलेल्या ताडोबाच्या जंगलातील वाघाचे छायाचित्र प्रसिद्ध झाल्यावर मोठा गदारोळ माजला होता, पण ते तेवढेच. त्यानंतरही इतर जंगलांमधून प्राणी तिथे पडलेल्या प्लास्टिकच्या वस्तूंशी खेळताना आढळून आले आहेत. गायीम्हशींच्या पोटातून शस्त्रक्रिया करून ७०-७० किलो प्लास्टिक कचरा बाहेर काढल्याच्या बातम्या अधूनमधून येत असतात. याशिवाय कासवे, मृत देवमासे, व्हेल मासे यांच्या पोटातही प्लास्टिकचा कचरा मिळतो. संयुक्त अरब अमिरातीमध्ये उंटांच्या एकूण मृत्यूपैकी निम्मे मृत्यू पोटात प्लास्टिक साठून राहिल्यामुळे होतात, असे एक अभ्यास सांगतो. वाळवंटात लोकांनी फेकून दिलेला प्लास्टिकचा कचरा उंट अन्न समजून खातात. तो न पचल्यामुळे पोटात तसाच राहतो. उंटांना त्यामुळे पोट भरल्यासारखे वाटते आणि त्यांचे खाणे कमी होते. यातून कुपोषण होऊन त्यांचा मृत्यू होतो, असे निरीक्षण आहे. हे रोखण्यासाठी तिथे सरकारी पातळीवर गेली १०-१२ वर्षे प्लास्टिक बंदी, प्लास्टिक वापरावर शुल्क, कलेच्या माध्यमातून जनजागृती असे वेगवेगळे उपाय योजले जात आहेत. जगभरात इतरत्रही या प्रश्नाची जाणीव होऊन त्यावर मात करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. पण सध्या तरी ते जंगलाला लागलेली आग विझवण्यासाठी एखादा चमचाभर पाणी घेऊन रमतगमत जाण्यासारखे आहेत. पण जंगलाला खरेच आग लागलेली आहे आणि ती विझवण्यासाठी समुद्रभर पाणी घेऊन जीव खाऊन धावण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. भीमा आणि उल्हास या नद्यांच्या उदाहरणांनी हे संकट अधोरेखित केले असले तरी त्याची व्हायला हवी तेवढी जाणीव दिसत नाही. 'माझे माहेर पंढरी' या गीतामध्ये याच भीमेचा म्हणजे चंद्रभागेचा उल्लेख आहे आणि ती पापभंग करते असे म्हटले आहे. तिच्या उदरात आपण ढकललेल्या प्लास्टिकचा पापभंग करणे ही आता आपलीच जबाबदारी आहे.

# आपण, नादिया आणि प्रेरणादायी संवाद

ऑलिम्पिक आख्यान

सिद्धार्थ केळकर
siddharth.kelkar
@expressindia.com



**आपल्याला ऑलिम्पिक** खऱ्या अर्थाने कधीपासून जवळचे वाटायला लागले? आपल्या देशाचे खेळाडू त्यात चमकायला लागले तेव्हापासून, असे उत्तर द्यावेसे वाटेल. पण, ते अर्धे बरोबर. कारण, आपल्याला पटकन आठवतात, त्या प्रतिमा. आणि, त्याही अलीकडच्या. त्याचे श्रेय दूरचित्रवाणीला. लिएंडर पेस १९९६ च्या अटलांटा ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक स्वीकारायला पोडियमवर चढला, तेव्हा त्याचा अभिमानाने भरून आलेला चेहरा टीव्हीवर पाहून डोळे पाणावले होते. घटनेला ३० वर्षे होऊनही ही प्रतिमा अमीट. नंतर अभिनव बिंद्रा (बीजिंग २००८) आणि नीरज चोप्राच्या (टोकियो २०२०) सुवर्णप्रतिमाही अशाच कायमच्या मनावर कोरल्या गेलेल्या. गेल्या ३० वर्षांत रौप्य आणि कांस्याच्या अशा आणखीही काही आहेत. त्या तेवढ्याच लक्षात राहिल्या, कारण त्या दूरचित्रवाणीवर पाहिल्या गेल्याने त्यांची 'फोटो मेमरी' तयार झाली. म्हणूनच सुरुवातीला म्हटले, की उत्तर अर्धे बरोबर. कारण, आपण ऑलिम्पिकमध्ये यापूर्वी मिळविलेले यश, त्या वेळच्या सगळ्या प्रतिमा डोळ्यांपुढे नसल्याने स्मृतिपटलावर उमटत नाही.

आपला हॉकी संघ खरे तर सुमारे शतकभरापूर्वीपासून ऑलिम्पिक गाजवत आला. १९२८ ते १९८० या कालावधीत आपण आठ सुवर्णपदके मिळविली. १९५२ च्या हेलसिंकी ऑलिम्पिकमध्ये तर खाशाबा जाधव यांनी कुस्तीत, म्हणजे वैयक्तिक क्रीडाप्रकारातही कांस्यपदक मिळविले. आपण ते यश पूर्ण विसरून गेलो असे नाही; फक्त ते आपल्या 'फोटो मेमरी'त पक्के बसलेले नाही. पण, अशा पराक्रमांवर जेव्हा जेव्हा, त्यातील नाट्यमयता, संघर्षासह चित्रपट येतात, तेव्हा त्यांची उजळणी पक्की होते (आठवा : 'भाग मिल्खा भाग', 'दंगल', 'सूरमा', 'चंदू चॅम्पियन' इत्यादी, आता खाशाबा जाधव यांच्यावरही चित्रपट येतो आहे). स्मृतींचे मजकूर पुसट होऊ नयेत, म्हणून हे आवश्यक. ते केवळ दस्तावेजीकरण नाही, ते प्रतिमांचे ठसणेही.

दूरदर्शनच्या सुरुवातीच्या काळात असे बरेच प्रयत्न केले गेल्याने अनेक प्रतिमा ठसल्या. त्यात सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आहेतच; क्रीडा प्रकारांबाबत ठळक आठवणाऱ्या म्हणजे १९८२ च्या दिल्लीतील आशियाई स्पर्धांचे थेट 'रंगीत' प्रसारण आणि नंतर १९८६ पासून पुढे फुटबॉल विश्वचषक सामन्यांचे प्रक्षेपण. दूरदर्शनने क्रिकेट बरेच दाखवले, त्या सामन्यांची क्षणचित्रे कायमच दाखविली. इतर खेळांच्या प्रसारणाच्या कोरल्या जातील अशा स्मृती नाहीत. तरीही, काही चित्रपट मालिकांच्या रूपात दाखवले गेले आणि लक्षात राहिले, त्यात होते 'बॉडी लाइन' (क्रिकेट), 'एस्केप टू व्हिक्टरी' (फुटबॉल), 'नादिया' (जिम्नॅस्टिक्स), 'द जेसी ओवेन्स स्टोरी' (ॲथलेटिक्स) आदी. सांगायचा मुद्दा असा, की यातील काही कहाण्यांनी खेळाडूच्या वैयक्तिक प्रवासाच्या निमित्ताने ज्या जागतिक स्पर्धेचे दर्शन घडविले ते होते ऑलिम्पिक. टीव्ही पाहायला लागलेल्या भारतीयांसाठी ऑलिम्पिकच्या त्या पहिल्या लक्षात राहिलेल्या प्रतिमा.

**ऑलिम्पिकमधले लिएंडर पेसचे (अटलांटा १९९६) कांस्यपदक, अभिनव बिंद्रा (बीजिंग २००८) आणि नीरज चोप्रा (टोकियो २०२०) यांचा सुवर्णपराक्रम दूरचित्रवाणीवर पाहिला गेल्याने त्यांची 'फोटो मेमरी' तयार झाली. ऑलिम्पिकमध्ये यापूर्वी मिळविलेले यश, त्या वेळच्या सगळ्या प्रतिमा डोळ्यांपुढे नसल्याने स्मृतिपटलावर उमटत नाही.**

उपरोल्लेखित मालिकांपैकी वानगीदाखल या लेखात एक दाखला. रुमानियाची जिम्नॅस्ट नादिया कोमानीच हिचा. नादियावरील चित्रपट- मालिका पाहताना, 'इतक्या भन्नाट कसरती एवढ्या लहान वयात करणे शक्य आहे?' अशा अचंब्याचा 'आ' कायम वासलेलाच राहायचा. १९७६ च्या मॉँट्रियल ऑलिम्पिकमध्ये 'अनइव्हन बार' प्रकारावरच्या कसरती करून तिने जे अप्रतिम 'लँडिंग' केले, त्या घटनेला गेल्याच महिन्यात ५० वर्षे झाली. तिने 'लँड' केले, तेव्हा टाळ्यांचा गजर थांबला नाही. नजरा गुणफलकाकडे लागल्या. गुणफलक काही क्षण स्तब्ध. या थांबलेल्या क्षणांचे संचित किती मोठे आहे, त्याचे आकलन तेव्हा झाले असेल का, असा प्रश्न आता पडतो. गुणफलकावर गुण उमटले १.००. अरे, असे कसे? इतक्या अप्रतिम कसरतीचे हे मूल्यमापन? मग काही क्षण गोंधळाचे. नंतर लक्षात आले, ओमेगा एसए या ऑलिम्पिकचे इलेक्ट्रॉनिक गुणफलक तयार करणाऱ्या कंपनीला नादियाचे गुणच दाखवता आले नाहीत. कारण, त्यांनी ही कल्पनाच केली नव्हती, की जिम्नॅस्टिक्ससारख्या प्रकारात कुणाला १० पैकी १० गुण मिळतील. आणि, त्यामुळे तो आकडा उमटविण्याची सोयच त्या फलकाला नव्हती. नादियाने याच ऑलिम्पिक स्पर्धांत पुढे आणखी सहा प्रकारांत १० पैकी १० गुण मिळवून जिम्नॅस्टिक्सच्या गुणफलकाला पुरते हरवले. इतिहास घडतो, तो असा.

जिम्नॅस्टिक्स आणि सोव्हिएत महासंघ असे खरे तर तोवर समीकरण. त्या काळात अमेरिकेबरोबरच्या शीतयुद्धात प्रत्येकच बाबतीत स्पर्धा करणारी सोव्हिएत रशिया जिम्नॅस्टिक्समध्ये एकतर्फी वर्चस्व गाजवून होती. १९७२ चे म्युनिक ऑलिम्पिक गाजवलेली याच देशाची ओल्गा कोर्बुत मॉँट्रियलमध्येही सुवर्णपदकांची प्रमुख दावेदार म्हणून आली होती. शिवाय, नेली किमचाही दबदबा होता. सोव्हिएत रशियाचे पुरुष आणि महिलांचे जिम्नॅस्टिक्सचे पूर्ण संघच अतिशय प्रबळ होते. नादियाने ती पोलादी भिंत ओलांडली, ती त्या वेळी कम्युनिस्टच असलेल्या रुमानियाच्या पोलादी भिंतीआड वाढूनही. नादियाने जे विक्रम केले, तो केवळ इतिहास राहिला नाही. अशासाठी, की तिने ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकले, त्या वेळी ती १४ वर्षांची होती. त्यानंतर जिम्नॅस्टिक्समध्ये सहभागी होण्यासाठी किमान १६ वर्षे पूर्ण केल्याची अट घालण्यात आली. त्यामुळे ही अट हटेपर्यंत तिचा विक्रम वर्तमानातही अबाधित. शिवाय, आता जिम्नॅस्टिक्समधील गुणांकनाच्या बदललेल्या निकषांमुळे १० पैकी १० मिळणे जवळपास दुरापास्त. त्यामुळे नादिया आणि तिच्यानंतरच्या काही मोजक्या सोडल्या, तर हा विक्रमही अजून तरी मोडणे अवघड, भविष्यात काही वेगळे घडेपर्यंत.

अवघ्या सहाव्या वर्षी जिम्नॅस्टिक्स शिकायला सुरुवात केलेल्या नादियाने पुढच्या आठ वर्षांत ऑलिम्पिक सुवर्णपदकाला गवसणी घालणे हा प्रवास खचितच अवघड. एवढ्या लहान वयात दररोज पाच-सहा तास फक्त या खेळाचा सराव इतकेच तिचे आयुष्य मर्यादित होऊन गेले होते. या सरावाचे काठिण्य, जिम्नॅस्टिक्समधील कसरतींमध्ये असलेले शारीरिक इजा होण्याचे धोके, इतक्या लहान वयात एकाग्रता आणण्यासाठी करावा लागणारा त्याग ही साधना सोपी नाही. जिम्नॅस्टिक्समध्ये ताकद आणि तोलाची कायम कसोटी. जोडीला कसरतीत लालित्य हवे, प्रत्येक कृतीत डौल हवा आणि लँडिंग करताना चेहऱ्यावर हसू ठेवून कृतज्ञता भावही हवा. त्याशिवाय मानवी वक्रता इतकी देखणी होऊ शकत नाही. नादिया त्याचे पूर्ण रूप होती.

नादिया तिकडे हा पराक्रम घडवत असताना या १९७६ च्या ऑलिम्पिकमध्ये आपण कुठे होतो? फार कुठेच नाही. ज्या हॉकीमध्ये दबदबा कायम ठेवून होतो, त्यात १९२८ नंतर प्रथमच पदकाविना परत येत होतो. त्यातही सातव्या स्थानी राहून. या संघाचा भाग असलेले अशोक कुमार हे भारताचे हॉकी दिग्गज ध्यानचंद यांचे पुत्र. आदल्याच वर्षी १९७५ मध्ये हॉकीत भारतीय संघाने जागतिक विजेतेपद मिळवले होते. या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पाकिस्तानविरुद्ध विजयी गोल लगावला होता अशोक कुमार यांनीच! १९८० च्या मॉस्को ऑलिम्पिकमध्ये नादियाने पुन्हा दोन सुवर्णपदके पटकावली. तिकडे १९७६ च्या ऑलिम्पिकमध्ये हॉकीत झालेल्या नाचक्कीचे सावट घेऊनच भारतीय संघ मॉस्कोत दाखल झाला होता. या वेळी स्पर्धेतील एकूण संघांची संख्या कमी होती. पण, भारतीय संघही नवखा होता. संघात फक्त पाच खेळाडू असे होते, जे परदेशी खेळाडूंच्या संघांशी खेळले होते. इतक्या नवख्या संघाला तेही गेल्या स्पर्धेतील अपयशाच्या पार्श्वभूमीवर ऑलिम्पिकसारख्या स्पर्धेत न्यायचे, तर प्रेरणेची ठिणगी गरजेची होती. कर्णधार वासुदेवन भास्करन यांनी मग कल्पना सुचविली प्रेरणा संवादाची. बेंगळुरूतील राष्ट्रीय शिबिरात तेव्हा भारतीय हॉकी संघाचा अशा प्रकारचा पहिलाच प्रेरणा संवाद झाला, तो फील्ड मार्शल सॅम माणेकशॉ यांच्याबरोबर! ते संघाशी दोनदा बोलले आणि त्यांनी एक ध्येयही दिले. याचा उपयोग होईल, असे वाटल्याने या आधी ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक मिळविलेल्या संघातील लेस्ली क्लॉडियस आणि मुनीस्वामी राजगोपाल यांनाही भास्करन यांनी बोलावून संघाशी संवाद साधण्याची विनंती केली. याचा अपेक्षित परिणाम झाला. भारताने पहिल्या सामन्यात टांझानियाला तब्बल १८-० अशा फरकाने हरविले. मग पोलंड, स्पेनबरोबर २-२ बरोबरी आणि क्युबाला १३-० अशी धोबीपछाड. यजमान सोव्हिएत रशियाबरोबचा सामना अवघड होता, कारण ते घरच्या मैदानावर खेळत होते. पास मागितलेला ऐकू जाईल की नाही, इतका स्टेडियममध्ये गोंधळ होता. पण, भारतीय संघ इतका आत्मविश्वासात होता, की जिवाच्या आकांताने खेळून संघाने सोव्हिएत रशियाला ४-२ धूळ चारली. अंतिम सामन्यात स्पेनविरुद्ध पूर्वार्धात भारताकडे २-० अशी आघाडी होती. आघाडीचा मध्यरक्षक म्हणून खेळणाऱ्या सुरिंदरसिंग सोधीने दोन्ही गोल केले. एम. के. कौशिकने उत्तरार्धाची सुरुवात गोलने केली, पण स्पेनचा कर्णधार जुआन ॲमटने दोन गोल करून सामना ३-२ अशा रोचक स्थितीत आणला. मग भारताने एक हुकमी एक्का खेळला. मोहम्मद शाहिद यांना सेंटर फॉरवर्ड म्हणून खेळविण्याचा. त्यांनी स्पर्धेत तोवर खूप चमकदार म्हणावी अशी कामगिरी केली नव्हती, पण संघाला आणि कर्णधाराला त्यांच्या कौशल्यावर विश्वास होता. भारताचा चौथा आणि विजयी गोल शाहिद यांनीच केला. भारत ४, स्पेन ३. हॉकीतील सुवर्णपदक भारताकडे...

या आठव्या सुवर्णपदकानंतर ऑलिम्पिकमध्ये हॉकीत २०२० मध्ये कांस्य मिळाले. पण, सुवर्णयश मिळविण्यासाठी भारत अजून झगडतो आहे. त्यासाठी कदाचित आणखी एक प्रेरणादायी संवाद लागेल. आपण तोवर या आख्यानाच्या पुढच्या भागात ध्यानचंद यांनी काय कमाल होती, ते पाहू.

# 'व्ही-टू-व्ही कम्युनिकेशन' यंत्रणेमुळे अपघातांना आळा कसा बसेल?

विशेष विश्लेषण

गोविंद डेगवेकर
govind.degvekar@expressindia.com

**अपघाताला कारण ठरणाऱ्या गोष्टींची माहिती चालकाला आधीच कळावी आणि अपघात, मनुष्यहानी टाळता यावी, या हेतूने वाहनांमध्ये टप्प्याटप्प्याने 'व्ही-टू-व्ही कम्युनिकेशन' यंत्रणा बंधनकारक करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे...**

**'व्ही-टू-व्ही' म्हणजे काय?**

'व्हेइकल टू व्हेइकल कम्युनिकेशन' (व्ही-टू-व्ही) अर्थात एका वाहनाचा अन्य वाहनांशी असलेला संपर्क. ऑक्टोबर २०२८पासून ही व्ही-टू-व्ही यंत्रणा प्रत्येक नव्या वाहनांमध्ये स्थापित करणे बंधनकारक असेल. याबाबतचा एक महत्त्वाचा प्रस्ताव केंद्र सरकारने तयार केला आहे. ही यंत्रणा कशी काम करेल, ती ॲडव्हान्स ड्रायव्हर असिस्टंट सिस्टीमहून (ॲडास) कशी वेगळी असेल आणि रस्ते सुरक्षेत तिचा किती महत्त्वाचा वाटा असेल? त्यातून एकसंध वाहतूक कशी कार्यान्वित होईल, हे पाहणे महत्त्वाचे आहे. समजा, समोरील वाहनाने अचानक ब्रेक लावल्यानंतर वा ड्रायव्हरच्या नजरेला पडण्यापूर्वी एखादी रुग्णवाहिका लांब अंतरावर असताना गाडीच्या डॅश बोर्डवर तातडीने डिजिटल संदेश मिळेल. रस्त्यावर लगतच्या वाहनांमध्ये बिनतारी संपर्काद्वारे वेग, वाहनाची स्थिती, दिशा इत्यादी माहितीची प्रत्यक्ष देवाण-घेवाण अधिक प्रभावी करणारे तंत्रज्ञान म्हणजे 'व्ही-टू-व्ही कम्युनिकेशन'.

**सरकारचा प्रस्ताव काय आहे?**

रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने सर्वच- म्हणजे दुचाकी तसेच हलक्या, मध्यम व प्रमाणित मालवाहतूक करणाऱ्या चारचाकी वाहनांमध्ये 'व्ही-टू-व्ही कम्युनिकेशन' पद्धती बंधनकारक करण्यासाठीचा प्रस्ताव तयार केला आहे. १ ऑक्टोबर २०२८ पासून या तंत्रज्ञानाचा पहिला टप्पा सुरू केला जाईल. यासाठी भारताच्या केंद्रीय वाहन नियम १९८९मध्ये दुरुस्ती केली जाईल. प्रकल्पाचा एकंदर खर्च पाच हजार कोटी, तर प्रत्येक वाहनामागे सुमारे पाच ते सात हजार रुपये खर्च येईल, असा प्राथमिक अंदाज आहे.

**'व्ही-टू-व्ही' सध्याच्या 'ॲडास'हून वेगळी कशी?**

वाहनातील कॅमेरा, रडार व इतर संवेदी उपकरणांच्या (सेन्सर) आधारे 'ॲडास' अर्थात 'ॲडव्हान्स ड्रायव्हर असिस्टंट' यंत्रणा ही रस्त्यावरील धोका निर्धारित करते. 'व्ही टू व्ही कम्युनिकेशन' त्याहून वेगळे आहे. या पद्धतीत चालकाच्या नजरेत न येणाऱ्या धोक्यांबाबत दोन वाहने एकमेकांशी 'बोलू' लागतील. म्हणजे, एखाद्या वळणावर, मोठी वाहतूक कोंडी वा धूसर वातावरणात संभाव्य धोका ओळखून सुरक्षाविषयक संदेशांचे तातडीने वहन करतील. यात व्ही-टू-व्ही ही 'ॲडास'पेक्षा काही पटींनी प्रगत असल्याचा तज्ज्ञांचा दावा आहे. 'ॲडास'चे एकेकटे सेन्सर धोका निश्चित करू शकत नाहीत.

**'व्ही-टू-व्ही' यंत्रणा कशी काम करेल?**

प्रस्तावित रचनेअंतर्गत कारखान्यातच सेल्युलर व्हेइकल-टू-एव्हरीथिंग (सी-व्हीटूएक्स) तंत्रज्ञानावर आधारित ऑन-बोर्ड युनिट बसवले जातील. ही यंत्रणा ५.८७५ ते ५.९२५ गिगाहर्ट- इतक्या प्रगत स्पेक्ट्रमच्या बळावर कार्यान्वित होईल. वाहनातील ही उपकरणे लगतच्या वाहनांशी सुरक्षेशी संबंधित माहितीची सातत्याने देवाण-घेवाण सुरू ठेवतील. त्यात अचानक ब्रेक, वाहनांतील टकरीचा धोका, विरुद्ध दिशेने येणारे वाहन आणि आपत्कालीन स्थितीत मदत पुरवणाऱ्या वाहनांच्या (रुग्णवाहिका, अग्निशमन दलाची वाहने) माहितीचा समावेश आहे. भारतातील वाहने व सुट्या भागांसाठी नियम तयार करणाऱ्या 'वाहन उद्योग मानक (ऑटोमोटिव्ह इंडस्ट्री स्टॅण्डर्ड-'एआयएस') समितीने 'वाहन उद्योग मानक-२३०' या ठरावात (एआयएस-२३०) अशा तंत्रज्ञानाची आवश्यकता स्पष्ट केली होती.

**या यंत्रणेची गरज किती?**

भारतात २०२५ मध्ये रस्ते अपघातांत एक लाख ८३ हजार माणसे बळी पडली; तर २०२६ मध्ये २७ जुलैपर्यंत बळींची संख्या ६२,१२२ वर पोहोचली. सर्वाधिक अपघातांमध्ये मानवी चुकांचा वाटा अधिक आहे. 'व्ही-टू-व्ही'च्या साह्याने वाहनांमध्ये प्रत्यक्ष स्थितीतील माहितीची देवाण-घेवाण सुरू ठेवल्यास चालकाला धोक्याचा अंदाज येईल आणि संभाव्य अपघात टाळता येईल. वाहनांमध्ये 'व्ही-टू-व्ही' यंत्रणा कार्यान्वित झाल्यास त्याआधारे 'व्हेइकल-टू-इन्फ्रास्ट्रक्चर' (वाहन ते पायाभूत सुविधा संपर्क) यंत्रणाही उभारता येईल. यात संवेदी उपकरणे (सेन्सर) विद्युत खांब, पुलांचे कठडे, उड्डाणपुले आणि संरक्षक कठड्यांना बसवली जातील. त्यामुळे वाहनांना संभाव्य धोक्याची माहिती अधिक वेगाने आणि प्रभावीरीत्या मिळू शकेल. यातून सर्वोत्तम वाहतूक व्यवस्थापन व सॉफ्टवेअर निर्धारित केलेल्या वाहन निर्मितीला चालना मिळेल. पूर्णपणे तंत्रज्ञानावर आधारलेली रस्ते सुरक्षा, ही त्याहून महत्त्वाची आणि आश्वासक मजल असेल.

## लोकमानस

loksatta@expressindia.com

### मूल्याधिष्ठित पुनर्बांधणी व्हावी

''**'नीट'नेटकी का** नाही...?' हा अग्रलेख (१४ ऑगस्ट) वाचला. भारताला अजूनही जागतिक दर्जाची शैक्षणिक व्यवस्था निर्माण करता आलेली नाही. शेजारील चीनच्या 'गाओकाओ'सारखी यंत्रणा आपण का उभारू शकलो नाही, यावर चिंतन झाले पाहिजे. आपल्या राजकीय नेतृत्वाने, 'न खाउंगा न खाने दुंगा' असा मंत्र तर दिला, पण प्रत्येक क्षेत्रात लागेबांधे असल्याने, 'नीट'सारख्या परीक्षेचेही पेपर फुटतात. जागतिक पातळीवर भारत विश्वगुरू असल्याचे चित्र रंगवले जात असताना अशी अवस्था होणे दयनीय आहे. निवडणुका जिंकण्यातच सरकार मग्न आहे. सारीच यंत्रणा भ्रष्ट आचरणाने पोखरून निघते तेव्हा, विश्वासार्हतेलाही तडे जातात. भाषांतरकार, प्रश्नपत्रिका तयार करणारे शिक्षक आणि छापखाना यांतील 'ऋणानुबंध' केवळ पेपर फुटल्यामुळे समोर आले. अन्यथा कित्येक वर्षांपासूनची ही साखळी पुढेही सुरूच राहिली असती. एनटीएची मूल्याधिष्ठित पुनर्बांधणी केल्याशिवाय पर्याय नसला तरी त्यात विद्यमान यंत्रणेतील कुणाही सदस्याचा अंतर्भाव करण्यात येऊ नये. एकूणच व्यवस्थेचे शुद्धीकरण करण्यासाठी, कठोर निर्णय घ्यावे लागतील. आरोग्य व्यवस्थेला भ्रष्टाचाराचा भुंगा कुरतडत आहे. विश्वगुरू म्हणून मिरवताना विकासातील त्रुटी लक्षात का येत नाहीत?

■ **डॉ. नूतनकुमार पाटणी,** चिकलठाणा (औरंगाबाद)

### आपण कसले विश्वगुरू?

''**'नीट'नेटकी का** नाही...?' हा अग्रलेख वाचला. केवळ नियमन करून नाही तर नियमांची कठोर अंमलबजावणी करून एखादी प्रक्रिया पार पाडायची असते, याचे भानच एनटीएने गमाविल्यामुळे आणि त्याबाबत गंभीर नसल्यामुळे पेपरफुटीसारख्या घटना घडतात. पेपर फुटू नयेत म्हणून निर्मिलेल्या व्यवस्थेवरही लक्ष ठेवणे अपरिहार्य आहेच. दोषींना कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे तरच या परीक्षा सुरळीत होतील नाहीतर 'मोरीला बोळा आणि दिंडी दरवाजा उघडा' असे असेल तर उंदीर आतमध्ये शिरणारच. शत्रू देशाचे काही चांगले गुण आपण घेतले तर काही बिघडत नाही. आपल्यासारखाच उदंड लोकसंख्या असलेला देश पण कोणाचीही भ्रष्टाचार करण्याची, पेपर फोडण्याची हिंमत होत नाही. 'विश्वगुरू', 'जगातील वेगवान अर्थव्यवस्था' वगैरे ठीक आहे पण 'नीट'सारखी परीक्षासुद्धा नीट घेता येत नसेल तर झाकली मूठ सव्वा लाखाचीच म्हणावी लागेल.

■ **अनिरुद्ध गणेश बर्वे,** कल्याण

### संसदेतल्या गोंधळाचीच चर्चा

'**अखेरच्या दिवशी** हजेरी' ही (१४ ऑगस्ट) बातमी वाचली. या अधिवेशनात चर्चा कमी आणि गोंधळाच जास्त झाला. विरोधकांनी अभ्यासपूर्ण प्रश्न उपस्थित करावेत आणि सत्ताधाऱ्यांनी समर्पक उत्तरे द्यावीत, हा अधिवेशनाचा खरा हेतू असतो. अधिवेशने अलीकडे चर्चेऐवजी गोंधळासाठी चर्चेत आहेत. कामकाज तहकूब, घोषणाबाजी, फलकबाजी हे नित्याचे झाले आहे. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशीही सभागृहात गदारोळ झाला. महत्त्वाच्या विधेयकांवर चर्चेला वेळ मिळाला नाही. आवाजी मतदानाने घाईघाईत मंजुरी देण्यात आली. विधेयके चर्चेविना संमत झाली. विरोधकांना बोलू दिले नाही. करदात्यांच्या पैशांतून चालणाऱ्या संसदेचे तास वाया गेले.

■ **संभाजी दुधमल,** सासवड

### नक्षलमुक्त होण्याच्या वाटेवर

'**मिसिर बेसराच्या** अटकेनंतर देश खरेच नक्षलमुक्त झाला का?' हे विश्लेषण (१४ ऑगस्ट) वाचले. मिसिर बेसराच्या अटकेनंतर नक्षलवादाचा कणा नक्कीच मोडला आहे, पण देश नक्षलमुक्त झाला हे पूर्णपणे सत्य नाही. नक्षलवादी जिल्ह्यांच्या संख्येत कमालीची घट झाली आहे. जेमतेम १०-१५ जिल्ह्यांमध्ये आता नक्षलवाद दिसून येतो. त्यातील मोठ्या नेत्यांच्या मृत्यूमुळे किंवा अटकेमुळे त्यांच्या ताकदीला आता आळा बसला आहे. तसेच पोलीस व सुरक्षा विभागाच्या दलांची पकड या नक्षली भागात मजबूत आहे, पण अजूनही महाराष्ट्र, तेलंगणा व छत्तीसगडसारख्या राज्यांतील जंगलांच्या भागात नक्षलवादाचे अस्तित्व काही प्रमाणात कायम आहेच. सरकारी योजनांमुळे, सुरक्षा दलांच्या प्रयत्नांतून आणि अनेकविध डावपेचांमुळे भारत आता नक्षलवादातून मुक्त होण्याचा शेवटच्या पायरीवर उभा आहे, असा विश्वास वाटतो.

■ **सरिता पोटे,** अहिल्यानगर

# 'युनिव्हर्सिटी टाउनशिप'साठी हालचाली

पुणे : देशातील प्रमुख औद्योगिक आणि मालवाहतुकीच्या परिसरात 'युनिव्हर्सिटी टाउनशिप' उभारण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारने हालचाली सुरू केल्या आहेत. या प्रस्तावित योजनेची रूपरेषा निश्चित करण्यासाठी शिक्षण मंत्रालयाने विविध भागधारकांकडून ऑनलाइन सर्वेक्षणाअंतर्गत अभिप्राय मागवण्यास सुरुवात केली आहे.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (एआयसीटीई) आणि विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) या बाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. केंद्र सरकारने २०२६-२७च्या अर्थसंकल्पात 'युनिव्हर्सिटी टाउनशिप' ही संकल्पना मांडली आहे. या प्रकल्पांच्या उभारणीसाठी राज्य सरकारांना केंद्र सरकारकडून मदत केली जाणार आहे. या अंतर्गत पाच 'युनिव्हर्सिटी टाउनशिप' प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक, शैक्षणिक प्रशासक, माजी विद्यार्थी, उद्योग प्रतिनिधी आणि अन्य संबंधित घटकांकडून सूचना, अभिप्राय मागवण्यात आले आहेत. या सर्वेक्षणाअंतर्गत सादर होणाऱ्या सूचनांच्या आधारे योजनेची पुढील रूपरेषा निश्चित करण्यात येणार आहे.

युनिव्हर्सिटी टाउनशिपबाबत अभिप्राय नोंदवण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांनी व्यापक प्रसार करावा. विद्यार्थी, शिक्षक, संशोधक, कर्मचारी, माजी विद्यार्थी, नवोन्मेष परिषद, नवोन्मेष आणि उद्योजकता विकास कक्ष, मार्गदर्शन केंद्र, नवउद्यमी, उद्योग भागीदारांना यात सहभागी करून घ्यावे. शिक्षण संस्थांनी अभिप्राय नोंदवण्याबाबतचा प्रचार-प्रसार करावा. विद्यार्थी आणि शिक्षकांच्या गटांमधून या उपक्रमाची माहिती देऊन अधिकाधिकांचा सहभाग सुनिश्चित करावा. अभिप्राय 'मायगव्ह' संकेतस्थळावर नोंदवता येणार आहे. तसेच https:// secure. mygov. in/ mygov- survey/ public- consultation- university- townships- initiative या दुव्याचा वापर करता येणार आहे, असे स्पष्ट केले आहे.

### काय आहे 'टाउनशिप'

- युनिव्हर्सिटी टाउनशिपच्या माध्यमातून विद्यापीठे, महाविद्यालये, संशोधन संस्था, कौशल्य विकास केंद्रे, नवोन्मेष केंद्रे तसेच निवासी सुविधा यांचा एकात्मिक शैक्षणिक परिसर विकसित करण्याचे उद्दिष्ट आहे.
- टाउनशिपद्वारे उच्च शिक्षण, संशोधन, कौशल्यविकास आणि उद्योग यांना एकाच परिसंस्थेत जोडण्याचा सरकारचा विचार आहे.


## स्वतंत्र मायक्रो हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लि.

ऑफिस क्र. 5 आणि 6, 11 वा मजला, ई विंग, टाइम्स स्क्वेअर, अंधेरी-कुर्ला रोड, मरोळ, अंधेरी (पू), मुंबई - 400059. टेलि. - 18001234427 / +91 22 69609000/100, ईमेल: collections@mhfcindia.com

### परिशिष्ट 4 [नियम 8 (1) पहा] ताबा सूचना

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार हे स्वतंत्र मायक्रो हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लि. (एसएमएचएफसी) यांचे अधिकृत अधिकारी आहेत यांनी सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 सहवाचता निर्देशित कलम 13 अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली नमूद कर्जदारांना मागणी सूचना जारी केली, ज्यामध्ये तक्त्यांमध्ये नमूद केलेल्या कर्जदारांना सदर सूचना मिळाल्याच्या तारखेपासून/सूचना मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत सूचनेमध्ये नमूद केलेली रक्कम व्याज आणि त्यावरील खर्चासह परत करण्याचे आवाहन केले आहे.
कर्जदार रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे कर्जदार/जामीनदार/ गहाण ठेवणार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकार यांनी निर्देशित नियमांच्या नियम 8 सहवाचता सदर निर्देशित कायद्याच्या कलम 13(4) अंतर्गत त्यांना/तिला दिलेल्या अधिकारांचा वापर करून खाली नमूद करण्यात आलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.
विशेषतः कर्जदार/जामीनदार/गहाण ठेवणारांना आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे मालमत्तेशी व्यवहार न करण्याची खबरदारी दिली जाते, आणि मालमत्तेच्या कोणत्याही व्यवहाराचा हा खाली नमूद केलेल्या रकमेसाठी आणि पूर्ण देय होईपर्यंत त्यावरील व्याज आणि खर्चासह यासाठी स्वतंत्र मायक्रो हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड (एसएमएचएफसी) यांच्या शुल्काच्या विषयाधीन असेल.

| कर्जदार/जामीनदाराचे नाव | मागणी सूचना तारीख / ताबा तारीख | थकबाकी रक्कम | मालमत्तेचे वर्णन |
|---|---|---|---|
| श्रीमती सुरेखा माकोडे | 14-05-2026<br>10-08-2026 | रु. 1,56,214/- (रुपये एक लाख छप्पन्न हजार दोनशे चौदा फक्त) | फ्लॅट/युनिट क्र. 101, मजला क्र. 1, एएमसी-एएचपी-पीएमएवाय-म्हासला 22 प्लॉट या प्रकल्पातील 'बी' नावाच्या इमारतीमधील फ्लॅटचा प्रकार - 1 बीएचके, येथे स्थित प्लॉट क्र. 1 ते 16, सर्वेक्षण क्र. 22 पार्ट, आय.टी.आय. कॉलेजच्याजवळ, कृष्णा नगरजवळ, तपोवन रोड, रहाटगाव, म्हासला, अमरावती, महाराष्ट्र - 444602. |

दिनांक:-15/08/2026 (शारिक सौदागर)- अधिकृत अधिकारी
स्थान: महाराष्ट्र स्वतंत्र मायक्रो हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्याकरिता

## आधार हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

Aadhar Housing Finance Ltd

**कॉर्पोरेट कार्यालय:** ऑफिस क्र. 501 आणि 503, पाचवा मजला, लाइटब्रिज, साकी विहार रोड, अंधेरी पूर्व, मुंबई उपनगर (जिल्हा), महाराष्ट्र -400072
**अमरावती शाखा:** मालमत्ता क्र. 23/4, राजापेठ, लँडमार्क घुंडीवाल हॉस्पिटल, अमरावती -444605 (महाराष्ट्र)
**वर्धा शाखा:** प्लॉट क्र. 7, अरवी नाका चौकाजवळ, गांधी नगर, नसरे सभागृह, वर्धा- 442001 (महा)

### जोडपत्र IV ताबा सूचना (अचल मालमत्तेसाठी)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे **आधार हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (AHFL)** चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या नियम 3 सह वाचण्यात येणारया अनुच्छेद 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली नमूद कर्जदारांना / जामीनदारांना एक मागणी सूचना निर्गमित केली ज्यात त्यांना सदर सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून **60 दिवसांचे** आत सूचनेत नमूद रकमेची परतफेड करण्याचे आव्हान करण्यात आले होते. कर्जदार सदर रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने कर्जदार/जामीनदारांना व सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेन्ट रुल्स, 2002 च्या नियम 8 सह वाचण्यात येणारया सदर अधिनियमाच्या अनुच्छेद 13 च्या उप-विभाग (4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली नमूद मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे. अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमाच्या अनुच्छेद 13 च्या उप-विभाग (8) मधील तरतुदींकडे वेधण्यात येते. याद्वारे कर्जदार व सर्वसामान्य जनतेस सावधगिरीची सूचना देण्यात येते की सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो एएचएफएलच्या खाली नमूद रकमेच्या व त्यावरील व्याज एवढ्या रकमेच्या भाराधीन असेल.

| अ. क्र. | कर्जदार/सह-कर्जदाराचे नाव (शाखेचे नाव)- | अनामत मत्तेचे वर्णन (अचल मालमत्ता) | मागणी सूचना दिनांक आणि रक्कम | ताबा दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | (कर्ज कोड क्र. 25710000182 / अमरावती शाखा) वृषभ सुनील वानखडे (कर्जदार) रेश्मा वृषभ वानखडे (सह-कर्जदार) | जुना मालमत्ता क्र. 217, नवा मालमत्ता क्र. 291, एकूण क्षेत्रफळ सुमारे 450 चौ.फू. (41.82 चौ.मी.) वॉर्ड क्र. 2, मौजे वाघोली, ता. मोर्शी, जि. अमरावती, ग्राम पंचायत वाघोली च्या हद्दीत. **चतुःसीमाः** पूर्वेस- शासकीय रस्ता, पश्चिमेस - शासकीय रस्ता, उत्तरेस - वानखडे यांचे घर. दक्षिणेस - वानखडे यांचे घर. | 12-05-2026<br>Rs. 5,67,269/- | 12-08-2026 |
| 2 | (कर्ज कोड क्र. 25710000100 / अमरावती शाखा) दिवंगत प्रीतम किशोरराव शिवणकर (द्वारे त्यांचे कायदेशीर वारस) (कर्जदार) शीतल प्रीतम शिवणकर (सह-कर्जदार) | प्लॉट क्र. 5, एकूण क्षेत्रफळ सुमारे 2034 चौ.फू. (189 चौ.मी.), त्यापैकी पूर्व पश्चिम विभाजन केल्यानंतर दक्षिणेकडील भाग उप-विभाजित करून प्लॉट क्र. 5/ब, क्षेत्रफळ सुमारे 1017 चौ.फू. (94.52 चौ.मी.), शेत सर्वे क्र. 185/2, मौजे रहाटगाव, प्रगणे नांदगाव पेठ, ता. व जि. अमरावती, अमरावती महानगर पालिकेच्या हद्दीत-444606. **चतुःसीमाः** पूर्वेस- लेआउट रस्ता, पश्चिमेस -प्लॉट क्र. 4, उत्तरेस - सर्विस लाईन, दक्षिणेस- उप-विभाजित प्लॉट क्र. 5/अ. | 12-05-2026<br>Rs. 10,79,280/- | 12-08-2026 |
| 3 | (कर्ज कोड क्र. 30210000048 / वर्धा शाखा) सागर बाळूभाऊ धरपाल (कर्जदार) दुर्गा बाळूभाऊ धरपाल (सह-कर्जदार) | प्लॉट क्र. 480, क्षेत्रफळ सुमारे 95 चौ.मी., नझुल शीट क्र. 3, मौजे वलगाव, ता. जि. अमरावती, ग्रामपंचायत वागाव च्या हद्दीत-444801. **चतुःसीमाः** पूर्वेस- शासकीय विहीर आणि लंगोटे यांचे घर, पश्चिमेस- शासकीय रस्ता आणि अंबरपुरे यांचे घर, उत्तरेस- शासकीय रस्ता आणि बजाज यांचे गोदाम, दक्षिणेस- बाळू धरपाल यांचे घर. | 12-05-2026<br>Rs. 6,96,336/- | 13-08-2026 |

स्थानः महाराष्ट्र स्वा/-प्राधिकृत अधिकारी
दिनांक: 15-08-2026 आधार हाऊसिंग फायनान्स लिमिटेड करिता

## गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालयः सहावा मजला, बी बिल्डींग, गंगा टूएनो, लोहेगाव, पुणे-411014.

**सर्फेसी अधिनियम, 2002 मधील अनुच्छेद 13(2) अंतर्गत मागणी सूचना**

आपण, म्हणजे खाली नमूद कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदारांनी **गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड,** यापुढे सुरक्षित धनको असा उल्लेख करण्यात येईल, यांच्याकडून आपल्या अचल मालमत्ता तारण ठेवून मालमत्तेवरील कर्ज / गृह कर्ज घेतलेले आहे. आपण भरण्यामध्ये कसूर केलेली आहे आणि म्हणून आपले कर्ज अनुत्पादक मत्ता म्हणून वर्ग करण्यात आले आहे. शेवटच्या ज्ञात पत्त्यावर थकबाकीच्या वसुलीसाठी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 मधील अनुच्छेद 13(2) अंतर्गत मागणी सूचना पाठविण्यात आली होती, परंतु ती तशीच परत आलेली आहे. त्यामुळे सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 3(1) सह वाचण्यात येणारया सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(2) अंतर्गत पाठविण्यात आलेल्या सुचेतील मजकूर आपल्याला बजावण्यात येणारी पर्यायी सूचना म्हणून येथे प्रकाशित करण्यात येत आहे.
कर्जदार, सह-कर्जदार, जामीनदार, अनामती, थकबाकी, अनुच्छेद 13(2) अंतर्गत पाठविण्यात आलेली मागणी सूचना आणि त्यात मागणी करण्यात आलेली रक्कम इ. तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कर्जदार, सह-कर्जदार, जामीनदार आणि कर्जाची रक्कम | अनामत मत्तेचा तपशील | मागणी सूचना दिनांक / थकबाकी रक्कम रु. |
|---|---|---|---|
| 1 | माया रवींद्र सहारे, रवींद्रजी रामचंद्रजी सहारे **कर्जाची रक्कमः** रु. 1070721/- **कर्ज क्र.:** HM0103H16100151 | जमीन क्षेत्रफळ सुमारे 1500.00 चौ.फू., मौजा-पाटणसावंगी यांच्या गावठाण हद्दीत, बंदोबस्त क्र. 135, प.ह.क्र. 15, वॉर्ड क्र. 3, ग्रामपंचायत घर क्र. 825 (जुना), 1053 (जुना), 1228 (नवीन), क्षेत्रफळ सुमारे 1300.00 चौ.फू., ग्रामपंचायत पाटणसावंगी यांच्या हद्दीत, पंचायत समिती - सावनेर, तहसील-सावनेर, जिल्हा नागपूर आणि **चतुःसीमाः** पूर्वेस- प्लॉट क्र. 20, पश्चिमेस- श्रीमती चंद्रभागाबाई कन्नडी यांची जमीन, उत्तरेस- 20 फू. रुंद रस्ता, दक्षिणेस- प्लॉट क्र. 16. | 10/08/2026<br>**रु. 970696/-** (रुपये नऊ लक्ष सत्तर हजार सहाशे शहाण्णव फक्त) यासह परतफेड करेपर्यंतचे वार्षिक 17.25% दराने पुढली व्याज. |
| 2 | शेख समीर शेख जमील, कनीज फातेमा अली निसार, मुमताज बी शेख जमील **कर्जाची रक्कमः** रु. 2497000/- **कर्ज क्र.:** LAP06012000000005024495 | पूर्व-पश्चिम विभाजनातील उत्तर भाग, जमीन शेत सर्वे क्र. 20/2, महानगर पालिका मालमत्ता क्र. 668 (नवीन) 278 (जुना), मौजे नायगाव, तह. आणि जिल्हा अकोला, क्षेत्रफळ सुमारे 1194 चौ.फू., महानगर पालिका अकोला यांच्या अधिकार क्षेत्रात, तह. आणि जिल्हा अकोला. मालमत्तेच्या **चतुःसीमाः** पूर्वेस-रस्ता, पश्चिमेस- सर्विस गल्ली, उत्तरेस- शादाब कॉलनी, दक्षिणेस- मालमत्ता क्र. 668 चा उर्वरित भाग. | 10/08/2026<br>**रु. 2656095/-** (रुपये सव्वीस लक्ष छप्पन्न हजार पंच्याण्णव फक्त) यासह परतफेड करेपर्यंतचे वार्षिक 15.2% दराने पुढली व्याज. |
२५ वर्षांहून अधिक काळ निष्कलंक सेवा बजावलेल्या २७ अधिकारी-अंमलदारांना अतिउत्कृष्ट सेवा पदक, तर १५ वर्षांहून अधिक काळ निष्कलंक सेवा बजावलेल्या तीन अधिकारी-अंमलदारांना उत्कृष्ट सेवा पदक जाहीर करण्यात आले आहे. पदकप्राप्त सर्व अधिकारी आणि अंमलदारांचे गडचिरोलीचे पोलीस अधीक्षक एम. रमेश यांनी अभिनंदन केले.

# पोलीस उपअधीक्षक प्रमोद लोखंडे यांना 'अति-उत्कृष्ट सेवा पदक'

लोकसत्ता वार्ताहर



**चंद्रपूर :** भारत सरकारच्या गृह मंत्रालयातर्फे पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दीर्घकालीन आणि निष्कलंक सेवेची दखल घेत प्रदान करण्यात येणारे 'अति-उत्कृष्ट सेवा पदक' (२५ वर्षे सेवा पूर्ण) भारत राखीव बटालियन-४, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १७, चंद्रपूर येथील पोलीस उपअधीक्षक तथा समादेशक सहायक प्रमोद हरीराम लोखंडे यांना जाहीर झाले आहे.

लोखंडे यांनी ३५ वर्षांच्या सेवाकाळात उत्कृष्ट कामगिरी बजावत ६४८ बक्षिसे आणि १६० प्रशंसापत्रे मिळविली आहेत. तसेच राज्य व राष्ट्रीय स्तरावरील विविध २५ प्रशिक्षणक्रम पूर्ण केले असून प्रशिक्षण अधिकारी म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पाडली आहे. गडचिरोलीतील सिंदसूर येथे २६ ऑगस्ट १९९४ रोजी झालेल्या नक्षलविरोधी कारवाईत त्यांनी धैर्याने सहभाग घेत दोन नक्षलवाद्यांना ठार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रातही लोखंडे यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या दीर्घकालीन आणि गुणवत्तापूर्ण सेवेला मान्यता देत केंद्र सरकारकडून त्यांना 'अति-उत्कृष्ट सेवा पदका'ने सन्मानित करण्यात येणार आहे.

# अमरावती विभागात सोयाबीनचे वर्चस्व कायम

## पारंपरिक तृणधान्यांची पीछेहाट, मक्याचा आलेख उंचावला

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**अमरावती :** अमरावती विभागात यंदाच्या खरीप हंगामात सोयाबीन या रोख पिकाचे वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध झाले असून, विभागातील सरासरी क्षेत्राच्या तुलनेत तब्बल ९२ टक्के क्षेत्रावर सोयाबीनची पेरणी पूर्ण झाली आहे. दुसरीकडे, ज्वारी आणि बाजरीसारख्या पारंपरिक तृणधान्यांच्या पेरणीत कमालीची घट नोंदवण्यात आली असून, मका पिकाकडे शेतकऱ्यांचा कल वाढल्याचे स्पष्ट चित्र पेरणी अहवालावरून समोर आले आहे.

अमरावती विभागात सोयाबीनचे सरासरी क्षेत्र १४ लाख ६३ हजार हेक्टर असून त्या तुलनेत यंदा १३ लाख ४२ हजार हेक्टरमध्ये सोयाबीनची लागवड करण्यात आली आहे. सर्वाधिक सोयाबीनचा पेरा बुलढाणा जिल्ह्यात झाला असून ४ लाख ४४ हजार हेक्टर क्षेत्र सोयाबीन पिकाखाली आले आहे. म्हणजे ११२ टक्के क्षेत्रात लागवड झाली आहे. दुसरीकडे, अमरावती विभागात कापसाचे सरासरी क्षेत्र १० लाख ९२ हजार ६१० हेक्टर आहे. प्रत्यक्षात १० लाख ८० हजार ३६५ हेक्टरवर (९९ टक्के) कापूस पिकाची पेरणी झाली आहे. यवतमाळमध्ये ४.८७ लाख हेक्टर (१०३ टक्के) आणि अमरावतीमध्ये २.६७ लाख हेक्टर (१०० टक्के) पेरणी पूर्ण झाली आहे. बुलढाण्यात मात्र हे प्रमाण ६८ टक्क्यांवर राहिले आहे.

तृणधान्यांच्या लागवडीत मोठी विषमता दिसून येत आहे. अमरावती विभागात मक्याचे सरासरी क्षेत्र ४५ हजार ४६२ हेक्टर असताना प्रत्यक्षात ६८ हजार ६५२ हेक्टरवर (१५१ टक्के) पेरणी झाली आहे. कडधान्य पिकांमध्ये तुरीने आपले स्थान मजबूत ठेवले असले तरी अल्पमुदतीच्या मूग व उडदाला पावसाच्या विलंबाचा फटका बसला आहे. विभागात ४ लाख ४९ हजार ६७६ हेक्टर सरासरी क्षेत्रापैकी ४ लाख २९ हजार ८५६ हेक्टरवर (९६ टक्के) तुरीची पेरणी झाली आहे.

कापूस व सोयाबीनमध्ये आंतरपीक म्हणून तुरीला पसंती कायम आहे. ३५ हजार ६३ हेक्टर सरासरी क्षेत्राच्या तुलनेत अवघ्या ५ हजार ७८९ हेक्टरवर (१७ टक्के) मुगाची पेरणी झाली. ३१ हजार ३२७ हेक्टर सरासरी क्षेत्रापैकी ६ हजार ३५६ हेक्टरवर (२० टक्के) उडदाची पेरणी मर्यादित राहिली आहे.

### खरीप ज्वारीचे क्षेत्र घटले



कधीकाळी पश्चिम विदर्भाचे मुख्य अन्नधान्य असलेल्या खरीप ज्वारीचे क्षेत्र कमालीचे आकुंचित झाले आहे. विभागातील २९ हजार ८५६ हेक्टर सरासरी क्षेत्रापैकी अवघ्या २ हजार ८३५ हेक्टरवर (केवळ ९ टक्के) ज्वारी पेरली गेली आहे. ५३७ हेक्टर सरासरी क्षेत्रापैकी अवघ्या १० हेक्टरवर बाजरीची पेरणी झाली आहे.

# सर्पदंश प्रकरणात दोषींना वाचवण्याचा प्रयत्न

## अंबादास दानवेंचा आरोप; मृत विद्यार्थिनींच्या कुटुंबीयांची भेट

लोकसत्ता वार्ताहर



**गडचिरोली :** जपतलाई आश्रमशाळेतील सर्पदंशाच्या घटनेनंतर संस्थाचालकांवर कारवाई करून प्रशासनातील जबाबदार अधिकाऱ्यांना वाचवण्याचा प्रयत्न सरकारकडून सुरू आहे, असा गंभीर आरोप शिवसेना (उबाठा) गटाचे नेते तथा आमदार अंबादास दानवे यांनी शुक्रवारी केला. दानवे यांनी जपतलाई येथे जाऊन आश्रमशाळेची पाहणी केली तसेच मृत विद्यार्थिनींच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

१० ऑगस्टला पहाटे आश्रमशाळेतील विद्यार्थिनींना सर्पदंश झाला. उपचारादरम्यान तीन विद्यार्थिनींचा मृत्यू झाला असून दोन विद्यार्थिनींवर अद्याप उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर मुख्याध्यापक आणि अधीक्षकांवर कारवाई करण्यात आली. मात्र, आश्रमशाळांची नियमित पाहणी करण्याची जबाबदारी असलेले प्रकल्प अधिकारी आणि वरिष्ठ अधिकारी अद्याप कारवाईच्या कक्षेबाहेर असल्याचा आरोप दानवे यांनी केला. '८५० चौरस फुटांच्या खोलीत तब्बल ११० मुलींना झोपवण्यात येत होते. ही आश्रमशाळा नसून कोंडवाड्यासारखी अवस्था होती,' असे सांगत दानवेंनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. प्रकल्प अधिकाऱ्यांनी दर आठवड्याला आश्रमशाळांची पाहणी करून संस्थेला आवश्यक सूचना देणे आणि विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे अपेक्षित होते, असे ते म्हणाले.

जपतलाईकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था असल्याने सुमारे ४५ किलोमीटर अंतर कापण्यासाठी दोन तास लागतात. त्यामुळे विद्यार्थिनींना वेळेत उपचार मिळण्यास विलंब झाल्याचा आरोपही दानवेंनी केला. संस्थाचालक आणि अधिकाऱ्यांनी संगनमत करून आश्रमशाळांना 'भ्रष्टाचाराचे अड्डे' बनवले असून, अनुदानाचा पैसा कुठे गेला, याची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

### मुख्यमंत्र्यांसह आदिवासी विकास मंत्रीही जबाबदार

२३५ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होईल, या कारणाने आश्रमशाळा बंद करण्याचा निर्णय चुकीचा असल्याचे दानवे म्हणाले. शाळेत प्रशासक नेमून व्यवस्था सुधारावी. या प्रकरणातील फिर्यादीच पहिला आरोपी ठरतो, अशी टीका करत प्रशासन काही अधिकाऱ्यांना वाचवत असल्याचा आरोप त्यांनी केला. मुख्यमंत्री तथा पालकमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांचीही या प्रकरणात जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

# तरुणावर तलवारीने हल्ला



लोकसत्ता वार्ताहर

**भंडारा :** शहरातील शुक्रवारी चौक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संत जगनाडे चौक परिसरात शुक्रवारी दुपारी अमित उर्फ विकी सुधाकर चोपकर (२०) याच्यावर तलवारीने पाच ते सहा तरुणांच्या टोळीने हल्ला केला. अमित याला परिसरात ह्यकचरा शेठह्ण या नावाने ओळखले जाते. अमित हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. गंभीर जखमी अवस्थेत त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हा हल्ला जुन्या वादातून झाल्याचा प्राथमिक अंदाज असून नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नाही.

# कर्जमुक्तीचे पाच ते १० हजार कोटी जमा होणार

## कृषिमंत्र्यांची माहिती; याद्या अद्ययावत होताच लाभ

लोकसत्ता खास प्रतिनिधी



पत्रकार परिषदेत बोलताना कृषिमंत्री भरणे.

**अकोला :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत 'ॲग्रीस्टॅक' पोर्टलच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यांची पडताळणी केली जात आहे. शासनाकडे पैसा उपलब्ध असून येत्या दोन ते चार दिवसांमध्ये शेतकऱ्यांच्या खात्यात पाच ते १० हजार कोटी रुपये जमा केले जाणार आहे, अशी माहिती राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज वाशीम येथे दिली.

वाशीम जिल्हा दौऱ्यावर आले असतांना त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी कर्जमुक्ती योजनेवर महत्त्वपूर्ण भाष्य केले. कृषिमंत्री म्हणाले, लाभार्थ्यांनी आपला विशिष्ट क्रमांक व आधार क्रमांक प्रमाणीकरण करून घ्यावा. सध्या योजनेच्या अंमलबजावणीची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्ती दिली जात आहे. पुढील दोन ते चार दिवसांत शेतकऱ्यांच्या कर्जखात्यामध्ये पाच ते दहा हजार कोटी रुपये जमा होणार आहेत. 'ॲग्रीस्टॅक' पोर्टलच्या माध्यमातून कर्जमुक्तीच्या याद्या पडताळण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

### 'त्या' शेतकऱ्यांनाही कर्जमुक्ती

सातबारा उताऱ्यावर किंवा इतर अधिकारात नोंद नसलेल्या दोन लाख ३१ हजार शेतकऱ्यांना अधिकृत महसूल दस्तऐवजावर आणून 'ॲग्रीस्टॅक' नोंदणी करण्यात येणार आहे. यामुळे त्यांना कर्जमुक्तीसह विविध शासकीय योजनांचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे, असे कृषिमंत्र्यांनी सांगितले.

# कोठी-कोरणार पूल प्रकरणी कारवाई केव्हा होणार?

## अधीक्षक अभियंता ठाकरेंचा अतिरिक्त पदभार १५ दिवसानंतर काढला

लोकसत्ता वार्ताहर



**गडचिरोली :** एटापल्ली तालुक्यातील कोठी-कोरणार येथील कोट्यवधी खर्चून बांधण्यात आलेला पूल खचल्याच्या प्रकरणाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण केले असतानाच अधीक्षक अभियंता नीता ठाकरे यांच्याकडील गडचिरोलीच्या अधीक्षक अभियंता पदाचा अतिरिक्त कार्यभार काढून घेण्यात आला आहे. १२ ऑगस्ट रोजी काढण्यात आलेल्या आदेशानुसार, पुढील आदेशापर्यंत चंद्रपूरच्या अधीक्षक अभियंता सोनाली चव्हाण यांच्याकडे गडचिरोलीचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे.

कोठी-कोरणार येथील या पुलाचे उद्घाटन १५ ऑगस्ट २०२३ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले होते. अवघ्या तीन वर्षांच्या आत ३१ जुलैच्या मुसळधार पावसामुळे पूल खचल्याने बांधकामाचा दर्जा, तांत्रिक नियोजन आणि देखरेखीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. विशेष म्हणजे, पुलाची मूळ मंजूर किंमत सुमारे चार कोटी नऊ लाख रुपये असताना डिझाईनमध्ये बदलाच्या नावाखाली खर्च जवळपास आठ कोटी रुपयांपर्यंत गेला असून डिझाइन बदल, सुधारित अंदाजपत्रक आणि वाढीव खर्चाची स्वतंत्र चौकशी तसेच विशेष लेखापरीक्षणाची मागणी आझाद समाज पक्षाने केली आहे. पूल खचून अनेक दिवस उलटूनही थेट निलंबनाची कारवाई न झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित होत होते. त्यातच ठाकरे यांचा गडचिरोलीचा अतिरिक्त पदभार काढून घेण्यात आल्याने या प्रशासकीय निर्णयाकडे संशयाच्या पार्श्वभूमीवर पाहिले जात आहे.

ठाकरे यांच्याकडे जून २०२६ पासून गडचिरोलीच्या अधीक्षक अभियंता पदाचा अतिरिक्त कार्यभार होता. त्यांच्याकडे गडचिरोलीसह नागपूर, भंडारा आणि गोंदिया या जिल्ह्यांचा अतिरिक्त भार असल्याचा मुद्दाही यापूर्वी उपस्थित करण्यात आला होता. केवळ पदभार काढण्यापुरतीच ही कारवाई मर्यादित राहणार की निकृष्ट बांधकामाच्या मुळाशी जाऊन जबाबदारी निश्चित केली जाणार, याकडे आता लक्ष लागले आहे.

# बोरगाव धरणात दोन विद्यार्थिनी बुडाल्या

**यवतमाळ :** येथील वाधवानी फार्मसी कॉलेजमध्ये शिकणाऱ्या दोन विद्यार्थिनी जवळच असलेल्या बोरगाव (ता. जि. यवतमाळ) येथील धरण परिसरात पर्यटनासाठी गेल्या असता धरणाच्या पाण्यात बुडाल्याची दुर्दैवी आणि खळबळजनक घटना घडली. आज, शुक्रवारी दुपारी ४ वाजेच्या सुमारास ही घटना घडल्याची माहिती समोर आली आहे.

अमृता अशोक खेडकर (रा. महात्मा फुले कॉलेजसमोर, धामणगाव रोड, यवतमाळ) आणि मोहिनी गौत्रे (रा. भोसा रोड, यवतमाळ) अशी पाण्यात बुडालेल्या विद्यार्थिनींची नावे आहेत. प्राथमिक माहितीनुसार, दोन्ही विद्यार्थिनी कॉलेजमधून बोरगाव धरण परिसरात फिरण्यासाठी गेल्या होत्या. फिरत असताना त्या धरणाच्या पाण्यात उतरल्या; मात्र पाण्याच्या खोलीचा योग्य अंदाज न आल्याने त्या अचानक खोल पाण्यात ओढल्या गेल्या आणि बुडाल्याची माहिती निष्पन्न होत आहे. दोन्ही विद्यार्थिनींचा शोध घेण्यासाठी धरण परिसरात शोध व बचाव मोहीम राबवण्यात येत आहे. अद्याप मुली सापडल्या नाही.



# उद्योगांसाठी पोषक वातावरण – पालकमंत्री

लोकसत्ता वार्ताहर

**बुलढाणा :** जिल्ह्यातील औद्योगिक विकासाला गती देण्यासह गुंतवणुकीसाठी अत्यंत पोषक आणि सकारात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी शासन स्तरावर सर्वंकष प्रयत्न सुरू आहेत. उद्योगांना आवश्यक पायाभूत सुविधा पुरवण्याबरोबरच १ ते सव्वा लाख कोटी रुपये खर्चाच्या 'वैनगंगा' (गोसीखुर्द) जलप्रकल्पाच्या माध्यमातून विदर्भातील आठ जिल्ह्यांचा आणि पर्यायाने बुलढाण्याचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवला जाईल. जिल्ह्यात गुंतवणूक करणाऱ्या उद्योजकांच्या पाठीशी प्रशासन खंबीरपणे उभे असून, त्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घेतली जाईल, अशी ग्वाही राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद पाटील यांनी दिली.

उद्योग आयुक्तालय आणि जिल्हा उद्योग केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने बुलढाणा रेसिडेन्सी क्लब येथील सभागृहात आयोजित 'बुलढाणा जिल्हा गुंतवणूक परिषद २०२६' मध्ये ते बोलत होते. या परिषदेस केंद्रीय आयुष राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव, आमदार संजय गायकवाड, आमदार श्वेता महाले, आमदार मनोज कायंदे, आमदार सिद्धार्थ खरात, ॲड. नाझर काझी, जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे, उद्योग व सेवा सहआयुक्त नीलेश निकम, राज्यकर आयुक्त संदीप शेलार, सहायक आयुक्त प्रमोद लांडे आणि मैत्री सेलचे सागर अवटी उपस्थित होते.

# साहित्य हे सर्व विचारांना सामावून घेणारे व्यासपीठ

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**अमरावती :** साहित्य आणि संस्कृतीशी संबंधित जीवनविषयक दृष्टिकोन विचारात घेता, साहित्य हे सर्व विचारांना सामावून घेणारे एक मोठे व्यासपीठ आहे. साहित्य ही सर्व विचारांना कवेत घेऊन चालणारी मोठी संस्था आहे, असे प्रतिपादन मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांनी केले.

रिद्धपूर येथील मराठी भाषा विद्यापीठात 'दीक्षारंभ' संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. अधिष्ठाता डॉ. कोमल ठाकरे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

**रिद्धपूर येथील मराठी भाषा विद्यापीठात 'दीक्षारंभ' संवाद कार्यक्रमात डॉ. आवलगावकर यांचे प्रतिपादन.**

डॉ. आवलगावकर म्हणाले की, विद्यार्थ्यांचा विचार प्रगल्भ व्हावा आणि ज्ञानार्जन हे त्यांचे पहिले उद्दिष्ट असावे, शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये योग्य समन्वय असणे आवश्यक आहे. जीवनाचा प्रवास खडतर असून अनेक संकटांचा सामना करावा लागतो. यातूनच विद्यार्थ्यांमध्ये ऊर्जा निर्माण होणे गरजेचे आहे. विद्यापीठ एका कुटुंबाप्रमाणे कार्य करत असून, विद्यार्थ्यांना कोणत्याही बाबतीत कमी पडू देणार नाही. ज्ञानार्जन ही एक पूजा असून, ध्येयवेडे होऊन जगण्याचा आनंद घेता आला पाहिजे, असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमात बीए आणि एमए अभ्यासक्रमांसाठी नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

अधिष्ठाता डॉ. कोमल ठाकरे यांनी मराठी साहित्याच्या अभ्यासक्रमातून मानवी जीवनदृष्टी प्राप्त होऊन व्यक्तिमत्त्व प्रगत होते, असे सांगितले. विविध विभागप्रमुखांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमांविषयी माहिती दिली. यामध्ये डॉ. मनोज उज्जैनकर (नाट्यशास्त्र), प्रा. डॉ. मनोज मुनेश्वर (मराठी), प्रा. अजय पटिले (पत्रकारिता आणि जनसंवाद) आणि प्रा. राहुल राठोड (इंग्रजी) यांचा समावेश होता.

यावेळी विद्यार्थ्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्रेयस कोल्हेकर यांनी केले, तर प्रा. प्रियंका तायडे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. प्रा. आशालाता गुट्टे, डॉ. प्रा. पल्लवी मावंदे, डॉ. प्रा अर्चना आखरे, डॉ. प्रा नितीन रामटेके, डॉ प्रा स्वप्निल मून यांच्यासह कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चंद्रपूरच्या कलावंतांना मोठे व्यासपीठ मिळावे – मुनगंटीवार

लोकसत्ता वार्ताहर



**चंद्रपूर :** चंद्रपूर आणि विदर्भातील नवोदित कलावंतांच्या प्रतिभेला वाव देणारे दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध करून देत व्यापक सांस्कृतिक चळवळ उभी राहावी, हे आपले स्वप्न आहे. कला, आवाज आणि चित्रफितींमध्ये समाजमन बदलण्याची मोठी शक्ती असून, अवघ्या दीड मिनिटांची लघुपटही कधी कधी दीड हजार पानांच्या पुस्तकापेक्षा अधिक प्रभावीपणे आशय आणि भावना पोहोचवू शकतो, असे प्रतिपादन माजी सांस्कृतिक कार्यमंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

एस.के. फिल्म प्रोडक्शनच्या वतीने मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'उत्कृष्ट शॉर्ट फिल्म व रील स्पर्धा २०२६'च्या बक्षीस वितरण समारंभात ते बोलत होते. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी सार्वजनिक वाचनालयात हा कार्यक्रम झाला. यावेळी आयोजक देवा बुरडकर, गणेश साळवे, सुदेश भालेकर, प्रीतम खोब्रागडे, चंद्रकांत गुंडावार, राजेश्वर सुरावार, रामपाल सिंग, डॉ. जयश्री कापसे उपस्थित होते.

स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सुमारे १५० ते २०० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला असून, त्यापैकी ७० स्पर्धकांची निवड करण्यात आली. प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांचा यावेळी गौरव करण्यात आला. चंद्रपूरची ओळख केवळ कोळशाच्या खाणींपुरती मर्यादित राहू नये. या खाणींतून निघणारे खरे 'कोहिनूर' म्हणजे जिल्ह्यातील कलाकार, कलावंत आणि प्रतिभावंत आहेत. त्यांच्या कलेला योग्य व्यासपीठ आणि संधी मिळाल्यास चंद्रपूरचा आवाज देश-विदेशात पोहोचेल, असे मुनगंटीवार म्हणाले.

सांस्कृतिक कार्यमंत्री असताना कलावंतांच्या मानधनात वाढ, पेन्शन तसेच वयोमर्यादेत बदल करण्याचे निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले. चंद्रपूरसह विविध ठिकाणी नाट्यगृह उभारण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. २०२७ मध्ये यापेक्षा मोठी आणि दर्जेदार स्पर्धा आयोजित करण्याचे नियोजन करावे, असे आवाहन मुनगंटीवार यांनी आयोजकांना केले.

## MAHATMA PHULE BACKWARD CLASS DEVELOPMENT CORPORATION LTD., MUMBAI

(A Government of Maharashtra Undertaking)

MPBCDC invites applications from eligible officers for appointment to the post of General Manager (Class-I) on Deputation from the Central Government/State Government/Government Corporations/ Local Self-Government Institutions/Public Sector Undertakings. The appointment shall be made in accordance with the approved Recruitment Rules of the Corporation. Eligible officers fulfilling the prescribed qualifications, experience, pay scale and other eligibility conditions may submit their applications, along with the prescribed documents including No Objection Certificate (NOC) from the parent department, Vigilance Clearance and other supporting documents, to the Corporation.

Although the corporation published the advertisement for the said post on its official website **https://mpbcdc.maharashtra.gov.in.** on 5th of August 2026. An insufficient number of Application were received consequently; Applications are now being invited from eligible candidates for the period from **15 August 2026 to 21 August 2026.**

The applications for the above-mentioned post shall be submitted through the proper channel by email at: **info@mpbcdc.in**

**Last Date of Submission: Friday, August 21, 2026, 05:00 PM.**

For detailed eligibility criteria, terms & conditions and application format, please visit: **https://mpbcdc.maharashtra.gov.in**

Sd/-
**Managing Director, MPBCDC Ltd.**

## JAIPUR DEVELOPMENT AUTHORITY

Indra Circle, Jawahar Lal Nehru Marg, Jaipur - 302004

JDA/IT(1288412)ITCore-FMS/2022/D-789 Date : 14.08.2026

### NOTICE INVITING BID

**NIB No.: JDA-IT-09:2026-27**

Online Bids are invited up-to 3:00 PM of 08.09.2026 for "**Supply of Network Switches**". The last date for Applying Bid and making online payment on JDA portal is up-to 5:00 PM of 07.09.2026. The estimated cost of NIB is Rs. 375.00 Lakh. Details may be seen in the Bidding Document at our office or the State Public Procurement Portal website www.sppp.rajasthan.gov.in, www.eproc.rajasthan.gov.in and www.jda.rajasthan.gov.in/jda

**UBN No. JDA2627GLOB00284**

To participate in the bid, bidder must:

A. Participate in Tender & Deposit Payment on 'Online Tender Participation' Portal of JDA at https://jda.rajasthan.gov.in/jda or by Single-Sign-On at https://sso.rajasthan.gov.in.

B. Submit e-Bid on 'e-Procurement Portal' of GOR at www.eproc.rajasthan.gov.in

Raj.Samwad/C/26/9984 **System Analyst**

## ADVERTISEMENT FOR THE POST OF PRINCIPAL
### (Grant-In-Aid Basis for Full Time)

**Name of the College: S. CHANDRA MAHILA MAHAVIDYALAYA, SAKOLI, DIST. BHANDARA – 441 802**

**Run by**

**Name of Society: D. K. HEALTH & WELFARE SOCIETY, Sadak Arjuni Dist. Gondia**

As per NOC Letter No. JDHE/Nagpur/NOC/2026/00006, दिनांक-12/08/2026.

1. Applications are invited from eligible candidates for the following post of Principal.

| Sr. No. | Post | No.of Post | Nature of Post | Nature of Vacancy | Category |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Principal | Principal-1 | Full Time | Clear Granted | Open - 1 |

**3.** Pay Scale As Per UGC & State Government Norms.

**4. Essential Qualifications:**

i) Ph.D. degree;

ii) Professor/Associate Professor with a total service/experience of at least fifteen years of teaching/ research in Universities Colleges and other institutions of higher education;

iii) A minimum of 10 research publications in peer-reviewed or UGC-listed journals; and

iv) A minimum of 110 Research Score as per Appendix II, Table 2 of Direction No. 20 of 2019 and Govt. Resolution dated 8th March, 2019.

**Notes: - Tenure:** A College Principal shall be appointed for a period of five years, extendable for another term of five years on the basis of performance assessment by a Committee appointed by the University, constituted as per Rules.

The application may be made on a plain paper/prescribed proforma & addressed to the President/Secretary of the Management on the address given below along with a crossed postal order / DD of Rs. 100/- drawn in favour of the Principal of the concerned college and certified copies of the relevant certificates/testimonials towards substantiation of eligibility in terms of academic qualifications, teaching experience, NOC/Resignation from previous college, and the research score sheet shall have to be attached, certified by the Principal.

**Address for the Application are as follows:**

**President/Secretary**
D.K. Health & Welfare Society
Near Bridge, Ganesh Ward, Sadak Arjuni
Dist. Gondia - 441807

## EQUITAS SMALL FINANCE BANK LTD

{Formerly Known As Equitas Finance Ltd}
Corporate Office: No.769, Spencer Plaza, 4th Floor, Phase-II, Anna Salai, Chennai, TN - 600 002

## ताबा सूचना

### (नियम 8(1) अंतर्गत-अचल मालमत्तेसाठी)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे **मे. इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड चे प्राधिकृत अधिकारी** असून त्यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अ‍ॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, 2002(2002 चा 54) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील [नियम 3] सह वाचण्यात येणारया अनु. 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत मागणी सूचना पाठवली ज्यात खाली नमूद कर्जदार यांना सदर सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या रकमेचा सदर सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांच्या कालावधीत भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते. खाली नमूद कर्जदार खाली नमूद रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने याद्वारे खाली नमूद कर्जदारआणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते कीनिम्नस्वक्षरीकारांनी सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, 2002 मधील नियम 8 सह वाचण्यात येणारया सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग (4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचाताबा घेतलेला आहे.कर्जदार आणि सर्व लोकांना याद्वारे सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तांच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो मे. इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडच्या खाली नमूद रकमेच्या तसेच तीवरील पुढील व्याज व इतर खर्चांच्या भाराधीन असेल. सदर अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग (8) च्या तरतुदींकडे वेधण्यात येते.

| अ. क्र. | कर्जदार / जामीनदाराचे नाव | अनामत मत्तेचे वर्णन (अचल मालमत्ता) | मागणी सूचना दिनांक व रक्कम | ताबा दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | कर्ज क्र.: **SEAKOLN0370707**<br>शाखाः अकोला न्यू रामनगर<br>कर्जदाराचे नावः श्री/श्रीमतीमोहम्मदरियाज<br>जामीनदाराचे नावः श्री/श्रीमतीसुरय्याबी शेखयाकूब<br>श्री/श्रीमती शेखयाकूब अब्दुलगनी | प्लॉट क्र. 21/बी, शेत सर्वे क्र. 1/4-ए, क्षेत्रफळ सुमारे 1210.50चौ.फू. (म्हणजे 112.50 चौ.मी.) सोबत तेथील बांधकाम, मौजा कासारखेड, प्रगणे बाळापूर, नगर परिषद बाळापूर च्या हद्दीत, तह. बाळापूर, जि. अकोला. उत्तरेस - प्लॉट क्र. 22, दक्षिणेस - प्लॉट क्र. 21/ए, पूर्वेस - रस्ता, पश्चिमेस - प्लॉट क्र. 16/बी. | 20.05.2026 आणि रक्कम रु. 10,02,195 | 10.08.2026 |
| 2 | कर्ज क्र.: **SEAKOLN0427585**<br>शाखाः अकोला न्यू रामनगर<br>कर्जदाराचे नावः श्री/श्रीमती मोहम्मदसाजिद अब्दुलसादिक<br>जामीनदाराचे नावः श्री/श्रीमती निखतफिरदौस मोहम्मदसाजिद | तळ मजल्यावरील दुकान क्र. 13 व 14, नगर परिषद मालमत्ता क्र. 46, दोन्ही दुकानांचे बिल्ट-अप क्षेत्रफळ सुमारे 214.5 चौ.फू. (म्हणजे 19.13 चौ.मी.) आणि 71.44 चौ.फू. (म्हणजे 6.64 चौ.मी.), अवोभाजित हिस्सा, सोबत तेथील बांधकाम, कमल टॉवर, प्लॉट क्र. 312, नझुल शीट क्र. 28ए, क्षेत्रफळ सुआरे 10249.00 चौ.फू. (म्हणजे 952.6 चौ.मी.), मौजे कसबे अकोट, प्रगणे अकोला, झोन क्र. 10, नगर पालिका अकोला च्या हद्दीत, ता. अकोट, जिल्हा अकोला. उत्तरेस - दुकान क्र. 19 व 20, दक्षिणेस - उन्होने दुकान क्र. 15 व 16, पश्चिमेस -कमल टॉवर दुकान क्र. 12. | 20.05.2026 आणि रक्कम रु.10,50,579 | 10.08.2026 |
| 3 | कर्ज क्र.: 700010000746<br>शाखाः अमरावती<br>कर्जदाराचे नावः श्री/श्रीमती मिलिंद सुखदेवराव मेश्राम<br>जामीनदाराचे नावः श्री/श्रीमती नेहा मिलिंद मेश्राम | प्लॉट क्र. 69 चा मधला भाग, शेत सर्वे क्र. 16, मालमत्ता क्र. 5343, क्षेत्रफळ सुमारे 540 चौ.फू. (म्हणजे 50.18 चौ.मी.), सोबत तेथील बांधकाम, मौजा बेनोडा प्रगणे नांदगाव पेठ, वॉर्ड क्र. सी-11, अमरावती महानगर पालिकेच्या हद्दीत, ता. व जि. अमरावती. उत्तरेस - रस्ता, दक्षिणेस - सर्विस लाईन, पूर्वेस - गायकवाड यांचा प्लॉट, पश्चिमेस -शहारे यांचा प्लॉट. | 20.05.2026 आणि रक्कम रु.4,02,378 | 10.08.2026 |
| 4 | कर्ज क्र.: 700010941239<br>शाखाः अमरावती<br>कर्जदाराचे नावः श्री/श्रीमती अमोल शृंगारे<br>जामीनदाराचे नावः श्री/श्रीमती रंजना शृंगारे<br>श्री/श्रीमती सुरेश शृंगारे<br>श्री/श्रीमती विष्णू पुंडलिक शृंगारे | प्लॉट क्र. 9, शेत सर्वे क्र. 72/1, ग्रामपंचायत मालमत्ता क्र. 788, क्षेत्रफळ सुमारे 1896.45 चौ.फू. (म्हणजे 176.25 चौ.मी.) सोबत तेथील बांधकाम, मौजा दाभा, ग्रामपंचायत दाभा च्या हद्दीत, ता. नांदगाव खंडेश्वर व जि. अमरावती. उत्तरेस -प्लॉट क्र. 10, दक्षिणेस - इतर लेआउट, पूर्वेस - लेआउटची मोकळी जागा, पश्चिमेस- लेआउट रस्ता. | 20.05.2026 आणि रक्कम रु.33,49,916 | 10.08.2026 |
| 5 | कर्ज क्र.: 700011869949<br>शाखाः हिंगणघाट<br>कर्जदाराचे नावः श्री/श्रीमती गणेश रामभाऊजी कुकडे<br>जामीनदाराचे नावः श्री/श्रीमती रामभाऊ शंकरराव कुकडे<br>श्री/श्रीमती गयाबाई रामभाऊ कुकडे | ग्रामपंचायत मालमत्ता क्र. 428, करानुसार घर क्र. 444, क्षेत्रफळ सुमारे 1500 चौ.फू. (म्हणजे 139 चौ.मी.), सोबत तेथील बांधकाम, मौजा नांदगाव, ग्रामपंचायत नांदगाव (बो) च्या हद्दीत, ता. हिंगणघाट, जिल्हा वर्धा. उत्तरेस -चंदू सेनाड यांचे घर, दक्षिणेस - नारायण वैद्य यांचे घर, पूर्वेस- रस्ता, पश्चिमेस - ढेकरे यांचे शेत. | 20.05.2026 आणि रक्कम रु.4,27,314 | 10.08.2026 |
| 6 | कर्ज क्र.: **SEPAT-WA0376945**<br>शाखाः परतवाडा<br>कर्जदाराचे नावः श्री/श्रीमती शरद श्रीराम जुनघरे<br>जामीनदाराचे नावः श्री/श्रीमती रेखा शरदराव जुनघरे<br>श्री/श्रीमती सुनिता राजकुमार जुनघरे<br>श्री/श्रीमती तुषार राजकुमार जुनघरे<br>श्री/श्रीमती योगेश राजकुमार जुनघरे | नझुल प्लॉट क्र. 87, नझुल शीट क्र. 25-सी, मालमत्तेचा प्रकार - ए. क्षेत्रफळ सुमारे 1148.09 चौ.फू. (म्हणजे 106.7 चौ.मी.), मौजा अचलपूर, नगर परिषद अचलपूर च्या हद्दीत, ता. अचलपूर, जि. अमरावती. उत्तरेस - रस्ता, दक्षिणेस - रस्ता, पूर्वेस - रस्ता, पश्चीम्स - श्री बाळूभाऊ राऊत यांचे घर. | 20.05.2026 आणि रक्कम रु.4,45,829 | 10.08.2026 |
| 7 | कर्ज क्र.: **SEPAT-WA0453373**<br>शाखाः परतवाडा<br>कर्जदाराचे नावः श्री/श्रीमती अभिषेक मनोहरराव वरखेडे<br>जामीनदाराचे नावः श्री/श्रीमती मनोहर ओंकार वरखेडे<br>श्री/श्रीमती शारदा मनोहरराव वरखेडे | नझुल प्लॉट क्र. 164 चा पूर्वेकडील भाग, नझुल शीट क्र/ 4, ग्रामपंचायत मालमत्ता क्र/ 331, मालमत्तेचा प्रकार - ए, क्षेत्रफळ सुमारे 1500 चौ.फू. (म्हणजे 139.40 चौ.मी.), सोबत तेथील बांधकाम, मौजा तवलर, ग्रामपंचायत तवलर च्या हद्दीत, ता. अचलपूर, जिल्हा अमरावती. क्षेत्रफळ 1500 चौ.फू., उप-नोंदणी जिल्हा अचलपूर आणि नोंदणी जिल्हा अमरावती. उत्तरेस -शासकीय रस्ता, दक्षिणेस - सर्विस लेन, पूर्वेस -शासकीय रस्ता, पश्चिमेस इ त्याच प्लॉटचा भाग आणि त्यानंतर श्री राजाभाऊ चित्र यांचे घर. | 20.05.2026 आणि रक्कम रु.17,02,457 | 10.08.2026 |
| 8 | कर्ज क्र.: 700010590672<br>शाखाः परतवाडा<br>कर्जदाराचे नावः श्री/श्रीमती शुभम भास्करराव कडू<br>जामीनदाराचे नावः श्री/श्रीमती लता भास्करराव कडू | ग्रामपंचायत (जुना) मालमत्ता क्र. 201, (नवा) मालमत्ता क्र. 268, क्षेत्रफळ सुमारे 544 चौ.फू. (म्हणजे 50.60 चौ.मी.), सोबत तेथील बांधकाम, मौजा हनवतखेडा, ग्रामपंचायत हनवतखेडा च्या हद्दीत, वॉर्ड क्र. 3, ता. अचलपूर, जि. अमरावती. उत्तरेस -अशोक श्यामरावजी पुणकर यांचे घर, दक्षिणेस - श्रीधरराव गावंडे यांचे घर, पूर्वेस- शासकीय रस्ता, पश्चिमेस - 3 फुटी सर्विस लेन. | 20.05.2026 आणि रक्कम रु.7,21,150 | 10.08.2026 |
| 9 | कर्ज क्र.: **SEWAR-DA0268775**<br>शाखाः वर्धा<br>कर्जदाराचे नावः श्री/श्रीमती प्रमोद रामदास कळंबे<br>जामीनदाराचे नावः श्री/श्रीमती स्वाती प्रमोद कळंबे | प्लॉट क्र. 292 चा उत्तरेकडील भाग, शेत सर्वे क्र. 65 - (7/12 उतारयानुसार 65/29/2), क्षेत्रफळ सुमारे 995.30 चौ.फू. (92.50 चौ.मी.), मौजा भाईपूर (भादोड पुनर्वसन), मौजा क्र. 133, ग्रामपंचायत भाईपूर च्या हद्दीत, तहसील आर्वी व जिल्हा वर्धा. उत्तरेस - परसराम शिवरकर यांचा प्लॉट, दक्षिणेस - मुकिंदा कोल्हे यांचा प्लॉट, पूर्वेस- लेआउट रोड, पश्चिमेस - विजय आनंदराव गोडसे यांचा प्लॉट. | 20.05.2026 आणि रक्कम रु.6,85,182 | 10.08.2026 |
| 10 | कर्ज क्र.: **SEWASIM0260694**<br>शाखाः वाशीम<br>कर्जदाराचे नावः श्री/श्रीमती शिरीष सुरेश परळीकर<br>जामीनदाराचे नावः श्री/श्रीमती गीता शिरीष परळीकर | प्लॉट क्र. 18, क्षेत्रफळ सुमारे 1501.00 चौ.फू. (139.50 चौ.मी.), मौजे शहापूर खुर्द, शेत सर्वे क्र. 16/2-ए, ग्रामपंचायत मालमत्ता क्र. 986, गट ग्रामपंचायत जांब (शहापूर) च्या हद्दीत, तह. मंगरूळपीर व जिल्हा वाशीम. उत्तरेस - लेआउटमधील रस्ता, दक्षिणेस - प्लॉट क्र. 31, पूर्वेस - प्लॉट क्र. 17, पश्चिमेस - प्लॉट क्र. 19. | 20.05.2026 आणि रक्कम रु. 7,27,617 | 10.08.2026 |
| 11 | कर्ज क्र.: **SEYVTML0272052**<br>शाखाः यवतमाळ<br>कर्जदाराचे नावः श्री/श्रीमती मुहम्मदशोएब<br>जामीनदाराचे नावः श्री/श्रीमती खातुआ शोएब तुकडी | मालमत्ता क्र. 1 (मालमत्ता क्र/ 108): नगर परिषद मालमत्ता क्र. 108, क्षेत्रफळ सुमारे 120 चौ.फू. (11.15 चौ.मी.). उत्तरेस - मालमत्ता क्र. 9, दक्षिणेस - अलोणे यांची मालमत्ता, पूर्वेस- मालमत्ता क्र. 9, पश्चिमेस इ नगर परिषद रस्ता. | 19.05.2026 आणि रक्कम रु.32,79,330 | 10.08.2026 |
| 12 | कर्ज क्र.: **SEKAMTE0263511**<br>शाखाः कामठी<br>कर्जदाराचे नावः श्री/श्रीमती पुष्पराज केवलजी गोखले<br>जामीनदाराचे नावः श्री/श्रीमती करिष्मा पुष्पराज गोखले | गावठाण मालमत्ता क्र. 81, एकूण क्षेत्रफळ सुमारे 986.00 चौ.फू. (91.60 चौ.मी.), यात 550.00 चौ.फू. (51.09 चौ.मी.) आरसीसी बिल्ट-अप क्षेत्रफळाचा समावेश आहे, मौजा गारला (सावली), पोस्ट दिघोरी (काळे), वॉर्ड क्र. 3, ग्रामपंचायत गारला (सावली( च्या हद्दीत, तह. कामठी आणि जिल्हा नागपूर. उत्तरेस - धनीराम रंगारी यांचे घर, दक्षिणेस-जिल्हा परिषद शाळा, पूर्वेस - रुपेश हिवरकर यांचे घर, पश्चिमेस -सावली परसद रोड. | 20.05.2026 आणि रक्कम रु.11,02,555 | 10.08.2026 |
| 13 | कर्ज क्र.: 200002147742<br>शाखाः काटोल<br>कर्जदाराचे नावः श्री/श्रीमती विशाल विश्रामजी डोंगरे<br>जामीनदाराचे नावः श्री/श्रीमती विशाल विश्रामजी डोंगरे | प्लॉट क्र. 23, क्षेत्रफळ सुमारे 1829.00 चौ.फू. (170.00 चौ.मी.), यात 1500.00 चौ.फू. (139.35 चौ.मी.) आयसीसी बिल्ट-अप क्षेत्रफळाचा समावेश आहे, नगर परिषद मालमत्ता क्र. 3037 व 3037/1, मौजा कारंजा, मौजा क्र. 13, शेत सर्वे क्र. 184/1जी, 184/1डी, 184/1घ (जुना) 256/23 (नवा), नगर परिषद कारंजा च्या हद्दीत, तह. कारंजा आणि जिल्हा वर्धा. उत्तरेस- प्लॉट क्र. 22, दक्षिणेस- प्लॉट क्र. 24, पूर्वेस - प्लॉट क्र. 27 आणि प्लॉट क्र/ 26, पश्चिमेस- 6 मी. रुंद ले'आउट रस्ता. | 22.04.2026 आणि रक्कम रु.2,12,322 | 10.08.2026 |
| 14 | कर्ज क्र.: **SESON-ER0273734**<br>शाखाः सावनेर<br>कर्जदाराचे नावः श्री/श्रीमती गुणवंता रामजी पिंपरेवार<br>जामीनदाराचे नावः श्री/श्रीमती रत्नमाला गुणवंता पिंपरेवार | प्लॉट क्र/ 16, क्षेत्रफळ सुमारे 1400.00 चौ.फू. (130.06 चौ.मी.) यात बिल्ट-अप क्षेत्रफळाचा समावेश आहे, ग्रामपंचायत मालमत्ता क्र. 260, मौजा खैरी (पंजाबराव), बंदोबस्त क्र. 58, प.ह.न. 47, खसरा क्र. 10/1, वॉर्ड क्र. 1, ग्रामपंचायत खैरी (पंजाबराव) च्या हद्दीत, तह. सावनेर व जिल्हा नागपूर. उत्तरेस - 20 फूट रुंद रस्ता, दक्षिणेस इ प्लॉट क्र. 15, पूर्वेस - 20 फूट रुंद रस्ता, पश्चिमेस - प्लॉट क्र. 17. | 20.05.2026 आणि रक्कम रु.1,62,652 | 10.08.2026 |
| 15 | कर्ज क्र.: **SETMR-TI0251027**<br>शाखाः त्रिमूर्ती नगर<br>कर्जदाराचे नावः श्री/श्रीमती देवराव बाबूराव गायकवाड<br>जामीनदाराचे नावः श्री/श्रीमती संगीता देवराव गायकवाड | महापालिका घर क्र. 510, क्षेत्रफळ सुमारे 432.00 चौ.फू. (40.13 चौ.मी.), यात आरसीसी बिल्ट-अपम क्षेत्रफळाचा समावेश आहे, मौजा खास नागपूर गड्डीगोदाम, शीट क्र/ 188, सिटी सर्वे क्र. 139, झोन 10, वॉर्ड क्र. 63 (नवा) 56 (जुना), नासुप्र व नामपा च्या हद्दीत, तहसील नागपूर व जिल्हा नागपूर. उत्तरेस - रस्ता, दक्षिणेस- गल्ली आणि मोतीराम यांचे घर, पूर्वेस - महादेव डंभारे यांचे घर, पश्चिमेस - रस्ता आणि धोगडे यांचे घर. | 20.05.2026 आणि रक्कम रु.4,47,547 | 10.08.2026 |
| 16 | कर्ज क्र.: 700010381550/600000120706<br>शाखाः उस्मानाबाद<br>कर्जदाराचे नावः श्री/श्रीमती नम्रता कृष्णा मालकर<br>जामीनदाराचे नावः श्री/श्रीमती कृष्णा रामरतन मालकर | ग्राम पंचायत मिळकत क्र. 479, अनु.क्र. 522, क्षेत्रफळ सुमारे 170.94 चौ.मी. म्हणजे 1840 चौ.फू., कोठाळा, ता. कळंब, जिल्हा धाराशिव. उत्तरेस-रस्ता, दक्षिणेस - पुस्कल मालकर यांची मिळकत, पूर्वेस - रस्ता, पश्चिमेस - अर्जुन डोंगरे यांची मिळकत. | 20.05.2026 आणि रक्कम रु.15,11,417 | 10.08.2026 |
| 17 | कर्ज क्र.: 700009086267/200002474544<br>शाखाः काटोल<br>कर्जदाराचे नावः श्री/श्रीमती पंचफुला शेषरावजी पोटे<br>जामीनदाराचे नावः श्री/श्रीमती शुभम शेषरावजी पोटे | सुमारे 1683.00 चौ.फू. जमीन आणि तेथील बांधकाम, प्लॉट क्र. 25, सर्वे क्र. 887/भू.क्र./25, मौजा सावरगाव, ग्रामपंचायत घर क्र. 377 (नवा), 265 (जुना) वॉर्ड क्र. 2, ग्रामपंचायत सावरगाव च्या हद्दीत, तह. नरखेड, जिल्हा नागपूर. उत्तरेस- रस्ता, दक्षिणेस - श्री धांडे यांचा मोकळा प्लॉट, पूर्वेस - श्रीमती चंचला पंत, पश्चिमेस - उमेश करोले यांचे घर. | 20.05.2026 आणि रक्कम रु.7,33,502 | 10.08.2026 |

दिनांक:15-08-2026
स्थान:नागपूर

स्वा/-प्राधिकृत अधिकारी
इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लि.

"सदर नोटिसीमध्ये नमूद केलेल्या सर्व मजकुराबाबतच्या अधिक स्पष्टते साठी इंग्रजी भाषेतील प्रसिद्ध केलेली नोटीस ग्राह्य धरण्यात येईल"

## पंजाब नैशनल बैंक | punjab national bank

भारत सरकारचा उपक्रम (A Govt. of India Undertaking)

**एआरएमबी, नाशिक**
शॉप नं.2 व 3 मेझनाईन मजला, स्नेह हाईट अपार्टमेंट, इंदिरा नगर, नाशिक - 422009. फोन : 0253- 2323020, ईमेल- cs8288@pnb.bank.in

सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 मधील नियम 8 व 9 अन्वये तमाम लोकांकरीता ई-लिलाव विक्री नोटीस

### स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री करण्याकरीता ई-लिलाव विक्री नोटीस

(सरफेसी कायदा, 2002 मधील नियम 8(6) अन्वये वैधानिक विक्री नोटीस)

**सेक्युरिआयझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट ॲन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट ॲक्ट 2002 कलम 13 (4) अंतर्गत मधील नियम 8(6), सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या अन्वये स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री ई- लिलाव पध्दतीने करण्या संदर्भात**

तमाम लोकांस व विशेषतः कर्जदार व हमीदार ज्यांचे वर्णन खालील तक्त्यामध्ये केले आहे त्यांना सदर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद स्थावर/ अस्थावर मिळकती ज्या सेक्युअर्ड क्रेडीटर यांचेकडे गहाण / ताब्यामध्ये आहेत, ज्याचा रचनात्मक / प्रत्यक्ष / प्रतिकात्मक ताबा अधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर यांनी घेतला आहे. अधिकृत अधिकारी, त्यांची विक्री **"जसे आहे तसे", "जिथे आहे तिथे" व "जशी आहे" त्या स्थितीत" खालील तारखेस** कर्जदार/ गहाणदार / हमीदार यांचेकडून देय रक्कम वसूल करण्याकरीता, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर, यांचेव्दारे करण्यात येणार आहे. राखीव किंमत व अनामत रक्कम व स्थावर मिळकतीचे किमान वर्णन व त्यावर असलेला बोजा (काही असल्यास) यांची माहिती खालीलप्रमाणे

| लॉट क्र. | शाखेचे नाव<br>खात्याचे नाव<br>कर्जदार / जामीनदाराचे नाव आणि पत्ता | मिळकतीचे वर्णन आणि कर्जदार / गहाणदार यांची नावे | अ) मागणी सूचनाकलम १३(२) प्रमाणे दिनांक<br>ब) थकबाकी रक्कम दि. ------ रोजी<br>क) ताबा दिनांक कलम १३(४) सरफेसी कलम २००२ प्रमाणे<br>ड) ताबा प्रकार सांकेतिक / प्रत्यक्ष /रचनात्मक | अ) अनामत रक्कम (रु. लाख)<br>ब) ईएमडी (ईएमडी जमा करण्याची शेवटची तारीख)<br>क) बोली वाढीव रक्कम | लिलावाचे दिनांक व वेळ | कर्जदारांच्या बोझाचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **शाखा : पीएनबी वाशिम (७८१२००)**<br>**कर्जदार: किसन मोतीराम निकम**<br>**कै.किसन मोतीराम निकम यांचे सर्व कायदेशीर वारस**<br>पत्ता: खरोला येथे, काजळंबा पोस्ट, तालुका व जिल्हा, वाशिम- 444505<br>**सह-कर्जदार: संतोष किसन निकम**<br>पत्ता: खरोला येथे, काजळंबा पोस्ट, तालुका व जिल्हा, वाशिम- 444505<br>**हमीदार:**<br>**श्री रामदास प्रल्हाद महाल्ले**<br>पत्ता: कळंबा महाली पोस्ट येथे, तालुका व जिल्हा, वाशिम- 444505 | प्लॉट क्रमांक १२७/१, खरोला, पोस्ट काजळंबा, तालुका आणि जिल्हा - वाशिम<br>**मालकी हक्क - श्री. किसन मोतीराम निकम**<br>**क्षेत्रफळ एरिया - २११.०७ चौरस मीटर पैकी बांधीव क्षेत्र १६८.५० चौरस मीटर**<br>**चतुःसिमा -**<br>**पूर्व** - निळकंठ ठाकरे यांची मालमत्ता<br>**पश्चिम** - रस्ता<br>**उत्तर** - रस्ता<br>**दक्षिण** - माधव ठाकरे यांची मालमत्ता<br>**मालमत्ता आयडी: PUNB00828800110** | अ) ०७/०९/२०२०<br>ब) रु. ४५०२१५१.९३/-<br>दि. ३१.०३.२०२६ रोजी<br>+ इतर व्याज + खर्च<br>क) ०४/०२/२०२१<br>ड) सांकेतिक ताबा | अ) रु. १२.५७ लाख<br>ब) रु. १.२५७ लाख (०२.०९.२०२६)<br>क) रु. ०.५ लाख | दि. ०२.०९.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत | माहित नाही |

विक्री ही सेक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या विहित केलेल्या अटी व शर्ती खालील प्रमाणे

1. मालमत्तेची विक्री जशी आहे तशी आणि जशी आहे तशी आणि जे काही आहे ते आहे वर विक्री केली जात आहे.
2. खाली नमूद सुरक्षीत मालमत्तेची माहिती ही अधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम माहितीनुसार नमूद केली आहे, परंतु अधिकृत अधिकारी हे त्यामध्ये असलेल्या कोणत्याही त्रुटीस, चुकीची माहितीस वा काही चुकल्यास उत्तर देण्यास जबाबदार राहणार नाहीत.
3. सदर विक्री ही दिनांक, 02.09.2026 @ सकाळी 11.00 ते संध्या. 4.00 वर **https://baanknet.com** वेबसाईटवर प्रदान केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मव्दारे खाली दिलेल्या स्वाक्षरीकर्ताव्दारे केली जाईल
4. ई-लिलावात सहभागी होण्यासाठी बोलीदाराने राखीव किंमतीपेक्षा किमान एक बोली अनिवार्यपणे सादर करणे आवश्यक आहे.
5. विक्रीच्या तपशीलावर अटी व नियमांसाठी कृपया **www.pnb.bank.in.** आणि **https://baanknet.com** ही वेबसाईट पहावी

स्वाक्षरी/-
**श्री. सजील कुमार**
मुख्य व्यवस्थापक आणि अधिकृत अधिकारी,
पंजाब नॅशनल बँक, (सिक्युअर्ड क्रेडिटर)

दिनांक - १५.०८.२०२६ | स्थळ - नाशिक

टीप : स्वैर भाषांतर: तफावत आढळल्यास मूळ इंग्रजी मजकूर ग्राह्य

## CENTRAL CABLES LIMITED

**CIN No. L31300MH1981PLC023772**
Regd Office : 5, Temple Road, Civil Lines, Nagpur-440001
Corporate Office: 1, Shakespeare Sarani, 6th Floor Room No. 6C, A. C. Market, Kolkata-700071
Phone No.:- +91- 712 - 2523054, 2546468, Fax :- +91 - 712- 2536149
Email : care.centralcables@gmail.com, Website : www.centralcables.in

**EXTRACT OF UNAUDITED STANDALONE FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED 30TH JUNE, 2026** (Rs. in lacs)

| Sl. No. | Particulars | Quarter Ended 30.06.2026 | Quarter Ended 31.3.2026 | Quarter Ended 30.06.2025 | Year Ended 31.03.2026 |
|---|---|---|---|---|---|
| | | Un-Audited | Audited | Un-Audited | Audited |
| 1 | Total Income from Operations | 160.10 | 126.04 | 119.56 | 329.82 |
| 2 | Net Profit/(Loss) for the period (Before Tax Exceptional and /or Extraordinary items#) | 77.64 | (376.96) | 31.52 | (360.62) |
| 3 | Net Profit/(Loss) for the period after Tax (after Exceptional and /or Extraordinary items) | 65.60 | (375.20) | 12.99 | (375.62) |
| 4 | Othe Comprehensive Income | - | 8.07 | 2.26 | 14.52 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/(Loss) for the period (after tax) and other comprehensive income (after tax)] | 65.60 | -367.13 | 15.25 | -343.10 |
| 6 | Equity Share Capital | 162.50 | 162.50 | 162.50 | 162.50 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve) | - | - | - | 917.91 |
| 8 | Earnings Per Share (of Rs. 10 each) (for continuing and discountinued operations)** (A) Basic : | 4.04 | (23.09) | 0.80 | (22.01) |
| | (B) Diluted : | 4.04 | (23.09) | 0.80 | (22.01) |

**Not Annualised
# The Company does not have Exceptional and Extra-ordinary items.

1. The above is an extract of the Unaudited Financial Results for quarter ended on 30th June, 2026, filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Unaudited Financial Results is available on the website of Metropolitan Stock Exchange of India at (www.msei.in) and on the Company's website ( www.centralcables.in).
2. The above results were reviewed by the Audit Committee, approved by the Board at its respective meeting held on 14th August, 2026
3. The Statutory Auditors have provided un-modified Limited Review Report for the quarter ended 30th June, 2026
4. The figures of the previous periods/ years has been regrouped/ reclassified wherever necessary to make them comparebale with those of the current period/ year.
5. The Company does not have Exceptional and Extraordinary items.

Place: Kolkata
Date : 14.08.2026

On behalf of the Board of
For Central Cables Limited

Sd/-
Swarna Mimani
Whole time Director
DIN: 01186819

7HIIS

# कोळसा चोरीला आता ‘वेकोलि’चाच दणका!

## सुरक्षा अधिकाऱ्यांना न्यायालयीन कारवाईचे अधिकार

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** कोळसा चोरी आणि अवैध उत्खननाविरोधातील कारवाईला आता कायदेशीर बळ मिळाले आहे. केंद्र सरकारने वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेडच्या (वेकोलि) अधिकृत सुरक्षा अधिकाऱ्यांना सक्षम न्यायालयात लेखी तक्रार दाखल करण्यासह झडती, प्रवेश, पाहणी आणि तपासणीचे अधिकार दिले आहेत.

खान आणि खनिज (विकास व विनियमन) अधिनियम, १९५७ मधील कलम २१(४), २२, २३-ब आणि २४ अंतर्गत हे अधिकार देण्यात आले आहेत. वेकोलिच्या सुरक्षा अधिकाऱ्यांसह काही खाण क्षेत्रांत तैनात केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या अधिकाऱ्यांनाही हे अधिकार मिळाले आहेत. यापूर्वी या कायद्यांतर्गत गुन्ह्याची न्यायालयाने दखल घेण्यासाठी पोलीस अधिकाऱ्यांची लेखी तक्रार आवश्यक होती. आता अधिसूचित वेकोलि आणि केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाचे अधिकारी निर्धारित प्रक्रियेनुसार स्वतः न्यायालयात तक्रार दाखल करून न्यायालयीन प्रक्रिया सुरू करू शकतील. कलम २३-बनुसार अधिकृत अधिकाऱ्यांना झडती घेता येणार आहे, तर कलम २४ नुसार खाण परिसरात प्रवेश करून पाहणी व तपासणी करता येणार आहे.

दरम्यान, या अधिकारामुळे संबंधित अधिकाऱ्यांना अवैध उत्खनन किंवा कोळसाचोरीची माहिती मिळाल्यानंतर तिचा शोध घेणे, तपास करणे आणि प्रकरण न्यायालयापर्यंत नेणे अधिक सुलभ होणार आहे. वेकोलिची सुरक्षा यंत्रणा केवळ देखरेखीपुरती मर्यादित न राहता थेट कायदेशीर कारवाईशी जोडली गेली आहे. नव्या अधिकारांची पूर्ण अंमलबजावणी करण्यासाठी वेकोलिचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. हेमंत शरद पांडे यांनी महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशच्या पोलिस महासंचालक तसेच मुख्य सचिवांना पत्र पाठवून माहिती दिली आहे.

राजपत्रानुसार अधिकृत अधिकाऱ्यांना वेकोलिच्या सुरक्षा प्रशिक्षण केंद्रात दोन दिवसांचे प्रशिक्षण देण्यात आले. वेकोलिचे संचालक (वित्त/मानव संसाधन) बिक्रम घोष, सुरक्षा विभागातील अधिकारी आणि क्षेत्रीय नोडल अधिकारी (सुरक्षा) प्रशिक्षणात सहभागी झाले. प्रशिक्षणात वेकोलिचे विभागाध्यक्ष (सुरक्षा) तथा मुख्य सुरक्षा अधिकारी लेफ्टनंट कमांडर (डॉ.) विक्रान्त मलहन यांनी खान आणि खनिज अधिनियमातील तरतुदींची माहिती दिली. नव्या अधिकारांमुळे कोळसा चोरी आणि अवैध उत्खननावर प्रभावी अंकुश बसेल, तसेच पोलीस आणि राज्य सरकारचे सहकार्य मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

### चोरीची माहिती देण्यासाठी टोल फ्री क्रमांक

कोळसा चोरी किंवा अवैध उत्खननाची माहिती नागरिकांना देता यावी यासाठी वेकोलिने १८००-२३३-५५०६/०७ हे टोल फ्री क्रमांक सुरू केले आहेत. या क्रमांकावर २४ तास, सातही दिवस माहिती देता येणार असून, मिळालेल्या माहितीवर तातडीने कारवाई केली जाणार आहे. नव्या व्यवस्थेसाठी १५० अधिकाऱ्यांना अधिकृत करण्यात आले असून, प्रत्येक कोळसा उत्खनन क्षेत्रात ही यंत्रणा राबवण्यात येणार आहे.

# इनाम देवस्थान जमिनींची ६०,००० प्रकरणे मार्गी

## शेतकऱ्यांना न्यायासाठी प्रयत्न - महसूलमंत्री

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** कायदेशीर अडचणींमुळे ‘प्रॉपर्टी कार्ड’ आणि सातबारा उतारा मिळू न शकलेल्या इनाम देवस्थान जमिनीवरील शेतकऱ्यांना पीक विमा, पीक कर्जासह आवश्यक शासकीय सुविधांचा लाभ मिळवून देण्यासाठी शासन पुढाकार घेत आहे. २,३१,००० प्रकरणांपैकी आतापर्यंत ६०,००० पेक्षा अधिक प्रकरणांवर मार्ग काढण्यात आला असून उर्वरित सुमारे १,६०,००० शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरही पुढील महिनाभरात तोडगा काढण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे महसूलमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

ते शुक्रवारी प्रसारमाध्यमांसोबत बोलत होते. राज्यात विविध भागांत जमिनींच्या स्वरूपानुसार वेगवेगळे कायदे आणि नियम लागू आहेत. पालघर-ठाणे येथे ‘वर्कर्स’, रत्नागिरी-सिंधुदुर्गमध्ये ‘कबुलायतदार’, मराठवाड्यात निजामाच्या जमिनी, नंदुरबारमध्ये जहागीरदारांच्या जमिनी, तर पश्चिम महाराष्ट्रात देवस्थान इनाम व देशमुख इनाम अशा विविध प्रकारच्या जमिनी आहेत. शेतकरी कसत असलेल्या जमिनी त्यांच्या नावावर करण्यासाठी शासन प्रयत्नशील असून, कोणत्याही शेतकऱ्यावर अन्याय होऊ देणार नाही, असेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले. आदिवासी शेतकऱ्यांना नवीन सातबारा देण्याच्या प्रक्रियेमुळे त्यांच्या जमिनी त्यांच्या नावावर होण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याचे त्यांनी सांगितले.

### ओबीसी संघटनांना आंदोलन टाळण्याचे आवाहन

ओबीसी संघटनांकडून सुरू असलेल्या आंदोलनांबाबत बावनकुळे म्हणाले, ओबीसी संघटनांनी रस्त्यावरचे वाद, मोर्चे आणि आंदोलनांमुळे राज्याची कायदा-सुव्यवस्था बिघडवणे योग्य नाही. समाजा-समाजात वाद होणे ही महाराष्ट्राची संस्कृती नाही. त्यामुळे कोणत्याही ओबीसी संघटनेने आंदोलन किंवा मोर्चे काढू नयेत, असे आवाहन त्यांनी केले.

# नागपूरमार्गे दोन अमृत भारत एक्स्प्रेस धावणार

## रेल्वे बोर्डाकडून सात नव्या गाड्यांना मंजुरी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** रेल्वे बोर्डाने देशातील विविध भागांना जोडणाऱ्या सात नव्या अमृत भारत एक्स्प्रेस गाड्यांना मंजुरी दिली आहे. यापैकी दोन गाड्या नागपूरमार्गे धावणार असून, विदर्भासह मध्य भारतातील प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे.

रेल्वे बोर्डाने मंजूर केलेल्या सेवांपैकी चारलापल्ली-गोरखपूर अमृत भारत एक्स्प्रेस (२२०७५/२२०७६) ही गाडी नागपूरमार्गे धावणार आहे. प्रस्तावित मार्गावर चारलापल्ली, काझीपेठ, पेड्डापल्ली, मंचेरियल, बल्लारशाह, चंद्रपूर आणि नागपूर यांचा समावेश आहे. त्यानंतर बैतूल, इटारसी, भोपाळ, बिना, वीरांगना लक्ष्मीबाई झाशी, ओराई, पोखरायन, कानपूर सेंट्रल, ऐशबाग, लखनऊ सिटी, गोमतीनगर, बाराबंकी, गोंडा आणि गोरखपूर येथे गाडी थांबणार आहे. या सेवेमुळे तेलंगणा, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि पूर्वांचल भागातील प्रवाशांना थेट संपर्काचा पर्याय उपलब्ध होण्याची शक्यता आहे. विशेषतः नागपूर, चंद्रपूर आणि बल्लारशाह परिसरातील प्रवाशांसाठी ही सेवा महत्त्वाची ठरणार आहे.

धनबाद-कोयंबतूर अमृत भारत एक्स्प्रेस (२२३६३/२२३६४) ही दुसरी मंजूर सेवा नागपूरमार्गे धावणार आहे. या गाडीचा मार्ग अत्यंत लांब असून झारखंडपासून दक्षिण भारतापर्यंतचा रेल्वे संपर्क अधिक सुलभ होणार आहे. धनबाद, गोमो, पारसनाथ, हजारीबाग रोड, कोडरमा, गया, अनुग्रह नारायण रोड, डेहरी ऑन सोन, सासाराम, भभुआ रोड आणि पं. दीनदयाळ उपाध्याय जंक्शननंतर मिर्झापूर, प्रयागराज छिवकी, कटनी, जबलपूर, नरसिंहपूर, पिपरिया, इटारसी आणि बैतूल मार्गे ही गाडी नागपूरला पोहोचेल. नागपूरनंतर चंद्रपूर, बल्हारशाह, सिरपूर कागजनगर, मंचेरियल, पेड्डापल्ली, वारंगल, महबूबाबाद, खम्मम, विजयवाडा, ओंगोल, नेल्लोर, गुडूर, रेणीगुंटा, तिरुत्तणी, काटपाडी, जोलारपेठ, सालेम, इरोड आणि तिरुप्पूर मार्गे कोयंबतूरपर्यंत सेवा प्रस्तावित आहे.

# बर्डीतील फेरीवाल्यांवर गुन्हे दाखल करण्याचा इशारा

## आयुक्त व फेरीवाल्यांची बैठक वादळी, चर्चा निष्फळ

**नागपूर :** बर्डीतील अनधिकृत फेरीवाल्यांवर गुन्हे दाखल करण्याचा इशारा महापालिका आयुक्त डॉ. विपीन इटनकर यांनी शुक्रवारी दिला. त्यामुळे फेरीवाले व प्रशासनातील बैठक निष्फळ ठरली. जुन्या फेरीवाला क्षेत्रात (हॉकर्स झोन) विक्रीची परवानगी देण्यास नकार दिल्याने फेरीवाल्यांनी नाराजी व्यक्त केली.

महापालिका आयुक्त डॉ. विपीन इटनकर यांनी शहरातील फेरीवाल्यांना तसेच शहर फेरीवाला समितीच्या सदस्यांना बैठकीसाठी बोलावले होते. बैठकीत शहर फेरीवाला समितीचे सदस्य रज्जाक कुरेशी, प्रमोद मिश्रा, नेहा ओचनी, रीतू मोहब्बे, राजकुमार तिवारी, मारुती पटेल, संदीप गुहे, सुनील सूर्यवंशी, प्रकाश भगत, हेमंत पाटमासे आदी उपस्थित होते. या बैठकीत फेरीवाल्यांना परवान्यावर चर्चा होऊन तोगडा निघेल अशी अपेक्षा होती. बैठकीत बर्डीसह महाल, गणेशपेठ बसस्थानक, आयटी पार्क, रविनगर, धरमपेठ, जरीपटका साप्ताहिक बाजारातील फेरीवाल्यांना परवान्याबाबतचा मुद्दा राज्य शासनाकडे असल्याचे आयुक्तांनी फेरीवाल्यांना सांगितले. २०१४ च्या फेरीवाला कायद्यात बदल होणार असून जुने फेरीवाला क्षेत्र रद्द करण्यात आल्याचेही आयुक्तांनी फेरीवाल्यांना सांगितले. आयुक्तांनी बर्डी येथील फेरीवाल्यांवर कारवाईबाबत पोलीस आयुक्तांसोबत चर्चा झाली असून साहित्य जप्त करून गुन्हे दाखल करण्याचा इशारा त्यांनी दिला. आयटी पार्क भागात परवानाधारक फेरीवाल्यांना दुकाने लावण्याची परवानगी देण्यात आली आहे. विनापरवाना फेरीवाल्यांना येथे स्थान नसल्याचेही त्यांनी सांगितले. इतर बाजारातील फेरीवाल्याबाबत कुठलेही ठोस आश्वासन न मिळाल्याने फेरीवाल्यांची निराशा झाली. आयुक्तांसोबतची बैठक निष्फळ ठरल्याचे शहर फेरीवाला समितीचे रज्जाक कुरेशी यांनी सांगितले.

# महापालिकेत ‘हर घर तिरंगा’ अभियान



महापालिकेत राष्ट्रध्वजाच्या वितरणादरम्यान महापौर नीता ठाकरे, आयुक्त डॉ. विपीन इटनकर व इतर पदाधिकारी.

## कर्मचारी, नागरिकांना राष्ट्रध्वजाचे वाटप. घोषणांनी परिसर दणाणला.

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** ‘हर घर तिरंगा’ अभियानांतर्गत महापालिकेत येणाऱ्या नागरिकांना आणि कर्मचाऱ्यांना शुक्रवारी राष्ट्रध्वजाचे वाटप करण्यात आले. यावेळी ‘भारत माता की जय’, ‘वंदे मातरम’ अशा घोषणा देण्यात आल्या.

महापौर नीता ठाकरे, सत्तापक्ष नेते बाल्या बोरकर, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी, आयुक्त डॉ. विपीन इटनकर, अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, उपायुक्त निर्भय जैन, मंगेश खवले, मुख्य वित्त अधिकारी सदाशिव शेळके यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे वितरण करण्यात आले. तत्पूर्वी महापालिकेच्यावतीने कस्तुरचंद पार्क येथे आयोजित फाळणी भयावहता स्मृती दिन कार्यक्रमाच्या मध्यमातून विभाजन विभिषिकेच्या भयावह स्मृतींची माहिती देण्यात आली. यावेळी देशाच्या फाळणीदरम्यान प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य निर्दोष नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

### महापौरांच्या हस्ते आज ध्वजारोहण

भारतीय स्वातंत्र्याच्या ८०व्या वर्धापन दिनानिमित्त १५ ऑगस्टला सकाळी ८.०५ वाजता सिव्हिल लाईन्स स्थित महापालिका मुख्यालयात ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. महापौर नीता ठाकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे.


## सितारा हाऊसिंग फायनान्स लि

Sitaara

(पूर्वीची सेवा गृह ऋण लि.)

नोंदणीकृत कार्यालयः पहिला मजला, 216/सी- 12, जुना क्र. सी-12, प्लॉट क्र. 13-बी, गुरु नानक पुरा, लक्ष्मी नगर, दिल्ली-110092, दिल्ली- भारत.

1. प्राधिकृत अधिकारी गौतम, मोबाईल क्र. 9921021840, ईमेल आयडी- guatam.ukey@sgrlimited.in
2. लिलाव सेवा पुरवठादार- सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, संपर्क व्यक्ती -बालाजी मन्नूर, मोबाइल क्र. 7977701080

### ई-लिलाव विक्री सूचना

[सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स 2002 मधील नियम 9(1) सह वाचण्यात येणारया नियम 8(6) व (7) नुसार]

याद्वारे सामान्य जनतेस व विशेषकरून कर्जदार आणि जामीनदारांना सूचित करण्यात येते कि **सितारा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** (पूर्वीची सेवा गृह ऋण लिमिटेड) यांच्या प्राधिकृत अधिकारयाने सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (2002 चा 54) अंतर्गत **सितारा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** (पूर्वीची सेवा गृह ऋण लिमिटेड) (सुरक्षित धनको) यांचेकडे तारण ठेवलेल्या खाली नमूद मालमत्तांचा याधीच प्रत्यक्ष ताबा घेतला असून **सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002** अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत सुरक्षित धनकोच्या वतीने प्राधिकृत अधिकारयाने कर्जदार, सह-कर्जदार आणि गहाणकारांकडून घेणे असलेल्या थकबाकी रकमेच्या (पुढील व्याज, शुल्के इ. सह) वसुलीसाठी खाली नमूद मालमत्ता ई-लिलावात काढल्या आहेत.

अचल मालमत्तेच्या खरेदीसाठी निम्नस्वाक्षरीकारांकडून खाली वर्णन केल्या प्रमाणे प्रत्यक्ष ताब्यात असलेल्या अचल मालमत्तेसाठी **‘‘जसे आहे जेथे आहे तत्वावर’’, ‘‘जसे आहे जे आहे तत्वावर’’, आणि ‘‘तेथे जे काही आहे या तत्त्वावर’’** आणि **‘‘कोणताही पर्याय नाही तत्त्वावर’’** प्रस्ताव / बोली आमंत्रित करीत आहेत. सदर विक्री ही कोणत्याही हमी व नुकसानभरपाईविना असेल.

खाली नमूद मालमत्ता ऑनलाइन ई-लिलावाच्या मध्यमामणे **https://www.bankeauctions.com** या वेबसाईटच्या माध्यमाने विक्री करण्यात येतील तसेचएसजीआरएल यांचे स्वीकृत ऑनलाइन लिलाव सेवा पुरवठादार **‘‘सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड’’** यांच्याद्वारे घेण्यात येईल.

| | |
|---|---|
| पाहणी दिनांक आणि वेळ | 14.09.2026 रोजी सायं. 6.00 वाजेपर्यंत |
| बोली / बयाणा रक्कम सादर करण्याचा शेवटचा दिनांक | 15.09.2026 |
| ई-लिलाव दिनांक व वेळ | 16.09.2026 रोजी स. 10.00 ते दु. 02.00 वाजेपर्यंत (स्वयंकालविस्तारः 5 मिनिटे) |

| अ. क्र. | कर्ज खाते क्र. आणि कर्जदार व सह-कर्जदाराचे नाव | मागणी सूचना दिनांक आणि रक्कम | मालमत्तेचे वर्णन | आरक्षित किंमत / बयाणा रक्कम (आरक्षित किमतीच्या 10%) / किमान बोली वृद्धी रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | कर्ज क्र. H3GP000005007542<br>1. श्रीमती कविता रविनाथ वढाई, पतीचे नाव श्री. रविनाथ वढाई (कर्जदार)<br>2. श्री. रविनाथ उदाराम वढाई वडिलांचे नाव श्री. उदाराम वढाई (सह-कर्जदार) | 29.07.2025, 11.06.2025 रोजी रु. 5,38,165.43/- | घर क्र. 408, कोसरा, तहसील पौनी, जिल्हा भंडारा, महाराष्ट्र - 441908, पूर्वेस- चंद्रकांत ऊके यांची मोकळी जमीन, पश्चिमेस- रस्ता, उत्तरेस- काशीनाथ उदाराम यांचे घर, दक्षिणेस- शामराव यांचे घर, गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे क्षेत्रफळ 595 चौ.फू. | रु. 6,36,650/-<br>रु. 63,665/-<br>रु. 10,000/- |
| 2 | कर्ज क्र. H3GP000005010261<br>1. श्रीमती नंदा जीवन वासनिक पतीचे नाव श्री. जीवन वासनिक (कर्जदार)<br>2. श्री. जीवन सखाराम वासनिक वडिलांचे नाव श्री. सखाराम वासनिक (सह-कर्जदार)<br>3. श्री. निशांत जीवन वासनिक वडिलांचे नाव श्री. जीवन वासनिक (सह-कर्जदार)<br>4. श्री. देवेंद्र संपत तिरपुडे वडिलांचे नाव श्री. संपत तिरपुडे (जामीनदार) | 16.09.2025, 10.08.2025 रोजी रु. 4,36,746.68/- | घर क्र. 131, आंबेडकर वॉर्ड क्र. 4, मौजा अंधळगाव, ग्रामपंचायत अंधळगाव, तहसील मोहाडी, जिल्हा भंडारा, महाराष्ट्र, पूर्वेस- रस्ता, पश्चिमेस- अशोक आत्माराम ठाकरे, उत्तरेस- प्रभास संपत तिरपुडे यांचे घर, दक्षिणेस- लखींदर जोगेंद्र ठाकरे यांचे घर. गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे क्षेत्रफळ 494 चौ.फू. | रु. 5,28,580/-<br>रु. 52,858/-<br>रु. 10,000/- |
| 3 | कर्ज क्र. H3GP000005011252<br>1. श्रीमती तायरून जायदली सय्यद, पतीचे नाव श्री. जायदली सय्यद (कर्जदार)<br>2. श्री. जायदली अमीर अली सय्यद, वडिलांचे नाव श्री. अमीर अली सय्यद (सह-कर्जदार)<br>3. श्री. अनिस अली जय्यद अली सय्यद, वडिलांचे नाव श्री. जय्यद अली सय्यद (सह-कर्जदार)<br>4. श्री. गणेश राजेश कागदे, वडिलांचे नाव श्री. राजेश कागदे (जामीनदार) | 28.03.2025, 31.01.2025 रोजी रु. 2,09,952/- | घर क्र. 317, गाव चांदोरी, तहसील भंडारा, जिल्हा भंडारा, महाराष्ट्र. पूर्वेस- अजगरअली सय्यद यांचे घर, पश्चिमेस- भागवत विरूसकर यांचे घर, उत्तरेस- टेकचंद शेंडे यांचे घर, दक्षिणेस- सीमेंट रोड, गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे क्षेत्रफळ 735 चौ.फू. | रु. 4,04,250/-<br>रु. 40,425/-<br>रु. 10,000/- |
| 4 | कर्ज क्र. H3GP000005012472<br>1. श्रीमती कीर्ती सुहास वाढई पतीचे नाव श्री. सुहास वाढई (कर्जदार)<br>2. श्री. सुहास शामराव वाढई वडिलांचे नाव श्री. शामराव वाढई (सह-कर्जदार)<br>3. श्री. अजय प्रकाश मोहरकर वडिलांचे नाव श्री. प्रकाश मोहरकर (जामीनदार) | 31.12.2025, 19.12.2025 रोजी रु. 5,71,447.09/- | मालमत्ता क्र. 410/1, मौजा कोसरा, ग्रामपंचायत कोसरा, तहसील पावनी, भंडारा, महाराष्ट्र- 441914, पूर्वेस- शामराव वाढई यांचे घर, पश्चिमेस- ग्रामपंचायत रस्ता, उत्तरेस- किशोर वाढई, दक्षिणेस- वहीवली रस्ता. गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे क्षेत्रफळ 600 चौ.फू. | रु. 8,40,000/-<br>रु. 84,000/-<br>रु. 10,000/- |
| 5 | कर्ज क्र. H3GP000005013602<br>1. श्रीमती विद्या ज्ञानेश्वर काळे पतीचे नाव श्री ज्ञानेश्वर काळे (कर्जदार)<br>2. श्रीमती ज्ञानेश्वर देवराव काळे, वडिलांचे नाव श्री. देवराव काळे (सह-कर्जदार) | 16.09.2025, 10.08.2025 रोजी रु. 5,96,324.22/- | घर क्र. 321, वॉर्ड क्र. 01, करमभड, ग्रामपंचायत करमभड, तहसील पारशिवणी, जिल्हा नागपूर, महाराष्ट्र, पूर्वेस- सुरेश काळे यांचे घर, पश्चिमेस- तुळशीराम यांचे घर, उत्तरेस- गजानन मेग्रे यांचे घर, दक्षिणेस- रस्ता. गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे क्षेत्रफळ 1612 चौ.फू. | रु. 5,00,800/-<br>रु. 50,080/-<br>रु. 10,000/- |
| 6 | कर्ज क्र. H3GP000005014821<br>1. श्रीमती दुर्गा विलास मेश्राम, पतीचे नाव श्री. विलास मेश्राम (कर्जदार)<br>2. श्री. विलास नागोराव मेश्राम, वडिलांचे नाव श्री. नागोराव मेश्राम (सह-कर्जदार)<br>3. श्री. दीपक कांठीराम मेश्राम, वडिलांचे नाव श्री. कांठीराम मेश्राम (जामीनदार) | 25.08.2025, 10.08.2025 रोजी रु. 2,56,896.45/- | मालमत्ता क्र. 301, मौजा मोहदुरा, ग्रामपंचायत मोहदुरा, तहसील आणि जिल्हा भंडारा, महाराष्ट्र. पूर्वेस- आजाबराव मेश्राम यांचे घर, पश्चिमेस- तुरसकर यांचा प्लॉट, उत्तरेस- जगदीश यांची शेत जमीन, दक्षिणेस- सीमेंट रस्ता. गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे क्षेत्रफळ 933 चौ.फू. | रु. 4,66,500/-<br>रु. 46,650/-<br>रु. 10,000/- |
| 7 | कर्ज क्र. H4RR000005010700<br>1. श्रीमती डुलन सुरेश धुर्वे पतीचे नाव श्री. सुरेश धुर्वे (कर्जदार)<br>2. श्री. सुरेश महादेव धुर्वे वडिलांचे नाव श्री. महादेव धुर्वे (सह-कर्जदार)<br>3. श्री. गोविंद शंकर सायवान वडिलांचे नाव श्री. शंकर सायवान (जामीनदार) | 09.07.2025, 11.06.2025 रोजी रु. 8,06,082.22/- | मालमत्ता क्र. 55, गाव गोबरवाही, तहसील तुमसर, जिल्हा भंडारा, महाराष्ट्र, पूर्वेस- मिताराम मरकम यांचे घर, पश्चिमेस- बुध सिरसम यांचे घर, उत्तरेस- ग्रामपंचायत रस्ता, दक्षिणेस- खुला प्लॉट, गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे क्षेत्रफळ 4200 चौ.फू. | रु. 20,70,000/-<br>रु. 2,07,000/-<br>रु. 10,000/- |
| 8 | कर्ज क्र. H4RR000005012022<br>1. श्रीमती रूपा वसंत धुर्वे, पतीचे नाव श्री. वसंत धुर्वे (कर्जदार)<br>2. श्री. वसंत माधोराव धुर्वे, वडिलांचे नाव श्री. माधोराव धुर्वे (सह-कर्जदार)<br>3. श्री. संदीप देवराव टेकाम, वडिलांचे नाव देवराव टेकाम (जामीनदार) | 16.09.2025, 10.08.2025 रोजी रु. 3,66,610.68/- | घर क्र. 462, गाव उमरवाडा, तहसील तुमसर, जिल्हा भंडारा, महाराष्ट्र. पूर्वेस- अनुसाया राजहंस शेंडे, पश्चिमेस- बेबी देवराव टेकाम यांचे घर, उत्तरेस- शंकर बागडे यांचे घर, दक्षिणेस- रस्ता. गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे क्षेत्रफळ 341.88 चौ.फू. | रु. 4,78,632/-<br>रु. 47,863.20<br>रु. 10,000/- |
| 9 | कर्ज क्र. HLP100008318<br>1. श्रीमती पुस्तकला उत्तम कनोजे, पतीचे नाव श्री. उत्तम कनोजे (कर्जदार)<br>2. श्री. सुनील उत्तम कनोजे, वडिलांचे नाव श्री. उत्तम कनोजे (सह-कर्जदार)<br>3. श्री. जयंत मुरारी बर्वेकर, वडिलांचे नाव श्री. मुरारी बर्वेकर (जामीनदार) | 29.07.2025, 11.06.2025 रोजी रु. 3,79,288.77/- | मौजा बोर्डा (गणेशी), ग्रामपंचायत बोर्डा गणेश, वॉर्ड क्र. 3, मालमत्ता क्र. 348, तहसील पारशिवणी, जिल्हा नागपूर, महाराष्ट्र, पूर्वेस- श्रीमती कल्पना सरोडे, पश्चिमेस- श्री. धानेश्वर सोनकुहडी यांचे घर, उत्तरेस- श्री. राम कोसरे यांचे घर, दक्षिणेस- गल्ली आणि श्रीमती काशीबाई लहुरे यांचे घर. गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे क्षेत्रफळ 840 चौ.फू. | रु. 5,04,000/-<br>रु. 50,400/-<br>रु. 10,000/- |

नियम व अटी:

1. प्राधिकृत अधिकारयाच्या सर्वोत्तम माहितीनुसार कोणत्याही मालमत्तेवर कोणतेही बोजे नाहीत. तरीही, इच्छुक बोलीदारांनी लिलावात काढलेल्या मालमत्तांवरील बोजे, मालकी हक्क तसेच मालमत्तेवरील दावे / अधिकार / थकबाकी यांची बोली सादर करण्यापूर्वी स्वतंत्रपणे चौकशी करावी. ई-लिलाव सूचना हे बँकेचे प्रतिनिधित्व किंवा वचन नसूनती तशी समजण्यात येऊ नये. सदर मालमत्तेची कंपनीस ज्ञात व अज्ञात अशा सर्व वर्तमान व भावी बोज्यांसहकरण्यात येत आहे. तिसरया पक्षाने काही दावा/ अधिकाराची / थकबाकी / वैधानिक देय / कर इत्या. ची मागणी केल्यास त्यासाठी प्राधिकृत अधिकारी /सुरक्षित धनको जबाबदार नसतील.
2. बोली सादर करण्याअगोदर मत्तेची पाहणी करण्याची आणि विनिर्देशांबाबत स्वतःचे समाधान करून घेण्याची जबाबदारी बोलीदारांची असेल. प्रत्येक मालमत्तेच्या वर्णनासमोर नमूद करण्यात आलेल्या स्थळी इच्छुक बोलीदारांना लिलावात काढण्यात आलेल्या मालमत्तांची पाहणी करता येईल.
3. या ई-लिलावात सहभागी होणारया सर्व इच्छुकांना बोली / निविदा प्रपत्रे भरून ते आरक्षित किमतीच्या 10% एवढ्या बयाणा रकमेसह शेवटच्या दिनांकाअगोदर सादर करावे लागतील. सर्व सहभागी / बोलीदारांना आपल्या बोली ऑनलाईन लिलाव सेवा पुरवठादार ‘‘सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड’’ यांच्या वेब पोर्टलवर ऑनलाईन सादर कराव्या लागतील आणि सर्वोच्च बोलीदारास यशस्वी बोलीदार घोषित करण्यात येईल आणि त्यांच्या नावे वर नमूद अनामत मत्तेची विक्री करण्यात येईल. इतर कोणत्याही पद्धतीने सादर केलेल्या बोली / अपूर्ण बोली फेटाळण्यास पात्र ठरतील. तपशीलासाठी कृपया मे. सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड च्या वरील व्यक्तीशी https://www.bankeauctions.com वर संपर्क साधावा; **संपर्क व्यक्ती श्री बालाजी मान्नूर, मोबाईल क्र. 7977701080 सपोर्ट क्र. 07291981124 / 25/ 26, ईमेल आयडीः** support@bankeauctions.com; mannur.govindarajan@c1india.com.
4. याद्वारे ऑनलाईन बोलीदार सहमती देत आहेत की त्यांनी प्राधिकृत अधिकारयासमक्ष पात्र बोली औपचारिकरित्या नोंदविलेली आहे, त्यांना हे दस्तावेज सादर करून ई-लिलाव बोली मंचाच्या माध्यमातून सहभागासाठी आपले स्वारस्य व्यक्त करावे लागेल. लिलाव सेवा पुरवठादाराकडून आपला लॉगीन आयडी व पासवर्ड प्राप्त प्राप्त करण्याची जबाबदारी पूर्णपणे निविदाकार / ऑनलाईन बोलीदाराची असेल. बोली प्रपत्रांसोबत पुढील केवायसी दस्तावेजांच्या प्रती असाव्यात, (i) PAN कार्ड (ii) आधार कार्ड/पासपोर्ट (iii) वर्तमान पत्त्याचा पुरावा (iv) वैध ई-मेल आयडी (v) संपर्क क्रमांक (मोबाईल / लँदलाईन) (vi) (कंपनीसाठी) लिलावात सहभागी होण्यासाठी बोर्डाचा ठराव. सदर दस्तावेजांच्या स्कॅन केलेल्या प्रती वर नमूद ईमेल आयडी वर सादर कराव्यात. तपशीलासाठी कृपया https://www.bankeauctions.com वर संपर्क साधावा; **संपर्क व्यक्ती श्री बालाजी मान्नूर, मोबाईल क्र. 7977701080 सपोर्ट क्र. 07291981124 / 25/ 26,** ईमेल आयडीः support@bankeauctions.com; mannur.govindarajan@c1india.com.
5. बयाणा रक्कम एचडीएफसी बँक लि., खाते धारकाचे नाव - सितारा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, खाते क्र. 57500001848343, आयएफएससी कोडः HDFC000060 किंवा प्राधिकृत अधिकारी, सितारा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, पत्ता, पहिला मजला, बसंत विहार कॉलनी (नौगन्व बुजुर्ग भवन), सर्वे क्र. 1090 भाग, देव हॉटेल जवळ, कोर्ट रोड, धर - 454001 - मध्य प्रदेश यांचे नावे काढण्यात आलेल्या डीडी/पे ऑर्डर च्या स्वरुपात **19-08-2026** रोजी सायं. 6:00 वाजेपर्यंत पर्यंत आरटीजीएस/एनईएफटी/ फंड ट्रान्सफर (याची पावती बोलीसह जोडण्यात यावी) च्या माध्यमातून जमा करण्यात यावी.
6. न भरलेले बोली प्रपत्र किंवा शेवटच्या दिनांकानंतर प्राप्त झालेल्या बयाणा रकमा अवैध समजण्यात येतील व त्या स्वीकारण्यात येणार नाहीत. बयाणा रकमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही. सर्फेसी नियम, 2002 मधील नियम 9(3) च्या तरतुदींनुसार सदर ई-लिलावाच्या यशस्वी बोलीदाराने ऑफर/बोली स्वीकारल्यानंतर विक्री किंमत / बोली किंमतीच्या (बयाणा रकमेसह) 25% रक्कम त्वरित किंवा एका दिवसाच्या आत जमा न केल्यास किंवा त्यास यशस्वी बोलीदार म्हणून घोषित केल्यानंतर लिलावातून त्यास बाहेर पडावयाचे असल्यास सुरक्षित धनको / एसजीआरएल द्वारे सदर बयाणा रक्कम जप्त केली जाईल. अयशस्वी बोलीदारांची बयाणा रक्कम परत करण्यात येईल.
7. विक्री किंमत / बोली रकमेपैकी उर्वरित 75% रकमेचा भरणा वित्तीय संस्था / सितारा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (पूर्वीची सेवा गृह ऋण लिमिटेड) यांनी विक्रीची पुष्टी करण्याच्या दिनांकापासून 15 (पंधरा) दिवसांचे आत किंवा प्राधिकृत अधिकारी लेखी ठरवून देतील त्या वाढीव कालावधीत जमा करावी लागेल, अन्यथा खरेदीदार / बोलीदाराने तोवर भरलेल्या / जमा केलेल्या रकमा जप्त करण्यात येतील आणि त्यांना मालमत्तेवर किंवा ती पुढे ज्या किमतीस विकली जाईल तिच्या कोणत्याही भागावर कोणताही दावा करता येणार नाही. विक्री किंमत जमा करण्यासाठी असलेल्या वेळ आणि संबंधित कालावधीबाबत अधिक तपशीलासाठी कृपया सर्फेसी नियम 2002 मधील नियम 9(3), 9(4) व 9(5) पाहावेत.
8. कोणत्याही परिस्थितीत मालमत्तेची आरक्षित किमतीपेक्षा कमी रकमेस विक्री करण्यात येणार नाही. सदर मालमत्तेची विक्री सर्वोच्च बोलीदारास करण्यात येईल, पण यासाठी सुरक्षित धनकोने बोली स्वीकारणे आवश्यक आहे.
9. **सदर विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी कृपया आमची वेबसाईट www.sgrlimited.inकिंवा https://www.bankeauctions.com येथे बोली सादर करण्यापूर्वी व ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यापूर्वी भेट द्यावी.**
10. **सदर कर्जदार/ जामीनदारांनी सदर सूचना सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 मधील नियम 8(6) अंतर्गत देण्यात येणारी सूचना समजण्यात यावी. याद्वारे वर नमूद केल्याप्रमाणे सदर सूचनेच्या दिनांकापासून 30 दिवसांच्या आत संपूर्ण दायित्वांची पूर्तता (ज्यात आतापर्यंतचे अतिरिक्त व्याज व आनुषंगिक शुल्के, खर्च यांचा समावेश आहे) करण्याची शेवटची व अंतिम संधी देण्यात येत आहे. तसे न केल्यास सदर मत्तांची वर नमूद नियम व अटींनुसार तसेच लिलाव सेवा पुरवठादाराच्या ऑनलाइन पोर्टलवर विक्री करण्यात येईल.**

अधिक माहितीसाठी, प्राधिकृत अधिकारयाशी वर नमूद कार्यालयीन पत्त्यावर संपर्क साधावा.

दिनांकः 14-08-2026 स्थानः भंडारा आणि नागपूर

स्वा/-, प्राधिकृत अधिकारी, सितारा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड करिता,



## हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

**मुख्य कार्यालय : नं. 167 - 169, दुसरा मजला, अन्ना सलाई, लिटल माऊंट सैदापेट, चेन्नई - 600 015 तमिळनाडू ईमेल आयडी: auction@hindujahousingfinance.com**

**शाखा कार्यालय - पहिला मजला, श्रीजी कॉम्प्लेक्स, चर्च रोड, न. एसबीआय स्क्वेअर, यवतमाळ, जिल्हा-यवतमाळ-445001, गांधी नगर, सातपुते हॉस्पिटलजवळ, आर्वी रोड, वर्धा-442001**

**परिशिष्ट IV ताबा सूचना (अचल मालमत्तेसाठी)**

तर, अधोस्वाक्षरी केलेले हे हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (HHFL) चे प्राधिकृत अधिकारी असल्याने आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 अन्वये आणि सेक्युरिटीच्या नियम 3 सह वाचलेल्या कलम 13(2) अन्वये दिलेल्या अधिकारांचा वापर करताना व्याज (अंमलबजावणी) नियम 2002, नोटिसमध्ये नमूद केलेली रक्कम प्राप्त झाल्यापासून 60 दिवसांच्या आत परतफेड करण्यासाठी खाली नमूद केलेल्या कर्जदार/जामीनदारांना कंपनीच्या अधिकृत अधिकाऱ्याने जारी केलेली मागणी सूचना(ने) या नोटिसचे. कर्जदाराची रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, याद्वारे कर्जदार/जामीनदार(ना) आणि सामान्यत: जनतेला नोटीस दिली जाते की खाली स्वाक्षरीदाराने त्याला उप अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा **सांकेतिक ताबा** घेतला आहे. -उक्त कायद्याच्या कलम 13 चे कलम (4) सिक्युरिटी इंटरेस्ट इनफोर्समेंट नियम, 2002 च्या नियम 8 सह वाचले आहे. कर्जदाराचे लक्ष या कायद्याच्या कलम 13 मधील उप-कलम (8) च्या तरतुदींकडे आमंत्रित केले आहे. सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळ. विशेषत: कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे मालमत्तेचा व्यवहार न करण्याची ताकीद देण्यात आली आहे आणि मालमत्तेशी कोणताही व्यवहार केल्यास त्यावरील व्याजासह येथे नमूद केलेल्या रकमेसाठी एचएचएफएलच्या शुल्काच्या अधीन असेल.

| कर्जदार आणि जमानतदाराचे नाव | मागणी सूचनेचा दिनांक व रक्कम | ताब्याची दिनांक |
|---|---|---|
| १. श्री मनोज जयस्वाल (कर्जदार), २. श्री नंदकिशोर जयस्वाल (सह-कर्जदार) आणि ३. कु. शोभा जयस्वाल (सह-कर्जदार) MH/YAV/YAVA/A000000133 | 15/05/2026 रू. Rs.986289/- 07/05/2026 पर्यंत | 10-08-2026 |
| जमीनीचा सर्व भाग आणि तुकडा बेअरिंग फ्लॅट नं. ए-3 (तळ मजला) गंगासिंधु अपार्टमेंट बिल्ट अप एरिया 37.16 चौ.मी, सोबतच 17.32 चौ.मी अविभाजित जमीनीचा वाटा लेआउट प्लॉट नं. 32, संपुर्ण क्षेत्रफळ (294.50 चौ.मी), फिल्ड सर्वे नं. 17 / 1, मौजे वाघपुर ता आणि जि. यवतमाळ, रा. वाघपुर येथे स्थित, यवतमाळ, उप नोंदणी जिल्हा यवतमाळ आणि नगरपषिद यवतमाळ च्या हद्दीत, आणि चतुर्सिमा:- उत्तरः प्लॉट नं. 32 चा भाग, दक्षिणः फ्लॅट नं. 4, पुर्वः प्लॉट नं. 32 चा भाग, पश्चिमः फ्लॅट नं. 2 | | |
| १. श्री योगेश फटिंग (कर्जदार), २. श्री नारायण फटिंग (सह-कर्जदार), ३. श्री वर्ष फटिंग (सह-कर्जदार) आणि ४. कु. अंचल फटिंग MH/NGR/WARD/A000000046 | 15/05/2026 रू. 505227/- 07/05/2026 पर्यंत | 14-08-2026 |
| संपत्तीचा सर्व भाग आणि तुकडा बेअरिंग प्लॉट नं. 47 संपुर्ण क्षेत्रफळ (2410.00 चौ.फुट) (224.00 चौ.मी) पी.एच नं. 21, खा.नं. 67 / 1, मौजा नं. 72, ता. देवली, जि. यवतमाळ आणि संपत्ती चतुर्सिमा:- उत्तरः 9 मी लेआउट रोड, दक्षिणः श्री. देवघरे यांचा प्लॉट, पुर्वः 9 मी लेआउट रोड, पश्चिमः रामभाऊ झोरे यांचा प्लॉट | | |

**कर्जदार / सहकर्जदार / जमिनदारांना वैधानिक सुचना**

कर्जदार/जामीनदारांनी सावधगिरी बाळगली आहे की मालमत्ता यापुढे कधीही सार्वजनिक लिलाव/निविदांद्वारे विकली जाऊ शकते आणि म्हणून ही सुरक्षा नियम 6, 8 आणि 9 अंतर्गत नोटीस म्हणून देखील मानली जाऊ शकते ( व्याज) अंमलबजावणी नियम, 2002. तपशिलवार यादी आणि पंचनामा अडथळ्यांमुळे नोंदविला जाऊ शकला नाही कारण अशा मालमत्तेचे छायाचित्रण केले गेले आहे.

**1)रितेश गवई (RLM)-9011858221 2)रुषिकेश उभाळे (ALM)-9823244498**
**3)राहुल निकुरे (CLM)-9405473208 ४)मिथलेश देहरिया(CRM)- 8226009399**

**दिनांक : 15/08/2026,**
**ठिकाण : नागपूर**

**स्वा / - प्राधिकृत अधिकारी, हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**



लोकसत्ता क्लासिफाइड्स

**सर्व्हिसेस**

**वृद्धश्रम/सेवासंस्था**

**वयोवृद्ध** सेवानिवृत्त एकाकी जीवन जगणारया व्यक्तींची आयुष्यभराची सोयॲडमिशननंतर आजारपण हॉस्पिटल सेवासुश्रुषा शेवटपर्यंत सांभाळणारे केळकरकाका 8788882602.

0090409475-1

**जाहिरात छोटी, प्रतिसाद मोठा संपर्क-२७०६९०४, २७०६९०३**

**यात्रा विशेष**

**यात्रासहल**

**दोस्तीटूर : लेहलडाख, हम्पीबदामी, केरळ तामिळनाडू, नैनिताल, भूतान, आसाम, नेपाळ, कोलकत्तापुरी सिक्कीम दार्जिलिंगसह, आदीकैास, चारधाम, नर्मदापरिक्रमा, त्रिस्थळी, कुरवपूर पिठापूर 9429694477/ 9594880123.**

0070987728-25

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.



## कॉसमॉस को-ऑप. बँक लि.

(मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)

रजिस्टर्ड ऑफिस : ‘कॉसमॉस भवन’, प्लॉट नं. ६, आयसीएस कॉलनी, युनिव्हर्सिटी रोड, गणेशखिंड, शिवाजीनगर, पुणे-४११ ००७. फोन : ०२० - ६७०८ ५३०८/११

**स्थावर मालमत्ता विक्री नोटीस (नियम ८(६) सरफेसी कायदा, २००२ अन्वये)**

अधिकृत अधिकारी, दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि. यांनी खालील नमूद केलेल्या थकबाकीदाराचे दि सिक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये, बँकेने ताब्यात घेतलेल्या व खालील प्रमाणे नोंद केलेल्या स्थावर मिळकती टेंडरद्वारे **‘‘जशी आहे तशी’’** विक्री करुन विक्री रकमेतून कर्जाची वसूली करणे करीता इच्छुक खरेदीदारांकडून सीलबंद टेंडर्स मागवित आहोत.

| कर्जदार, गहाणदार, जामिनदारांचे नाव आणि शाखा | १३(२) मागणी नोटीस तपशील: दिनांक | १३(२) मागणी नोटीस तपशील: मागणी नोटीस रक्कम | ताबा दिनांक | विक्री / लिलाव तपशील: दिनांक | विक्री / लिलाव तपशील: वेळ |
|---|---|---|---|---|---|
| कर्जदार :<br>**१. मे. लॅव्हिना इम्पेक्स, (कर्जदार) प्रोप्रायटर सौ. लता मुकेश जावंधिया (गहाणदार) यांच्यामार्फत, पत्ता**-प्लॉट नं. ६७२, जलालपुरा, पथ्थर फोड अखाडा, गांधीबाग, नागपूर-४४०००२ आणि **राहणार**-कोटेचा भवन, ८१८, पोथी गल्ली, न्यू इतवारी रोड, बागडगंज, नागपूर-४४०००२<br>**२. श्री. शारदाकुमार हरीदास जावंधिया (जामीनदार) पत्ता :** कोटेचा भवन, ८१८, पोथी गल्ली, न्यू इतवारी रोड, बागडगंज, नागपूर-४४०००२<br>**३. श्री. मुकेश शरदकुमार जावंधिया (जामनीदार) पत्ता :** कोटेचा भवन, ८१८, पोथी गल्ली, न्यू इतवारी रोड, बागडगंज, नागपूर-४४०००२<br>**शाखा : नागपूर** | ०८.०८.२०२५ | ₹ ५०,३१,१२१.२४ + व्याज व इतर चार्जेस | १०.०३.२०२६ | ०८.०९.२०२६ | दु. २.३० वा. |

**मिळकतीचे वर्णन :** नगरपरिषद बुटीबोरी, तहसील नागपूर ग्रामीण, जिल्हा नागपूर स्थित मौझा बोरी येथील खासरा नं. ७३, पी.एच.नं. ७६ मालीक मकबुजा कार्व्हड् लेआऊटनुसार या बिगरशेतजमिनीचे एकूण क्षेत्रफळ १४५०० चौ.मी.असून यामधील प्लॉट नं. १५ एकूण क्षेत्रफळ २११.५०० चौ.मी. पैकी सर्वसामाईक भागाचे क्षेत्रफळ २०३.७८० चौ.मी. सदर प्लॉटच्या **चतु:सीमा : पूर्वेस** : प्लॉट नं. १४, **पश्चिमेस** : ९.०० मीटर रस्ता, **उत्तरेस** : ९.०० मीटर रस्ता, **दक्षिणेस** : प्लॉट नं. १६.

| रिझर्व्ह किंमत | बयाणा रक्कम |
|---|---|
| ₹ ४५,४०,०००.०० (₹ पंचेचाळीस लाख चाळीस हजार फक्त) | ₹ ४,५४,०००.०० (रू. चार लाख चोपन्न हजार फक्त) |

**विक्री / लिलावाचे ठिकाण –** दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि., प्लॉट नं. ४, तळ मजला, सेंट्रल बाजार रोड, हॉटेल सेंट्रल पॉईंट समोर, रामदास पेठ, नागपूर-४४००१२ (फोन नं.: ०७१२/२४४४७६६/२४५४८२४)

**अटी व शर्ती – १.** वरील प्रमाणे नमूद केलेली स्थावर मिळकत ही **‘‘जी आहे जेथे आहे, जशी आहे तशी, तेथे जे आहे’’**या तत्वावर विक्री केली जाईल. **२.** टेंडर दाखल करणेपुर्वी अधिकृत अधिकारी यांच्याशी सदर मिळकतीचे मालकी हक्क, टायटल व देयके इ. संदर्भात शहानिशा करून घेण्याची जबाबदारी खरेदीदार यांची राहील व नंतर याबाबत कुठल्याही प्रकारच्या तक्रारीची नोंद घेतली जाणार नाही. (टेंडर फॉर्म मिळण्याचे ठिकाण दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि., प्लॉट नं. ४, तळ मजला, सेंट्रल बाजार रोड, हॉटेल सेंट्रल पॉईंट समोर, रामदास पेठ, नागपूर-४४००१२ (फोन नं.: ०७१२/२४४४७६६/२४५४८२४). **३.** इच्छुक खरेदीदार यांनी आपले बयाणा रक्कमेचे पे ऑर्डर/डीडीसह दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि. केवायसी सहित **दि. ०७.०९.२०२६, सायं. ५.०० पर्यंत** पोहचेल असे पाठविण्यात यावे. बयाणा रक्कम आरटीजीएस/एनईएफटी फंड ट्रान्सफर द्वारे अदा करू शकता त्याचा तपशील पुढीलप्रमाणे – दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि. A/c No. 090370171, IFSC Code- COSB0000090 शाखा युनिव्हर्सिटी रोड, पुणे. **४.** इच्छुक खरेदीदार यांनी आपले टेंडर/ऑफर्स बयाणा रकमेचे पे ऑर्डर/डीडी सीलबंद पाकीटात घालुन व पाकीटावर **‘‘मे. लॅव्हिना इम्पेक्स, प्रोप्रायटर सौ. लता मुकेश जावंधिया यांच्या कर्जाच्या संदर्भातील मिळकत खरेदीसाठी टेंडर’’** असे स्पष्ट नमुद करावे. सदर विक्री/लिलाव आपल्यावर कायम न झाल्यास आपण भरलेली बयाणा रक्कम परत करण्यात येईल. तसेच रिझर्व्ह किंमतीपेक्षा कमी किंमतीला आलेले टेंडर्स/ऑफर्स विचारात घेतले जाणार नाही. सदर बयाणा रकमेवर व्याज दिले जाणार नाही. **५.** विक्री कार्यवाहीतील स्थावर मिळकतीबाबत आवश्यक ते टॅक्स, स्टॅम्प ड्यूटी, रजिस्ट्रेशन चार्जेस, टीडीएस व इतर सर्व आनुषंगिक खर्च नियमानुसार व वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार खरेदीदारास करावा लागेल. **६.** सर्व कायदेशीर देयके व इतर देयके, कर, दर, कर आकारणी, फी, दावे, चार्जेस, जीएसटी इ. जबाबदारी खरेदीदार यांची सर्वस्वीपणे राहील. **७.** सर्व टेंडर्स/ऑफर्स उघडल्या नंतर संभाव्य बोलीदारांना आपापल्या बोली वाढविण्याची संधी देण्यात येईल. बोली हस्तांतर करता येणार नाही. **८.** विक्री कार्यवाहीतील ज्या बोलीदाराची बोली सर्वात जास्त आहे अशा कायम केलेल्या बोलीदाराने २५% रकमेची (त्याच्या बोलीच्या) पुर्तता पुढील १ दिवसाच्या कार्यालयीन वेळेत करणे आवश्यक आहे. सदर रकमेमध्ये त्याने भरलेल्या बयाणा रकमेचा अंतर्भाव करण्यात येईल. सदर रक्कम ''दि कॉसमॉस को-ऑप बँक लि.'' A/c No. 090370171, आयएफएससी कोड – COSB0000090 शाखा युनिव्हर्सिटी रोड, पुणे यांच्या नावाने बँकर्स एनईएफटी/आरटीजीएस द्वारे अदा करण्यात यावी. सदर २५% रकमेची पुर्तता बोलीदाराकडून दिलेल्या मुदतीत न झाल्यास त्यांनी भरलेली बयाणा रक्कम कोणतीही पुर्वसुचना अथवा नोटीस न देता जप्त करण्यात येईल. **९.** २५% रकमेचा भरणा केल्यानंतर व अधिकृत अधिकारी यांनी विक्री/लिलाव कायम केल्यानंतर उर्वरीत ७५% रक्कम पुढील १५ दिवसांत कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक राहील. जर सदरचा भरणा सदर मुदतीत केला गेला नाही तर भरलेली २५% रक्कम जप्त करण्यात येईल व सदर स्थावर आणि जंगम मिळकतीची विक्री कारवाई पुन्हा करण्यात येईल. **१०.** मिळकतीची प्रत्यक्ष पाहणी दिनांक **०३.०९.२०२६** रोजी **स. ११.०० ते दु.१.००** पर्यंत करण्यात येईल. **११.** बँकेच्या माहीतीप्रमाणे वरील नमूद मिळकतीवर कोणत्याही प्रकारची देणी नाहीत. **१२.** सदर लिलावाच्या टेंडर्स/ऑफर्स स्विकारणे न स्विकारणे, लिलाव कायम करणे, पुढे ढकलणे, रद्द करणे व इतर सर्व हक्क कोणतेही कारण न देता अधिकृत अधिकारी यांचे राहील. **१३.** विक्री/लिलावाच्या तपशिलवार अटी व शर्ती लिलावाच्या वेळी व लिलावाच्या ठिकाणी वाचण्यात येतील. **१४.** सदर विक्री नोटीस ही बँकेच्या अधिकृत वेबसाईट म्हणजेच **www.cosmos.bank.in.** वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**टिप:–** सदरची **१५ दिवसांची नोटीस** नियम ८(६) एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट,२००२ अन्वये कर्जदार, जामिनदार व गहाणदार यांना सुध्दा लागू आहे.

**दिनांक :** १४.०८.२०२६
**ठिकाण :** पुणे

**श्री. सचिन श्रीकुमार रणभोर**
अधिकृत अधिकारी व सहाय्यक महाव्यवस्थापक,
**दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि.**

# मोमीनपुरातील कावड यात्रेला परवानगी नाहीच

## पोलिसांचा निर्णय उच्च न्यायालयाकडून कायम

लोकसत्ता प्रतिनिधी

**नागपूर :** महाल येथील कल्याणेश्वर शिव मंदिरापासून मोमीनपुरा परिसरातील अंसारनगर येथील गणेश-शिव मंदिरापर्यंत १६ ऑगस्टला प्रस्तावित कावड यात्रेला परवानगी नाकारण्यात आली. सामाजिक सौहार्द आणि कायदा-सुव्यवस्था लक्षात घेऊन पोलिसांनी या मार्गावरील यात्रेला परवानगी नाकारण्याचा घेतलेला निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने योग्य ठरवला. त्यामुळे मोमीनपुरा परिसरातून कावड यात्रा निघणार नाही, हे स्पष्ट झाले.



कावड यात्रेला परवानगी देण्याच्या मागणीसाठी संयोजक दीपक नेचवानी यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्याला विरोध करण्यासाठी मोमीनपुरा येथील रहिवासी फैजान आदिल खान यांनी हस्तक्षेप अर्ज दाखल केला. या याचिकेवर न्या.अनिल किलोर आणि न्या. रजनीश व्यास यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. प्रस्तावित कावड यात्रेचा समारोप अंसार नगर येथील गणेश-शिव मंदिरात होणार होता. हा परिसर संवेदनशील असून सामाजिक सौहार्द कायम राखण्यासाठी पोलीस प्रशासनाने यात्रेला परवानगी नाकारली असल्याचे फैजान खान यांनी न्यायालयाला सांगितले. यात्रेला परवानगी दिल्यास अप्रिय घटना घडण्याची शक्यता असून त्याचा परिणाम परिसरातील सामाजिक सलोख्यावर होऊ शकतो, असा युक्तिवादही करण्यात आला.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकल्यानंतर न्यायालयाने पोलीस प्रशासनाचा निर्णय कायम ठेवत याचिका फेटाळून लावली. त्यामुळे १६ ऑगस्टला प्रस्तावित कावड यात्रा मोमीनपुरातून निघणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

याचिकाकर्त्याच्या वतीने ॲड. साहिल मते आणि ॲड. निखिल वाघमारे, राज्य सरकारच्या वतीने मुख्य सरकारी वकील तसेच ज्येष्ठ विधिज्ञ देवेंद्र चौहान आणि हस्तक्षेप अर्जदाराच्या वतीने ॲड. अश्विन इंगोले यांनी बाजू मांडली.

# शालार्थ ई-केवायसीसाठी दोन महिन्यांची मुदतवाढ द्या

## शिक्षकांचे वेतन थांबवू नये; विदर्भ प्राथमिक माध्यमिक शिक्षक संघाची मागणी

लोकसत्ता प्रतिनिधी

**नागपूर :** शालार्थ प्रणालीमध्ये ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी शिक्षकांना किमान दोन महिन्यांची मुदतवाढ देण्यात यावी, तसेच तोपर्यंत कोणत्याही शिक्षक अथवा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन थांबवू नये, अशी मागणी विदर्भ प्राथमिक माध्यमिक शिक्षक संघ, नागपूर विभागाने केली आहे. संघाचे संस्थापक मिलिंद वानखेडे यांच्या नेतृत्वाखाली विभागीय शिक्षण उपसंचालकांना याबाबत निवेदन देण्यात आले.



विभागीय शिक्षण उपसंचालकांना निवेदन देताना विदर्भ प्राथमिक माध्यमिक शिक्षक संघाचे पदाधिकारी.

राज्यातील खाजगी अनुदानित, अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ऑगस्ट २०२६ चे वेतन, सप्टेंबर २०२६ मध्ये देय असलेल्या वेतन देयकापूर्वी शालार्थ प्रणालीतील ई-केवायसी पूर्ण करण्याचे निर्देश शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिले आहेत. विहित मुदतीत ई-केवायसी पूर्ण न करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेतन आहरित करण्यात येणार नसल्याचे निर्देशात नमूद आहे. दरम्यान, ई-केवायसी पूर्ण करताना अनेक शिक्षकांना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. वित्त विभागाच्या २७ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार बहुतांश शिक्षकांची बँकेत ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. मात्र, अनेक महिला शिक्षकांच्या नियुक्त्या शैक्षणिक प्रमाणपत्रांवरील नावानुसार झाल्या असून, शालार्थ प्रणालीतही त्याच नावाची नोंद आहे. विवाहानंतर आधारकार्ड आणि पॅनकार्डवरील नाव बदलल्याने शालार्थमधील नोंद आणि आधारवरील नावात तफावत निर्माण झाली आहे. त्यामुळे शालार्थ ई-केवायसीसाठी दोन महिन्यांची मुदतवाढ द्या, अशी मागणी करण्यात आली. निवेदन देताना विभागीय सचिव खिमेश बढिये, शहर संघटक समीर काळे, काँग्रेस शिक्षक सेलचे विभागीय अध्यक्ष प्रकाश भोयर यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित यंत्रांसाठी निधीची कमतरता पडू देणार नाही – पालकमंत्री

## मेयोतील हीरक महोत्सवी वर्षाचा प्रारंभ



रुग्ण व त्याच्या नातेवाईकासोबत पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अधिष्ठाता डॉ. रवी चव्हाण आणि इतर.

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नागपूर :** ग्रामीण भागातील गोरगरिबांसह शहरी भागातील सर्वसामान्य नागरिकांना उपचारांसाठी जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. मेयोच्या हीरक महोत्सवी वर्षात कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित अत्याधुनिक सेवा-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाकडून निधीची कमतरता पडू देणार नाही, अशी ग्वाही पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या (मेयो) हिरक महोत्सवी वर्षाच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमाला अधिष्ठाता डॉ. रवी चव्हाण, डॉ. सतीश देवपुजारी, डॉ. भावना सोनवणे, डॉ. राजीव खंडेलवाल, माजी आमदार डॉ. मिलिंद माने यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

नागपूरच्या वैद्यकीय क्षेत्राच्या ऐतिहासिक वाटचालीत मेयोचे मोठे योगदान आहे. ग्रामीण तसेच शहरी भागातील अनेक कुटुंबांसाठी मेयोने आरोग्यसेवेचे महत्त्वाचे केंद्र म्हणून भूमिका बजावली आहे. येथील कुशल डॉक्टरांनी गंभीर आजारांशी झुंजणाऱ्या अनेक रुग्णांना उपचार देत त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवले आहे. मेयोच्या हिरक महोत्सवी वर्षाचा टप्पा हा संस्थेने आरोग्य क्षेत्रात बजावलेल्या कर्तव्यपूर्तीचा गौरव असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. यावेळी त्यांनी अधिष्ठाता डॉ. रवी चव्हाण यांच्या कार्यशैलीचे कौतुक केले.

हीरक महोत्सवी वर्षाच्या प्रारंभानिमित्त मेयोमध्ये डिजिटल मॅमोग्राफी आणि पेन क्लिनिक सुरू करण्यात आले. तसेच केंद्रीय वैद्यकीय प्रयोगशाळेतील तपासणीचे अहवाल रुग्णांना त्यांच्या मोबाइलवर उपलब्ध करून देणाऱ्या अर्जाचा शुभारंभही बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ. रवी चव्हाण यांनी तर संचालन डॉ. गोपाल अग्रवाल यांनी केले.

# 'फ्लाय ॲशची योग्य विल्हेवाट का नाही?'

## केंद्र, राज्य सरकारसह जिल्हाधिकाऱ्यांना न्यायालयाकडून नोटीस

लोकसत्ता प्रतिनिधी

**नागपूर :** खापरखेडा औष्णिक वीज केंद्रातून निर्माण होणाऱ्या फ्लाय ॲशची नांदगाव येथील राख साठवण बंधाऱ्यात शास्त्रीय निकषांचे पालन न करता विल्हेवाट लावली जात असल्याच्या प्रकरणाची मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने गंभीर दखल घेतली. न्यायालयाने याप्रकरणी केंद्र, राज्य सरकारसह जिल्हाधिकारी, महाजेनको, प्रदूषण नियंत्रण मंडळाला नोटीस बजावत दोन आठवड्यात भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश दिले.

न्या. अनिल किलोर व न्या. राज वाकोडे यांच्या खंडपीठाने एका वृत्ताच्या आधारावर याचिका दाखल करण्याचे निर्देश दिले. नांदगाव येथील सुमारे ७२३ एकरांवरील राख साठवण बंधाऱ्याचा महाजेनकोने पुन्हा फ्लाय ॲश टाकण्यासाठी वापर सुरू केला. यापूर्वी २०२१ मध्येही या बंधाऱ्यात फ्लाय ॲश टाकल्यानंतर परिसरातील शेतीचे नुकसान झाल्याने तीव्र विरोध झाला. त्यानंतर राख टाकणे थांबवण्यात आले होते. आता पुन्हा शास्त्रीय पद्धतीने अस्तर (लायनिंग) व 'लगून'ची व्यवस्था न करता फ्लाय ॲश टाकण्यात येत असल्याचा दावा केला जात आहे. त्यामुळे राख शेजारच्या शेतात पसरली होती. ॲड. अर्णव पानसरे यांनी न्यायालयीन मित्र म्हणून बाजू मांडली. याचिकेवर पुढील सुनावणी ३१ ऑगस्ट रोजी होणार आहे.

# रेल्वेस्थानक परिसरात गळफास घेऊन आत्महत्या

**नागपूर :** नागपूर रेल्वेस्थानक परिसरातील मेट्रो स्थानकाजवळ एका अनोळखी व्यक्तीने शर्टच्या सहाय्याने झाडाला गळफास घेतल्याची घटना शुक्रवारी सायंकाळी घडली. माहिती मिळताच लोहमार्ग पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. मृताची ओळख अद्याप पटलेली नाही. प्राथमिक माहितीनुसार, तो बेघर असल्याचा अंदाज आहे. मृत्यूचे नेमके कारण आणि वेळ शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार आहे. पुढील तपास सुरू आहे.

# शहर काँग्रेस कार्यकारिणी लवकरच

**नागपूर :** शहर काँग्रेसच्या नव्या कार्यकारिणीचे गठन लवकरच करण्यात येणार असून, त्यामध्ये ५५ पदाधिकाऱ्यांचा समावेश करण्यात येणार आहे. प्रत्येक विधानसभा मतदारसंघाला संघटनात्मक प्रतिनिधित्व देताना महिलांनाही स्थान देण्यात येणार असल्याची माहिती शहर काँग्रेसचे अध्यक्ष प्रफुल्ल गुडधे यांनी दिली.

देवडिया काँग्रेस भवन येथे शुक्रवारी शहर काँग्रेस कार्यकारिणीची बैठक गुडधे यांच्या नेतृत्वाखाली झाली. या बैठकीत नव्या कार्यकारिणीच्या रचनेबाबत माहिती देण्यात आली. नव्या कार्यकारिणीत प्रत्येक विधानसभा मतदारसंघातून दोन महिलांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नव्या कार्यकारिणीसाठी शहर काँग्रेसकडून विधानसभा मतदारसंघातील काँग्रेस नेत्यांना पत्र देऊन पदाधिकाऱ्यांच्या नावांची मागणी करण्यात आली आहे. सर्व नावे प्राप्त झाल्यानंतर अंतिम यादी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसकडे पाठवण्यात येणार असल्याचे गुडधे यांनी सांगितले.







महाराष्ट्र ग्रामीण बँक
MAHARASHTRA GRAMIN BANK
शासकीय मालकीची शेड्युल्ड बँक Scheduled Bank Owned by Government

मागणी सूचना

मुख्य कार्यालय : प्लॉट क्र. ४२, गट क्र. ३३,(भाग), गोलवाडी गाव, ग्रोथ सेंटर, वाळूज महानगर -IV, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३११३६
क्षेत्रीय कार्यालय : चंद्रपूर

निम्न स्वाक्षरीकर्ता, सेक्युरिटायझेन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ उक्त कायदा नियम १३/२, अंतर्गत प्राधिकृत अधिकारी / क्षेत्रीय व्यवस्थापक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, **क्षेत्रीय कार्यालय, चंद्रपूर - शाखा चंद्रपूर** चे असून थकीत कर्ज ज्या कर्जदाराचे नावे आहे त्यांची नावे खालील सारणीत दिलेली आहेत. तसेच गहाण ठेवण्यात आलेल्या मालमत्तेचा तपशिलही देण्यात आलेला आहे. तारणदारांनी सदर मालमत्ता गहाण ठेवलेली असून संबंधीत कर्जदाराला, जामीन देणाऱ्या जामीनदाराची नावे सारणीत दिलेली आहेत. कर्जदार यांनी मंजूरीच्या अटीचे पालन न केल्याने तुमचे खाते अनियमित झालेले आहे. आर.बी.आय. च्या मार्गदर्शक तत्वानुसार त्यांचे अकार्यक्षम खाते म्हणून वर्गीकरण करण्यात आलेले आहे. खाते अकार्यक्षम झाल्याचा दिनांक तसेच मागणी सूचना जारी केल्याचा दिनांक खालील सारणीत दर्शविण्यात आलेला आहे. निर्देशित अदत्त रक्कम ज्या तारखेपर्यंत व्याजासह येणे बाकी व्याज अधिक शुल्क अधिभार इ. खालील रक्कमेचा भरणा करावा अन्यथा खालील सुरक्षा मालमत्ता बाबत अधोहस्ताक्षरित हे योग्य कारवाई करु शकतील.

| कर्जदाराचे नाव, पत्ता व कर्ज खाते क्र. | जामीनदाराचे नाव व पत्ता | मागणी सूचनेचा दिनांक | अदत्त रक्कम रुपये | चल/अचल मालमत्तेचे चतु:सिमेसह विवरण | शाखा |
|---|---|---|---|---|---|
| **श्रीमती शिवकुमारी हरिद्वार मराहू (कर्जदार)** महाकाली क्वार्टर माइन्स, क्वार्टर क्र.एम-८, चांदा फोर्ट रेल्वे स्टेशन जवळ, बाबूपेठ, चंद्रपूर, ता. चंद्रपूर, जि. चंद्रपूर, महाराष्ट्र - ४४२४०३. कर्ज खाते क्र. : ६६८०१००४३४६ | **श्री विजय बालाजी कन्नाके (जामीनदार)** महाकाली क्वार्टर माइन्स, क्वार्टर क्र. M-६, चांदा फोर्ट रेल्वे स्टेशन जवळ, बाबूपेठ, चंद्रपूर, ता. चंद्रपूर, जि. चंद्रपूर, महाराष्ट्र - ४४२४०३. | २२.०७.२०२६ | रु. २,८०,७०८.५३/- तसेच URI रु. ५,७०३/-, तसेच ०१-०३-२०२६ पासून लागू न केलेले व्याज ९.७५% प्रति वर्ष व दंडात्मक व्याज २% | माधव टॉवर' मधील फ्लॅट क्र.GF-१०, तळमजल्यावर स्थित, ज्यास ३०.०० चौ. मी. अविभाज्य जमीन हिस्सा व ६८.९३ चौ. मी. बांधकाम क्षेत्र असून, एकूण २७०१.४८ चौ.मी.क्षेत्रफळाच्या डायव्हर्टेड सर्व्हे क्र. ६२/१-बी मधील लेआऊट प्लॉट क्र.१, २, ३, ६, ७, ८, ९ व १० मधून, मौजा दाताळा, ता. व जि. चंद्रपूर, तलाठी सजा क्र.०७ येथे स्थित आहे. लेआऊट प्लॉट क्र. १, २, ३ व ६ ते १० यांच्या सीमा : पूर्व : ९ मीटर रस्ता, पश्चिम : ३० मीटर डी.पी. रस्ता, उत्तर : सर्व्हे क्र.६२/२ ची जमीन, दक्षिण : ९ मीटर लेआऊट रस्ता फ्लॅट क्र. GF-१० च्या सीमा : पूर्व : पॅसेज, पश्चिम : पार्किंग, उत्तर : फ्लॅट क्र. GF-०९, दक्षिण : फ्लॅट क्र. GF-११ | चंद्रपूर शाखा (शाखा कोड ६८०१) |

उपरोक्त कर्जदार यांना सूचित करण्यांत येते की, प्राधिकृत अधिकारी सरफेसी कायद्याच्या तरतुदीनुसार ( SARFAESI ACT 2002) तारण मालमत्ता / संरक्षित संपत्तीचा ताबा घेऊन सदरील मालमत्ता लिलावाद्वारे विक्रीस काढतील तसेच जर नोटीसच्या तारखेपासून ६० दिवसांचे आत उपरोक्त थकबाकी न फेडल्यास बँकेस असलेल्या कायदेशीर अधिकाराचा वापर करुन कोणतीही पुर्वसूचना न देता कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. सरफेसी कायदा कलम १३ (१३) नुसार तुम्हास तारण मालमत्ता हस्तांतरण, विक्री करण्यास अथवा लीजवर देण्यास मनाई आहे.

ठिकाण : चंद्रपूर
दिनांक : १४.०८.२०२६

(टीप - स्वैर भाषांतर, तफावत पडल्यास मूळ इंग्रजी ग्राह्य)

प्राधिकृत अधिकारी / क्षेत्रीय व्यवस्थापक
महाराष्ट्र ग्रामीण बँक,
क्षेत्रीय कार्यालय : चंद्रपूर

नागपूर दिनांक
WWW.LOKSATTA.COM लोकसत्ता

## संक्षिप्त

### विश्वकेसरीतर्फे गीतगायन स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा



**नागपूर :** विश्वकेसरी फाउंडेशनतर्फे आयोजित आंतरशालेय एकल गीतगायन स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण सोहळा साई सभागृह, शंकर नगर येथे उत्साहात झाला. नागपूरचे गायक, तबलावादक, गुरू व कवी स्वरचैतन्य डॉ. मिलिंद इंदूरकर आणि आशिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नाव नोंदवलेल्या स्वरसाधिका प्रा. दीपश्री पाटील प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. बालकलाकारांना साथसंगत करणारे वादक आर्य पुरणकर, राहुल मानेकर, अनिकेत दहेकर, नंदू गोहणे व प्रमोद बावणे तसेच निवेदिका प्राची भट मुळे यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. स्पर्धेचे परीक्षक गायक मुकुल पांडे व श्रुती चौधरी यांचा सत्कार करण्यात आला. गट 'अ'मध्ये स्वरदा जावळे हिने प्रथम, इतिशा पाठे हिने द्वितीय, तर अन्वी गिजरे हिने तृतीय क्रमांक पटकावला. गट 'ब'मध्ये भरत मानेगावकर प्रथम, अजिंक्य देशमुख द्वितीय, तर सई पायघन आणि माधव मुळे यांनी विभागून तृतीय क्रमांक मिळवला. विश्वकेसरी फाऊंडेशनचे अध्यक्ष भूषण पांढरे, सचिव सीए श्रेयस इंदूरकर आणि कोषाध्यक्ष अभिमन्यू जोग यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना व शाळांना पारितोषिके देण्यात आली.

### निहारिकाला कराटेत सुवर्ण, कांस्यपदक



**नवी दिल्ली** येथील तालकटोरा इनडोअर स्टेडियममध्ये ७ ते ९ ऑगस्टदरम्यान झालेल्या ऑल इंडिया इंडिपेंडन्स कप कराटे चॅम्पियनशिपमध्ये निहारिका कृणाल मत्ते हिने वैयक्तिक काता प्रकारात सुवर्णपदक, तर कुमिते प्रकारात कांस्यपदक पटकावले. तिने सात वर्षे वयोगटात हे यश मिळवले. सेईको काई कराटे इंटरनॅशनल इंडिया आणि भारत कराटे अ‍ॅकेडमीतर्फे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत देशभरातील कराटेपटूंनी सहभाग घेतला. निहारिका ही माउंट लिटरा झी स्कूलमध्ये इयत्ता दुसरीची विद्यार्थिनी असून, ती मागील दोन वर्षांपासून गौरा डोजो येथे कराटेचे प्रशिक्षण घेत आहे. तिने आपल्या यशाचे श्रेय आई-वडील आणि प्रशिक्षक सचिन लोहकरे यांना दिले.

### इंद्रधनूतर्फे गुणवंत अपंग विद्यार्थ्यांचा सत्कार



**इंद्रधनू विकलांग** सेवा संस्थेतर्फे दहावी व बारावीतील गुणवंत अपंग विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा प्रार्थना सभागृह, शांतीनिकेतन कॉलनी येथे झाला. विविध दिव्यांग शाळांतील सुमारे ६० विद्यार्थी कार्यक्रमाला उपस्थित होते. डायबेटॉलॉजिस्ट डॉ. संकेत पेंडसे अध्यक्षस्थानी, तर बँक ऑफ महाराष्ट्र सेवानिवृत्त कर्मचारी संघटना, नागपूर क्षेत्राचे सचिव अजय गजानन सायगावकर विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. गणित विषयात सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्याला नलिनी देशकर यांच्या मातोश्रींतर्फे, तर विज्ञान विषयात सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्याला श्रुती कर्हु यांच्यातर्फे आर्थिक पारितोषिक देण्यात आले.

### डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांना पुरस्कार जाहीर



**नागपूर :** वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्थेचे (अभिमत विद्यापीठ) मुख्य सल्लागार, इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ ग्लोबल नेटवर्क फॉर मेडिकल, हेल्थ प्रोफेशन्स अँड बायोएथिक्स एज्युकेशनचे सरचिटणीस आणि असोसिएशन ऑफ मेडिकल एज्युकेटर्स ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांना प्रतिष्ठेचा 'पीकॉक मेडिकल एज्युकेशन एक्सलन्स अवॉर्ड-२०२६' प्रदान करण्यात येणार आहे. गेल्या तीन दशकांहून अधिक काळ डॉ. मिश्रा यांनी वैद्यकीय शिक्षण आणि वैद्यकीय व्यवसायाच्या विकासासाठी केलेल्या समर्पित कार्याची दखल घेत हा पुरस्कार देण्यात येत आहे.

# महामेट्रोसाठी पुन्हा वृक्षतोड

## वाहनतळासाठी अजनी परिसरातील हिरवळीवर कुऱ्हाड

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** विकासकामांसाठी झाडे तोडायची आणि त्याच्या बदल्यात रोपे लावायची, हे नागपूरच्या विकासाचे नवे समीकरण ठरत असताना आता अजनीतील 'नीरी'च्या हिरवळीचीही त्यात भर पडली. अजनी मेट्रो स्थानकापासून अवघ्या २०० मीटर अंतरावर असलेल्या नीरीच्या परिसरातील मोठ्या हिरवळीवर वाहनतळासाठी कुऱ्हाड चालवली जात आहे. पक्ष्यांच्या अधिवासासाठी ओळखल्या जाणाऱ्या या परिसरातील वृक्षतोड सुरू झाल्यानंतर तब्बल १२ फूट उंचीचे टिनाचे कुंपण उभारून वृक्षतोडीची कारवाई नजरेआड करण्यात आली.

नीरीकडून ही जागा अधिकृतरित्या महामेट्रो प्रशासनाकडे हस्तांतरित करण्यात आली. त्यानंतर झाडे तोडण्यासाठी महापालिकेकडे परवानगी मागण्यात आली. महापालिकेच्या वृक्षतोड नोंदीतही अजनी चौकातील नीरी परिसरात महामेट्रो प्रकल्पासाठी २४९ झाडे तोडण्याचा प्रस्ताव यापूर्वी नोंदवण्यात आला होता. अजनी परिसरात ही वृक्षतोड करण्यात आली, त्यावर जवळपास सर्वच प्रकारचे पक्षी वास्तव्यास होते. मात्र, वृक्षतोडीने या पक्ष्यांचा अधिवास हिरावला गेल्याचे परिसरातील नागरिक सांगत आहेत.



### 'आधी सहा हजार झाडे लावली'

नीरीच्या जागेवर वृक्षतोड करण्यापूर्वी महापालिकेची अधिकृत परवानगी घेण्यात आली. नियमानुसार सहा हजार झाडांची लागवड करण्यात आल्याचे महामेट्रो प्रशासनाकडून सांगण्यात आले. त्यानंतरच वृक्षतोड करण्यात आली. मात्र, या जागेवर नेमके वाहनतळच उभारले जाणार आहे की अन्य कोणते बांधकाम केले जाणार, याबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही, असे अखिलेश हळवे, वरिष्ठ संचालक (कॉर्पोरेट कम्युनिकेशन्स), महामेट्रो नागपूर प्रशासन यांनी सांगितले.



### 'वृक्षतोडीची भरपाई दूरवर वृक्षलागवडीतून होऊच शकत नाही'

एखाद्या परिसरातील मोठ्या संख्येने वृक्ष तोडून त्याच्या बदल्यात दूरच्या ठिकाणी भरपाई वृक्षलागवड करणे हा त्या परिसरातील नागरिकांसाठी पर्यावरणीय हानीची भरपाई ठरू शकत नाही. त्यामुळे भविष्यात वृक्षतोडीस परवानगी देताना शक्यतो त्याच परिसरात किंवा लगतच्या परिसरातच पर्यायी वृक्षारोपण करण्यात यावे, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने महापालिकेला दिले.

खामला येथील 'लंडन स्ट्रीट' परिसरातील मोठ्या प्रमाणातील वृक्षतोडीच्या मुद्द्यावर न्यायालयाने स्वतःहून जनहित याचिका दाखल केली होती. न्या. अनिल किलोर आणि न्या. राज वाकोडे यांच्या खंडपीठाने ही याचिका निकाली काढताना भविष्यातील वृक्षतोडीच्या परवानग्यांसाठी भरपाई वृक्षलागवडीबाबत महत्त्वपूर्ण निर्देश दिले. 'भरपाई' या शब्दाचा अर्थ झालेली हानी भरून काढणे असा होतो. त्यामुळे 'भरपाई वृक्षलागवड' ही संकल्पना केवळ तोडलेल्या वृक्षांच्या संख्येइतकी वृक्षे अन्यत्र लावण्यापुरती मर्यादित ठेवता येणार नाही. त्याअनुषंगाने अशी वृक्षलागवड शक्यतो त्याच ठिकाणी



किंवा त्याला लागून असलेल्या अथवा जवळच्या परिसरात करणे आवश्यक आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

### ...तोपर्यंत एकही वृक्ष तोडू नये



या प्रकरणात संबंधित विकासकाने प्लॉट क्रमांक ५ आणि ४ साठी आवश्यक भरपाई वृक्षलागवड पूर्ण केल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. मात्र, प्लॉट क्रमांक ३ साठी आवश्यक असलेल्या ४ हजार ८८ झाडांपैकी आणखी २ हजार ५६७ झाडे लावणे बाकी असल्याने त्यासाठीची प्रक्रिया त्यानंतरच करता येईल, असे आदेशात नमूद केले. तसेच पर्यावरणीय मंजुरी मिळेपर्यंत प्लॉट क्रमांक ३ मधील एकही वृक्ष तोडू नये, असेही न्यायालयाने महापालिकेला निर्देश दिले.

नागपुरात विकासकामांसाठी वृक्षतोडीची ही प्रक्रिया नवी नाही. महामेट्रोच्या पहिल्या टप्प्यात विविध पायाभूत सुविधांसाठी २ हजार ६१८ झाडे तोडण्यात आली असून त्या मोबदल्यात १६ हजार ४४७ झाडांची लागवड करण्यात आल्याचे माहिती अधिकारामधून समोर आली. रेशीमबाग मैदान, सीताबर्डीतील महाज्योती भवन, मानकापूर येथील स्पोर्ट्स हब तसेच सिव्हिल लाइन्समधील शासकीय इमारतींसाठीही वृक्षतोडीचे प्रस्ताव महापालिकेच्या नोंदीत आहेत.

नागपूरला 'हरित शहर' करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवडीची घोषणा होत असतानाच दुसरीकडे शहरातील जुन्या आणि मोठ्या वृक्षांवर विकासकामांच्या नावाखाली कुऱ्हाड चालत आहे.

जूनमध्ये शहरातील सुमारे पाच हजार वृक्षांचे आरोग्य आणि संवर्धनाच्या दृष्टीने 'एआय' आणि 'लिडार' तंत्रज्ञानाद्वारे सर्वेक्षण सुरू करण्यात आले. त्यामुळे एका बाजूला वृक्षांचे वैज्ञानिक संवर्धन आणि दुसऱ्या बाजूला विकासासाठी त्यांची तोड, अशी विसंगत स्थिती नागपुरात दिसत आहे.

# डॉ. प्रधान, कुलकर्णी यांना राष्ट्रपती पोलीस पदक

## नागपुरातील अधिकारी, कर्मचाऱ्यांचा गौरव



विश्वास नांगरे पाटील | डॉ. दिगंबर प्रधान | प्रशांत कुळकर्णी | प्रदीप चौगावकर | वैभव जाधव | विजय माहुलकर

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर जाहीर करण्यात आलेल्या राष्ट्रपती पोलीस आणि भारत सरकार यांच्या पदकांच्या यादीत नागपूरसह विदर्भाचा ठसा उमटला. नागपूर येथे कार्यरत असलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी राष्ट्रपदी व इतर पोलीस पदक जाहीर झाले. राष्ट्रपती पदकांमध्ये डॉ. दिगंबर प्रधान, प्रशांत कुलकर्णी, प्रदीप चौगावकर, वैभव जाधव आणि राजकुमार जनबंधू यांचा समावेश आहे. तर केंद्र सरकारच्या अति-उत्कृष्ट सेवा पदक विजेत्यांमध्ये विश्वास नांगरे पाटील, विजय माहुलकर यांचा समावेश आहे.

राष्ट्रपती पदकविजेत्यांमध्ये डॉ. दिगंबर पांडुरंग प्रधान हे पोलीस अधीक्षक असून नागपूर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागात कार्यरत आहेत. प्रशांत राधाकृष्ण कुलकर्णी हे पोलीस उपअधीक्षक असून पोलीस प्रशिक्षण केंद्र, नागपूर येथे उपप्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. पोलीस प्रशिक्षण केंद्र, नागपूर येथील पोलीस निरीक्षक प्रदीप वसंतराव चौगावकर, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा) वैभव जाधव, आणि नागपूर शहर पोलीस दलातील हवालदार राजकुमार यादव जनबंधू यांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठीचे राष्ट्रपती पोलीस पदक जाहीर झाले आहे. तर भारत सरकारच्या गृह खात्याकडून दिल्या जाणाऱ्या अति-उत्कृष्ट सेवा पदक विजेत्यांमध्ये नागपूरचे पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील आणि विजय माहुलकर यांचा समावेश आहे. माहुलकर हे लाचलुचपत प्रतिबंध विभागात अतिरिक्त पोलीस अधीक्षक पदावर कार्यरत आहेत. या पदकांमुळे नागपूर पोलीस प्रशिक्षण केंद्र, शहर पोलीस दल पोलीस सेवेला मिळालेला हा सन्मान महत्त्वाचा आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाने स्वातंत्र्यदिनानिमित्त पदकांची घोषणा केली आहे.



### वंदे मातरम्...!

अखंड भारत संकल्प दिनानिमित्त राष्ट्रजागृती प्रतिष्ठानतर्फे शुक्रवारी आयोजित सामूहिक वंदे मातरम गायन सोहळ्यात ५ हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. महाल परिसरातील लाकडी पूल चौकात एकसुरात गायन करीत विद्यार्थ्यांनी राष्ट्रभक्तीचा जागर केला.

# 'नागरिकांचा सल्ला घेऊन पाणी साचण्याच्या समस्येवर तोडगा काढा'

## उच्च न्यायालयाकडून महापालिकेला सूचना

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** शहरातील पाणी साचण्याच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी नागरिक सहकार्य करण्यासाठी तयार आहेत. नागरिकांच्या सूचनांचा सकारात्मक विचार करून समस्येवर तोडगा काढण्याचे प्रयत्न करावे, अशा सूचना न्यायालयाने महापालिकेला केल्या. नागरिकांच्या सूचनांचा प्रस्ताव तयार करून १८ ऑगस्टपर्यंत सादर करण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले.

जनमंचच्यावतीने सिमेंट रस्त्यांच्या दुरवस्थेवर जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. याचिकेवर न्या. उर्मिला जोशी-फाळके आणि न्या. राज वाकोडे यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान, याचिकाकर्त्यांने महापालिकेच्या उपाययोजना सुरू केल्याच्या दाव्याबाबत प्रतिशपथत्र दाखल केले. शहरात विविध ठिकाणी पाणी साचण्याच्या समस्येमागील खऱ्या प्रश्नांना सोडवण्याऐवजी महापालिका अनावश्यक कामांकडे अधिक लक्ष देत आहे, असा आरोप याचिकाकर्त्यांनी उच्च न्यायालयात केला. महापालिकेने याला प्रत्युत्तर देताना सल्लागार नेमणार असल्याचे सांगितले. तुम्ही तज्ज्ञांचा सल्ला घ्या, आम्ही थांबवत नाही, मात्र नागरिकांकडून काही सूचना येत असतील तर त्यांचाही विचार करा, असे न्यायालय म्हणाले. न्यायालयाने याचिकाकर्त्याला याबाबत प्रस्ताव तयार करून न्यायालयासमक्ष सादर करण्याचे निर्देश दिले. यानंतर महापालिका यावर सकारात्मक विचार करेल, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

### वनरक्षकांच्या निवासस्थानांच्या दुरवस्थेवर प्रश्नचिन्ह

इंदोरा परिसरात वनरक्षकांच्या निवासस्थानाच्या दुरवस्थेवर न्यायालयाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले. सात इमारतीतील ३५ क्वार्टरसाठी केवळ एक पाण्याचा नळ असणे फारच वाईट स्थिती दाखवते, असे न्यायालय म्हणाले. वनविभागाने वर्षभरापूर्वी नूतनीकरणासाठी प्रस्ताव तयार केला होता. मात्र, सातपैकी केवळ एका इमारतीसाठी तीन कोटी रुपये मंजूर करण्यात आले. न्यायालयाने याबाबत उर्वरित सहा इमारतीला कधी निधी देणार, असा प्रश्न उपस्थित केला.

# खरगे यांच्या सभेनंतर शुद्धीकरण, काँग्रेसकडून निषेध

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**नागपूर :** काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या उत्तराखंडमधील हल्द्वानी येथील सभेनंतर त्या ठिकाणी भाजपच्या कार्यकर्त्यांनी गंगाजलाने शुद्धीकरण केल्याच्या घटनेचा निषेध करण्यासाठी शहर व ग्रामीण काँग्रेसच्यावतीने शुक्रवारी संविधान चौकात आंदोलन करण्यात आले.

शहर काँग्रेसचे अध्यक्ष प्रफुल्ल गुडधे आणि नागपूर ग्रामीण जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अश्विन बैस यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ हे आंदोलन करण्यात आले. यावेळी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घटनेचा निषेध नोंदवत घोषणा दिल्या. यावेळी माजी मंत्री सुनील केदार, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, प्रदेश पदाधिकारी गिरीश पांडव, बंडोपंत टेंभुर्णे, माजी नगर झोन सभापती आसिफ शेख, संदेश सिंगलकर, विजय सरटकर आणि कुंदा राऊत यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# 'मराठा-कुणबीकरणा'विरोधात ओबीसी मुक्ती मोर्चा पुन्हा न्यायालयात

**नागपूर :** मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेमुळे ओबीसींच्या आरक्षणाच्या हक्कांवर परिणाम होण्याची शक्यता असून, सरकारकडून सुरू असलेले 'मराठा-कुणबीकरण' ओबीसींच्या घटनात्मक चौकटीला बाधक आहे. या विरोधात राष्ट्रीय ओबीसी मुक्ती मोर्चाच्यावतीने न्यायालयात नव्याने दाद मागण्यात येणार असल्याची माहिती मोर्चाचे मुख्य संयोजक नितीन चौधरी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मोठ्या प्रमाणावर कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप झाल्यास लहान ओबीसी जातींच्या आरक्षणासह राजकीय व सामाजिक प्रतिनिधित्वावर परिणाम होण्याची भीती चौधरी यांनी व्यक्त केली. ओबीसींच्या हक्कांच्या संरक्षणासाठी मोर्चा नव्या मुद्द्यांसह न्यायालयात जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पत्रकार परिषदेला भूषण दडवे, गीताताई महाले, प्रभाकर फुलबांधे, गुणवंत देशकर आणि वासुदेवराव महाले उपस्थित होते.

# महापालिकेच्या प्रकल्पांना एमएसआयडीसीच्या कुबड्या!

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** महापालिका यशवंत स्टेडियम, मस्कासाथ बाजार, सक्करदरा बुधवार बाजार, इतवारी सराफा बाजार, दही बाजार, डिक दवाखाना, कॉटन मार्केट, संत्रा मार्केट, नेताजी मार्केट बांधणार आहे. महापालिका या दहा प्रकल्पांची कामे महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाला (एमएसआयडीसी) देणार आहे. यासाठी प्रकल्प व्यवस्थापन शुल्क म्हणून महापालिकेकडून एमएसआयडीसीला प्रकल्पाच्या किमतीची ५ टक्के रक्कम दिली जाणार आहे. त्यामुळे महापालिकेतील मुख्य अभियंत्यांपासून तज्ज्ञ अधिकाऱ्यांच्या कामावर प्रश्न निर्माण झाले आहे.

महापालिकेचे १० प्रकल्प एमएसआयडीसी बांधणार असून याबाबत सामंजस्य कराराचा प्रस्ताव येत्या महापालिकेच्या सभेत मंजुरीसाठी येणार आहे. एमएसआयडीसीने महापालिकेच्या जागांवर व्यावसायिक प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.

महापालिकेच्या जागेवरील प्रकल्प 'डिझाईन, बिल्ड, फायनन्स, ऑपरेट, सेल' या तत्त्वावर विकसित केले जाणार आहे. राज्य शासनाकडून महापालिकेला मिळालेल्या जागा ३० वर्षांसाठी भाडेपट्ट्याने देण्यात येणार आहे. या दहाही प्रकल्पांसाठी लागणाऱ्या एकूण प्रकल्प खर्चापैकी ५ टक्के रक्कम एमएसआयडीसीला देण्यात येणार आहे. दोन वर्षांपूर्वीच २०२४ मध्येच सामंजस्य करार करण्याबाबत एका बैठकीत चर्चा झाली होती. परंतु तेव्हापासून प्रकरण रखडले होते. आता येत्या २० ऑगस्टला होणाऱ्या महापालिकेच्या सभेत सामंजस्य करार करण्यास मंजुरीचा प्रस्ताव येणार आहे.

महापालिकेत मुख्य अभियंत्यांपासून अधीक्षक, कार्यकारी, उपअभियंता, कनिष्ठ अभियंते आहेत. परंतु प्रकल्प पूर्ण करण्याच्या त्यांच्या क्षमतेवर विश्वास न करता महापालिकेने तीन वर्षांपूर्वी अस्तित्वात आलेल्या एमएसआयडीसीवर जबाबदारी दिल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

**महापालिकेने दहा प्रकल्पांसाठी एजन्सीची नियुक्ती केली आहे. या एजन्सीला प्रकल्प किमतीच्या ५ टक्के रक्कम महापालिकेकडून दिली जाणार आहे.**

### दुकानदारांच्या तात्पुरत्या व्यवस्थापनाची जबाबदारी




यशवंत स्टेडियम विकास प्रकल्प, सक्करदरा बुधवार बाजार, इतवारी सराफा बाजार आणि मस्कासाथ बाजारात एकूण २०४ ओटे आहेत. येथे लहान दुकानदारांनी आपली दुकाने थाटली आहेत. या सर्व दुकानदारांच्या तात्पुरत्या व्यवस्थापनाची जबाबदारीही एमएसआयडीसीला देण्यात येणार आहे. यशवंत स्टेडियम येथे ११५, मस्कासाथ बाजारात ३४, इतवारी सराफा बाजारात ५५ जागा दुकानदारांना देण्यात आल्या आहेत.

# ब्लिंकिट, बिग बास्केट, जिओमार्टच्या गोदामांवर एफडीएचे छापे

## आठपैकी सहा ठिकाणी नियमभंग

**नागपूर :** ऑनलाइन विक्री व्यवस्थेवर अन्न व औषध प्रशासनाच्या अन्न शाखेने धडक कारवाई केली. ब्लिंकिट, बिग बास्केट आणि जिओमार्टच्या आठ गोदामांची गुरुवारी रात्री उशिरापर्यंत तपासणी करण्यात आली. त्यापैकी सहा ठिकाणी अन्नसुरक्षा नियमांचे पालन होत नसल्याचे आढळल्याने सुधारणा नोटीस बजावण्यात आल्या.

ऑनलाइन मागणी पूर्ण करण्यासाठी या कंपन्यांकडून शहरात लहान-मोठ्या गोदामांचे जाळे उभारले गेले आहे. अन्न शाखेने या गोदामांची तपासणी केली. तपासणीत खाद्यपदार्थांची अयोग्य साठवणूक, गोदामातील अस्वच्छता, कच्चे व तयार पदार्थ योग्यरीत्या वेगळे न ठेवणे, काही वस्तू थेट जमिनीवर ठेवणे, तापमान नियंत्रणाच्या नियमांकडे दुर्लक्ष, कीटकनियंत्रणाची अपुरी व्यवस्था तसेच मुदतबाह्य किंवा खराब वस्तूंची योग्य छाननी न करणे यांसारख्या त्रुटींपैकी एक किंवा अनेक बाबी आढळल्याचे सांगण्यात आले.

# घाऊक महागाई घटून ९.७८ टक्क्यांवर

पीटीआय, नवी दिल्ली



**इंधन आणि** खाद्यपदार्थांच्या किमती कमी झाल्यामुळे, घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई जुलै महिन्यात ९.७८ टक्क्यांवर नोंदवली गेल्याचे शुक्रवारी जाहीर झालेल्या आकडेवारीने स्पष्ट केले. सलग नऊ महिने चढत्या भाजणीने वाढीनंतर, महागाईत घट होण्याची ही पहिलीच वेळ आहे.

सरलेल्या वर्षातील ऑक्टोबर २०२५ नंतर घाऊक महागाई दरात पहिल्यांदाच घसरण झाली आहे. प्राथमिक वस्तू आणि उत्पादित वस्तूंच्या महागाईत वाढ होऊनही, इंधन आणि ऊर्जा घटकांच्या किमती कमी झाल्यामुळे जुलैच्या आकडेवारीत ही घसरण प्रामुख्याने दिसून आली आहे. आधीच्या महिन्यांत म्हणजेच जूनमध्ये घाऊक महागाईचा दर ९.८७ टक्क्यांवर होता.

विविध गटांचा विचार करता, इंधन आणि ऊर्जा क्षेत्रातील किमतवाढ जूनमधील २७.४१ टक्क्यांवरून, जुलैमध्ये २०.०५ टक्क्यांपर्यंत खाली आली. खाद्यपदार्थांच्या महागाईतील किरकोळ घट होऊन ती जूनमधील ५.४९ टक्क्यांवरून, जुलैमध्ये ५.४४ टक्क्यांवर आली. मात्र, उत्पादित वस्तूंच्या महागाईत वाढ दिसून आली; ती जूनमधील ७.४८ टक्क्यांवरून जुलैमध्ये८.२९ टक्क्यांवर पोहोचली, अशी माहिती शुक्रवारी केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने दिली.

येत्या काही वर्षात घाऊक महागाई दराची जागा 'आउटपुट प्रोड्युसर प्राइस इंडेक्स' (पीपीआय) घेणार आहे. तो जुलैमध्ये ९.६ टक्के (वार्षिक आधारावर) या पातळीवर स्थिर राहिला. 'पीपीआय'मध्ये उत्पादन आणि खाणकाम क्षेत्रातील महागाई कमी झाली असली, तरी कृषी आणि वीज क्षेत्रातील वाढीव 'पीपीआय'मुळे ती घट भरून निघाली.

घाऊक महागाईचा कल बदलला आहे आणि जागतिक किमतींनी उच्चांक गाठल्यासारखे वाटत असल्याने आगामी महिन्यांत घाऊक महागाई दर कमी होण्याची शक्यता आहे, असे बार्कलेजच्या संशोधन अहवालात म्हटले आहे. घाऊक महागाईने कळसाला गाठले असून, आता इथून पुढे महागाईत हळूहळू आणि त्यात माफक घट सुरू राहील. हे प्रामुख्याने जागतिक कमॉडिटींच्या (वस्तूंच्या) तुलनेने कमी किमती आणि विशेषतः खनिज तेलाच्या किमती (जूनपासून) कमी झाल्यामुळे शक्य होईल, असेही त्यात म्हटले आहे.

# लढाऊ विमान इंजिन निर्मितीसाठी 'रिलायन्स, रोल्स-रॉईस' एकत्र

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

भारताच्या 'प्रगत मध्यम लढाऊ विमान' कार्यक्रमासाठी स्वदेशी बनावटीचे इंजिन विकसित करण्याच्या उद्देशाने रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी विमान इंजिन उत्पादक ब्रिटिश कंपनी 'रोल्स-रॉईस' यांनी धोरणात्मक भागीदारीची शुक्रवारी घोषणा केली. या ऐतिहासिक भागीदारीमुळे देशांतर्गत संरक्षण तंत्रज्ञान व उत्पादन क्षमतेला मोठे बळ मिळणे अपेक्षित आहे.

या भागीदारी कराराचा भाग म्हणून, उभय कंपन्या भारतात 'एरोस्पेस गॅस टर्बाइन' संकुल उभारणार आहेत. हे केंद्र ऊर्जा आणि प्रणोदन (पॉवर, प्रोपेल्शन) तंत्रज्ञानासाठी उत्कृष्टता केंद्र म्हणून विकसित केले जाईल आणि त्यात लढाऊ विमानांच्या इंजिनची रचना, विकास, उत्पादन, चाचणी आणि संपूर्ण जीवनचक्रातील देखभाल व सहाय्य या बाबींचा समावेश असेल.


## ताबा सूचना

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हा ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी (इंडिया) लिमिटेड यांचा अधिकृत अधिकारी असून, **आर्सिल-ट्रस्ट-2025सी-006("आर्सिल")** चा विश्वस्त म्हणून कार्यरत, सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकन्सट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 (54, 2002) ("निर्देशित कायदा") अन्वये, आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) रूल्स, 2002 ("निर्देशित नियम") च्या नियम 3 सहवाचता निर्देशित कायद्याच्या कलम 13 (12) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, कर्जदार/सह-कर्जदार/गहाण ठेवणारे/जामीनदार यांना मागणी सूचना (खालील रकान्यात तपशील दिल्याप्रमाणे) जारी केली, ज्याद्वारे कर्जदार, म्हणजेच (खालील रकान्यात तपशील दिल्याप्रमाणे), जामीनदार आणि गहाण ठेवणारे यांना **कर्ज क्र. -** (खालील रकान्यात तपशील दिल्याप्रमाणे) अंतर्गत रक्कम परतफेड करण्यास सांगितले आहे, ज्याचा तपशील खालील रकान्यात नमूद केला आहेः

कर्जदार/सह-कर्जदार/गहाण ठेवणारे/जामीनदार यांनी सदर रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, याद्वारे कर्जदार/सह-कर्जदार/गहाण ठेवणारे/जामीनदार, विशेषतः, आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येत आहे की, निम्नस्वाक्षरीकार यांनी निर्देशित नियमांच्या नियम 8 सहवाचता निर्देशित कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (4) अन्वये त्याला/तिला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली नमूद केलेल्या तारखेला, "जशी आहे, जिथे आहे आणि तिथे जे काही आहे" या तत्त्वावर, खाली वर्णन केलेल्या मूळ स्थावर मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

| अ. क्र. | कर्जदार आणि जामीनदाराचे नाव / ट्रस्टचे नाव / बँकेचे नाव | मागणी सूचना तपशील | ताबा तारीख |
|---|---|---|---|
| 1 | श्रीमती चित्रमाला सुरचंद मरसकोल्हे / श्री.सुरचंद श्रीराम मरसकोल्हे<br>ट्रस्टः आर्सिल- ट्रस्ट-2025सी-006 ("आर्सिल")<br>विक्री बँकः- सेवा गृह ऋण लिमिटेड (सेवा) | कर्ज क्र. एच4आरआर000005008400<br>कलम 13(2) दिनांक 21/05/2025 मागणी रु. 3,62,022.53/- (रुपये तीन लाख बासष्ट हजार बावीस आणि त्रेपन्न पैसे फक्त) वरील निर्देशित रकमेवर दि. 28/04/2025 रोजीपासून लागू होणारया करारानुसारच्या दराने भविष्यातील व्याजासह, आकस्मिक खर्च, शुल्क, आकार इत्यादींसह एकत्रित. | दि. 11/08/2026 रोजी भौतिक ताबा |

**मालमत्तेचे वर्णनः श्री. रोशन भालचंद्र दराडे / श्री. संजय बालचंद्र गराडे / श्रीमती माहेश्वरी संजय गराडे यांच्या मालकीची मालमत्ता,** घर क्र. 571, मौजा निमखेडा, मोजमापे 320 चौ. फूट (29.72 चौ. मीटर) त्यावरील बांधलेल्या घरासह, गट ग्रामपंचायत निमखेडाच्या हद्दीतील, वॉर्ड क्र. 3, पंचायत समिति मौदा, मौदा, जि. नागपूर एमएच- 442206 यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल, आणि द्वारे सीमाबद्ध- पूर्वः रस्ता, दक्षिणः सुशील आदमाचे यांचे घर, पश्चिमः लक्ष्मी सोंगावले यांचे घर, उत्तरः ताराचंद मरसकोल्हे यांचे घर.

कर्जदार/जामीनदार/गहाण ठेवणारे, विशेषतः, आणि सर्वसाधारणपणे जनतेला, याद्वारे सावध केले जाते की, आर्सिल यांचा वर नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचा कायदेशीर ताबा आहे आणि सरफेसी कायदा, 2002 च्या कलम 13(13) अंतर्गत, कर्जदार/जामीनदार/गहाण ठेवणारे किंवा कोणतीही व्यक्ती, सादर ही सूचना मिळाल्यानंतर, आर्सिलच्या पूर्व लेखी संमतीशिवाय, स्थावर मालमत्तेचे विक्री, भाडेपट्टा किंवा अन्यथा व्यवहार/विलगीकरण करणार नाही आणि स्थावर मालमत्तेशी संबंधित कोणत्याही व्यवहारावर वर नमूद केलेल्या रकमेसाठी आर्सिलकडून शुल्क आकारले जाईल, तसेच निर्देशित रकमेवर करारानुसार भविष्यातील व्याज, आनुषंगिक खर्च, व्यय, शुल्क इत्यादी आकारले जातील.

वरील उल्लेखित स्थावर मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात, कर्जदार/जामीनदार/गहाण ठेवणारे यांचे लक्ष सदर निर्देशित कायद्याच्या कलम 13 च्या उपकलम (8) च्या तरतुदींकडे वेधले जात आहे.

ठिकाणः नागपूर
दिनांकः 15.08.2026

सही/-
अधिकृत अधिकारी
ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी (इंडिया) लिमिटेड

### ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी (इंडिया) लि.

सीआयएन- यू65999एमएच2002पीएलसी134884, वेबसाइटः www.arcil.co.in
**नोंदणीकृत कार्यालयः** द रूबी, 10वा मजला, 29 सेनापती बापट मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई-400 028. **टेलि.:** +91 2266581300.
**शाखा कार्यालयः** युनिट क्रः 211 आणि 212, 2रा मजला, प्लॉट क्र 28/2, झेनिथ कॉम्प्लेक्स, के. एम. गांधी पथ, शिवाजी नगर, पुणेः 411005, महाराष्ट्र.



## SOLAR INDUSTRIES INDIA LIMITED

CIN: L74999MH1995PLC085878
**Registered Office:** "Solar" House 14, Kachimet, Amravati Road, Nagpur - 440023, Maharashtra, India.
**Tel:** + 91 712 6634555, **Fax:** + 91 712 22500200,
**Email:** investor.relations@solargroup.com, **Website:** www.solargroup.com

### EXTRACT OF UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED JUNE 30, 2026

(₹ in crores, except Per Share Data)

| Sr. No. | Particulars | Standalone Quarter Ended 30.06.2026 Unaudited (1) | Standalone Quarter Ended 30.06.2025 Unaudited (2) | Consolidated Quarter Ended 30.06.2026 Unaudited (1) | Consolidated Quarter Ended 30.06.2025 Unaudited (2) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Total Income from Operations (net) | 1,686.15 | 1,416.82 | 3,676.72 | 2,183.71 |
| 2 | Net Profit for the period after tax | 358.38 | 279.52 | 666.37 | 352.62 |
| 3 | Total Comprehensive Income for the period (after tax) | 355.58 | 279.94 | 691.22 | 408.64 |
| 4 | Paid-up Equity Share Capital (Equity share of ₹ 2/- each) | 18.10 | 18.10 | 18.10 | 18.10 |
| 5 | Reserves (excluding Revaluation Reserve) | - | - | - | - |
| 6 | Earning per Share (Face value of ₹ 2 /-) (not annualised) | | | | |
| | a) Basic: | 39.60 | 30.89 | 72.11 | 37.43 |
| | b) Diluted: | 39.60 | 30.89 | 72.11 | 37.43 |

Notes :-
1. The Unaudited Consolidated Financial Results for the quarter ended June 30, 2026 of SOLAR INDUSTRIES INDIA LIMITED (the "Group") have been reviewed and recommended by the Audit Committee and subsequently approved by the Board of Directors at their respective meeting held on August 13, 2026. The Statutory Auditors of the Company have carried out a limited review of the aforesaid results.
2. The Company has identified 'Explosives and its Accessories', as its only reportable segment as defined under Ind AS 108 - Operating Segments.
3. Previous period figures have been regrouped, as considered necessary, to conform with current period presentation.
4. The above is an extract of the detailed format of statement of Unaudited Financial Results for the quarter ended on June 30, 2026 filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Unaudited Financial Results for the quarter ended on June 30, 2026 are available on the Stock Exchange websites at: (www.nseindia.com) and (www.bseindia.com) and on the Company's website at: (www.solargroup.com).

Place : Nagpur
Date : August 13, 2026

for Solar Industries India Limited
Sd/-
Manish Nuwal
Managing Director & CEO
DIN - 00164388

Adfactors 284/26


# 'एमएससीआय' निर्देशांकात सप्टेंबरपासून फेरबदल

**मुंबई :** जागतिक निर्देशांक प्रदाता 'एमएससीआय'कडून त्रैमासिक फेररचनेनुसार, ऑगस्ट महिन्यासाठी नवीन निर्देशांकाची घोषणा गुरुवारी केली. या फेररचनेनुसार, अदानी एनर्जी सोल्यूशन्स, लेन्सकार्ट सोल्यूशन्स, डिस्काउंट ब्रोकिंग ॲप 'ग्रो'ची पालक कंपनी बिलियनब्रेन गॅरेज व्हेंचर्स आणि औषध निर्मिती क्षेत्रातील लॉरस लॅब्स या चार कंपन्यांचा 'एमएससीआय इंडिया निर्देशांका'त समावेश करण्यात आला आहे.

दुसरीकडे, एसबीआय कार्ड्स अँड पेमेंट सर्व्हिसेस, ॲस्ट्रल लिमिटेड आणि बालकृष्ण इंडस्ट्रीज या तीन कंपन्यांची या मुख्य निर्देशांकातून गच्छंती झाली आहे. हे सर्व बदल ३१ ऑगस्ट २०२६ रोजी व्यवहार बंद झाल्यानंतर लागू होतील आणि १ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीसाठी प्रभावी ठरतील.

जागतिक स्तरावरील 'पॅसिव्ह' व्यवस्थापित आणि संस्थात्मक गुंतवणूकदार 'एमएससीआय निर्देशांका'ला अनुसरून गुंतवणूक निर्णय घेत असतात. 'नुवामा अल्टरनेटिव्ह अँड क्वांटिटेटिव्ह रिसर्च'च्या अहवालानुसार, चार नवीन कंपन्यांच्या समावेशामुळे भारतीय बाजारात सुमारे ५,७०० कोटी रुपयांची नवीन परकीय गुंतवणूक येण्याची शक्यता आहे.


## केनरा बैंक Canara Bank

क्षेत्रिय कार्यालय नागपूर
पहिला मजला, चांडक भवन नॉर्थ अंबाझरी रोड, शंकर नगर चौक, नागपूर - 440010
फोन: 0712 – 2559750 ई-मेल : recoveryrongp@canarabank.com

### मागणी सुचना

मागणी सुचना अंतर्गत सेक्शन 13(2) सह वाचले जाणा–या सेक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रकशन ऑफ फायनॅंशियल असेट्स अन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्यूरिटी इन्टरेस्ट ऍक्ट 2002 खालील दिलेल्या कर्जदार यांना आमच्या खालील दिलेल्या शाखेतुन वेळोवेळी कर्ज / पत सुविधा उपलब्ध करुन दिली आहे.

| अ. क्र. | कर्जदारांचे नाव व पत्ता | खात्याचे स्वरुप | कर्ज खाते क्र. | कर्ज मान्यता दिनांक | मान्य केलेल्या कर्जाची रक्कम | थकबाकी खर्च | व्याज दर | एन.पी.ए. दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | नागपूर गिट्टीखदान शाखा<br>1. श्री. मनोहर देवराव धार्मीक (कर्जदार)<br>2. श्री. लक्ष्मन मनोहर धार्मीक (सह-कर्जदार)<br>3. श्री. प्रविन मनोहर धार्मीक (सह-कर्जदार)<br>प्लॉट नं. 136 ए शितला माता मंदिर जामदर वाडी बिनाकी डॉ. आंबेडकर मार्ग नागपूर महाराष्ट्र 440017 | HOUSING FINANCE | 160000955290 | 21-07-2022 | रु. 40,00,000/- | रु. 4,76,606.72 व्याज आणि खर्च | 8.05 %+ (2% दंडात्मक व्याज) | 06.08.2026 |
| | | CANARA HOME LOAN SECURE | 164002618154 | 07-09-2022 | रु. 2,14,364/- | रु. 1,90,892.00 व्याज आणि खर्च | 8.10 %+ (2% दंडात्मक व्याज) | |

**अचल सुरक्षित मालमत्तेचे तपशिल : अनुसुची - I :** जमीनीचा सर्व भाग आणि तुकडा बेअरिंग प्लॉट नं. 136ए पश्चिमेकडिल जमीनीचा भाग क्षेत्रफळ 19.29 चौ.मी (1500 चौ.फुट) संपुर्ण जमीनीचा क्षेत्रफळ 286 चौ.मी बेअरिंग प्लॉट नं. 136, बेअरिंग खा. नं. 115,117 मौजा- बिनाकी, सिटी सर्वे नं. 2043, शिट नं. 430 / 47, वार्ड नं. 42, महानगर हाऊस नं. 1428 / ए / 136, पी.एच नं. 10, बिल्ट अप एरिया 60.07 चौ.मी 32 वर्ष जुना घर एनएमसी आणि एनआयटी च्या हद्दीत, ता आणि जि. नागपूर चतुर्सिमा:- पुर्व: प्लॉट नं. 136 बी, पश्चिम: 9 मी रुंद रोड, उत्तर: 9 मी रुंद रोड, दक्षिण: प्लॉट नं. 137. **संपत्ती धारकाचे नाव: श्री. मनोहर देवराव धारमीक**

वरील मालमत्ता वर निर्देशित ऋण सुविधासाठी गहाण / तारण आपण ठेवलेली आहे. ठरलेल्या शर्ती व अटीनुसार आपण कर्जाची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्यामुळे वरील खाते वर दर्शविलेल्या तारखेला नॉन परफॉर्मिंग असेस्ट (एनपीए) ला वर्गीकृत करण्यात आले. वर नमुद कर्जदारांकडे असलेली थकबाकी रक्कम व अद्यावत व्याज व इतर खर्चासाठी नोटीस दिलेल्या तारखेपासुन **साठ दिवसांच्या** आत परतफेड करण्याची नोटीस नियम 13 (2) अन्वये आपल्याला देण्यात येत आहे. वरील रक्कम परतफेड करण्याकरीता अपयशी ठरल्यास नियम 13(4) अंतर्गत सर्व किंवा कोणत्याही हक्काचा उपयोग करण्यास बाध्य असु. या नंतर, आपण आमच्या पुर्वसंमती शिवाय खालील नमुद गहण मालमत्तेसंबंधी कोणत्याही प्रकारचे व्यवहार करण्यासाठी प्रतिबंध आहात. हा कायदा किंवा कोणत्याही कायद्यानुसार आम्हाला प्राप्त असलेल्या इतर कोणत्याही अधिकारांचा पुर्वग्रह न ठेवता आहे. गहाण मालमत्ता सोडविण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात सरफायसी (SARFAESI) कायद्याच्या नियम (13) च्या उपनियम (8) नुसार आपले लक्ष वेधण्यात येत आहे, आमच्या शाखेकडे उपलब्ध असलेल्या पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाद्वारे तुम्हाला मागणीची नोटीस सुद्धा पाठविण्यात आली होती.

ठिकाण : नागपूर दिनांक : 13.08.2026 (इंग्रजीतील मूळ मजकूर ग्राह्य धरण्यात येईल) प्राधिकृत अधिकारी, केनरा बैंक



## DIFFUSION

Innovative superconditioning solutions

### डिफ्युजन इंजिनियर्स लिमिटेड

CIN No.: L99999MH2000PLC124154
**नोंदणीकृत कार्यालय :** टी-५ आणि ६, एमआयडीसी, हिंगणा इंडस्ट्रीयल एरिया, नागपूर - ४४००१६, महाराष्ट्र.
ई-मेल : cs@diffusionengineers.com I वेबसाइट : www.diffusionengineers.com
मोबाइल क्रमांक : ९१५८३१७९४३

### ४४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, रिमोट ई-व्होटिंगबाबतची माहिती, पुस्तके बंद ठेवण्याचा कालावधी, रेकॉर्ड तारीख इत्यादी

**याद्वारे सूचना देण्यात येते की:**

१. कंपनीची ४४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('४४ वी एजीएम') सोमवार, ७ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी २:०० वाजता आयोजित केली जाईल. कंपनी कायदा २०१३ ('कायदा') आणि त्याअंतर्गत तयार केलेले नियम, तसेच अनुक्रमे ८ एप्रिल २०२०, ५ मे २०२०, २५ सप्टेंबर २०२३, १९ सप्टेंबर २०२४ आणि २२ सप्टेंबर २०२५ रोजीची सामान्य परिपत्रके क्रमांक १४/२०२०, २०/२०२०, ०९/२०२३, ०९/२०२४ आणि ०३/२०२५ व कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने ('एमसीए परिपत्रके') वेळोवेळी जारी केलेली इतर संबंधित परिपत्रके यांच्या तरतुदींनुसार; सदस्यांच्या एका सामायिक ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग/इतर ऑडिओ-व्हिज्युअल साधने ('व्हीसी/ओएव्हीएम') या सुविधेद्वारे ४४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या (एजीएम) सूचनेमध्ये नमूद केलेले सामान्य आणि विशेष कामकाज पार पाडले जाईल. ४४ व्या एजीएम चे 'मानलेले ठिकाण' हे कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय असेल.

२. ४४ व्या एजीएमची सूचना आणि ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल यांची इलेक्ट्रॉनिक प्रत (ई-मेल) अशा सर्व सदस्यांना पाठवण्यात आली आहे ज्यांचे ई-मेल पत्ते कंपनीकडे किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपंट ('डीपी') कडे नोंदणीकृत आहेत. ४४ व्या एजीएम मध्ये सामील होण्याच्या सूचना आणि रिमोट ई-व्होटिंगद्वारे किंवा ४४ व्या एजीएम दरम्यान ई-व्होटिंग प्रणालीद्वारे मतदान करण्याच्या पद्धती ४४ व्या एजीएम च्या सूचनेमध्ये दिल्या आहेत. व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे ४४ व्या एजीएममध्ये सहभागी होणाऱ्या सदस्यांची गणना कायद्याच्या कलम १०३ अंतर्गत 'कोरम' (गणपूर्ती) निश्चित करण्याच्या उद्देशाने केली जाईल.

३. २६ ऑगस्ट २०२६ रोजी ज्या सदस्यांकडे प्रत्यक्ष स्वरूपात किंवा डिमटेरियलाइज्ड स्वरूपात शेअर्स आहेत, ते सदस्य सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड ('सीडीएसएल') च्या इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणाली ('ई-मतदान') द्वारे ४४ व्या एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या सामान्य आणि विशेष कामकाजावर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करू शकतात.

सर्व सदस्यांना सूचित करण्यात येते की:
i. ४४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या (एजीएम) सूचनेमध्ये नमूद केलेले सामान्य आणि विशेष कामकाज इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे मतदानाद्वारे पार पाडले जाईल;
ii. रिमोट ई-व्होटिंग (दूरस्थ ई-मतदान) शुक्रवार, ४ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९:०० वाजता (भाप्रव) सुरू होईल;
iii. रिमोट ई-व्होटिंग रविवार, ६ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजता (भाप्रवे) समाप्त होईल;
iv. रिमोट ई-व्होटिंगद्वारे किंवा ४४ व्या एजीएम दरम्यान ई-व्होटिंग प्रणालीद्वारे मतदान करण्याच्या पात्रतेचे निर्धारण करण्यासाठी 'कट-ऑफ तारीख' २६ ऑगस्ट २०२६ ही आहे;
v. ४४ व्या एजीएमची सूचना ईमेलद्वारे पाठवल्यानंतर जी व्यक्ती कंपनीची सदस्य बनते आणि कट-ऑफ तारखेला शेअर्स धारण करते, ती cs@diffusionengineers.com वर विनंती पाठवून लॉगिन आयडी आणि पासवर्ड मिळवू शकते;
vi. सदस्यांनी खालील बाबींची नोंद घ्यावी: अ) एकदा का सदस्याने एखाद्या ठरावावर मतदान केले की, त्यानंतर त्यांना ते बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही; ब) ज्या सदस्यांनी ४४ व्या एजीएम पूर्वी रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदान केले आहे, ते व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे ४४ व्या एजीएम मध्ये सहभागी होऊ शकतात, परंतु त्यांना ४४ व्या एजीएमदरम्यान ई-व्होटिंग प्रणालीद्वारे पुन्हा मतदान करण्याचा अधिकार नसेल; क) ४४ व्या एजीएममध्ये सहभागी होणारे सदस्य ज्यांनी रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदान केलेले नाही, त्यांना ४४ व्या एजीएम दरम्यान ई-व्होटिंग प्रणालीद्वारे मतदान करण्याचा अधिकार असेल; आणि ड) ज्या व्यक्तीचे नाव कट-ऑफ तारखेला कंपनीच्या सदस्य नोंदवहीत किंवा डिपॉझिटरीजद्वारे राखल्या जाणाऱ्या लाभार्थी मालकांच्या नोंदवहीत नोंदवलेले आहे, ती व्यक्ती रिमोट ई-व्होटिंगची सुविधा, व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे ४४ व्या एजीएममध्ये सहभाग आणि ४४ व्या एजीएमदरम्यान ई-व्होटिंगचा लाभ घेण्यास पात्र असेल.
vii. ४४ व्या एजीएमची सूचना आणि ३१ मार्च २०२६ रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल कंपनीच्या (www.diffusionengineers.com); नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (www.nseindia.com); बीएसई लिमिटेड (www.bseindia.com) आणि सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (www.evotingindia.com) या संकेतस्थळांवर उपलब्ध आहेत.
viii. रिमोट ई-व्होटिंग किंवा एजीएम दरम्यानच्या ई-व्होटिंगबाबत कोणत्याही तांत्रिक मदतीसाठी/प्रश्नासाठी/स्पष्टीकरणासाठी किंवा समस्यांसाठी, आपण www.evotingindia.com वरील 'मदत' विभागात उपलब्ध असलेले 'वारंवार विचारले जाणारे प्रश्न' आणि ई-व्होटिंग मॅन्युअल पाहू शकता; किंवा helpdesk.evoting@cdslindia.com वर ईमेल करू शकता किंवा १८०० २१० ९९११ या टोल-फ्री क्रमांकावर कॉल करू शकता. आणखी काही प्रश्न असल्यास, कृपया आमच्या रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट्सशी investor@bigshareonline.com या ईमेल आयडीवर संपर्क साधावा.
ix. ज्या सदस्यांचे केवायसी तपशील (उदा. पिन कोडसह टपालाचा पत्ता, मोबाईल क्रमांक, बँक खात्याचे तपशील, आधारशी लिंक केलेला पॅन इ.) किंवा ई-मेल पत्ता कंपनीकडे किंवा त्यांच्या संबंधित डीपीज कडे नोंदवलेला/अद्ययावत केलेला नाही, ते खालील पायऱ्यांचे अनुसरण करून त्यांचे केवायसी तपशील आणि ई-मेल पत्ता नोंदवू/अद्ययावत करू शकतात:
a. ज्या सदस्यांकडे 'फिजिकल' स्वरूपात (कागदी प्रमाणपत्राच्या स्वरूपात) शेअर्स आहेत, त्यांनी योग्यरित्या भरलेले आणि स्वाक्षरी केलेले 'फॉर्म आयएसआर-१' मधील विनंती पत्र सादर करावे. त्यासोबत आधारशी लिंक केलेल्या पॅनची स्वतः साक्षांकित प्रत आणि सदस्याच्या पत्त्याच्या पुराव्यासाठी कोणत्याही दस्तऐवजाची (उदा. आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, निवडणूक ओळखपत्र, पासपोर्ट इ.) स्वतः साक्षांकित प्रत तसेच 'फॉर्म खडठ-१' मध्ये नमूद केलेले इतर आवश्यक दस्तऐवज जोडावेत.
i. जर ई-मेल पत्ता नोंदणीकृत असेल तर – त्यांच्या नोंदणीकृत ई-मेल पत्त्यावरून cs@diffusionengineers.com वर ई-मेल पाठवून आणि त्यानंतर त्याची प्रत्यक्ष प्रत पोस्टाद्वारे कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात पाठवणे अनिवार्य आहे; किंवा 'फॉर्म आयएसआर-१' सोबत आवश्यक कागदपत्रे थेट 'रजिस्ट्रार अँड शेअर ट्रान्सफर एजंट' (आरटीए) असलेल्या 'बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड'कडे पाठवून; आणि
ii. जर ई-मेल पत्ता नोंदणीकृत नसेल तर – वरील कागदपत्रांची प्रत्यक्ष प्रत पोस्टाद्वारे कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात किंवा थेट आरटीएकडे पाठवून.
b. ज्या सदस्यांकडे 'डीमॅट' स्वरूपात शेअर्स आहेत, ते त्यांच्या 'डीपी' कडे त्यांचे केवायसी तपशील आणि ई-मेल पत्ता अद्ययावत करू शकतात.

४. ३१ मार्च २०२६ रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षासाठीच्या अंतिम लाभांशासाठी सदस्यांची पात्रता निश्चित करण्यासाठी 'रेकॉर्ड डेट' २६ ऑगस्ट २०२६ ही असेल – अर्थात, कंपनीच्या ४४ व्या एजीएममध्ये सदस्यांनी याला मंजुरी दिल्यास. हा लाभांश ६ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी दिला जाण्याचे प्रस्तावित आहे.

५. वार्षिक सर्वसाधारण सभा आणि अंतिम लाभांश (सदस्यांनी मंजुरी दिल्यास) या उद्देशासाठी, कंपनीचे 'सदस्य नोंदणी पुस्तक' आणि 'शेअर हस्तांतरण पुस्तके' २७ ऑगस्ट २०२६ ते ७ सप्टेंबर २०२६ (दोन्ही दिवस धरून) या कालावधीत बंद राहतील.

६. १ एप्रिल २०२४ पासून लागू झालेल्या सेबीच्या परिपत्रकानुसार, ज्या सदस्यांकडे 'फिजिकल' स्वरूपात (कागदी प्रमाणपत्राच्या स्वरूपात) शेअर्स आहेत, त्यांना लाभांशाचे पैसे केवळ इलेक्ट्रॉनिक पद्धतीने दिले जातील; परंतु ही सुविधा अशाच सदस्यांना मिळेल ज्यांनी कंपनीकडे आपला पिन कोडसह टपाल पत्ता, मोबाईल क्रमांक, बँक खात्याचा तपशील, आधारशी लिंक केलेला पॅन आणि नमुना स्वाक्षरी ('केवायसी तपशील') पूर्ण/अद्ययावत केले आहेत. त्यामुळे, सदस्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी त्यांचे केवायसी तपशील पूर्ण/अद्ययावत करावेत.

वरील माहिती कंपनीच्या सर्व सदस्यांच्या हितासाठी जारी केली जात असून ती संबंधित कायदा आणि एमसीएच्या परिपत्रकांचे पालन करते. कोणत्याही शंका किंवा प्रश्नांसाठी सदस्य cs@diffusionengineers.com या ईमेलवर संपर्क साधू शकतात

स्थळ: नागपूर
दिनांक: १४ ऑगस्ट २०२६

संचालक मंडळाच्या आदेशावरून
डिफ्युजन इंजिनिअर्स लिमिटेड करिता
स्वाक्षरी/-
चंचल जैस्वाल
कंपनी सेक्रेटरी आणि अनुपालन अधिकारी
(सदस्यत्व क्रमांक: A67136)



## दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

एटीव्हीएम फॅसिलिटेटर्सची नियुक्ती
क्र. 2026/C/Chg./ATVM(II)/R.
दिनांकः 10/07/2026

भारताच्या माननीय राष्ट्रपतींसाठी व त्यांचे वतीने मंडळ रेल्वे व्यवस्थापक (वाणिज्य), द.पू.म.रेल्वे, रायपुर मंडळ यांचेद्वारे स्मार्ट कार्ड आधारित अनारक्षित तिकिटे जारी करण्यासाठी फॅसिलिटेटर्स म्हणून नियुक्ती करण्यासाठी इच्छुक निवृत्त ग्रुप सी व डी रेल्वे कर्मचारी आणि आम जनतेकडून विहित नमुन्यातील अर्ज आमंत्रित आहेत.
1. **कामाचे नावः-** रायपुर, दुर्ग, भिलाई पावर हाऊस, भाटापारा, तिलदा, हथबंद, उरकुडा, भिलाई नगर, भानुप्रतापपूर, मरौदा, बालोद, सरोना आणि मंदिर ह्सौद स्थानके येथे स्मार्ट कार्ड आधारित अनारक्षित तिकिटे जारी करण्यासाठी एटीव्हीएम फॅसिलिटेटर्सची नियुक्ती.
2. **अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळः- 18/09/2026 रोजी 15.00 वाजेपर्यंत**
3. **अर्ज पेटी उघडणेः- 18/09/2026 रोजी 15.30 वाजता**
4. **मोहरबंद अर्ज सादरीकरणः** अर्जदारांनी वरिष्ठ मंडळ वाणिज्य व्यवस्थापक / द.पू.म.रेल्वे, रायपूर यांना उद्देशून असलेले आपले मोहरबंद लिफाफे वरिष्ठ मंडळ वाणिज्य व्यवस्थापक, डीआरएम कार्यालय कॉम्प्लेक्स, द.पू.म.रेल्वे, वॉल्टेअर लेव्हल क्रॉसिंग गेट, आरव्हीएच कॉलनी, रायपूर (छग) यांचे कार्यालयात यासाठी ठेवण्यात आलेल्या अर्ज पेटीमध्ये दि. 18/09/2026 रोजी 15.00 वाजेपर्यंत टाकावेत.

अधिक तपशील, अर्हता निकष, स्थानके आणि वरील कामाच्या संपूर्ण तपशीलासाठी कृपया वरिष्ठ डीसीएम/दपूमरे/रायपुर यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा आमच्या वेबसाईटवर **www.secr.indianrailways.gov.in** येथे उपलब्ध असलेले अर्ज दस्तावेज आणि इतर तपशील पाहावेत / डाऊनलोड करावेत.

**मंडळ रेल्वे व्यवस्थापक (वाणिज्य)**
**द.पू.म.रेल्वे, रायपूर**
**PR/R/SR.DCM/AN/171**
दक्षिण पूर्व मध्य रेल्वे @secrail



## लोकसत्ता जीवनसाथी

दोन जीवांच्या मीलनाचा मंगल मार्ग
विवाहोत्सुक मंडळींसाठी रविवार लोकसत्तामध्ये छोट्या जाहिरातींचे खास सदर

### वर पाहिजे

Unmarried, 01/10/83, 5'-1" 96K Maratha girl, doing government job. Education BMS, B.Ed. looking for an unmarried, ONLY Mumbai city based suitable groom from Sonar, Maratha, Saraswat, Brahmin, Bhandari caste only. 9821608676.
0071050546-1

### जातीची अट नाही

**हिंदू-** भंडारी- 33, 5", MBB, MD, (Oncopath), मुंबईत स्थायिक, जातीची अट नाही. 9920492071.
0071054058-1

### वधू पाहिजे

**मुंबई** विधुर, वैश्यवाणी, वय ६१, ५'-२'', बारा लाख, एक मुलगी. अपेक्षा- विनापत्य, नोकरी, रिटायर्ड, अविवाहित, घटस्फोटित, विधवा. संपर्क- ९८२०२४७०४६.
0071053710-1

७३ वर्षांच्या प्रकृतीने सुदृढ असलेल्या विधुर सद्गृहस्थास, पुढील आयुष्यासाठी, विनापाश विधवा, सहचारिणी, सहसोबती पाहिजे. बी.कॉम., एल.एल.बी. केंद्र सरकारकडून निवृत्त. मासिक उत्पन्न दोन लाख, फक्त रिलेशनशिप चालेल. अपेक्षा- किमान शिक्षण १२वी. कृपया संपर्क साधा 9423084322 (स्वतः)
0071052156-1

**वर-** हिंदू मराठी (कोकणस्थ), ३५/ ५'-९'', सावळी, बी.ए., आय.टी.आय., मुंबईत सरकारी नोकरी, मुंबईस्थित. अपेक्षा- अनुरूप, स्वजातीय (कोकणस्थ), मनमिळाऊ, सुशिक्षित, सुदृढ बांधा. 8104690773/ 7977150559.
0071053206-1

**वर गुजराती : ब्राह्मण : वय ४७, ५'-४'', B.Com., लीगल वर्क, मुंबईत स्वतःचे घर, शाकाहारी. अपेक्षा- गृहकार्यदक्ष वधू. 9082428239/ 9082428708/ 9869487926/ 9892748071.**
0071054101-1

**वर** कऱ्हाडे ब्राह्मण ४७/५'-२'', एकुलता एक, आई वडील नाहीत, स्वतःचे घर, मुलाला Epilepsy आकडी येते औषधाने (आटोक्यात), पूर्ण शाकाहारी, उत्पन्न ३ लाख वार्षिक. अपेक्षा- अनुरूप, 5ft वा कमी, शाकाहारी, नोकरी, ब्राह्मण कुटुंब, सुशिक्षीत, मनमिळावू. त्याला आधार देणारे, मुलीला अल्प व्यंग चालेल. संपर्कः पूर्णिमा 9920467621
0071051892-1

**प्रथम वर-** पाचकळशी (SKP), ४१ / ५'-४'', B.Sc., MCA, राहणार- नायगाव-वसई, गव्हाळ, IT कंपनीत नोकरी (७५,०००/- मासिक). अपेक्षा- प्रथम वधू, गव्हाळ, उंची- ४'-९'' ते ५'-४'', वय ३५ पर्यंत, पदवीधर (नोकरीला प्राधान्य) जातीची अट नाही. संपर्क- 8605147485/ 9869361719.
0071052382-1

### जातीची अट नाही

**मराठा-** 39, 5'-8", B.Tech MBA (IIM, Indore) मुंबईत स्थायिक, वार्षिक उत्पन्न 1 कोटी +, जातीची अट नाही. 9136583201.
0071052413-1

### मॅरेज ब्युरो

**जीवनसाथी सुयोग्य निवडीसाठी प्रथम वर, पुनर्विवाहोत्सुक मुंबईतील/ परदेशातील उच्चवर्णीय स्थळांसाठी मेधा दामले- इंद्रवदन, सेनाभवनसमोर, दादर (प.). फोन- 022-24305607, वेळ- ११-५.**
0071018927-2

**शुभमुहूर्त** विवाह मंडळ. https://shubhmuhurta.com
१२ पर्यंत शिक्षण असलेल्या मुलींची मोफत नोंदणी. सर्व जातींची स्थळे (शहरभर ५० शाखा).
* अंधेरी 9892982493
* विलेपार्ले 9220342206
* जोगेश्वरी 9322102349
* कांदिवली 9969756084
* कांदिवली 9821406411
* मालाड 9833776942
* बोरीवली 9757095502
* भाईंदर 8928100852
* मीरा रोड 9529230473
* नालासोपारा 9702320959
* नालासोपारा 9324860518
* विरार 8788528928
* विरार 8087920719
* विरार 9869527512
* डहाणू 9168326658
* लालबाग 9224227938
* सायन 9833809324
* घाटकोपर 9870753241
* विक्रोळी 9930429916
* ठाणे 8097519381
* भांडुप 9869980417
* ठाणे 8108387522
* कळवा 9821527358
* कल्याण 9869868620
* कल्याण 9769526561
* डोंबिवली 9892133551
* ठाकुर्ली 9833364736
* बदलापूर 8369148757
* चेंबूर 8850249088
* ऐरोली 9769254327
* नवीन पनवेल 8888935775
* उरण 9769909142
* अलिबाग 9226766129
* पुणे 9075513357
* रोहा 8888935775
* रत्नागिरी 9420526622
* रत्नागिरी 9834090507
* सिंधुदुर्ग 9130070987
* (नवीन शाखेसाठी संपर्क) (9324860518/ 9869868620).

0071046608-1

जीवनसाथी
Loksatta (All) Matrimonials
Rate for Min. 20 Words
Rs. 1400/-
Each extra word
Rs. 40/-
For Matimonials Classified Display
Rs. 515/- p.sq.cm./
Marriage Bureau Scheme For Run on words:
2 Paid + 1 Free

### क्षत्रिय मराठा तावडे हितवर्धक मंडळ, मुंबई

मराठा वधुवरांचा दादरमध्ये मेळावा
स्थळ: श्री शिवाजी मंदिर नाट्यगृह, एन. सी. केळकर मार्ग, दादर (प)
प्रवेश शुल्क रु. ५००/- (चहा, फराळासह)
वेळ: रविवार २३ ऑगस्ट सकाळी ९.३० ते १.३०
मंडळाच्या तीनही केंद्रात पूर्व नावनोंदणी सुरु
लोअर परळ- | ठाणे - | बोरीवली -
www.tawdevivah.com

### ॥ज्योतिर्लिंग प्रसन्न॥ यशवंत वधूवर सूचक केंद्र

सेक्टर ३, नवीन पनवेल, नवी मुंबई.
सर्व जातीतील प्रथम, घटस्फोटीत, विधवा, विधुर व आंतरजातीय विवाहास तयार असलेली स्थळे उपलब्ध.
वेळ : स. १० ते २. संध्या. ४ ते ८. इंटरनेट सुविधा उपलब्ध yashwantvadhuvar.com
संचालक: विष्णू यशवंत सुरवसे
7498846847 9324201800

### फिरकीच्या आव्हानासमोर आजपासून श्रीलंकेविरुद्ध पहिला सामना

# भारताच्या सर्वांगीण क्षमतेची कसोटी

**पीटीआय, गॉल**



भारत आणि श्रीलंका यांच्यातील पहिला कसोटी सामना गॉल येथे सुरू होईल, तेव्हाच कसोटी क्रिकेटच्या इतिहासाचे नवे पान लिहिले जाईल. भारताचा हा सहाशेवा कसोटी सामना असेल आणि इतके सामने खेळणारा भारत हा तिसरा संघ ठरेल. त्याचवेळी गॉलच्या मैदानावरील हा पन्नासावा सामना असेल. पन्नास कसोटी सामन्यांचे आयोजन करणारे गॉल हे आशियातील पहिले मैदान ठरेल.

**मर्यादित षटकांच्या** क्रिकेटमधील वर्चस्वानंतरही भारतीय संघ अलीकडे कसोटी क्रिकेटमधील आपले अस्तित्व हरवून बसल्यासारखे चित्र समोर आले आहे. लागोपाठ दोन मालिकेत सपशेल पराभव पत्करावा लागल्यानंतर आता नव्याने कसोटी क्रिकेटच्या मंचावर श्रीलंकेत पुनरागमन करताना भारतीय संघाच्या सर्वांगीण क्षमतेची कसोटी लागणार आहे.

फिरकी गोलंदाजांना साथ देणाऱ्या खेळपट्टीसह अनुकूल हवामानात भारताच्या फलंदाजांचीच नाही, तर फिरकी गोलंदाजांची देखील परीक्षा बघितली जाईल. येथील हवेचा स्त्रोत पाहता फिरकी गोलंदाजांना आपल्या चेंडूच्या गती आणि फिरकीवर नियंत्रण ठेवावे लागणार आहे. श्रीलंकेचे गोलंदाज याच हवामानात खेळत असल्यामुळे त्यांना त्याची सवय आहे. पण, भारतीय गोलंदाज आणि फलंदाजांना या हवामानाशी जुळवून घ्यावे लागणार आहे. भारतीय संघ या परिस्थितीशी किती झटपट समरस होतो, यावर त्यांचे यशापयश अवलंबून राहील यात शंका नाही.

श्रीलंकेत भारताने यापूर्वी सलग पाच कसोटी सामने जिंकले असले तरी नजिकच्या काळात भारताने मायदेशातील आपल्या गेल्या तीन मालिकांपैकी दोन मालिका गमावल्या आहेत. केवळ याच कारणामुळे ते अशा देशात निश्चित अतिशय प्रबळ दावेदार नसतील.

**कसोटी सामन्यांचे दुर्भिक्ष**

भारतीय संघ सध्या नाही म्हटले तरी बदलाच्या टप्प्यातून जात आहे, तर दुसरीकडे श्रीलंका संघ कसोटी क्रिकेटमध्ये जवळपास विजनवासात असल्यासारखा आहे. भारताने या वर्षात आतापर्यंत अवघी एकच कसोटी खेळणे ही एक दुर्मिळ गोष्ट आहे, परंतु श्रीलंकेने गेल्या १३ महिन्यांत केवळ दोनच कसोटी सामने खेळणे हा आता एक नियमच बनला आहे. गेल्या आठ वर्षांत त्यांनी दोनपेक्षा जास्त कसोटी सामन्यांच्या केवळ दोनच मालिका खेळल्या आहेत. त्यामुळे या दोन्ही संघांकडून काय अपेक्षा ठेवाव्यात, हे सांगणे कठीण आहे. श्रीलंका दोन्ही बाजूंनी भारतीय फलंदाजांना अडचणीत आणू शकतील अशा दोन फिरकीपटूंची जोडी मैदानात उतरवण्यासाठी उत्सुक असेल, तर भारतीय संघ दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंडविरुद्ध अशाच प्रकारच्या फिरकीला अनुकूल परिस्थितीत झालेल्या मालिकांमधील पराभवानंतर जोरदार पुनरागमन करण्यासाठी उत्सुक असेल.

**प्रथम फलंदाजी निर्णायक**

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत मोठी धावसंख्या उभारणे याकडेच दोन्ही संघांचा कल राहील, जेणेकरून खेळपट्टी फिरकीपटूंना अधिक मदत करू लागण्यापूर्वी धावा फलकावर असतील; कारण श्रीलंकेमध्ये सहसा असेच घडते. खेळपट्टी प्रथम फलंदाजांना पूर्ण साथ करते आणि नंतर ती फिरकीच्या आहारी जाते. पथुन निसांकाच्या अनुपस्थितीत, धनंजया डी सिल्वा, कमिंदू मेंडिस आणि दिनेश चंडिमल यांनाच फलंदाजीची मुख्य जबाबदारी सांभाळावी लागेल. पहिल्या कसोटीत तेथील परिस्थितीशी जुळवून घेताना अचानक अडचणीत येणे भारतीय फलंदाजांना नक्कीच टाळावे लागेल. के.एल. राहुल, यशस्वी जैस्वाल, शुभमन गिल, देवदत्त पडिक्कल, ऋषभ पंत, ध्रुव जुरेल यांना ही जबाबदारी पार पाडावी लागेल.

### गोलंदाजांना लय आवश्यक

भारतीय संघ येथे कुलदीप यादव, मानव सुथार आणि रवींद्र जडेजा या तीन डावखुऱ्या फिरकीपटूंसह मैदानात उतरण्याची शक्यता आहे आणि त्यांना अचूक टप्प्यावर गोलंदाजी करावी लागेल. गॉलची खेळपट्टी सुरुवातीला फारशी फिरकीला मदत करणारी नसेल, परंतु सामना जसा पुढे जाईल तशी ती नैसर्गिकरित्या फिरकीला साथ देईल. त्यामुळे गोलंदाजांना त्यांच्या कौशल्यावर विश्वास ठेवून अचूक टप्पा आणि दिशा शोधावी लागेल. येथे फिरकीपटू अधिक षटके टाकतील, परंतु मुख्य वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज आणि प्रसिध कृष्णा यांच्यावर धावा रोखण्याची जबाबदारी राहील.

- वेळ : सकाळी १० वाजता
- थेट प्रक्षेपण : सोनी स्पोर्ट्स टेन १, ३, सोनी लिव्ह ॲप.

### गिल म्हणाला...

- उत्कृष्टता केंद्रात दुखापतीतून सावरत असलेल्या खेळाडूंच्या प्रगतीवर संघ व्यवस्थापनाचे लक्ष
- खेळाडूच्या दृष्टीकोनातून भविष्याचा विचार करताना, कठोर निर्णय घ्यावा लागतो
- प्रमुख खेळाडू जायबंदी असल्याचा संघाच्या मानसिकतेवर कसलाच परिणाम नाही. तरुण खेळाडू संघासाठी मोलाचे योगदान देतील
- प्रमुख खेळाडूंना श्रीलंका क्रिकेट एकादश विरुद्ध झालेल्या सामन्यात स्थानिक परिस्थितीचा अनुभव घेण्याची संधी मिळाली.
- सिराजसह प्रसिध कृष्णा नवीन चेंडूने गोलंदाजीची सुरुवात करेल
- बुमराच्या अनुपस्थितीत प्रसिध आणि गुरनूर ब्रार सारख्या गोलंदाजांसाठी आपल्या खेळाचा स्तर उंचावण्याची उत्तम संधी

## बांगलादेशचे वर्चस्व कायम



**डार्विन :** तान्झिद हसनच्या (१९७ चेंडूंत १०१ धावा) कारकीर्दीतील पहिल्या शतकाच्या जोरावर बांगलादेशने शुक्रवारी दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या सामन्याच्या दुसऱ्या दिवसअखेर ६ बाद ३५१ धावसंख्येपर्यंत मजल मारली. त्यामुळे त्यांनी क्रमवारीत शीर्ष स्थानी असणाऱ्या ऑस्ट्रेलियाविरुद्ध पहिल्या डावात १५३ धावांची आघाडी मिळवली. सामन्याच्या तिसऱ्या दिवशी त्यांचा प्रयत्न आघाडी आणखी वाढविण्याचा असेल.

तान्झिदने नेथन लायनच्या चेंडूवर एक धावा काढत १८८ चेंडूंत आपले शतक पूर्ण केले. मात्र, आपल्या या धैर्यपूर्ण खेळीत त्याला आणखी एका धावेचीच भर घालता आली. लायनच्या चेंडूवर मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात तो बाद झाला. तंजीदने दोन महत्त्वाच्या भागीदारी रचत बांगलादेशच्या डावाला पुढे नेण्यास सहकार्य केले. तान्झिदने मोमिनुल हक (४९) याच्यासह दुसऱ्या गड्यासाठी १०२ धावांची आणि कर्णधार नजमुल हुसेन शांतोसह तिसऱ्या गड्यासाठी ९३ धावांची भागीदारी केली. तान्झिदने आपल्या खेळीत आठ चौकार व एक षटकार लगावला. शांतोने १२६ चेंडूंत ८४ धावांची खेळी केली. मात्र, दुसरा नवीन चेंडू घेतल्यानंतर ऑस्ट्रेलियाने तीन फलंदाजांना बाद करीत सामन्यात पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला.

# भारताची हॉकी विश्वचषक मोहीम आजपासून

### सलामीच्या लढतीत वेल्सशी गाठ

**ॲमस्टेलवीन (नेदरलँड्स) :** अर्ध्या शतकापेक्षाही अधिक काळापासूनचा पदकाचा दुष्काळ संपुष्टात आणण्यासाठी भारतीय पुरुष हॉकी संघ पूर्णपणे सज्ज झाला आहे. बदलत्या स्वरुपात होणाऱ्या यंदाच्या विश्वचषक हॉकी स्पर्धेतील आपल्या मोहिमेस भारतीय संघ आजपासून वेल्सविरुद्धच्या लढतीने सुरुवात करेल.

चुकीला माफी नाही असे काहीसे यंदाच्या विश्वचषक स्पर्धेचे स्वरुप आहे. अशा वेळी हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखाली आणि क्रेग फुल्टन यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय संघ वेल्सवर दणदणीत विजय मिळवून भारताच्या स्वातंत्र्यदिनाच्या उत्साहात भर घालण्यास उत्सुक आहे. या विजयामळे भारताच्या अशा एका मोहिमेची दमदार सुरुवात होईल. गेल्या ५१ वर्षांचा विजयमंचावर येण्याचा दुष्काळ संपवण्यासाठी ही सुरुवात प्रेरक ठरु शकते. भारताने आतापर्यंत केवळ १९७५ मध्ये एकदाच या स्पर्धेचे विजेतेपद मिळविले आहे. तेव्हा अजितपाल सिंग यांच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने क्वालालम्पूर येथे झालेल्या अंतिम सामन्यात पाकिस्तानचा पराभव केला होता.

आम्हाला भारतीय हॉकीमध्ये आमचा स्वतःचा नवा इतिहास लिहायचा आहे, असे सांगून त्यांनी खेळाडूंना १९७५ च्या सावलीत जगण्याऐवजी स्वतःची नवीन कहाणी तयार करण्याचे आवाहन यापूर्वीच केले आहे. भारताने यापूर्वी १९७१ मध्ये कांस्य आणि १९७३ मध्ये रौप्यपदक जिंकले होते. आता पाच दशकांहून अधिक काळानंतर, सध्याच्या पिढीकडे हा इतिहास बदलण्यासाठी आवश्यक अनुभव, खोली आणि आत्मविश्वास असल्याचा विश्वास संघात आहे.



### समतोल संघ

गेल्या हंगामात नऊ संघांच्या प्रो लीगमध्ये आठव्या क्रमांकावर घसरल्यामुळे निराशा झाली होती. परंतु, युरोपातील शेवटच्या टप्प्यात संघाने आपली लय परत मिळवली. त्यांनी विद्यमान जागतिक व युरोपियन चॅम्पियन जर्मनी आणि ऑलिम्पिक चॅम्पियन नेदरलँड्सचा पराभव केला. राजगीर येथील आशिया चषक स्पर्धेतील विजेतेपदामुळे संघाचा आत्मविश्वास आणखी वाढला आहे. प्रो लीग हंगामात तब्बल ३३ खेळाडूंना आजमावल्यानंतर, फुल्टन यांनी अनुभव आणि तरुणाईचा उत्तम मेळ घालत अंतिम संघाची निवड केली आहे. भारतासाठी सर्वाधिक ४१७ आंतरराष्ट्रीय सामने खेळण्याचा अनुभव असलेला अनुभवी मध्यरक्षक मनप्रीत सिंग संघाचा कणा ठरेल, तर दुसरीकडे, संघातील आठ खेळाडू पहिल्यांदाच विश्वचषकाचा अनुभव घेणार आहेत.

### हरमनप्रीत मुख्य अस्त्र

पॅरिस ऑलिम्पिकनंतर दिग्गज गोलरक्षक पी. आर. श्रीजेशने निवृत्ती घेतल्यामुळे, आता ही मोठी जबाबदारी तरुण मोहित एच.एस. आणि सूरज करकेरा यांच्या खांद्यावर असेल. आक्रमणाचा विचार केल्यास, हरमनप्रीतची पेनल्टी कॉर्नरमधील अचूकता हे भारताचे सर्वात मोठे अस्त्र राहील. संरक्षण फळीत अनुभवी अमित रोहिदास त्याच्या साथीला असेल. मध्यफळीची धुरा मनप्रीत आणि हार्दिक सिंग सांभाळतील, तर आक्रमणात अभिषेक आणि मनदीप सिंग यांच्यावर नजर असेल.

''भारतीय संघ या स्पर्धेत मोठ्या सकारात्मकतेसह उतरत आहे. टोक्यो ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकून भारताने ऑलिम्पिकमधील ४१ वर्षांचा पदकाचा दुष्काळ संपवला होता. त्यानंतर पॅरिस ऑलिम्पिकमध्येही संघाने कांस्यपदक राखण्याची कामगिरी केली होती. आता हेच सातत्य विश्वचषकाच्या मंचावर दाखवण्याचे मोठे आव्हान संघासमोर असेल,'' असे हरमनप्रीतने स्पर्धेसाठी रवाना होताना सांगितले होते.

जागतिक क्रमवारीत आठव्या क्रमांकावर असलेल्या भारतासाठी, १५व्या क्रमांकावरील वेल्सविरुद्धचा हा पहिला सामना कागदावर तरी सोपा दिसतो आहे. मात्र, नव्या स्वरुपामुळे स्पर्धेत चांगली सुरुवात करणे किती महत्त्वाचे आहे, याची जाणीव आतापर्यंत सर्व खेळाडूंना झाली आहे. याच गटात पुढे तिसऱ्या क्रमांकावरील इंग्लंड आणि १२व्या क्रमांकावरील पाकिस्तानसारखे तगडे संघ भारताच्या वाटेत असणार आहेत. त्यामुळे प्रत्येक सामना अत्यंत महत्त्वाचा ठरेल.

- **वेळ :** सायं. ४.३० वा.
- **थेट प्रक्षेपण :** स्टार स्पोर्ट्स २, जिओहॉटस्टार ॲप.

## मिझोराम संघाचा सलग दुसरा विजय

**पुणे :** कनिष्ठ गटाच्या महिला राष्ट्रीय हॉकी स्पर्धेत हॉकी मिझारोम संघाने सलग दुसऱ्या विजयाची नोंद करुन आपले अग्रस्थान भक्कम केले. नेहरुनगर येथील मेजर ध्यानचंद मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत ब श्रेणीत मिझोरामने दिल्लीचा ३-१ असा पराभव केला. सामन्याच्या १८व्या मिनिटाला टोप्रो रिलेन हिने गोल करुन मिझोरामला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर मध्यंतरापर्यंत त्यांनी १-० अशी आघाडी कायम राखली होती. उत्तरार्धात अल रॉंगबावल इस्थर हिने ३४ आणि अंजना एक्सा हिने ५१व्या मिनिटाला गोल करुन मिझोरामची आघाडी ३-० अशी भक्कम केली.

## प्रज्ञानंदची फॉरेस्टवर मात

**सेंट लुईस :** भारतीय ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदने गेल्या फेरीच्या पराभवानंतर जोरदार पुनरागमन करताना सिंकेफिल्ड चषक बुद्धिबळ स्पर्धेच्या चौथ्या फेरीत नेदरलँड्सच्या जॉर्डन व्हॅन फॉरेस्टला नमविले. या विजयामुळे प्रज्ञानंदचे नऊ फेऱ्यांच्या या स्पर्धेत चार फेऱ्यांनंतर २.५ गुण झाले आहेत.



तिसऱ्या फेरीत प्रज्ञानंदला जर्मनीच्या व्हिन्सेंट केमेरकडून पराभूत व्हावे लागले होते. चौथ्या फेरीत विजय मिळवणे हे प्रज्ञानंदसाठी महत्त्वपूर्ण होते. यामुळे ग्रँड चेस टूरच्या अंतिम टप्प्याच्या स्पर्धेत पात्रता मिळविण्याची त्याला अजूनही संधी आहे. प्रज्ञानंदची लढत सोडल्यास इतर सर्व लढती बरोबरीत राहिल्या. अमेरिकेच्या वेस्ली सो याने लेव्हॉन अरोनियनविरुद्ध बरोबरीची नोंद करीत तीन गुणांसह आपले शीर्ष स्थान कायम राखले.

अन्य सामन्यात फॅबियानो कारुआनाने सॅम्युएल सॅव्हियनविरुद्ध बरोबरीची नोंद केली. तर, अनिश गिरीने उझबेकिस्तानचा जागतिक अजिंक्यपदाची लढत खेळणाऱ्या जावोखिर सिंदारोवविरुद्ध गुण विभागून घेतले. अन्य लढतीत फ्रान्सचा ग्रँडमास्टर मॅक्सिम व्हॅचिएर-लाग्रेव्हने केमेरशी बरोबरी साधली. आता स्पर्धेच्या पाच फेऱ्या शिल्लक असून वेस्ली सो शीर्ष स्थानी आहे. प्रज्ञानंद, व्हॅचिएर-लाग्रेव्ह आणि अरोनियन त्याच्याहून अर्ध्या गुणाने मागे आहेत. कारुआना, केमेर व सॅम्युएल यांचे दोन गुण आहेत. तर, अनिश व सिंदारोव १.५ गुणांसह संयुक्त आठव्या स्थानी आहे. फॉरेस्ट अर्ध्या गुणासह अखेरच्या स्थानी आहे.

पंजाब नैशनल बैंक ...भरोसे का प्रतीक! punjab national bank ...the name you can BANK upon!

**सार्वजनिक सूचना**

ही सूचना अशा निष्क्रिय खातेदारांसाठी आहे ज्यांच्या खात्यांमध्ये शून्य शिल्लक आहे आणि गेल्या तीन वर्षांहून अधिक काळ ग्राहकाकडून या खात्यात कोणताही व्यवहार झालेला नाही. त्यांनी KYC कागदपत्रे सादर करून आपले खाते पुन्हा सक्रिय करण्यासाठी PNB शाखेशी संपर्क साधावा, अशी विनंती आहे. या सूचनेच्या तारखेपासून एका महिन्याच्या आत खाते सक्रिय न झाल्यास, कोणतीही अतिरिक्त सूचना न देता अशी निष्क्रिय खाती बंद करण्यात येतील.
कोणत्याही प्रश्नांसाठी/मदतीसाठी कृपया आपल्या शाखेशी संपर्क साधा.

पंजाब नॅशनल बँक
दिनांक: 15.08.2026
अधिकृत स्वाक्षरीकर्ता
















हे पत्र **मुद्रक आणि प्रकाशक विरेंद्र विद्याधर रानडे** यांनी मालक, दि इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - दि इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड), यांच्यासाठी लोकमत, प्लॉट नं. १९२, २०७ आणि २०८, एमआयडीसी इंडस्ट्रियल एरिया, बुटीबोरी, नागपूर-४४११०८ येथे छापून प्लॉट. नं. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, अंबाझरी ले-आऊट, अंबाझरी, नागपूर-४४००१० येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी क्रमांक : २२३०४२१, २२३६८९७, फॅक्स क्रमांक : २२३६९८६. **लोकसत्ता मुंबई कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१. दूरध्वनी क्रमांक : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७. **महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४. दूरध्वनी : ०२०-६७२४१०००, फॅक्स : ०२०६७२४११४७. ■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **निवासी संपादक : देवेंद्र गावंडे*** (*पी.आर.पी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Loksatta, RNI. No. 54743/92, Dated 30-4-92.
© दि. इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.

# कृषिमंत्र्यांना शेतकऱ्यांसाठी वेळ नाही का?

## शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये रोष; पीक विम्याच्या प्रश्नावर घेराव

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**अकोला :** ट्रॅक्टर 'शोरूम'ला भेट देण्यात व्यस्त असलेल्या कृषिमंत्र्यांना शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेण्यात वेळ नाही का? असा संतप्त प्रश्न स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. वाशीम येथे पीक विम्याच्या प्रश्नावर कृषिमंत्र्यांना घेराव घालून शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांचे निवेदन संघटनेच्यावतीने सादर करण्यात आले.

राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे वाशीम जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले आहेत. या दौऱ्यामध्ये त्यांनी एका ट्रॅक्टर 'शोरुम'ला भेट दिली. त्यावरून स्वाभिमानी शेतकरी संघटनेने कृषिमंत्र्यांवर टीका केली आहे. याठिकाणी संघटनेचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष मनीष जाधव यांच्या नेतृत्वात पदाधिकारी व शेतकऱ्यांनी कृषिमंत्र्यांना घेराव घातला.



कृषिमंत्र्यांना निवेदन सादर करताना संघटनेचे पदाधिकारी.

### न्याय देणार

खरीप हंगाम २०२५-२६ च्या प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या जोखीम परताव्यासंदर्भात विषयाची सखोल चौकशी करण्यात येणार आहे. केंद्र आणि कंपनीकडे पाठपुरवठा करून निश्चित शेतकऱ्यांना न्याय दिल्या जाईल, असे आश्वासन कृषिमंत्र्यांनी आंदोलकांना दिले.

गतवर्षी खरीप हंगाम २०२५-२६ मध्ये अतिवृष्टी व ओल्या दुष्काळाने यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी उद्ध्वस्त झाले. त्यांचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले. प्रधानमंत्री पीक विमा योजनेमध्ये शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणे अपेक्षित असताना शासनाने शेतकरी नव्हे तर केवळ कंपनी हिताचा निर्णय घेतल्याचा आरोप पदाधिकाऱ्यांनी केला. यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी गतवर्षीच्या खरीप हंगामात तांत्रिक अडचण व चुकीच्या शासन धोरणामुळे पीक विम्याच्या नुकसान भरपाईपासून वंचित आहेत. त्यामुळे या खरीप हंगामात शेतकऱ्यांनी योजनेकडे पाठ फिरवली. केंद्रीय कृषी मंत्रालयाकडे पाठपुरावा करून शेतकऱ्यांना मदत मिळवून द्यावी यासह विविध मागण्यांचे निवेदन कृषिमंत्र्यांकडे सादर करण्यात आले.

# 'अशाप्रकारचे रस्त्याचे काम कुठेच बघितले नाही'

## ब्रह्मपुरी-आरमोरी महामार्गाच्या दुरुस्तीबाबत न्यायालयाचे ताशेरे

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** ब्रह्मपुरी-आरमोरी महामार्गाच्या दुरवस्थेबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली. न्यायालयाने फटकारल्यावर सार्वजनिक बांधकाम विभागद्वारा पीडब्ल्यूडी सिमेंट रस्त्यावरील भेगा भरण्याचे काम सुरू केले. मात्र या कामाच्या दर्जावर न्यायालयाने ताशेरे ओढत, अशाप्रकारचे काम तर कुठेच बघितले नाही, असे निरीक्षण नोंदवले. न्यायालयाने याप्रकरणी पीडब्ल्यूडीला १८ ऑगस्टपर्यंत स्पष्टीकरण देण्याचे निर्देश दिले.

जनमंचच्यावतीने दाखल सिमेंट रस्त्यांच्या याचिकेवर न्या. उर्मिला जोशी-फाळके आणि न्या. राज वाकोडे यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणीदरम्यान ब्रह्मपुरी-आरमोरी महामार्गाच्या दुरवस्थेचा मुद्दा उपस्थित झाला. मागील सुनावणीत न्यायालयाने याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाला फटकारले होते. यानंतर शुक्रवारी विभागाने छायाचित्र सादर करत दुरुस्तीचे काम सुरू झाले असल्याची माहिती दिली. मात्र छायाचित्रातील स्थिती बघितल्यावर न्यायालयाने संताप व्यक्त केला. सिमेंटच्या भेगा भरताना अतिशय गुणवत्ताहीन काम करण्यात येत आहे. न्यायालयाने याबाबत स्पष्टीकरण मागितल्यावर मानसूनचे कारण पुढे करण्यात आले. मान्सूनच्या काळात कुठलेही पक्के काम करता येत नाही. कोणत्याही पद्धतीने काम केले तरी हीच स्थिती राहणार आहे, असे उत्तर पीडब्ल्यूडीने दिले. यावर न्यायालयाने पीडब्ल्यूडीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. देशातील अनेक राज्याचे दौरे केले आहेत. तेथील रस्तेही बघितले आहे. मात्र अशाप्रकारचे कापडावरील ठिगडीसारखे काम कुठेच बघितले नाही.

आम्ही या क्षेत्रातील तज्ज्ञ नाही, मात्र छायाचित्र बघून कुणीही कामाचा दर्जा काय आहे, हे सहजपणे सांगू शकतो, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. पीडब्ल्यूडीकडून अशाप्रकारच्या कामाची अपेक्षा नाही, असे मत नोंदवत, १८ ऑगस्टपर्यंत स्पष्टीकरण देण्याचे निर्देश दिले.

# 'नदी पोखरून २० हजार ब्रास अवैध वाळूचा साठा'

**लोकसत्ता वार्ताहर**

**यवतमाळ :** आर्णी तालुक्यातील आयता परिसरात तब्बल २० हजार ब्रास अवैध वाळूचा महाकाय साठा करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. वाळू तस्करांनी अक्षरशः वाळूचे डोंगर उभे केले असून, माहिती अधिकार कार्यकर्ते रजनीकांत बोरेले यांनी या प्रकरणाची 'एसआयटी'मार्फत चौकशी करण्याची मागणी करत मुख्यमंत्री, महसूल मंत्री, जिल्हाधिकारी व वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली आहे.



यवतमाळ जिल्हा गेल्या काही वर्षांपासून अवैध वाळू उत्खनन आणि तस्करीचे मुख्य केंद्र बनला आहे. वर्धा, पैनगंगा, बेंबळा, अरुणावती आणि अडानसह अनेक नद्यांच्या पात्रातून रात्रं-दिवस यंत्रसामग्रीच्या साहाय्याने बेकायदेशीर उपसा सुरू असतो. स्थानिक महसूल व खनिजकर्म विभागाच्या ढिसाळ नियोजनामुळे आणि प्रशासकीय उदासीनतेमुळे वाळू तस्करांचे जाळे अधिकच बळकट झाले आहे. कठोर आणि ठोस कारवाईचा अभाव असल्यानेच तस्करांनी ऐन पावसाळ्यात आयता परिसरात थेट २० हजार ब्रासचा महाकाय साठा करण्याचे धाडस दाखवले आहे. सध्या बाजारात वाळूचा प्रचंड तुटवडा निर्माण करून हे तस्कर सामान्य नागरिक आणि बांधकाम व्यावसायिकांना अव्वाच्या सव्वा दराने वाळू विकून कोट्यवधी रुपयांची लूट करत असल्याचा आरोप केला जात आहे.

या संपूर्ण प्रकरणात पारदर्शकता आणण्यासाठी आणि प्रशासकीय यंत्रणेचा ढिसाळपणा रोखण्यासाठी या अवैध साठ्याच्या ठिकाणी तात्काळ सीसीटीव्ही कॅमेरे बसवून संपूर्ण साठ्याची ड्रोन व डिजिटल साहाय्याने अचूक मोजणी करावी, अशी मागणी बोरेले यांनी केली आहे.

# महसूलमंत्री बावनकुळे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी 'वॉर रूम'चे उद्घाटन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वर्धा :** विविध योजनांचा आढावा घेणाऱ्या जिल्हाधिकारी वॉर रुमचे उद्घाटन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय तेली तसेच सर्व उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, महसूल कर्मचारी उपस्थित होते. उद्घाटनानंतर महसूल मंत्री व पालकमंत्र्यांनी वॉर रुम तसेच व्हिडिओ कॉन्फरन्स रुमची पाहणी केली. जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी सादरीकरणाद्वारे वॉररुममध्ये करण्यात येणाऱ्या कामांची माहिती सादर केली. या वॉररुममधून एकात्मिक निरीक्षण व सनियंत्रण केले जाणार आहे. डेटा आधारित निर्णय प्रक्रिया, अंमलबजावणीचा मागोवा आणि जिल्हा विकासाच्या प्राधान्यक्रमांसाठी हे एक समन्वयित केंद्र असणार आहे. याठिकाणी विकासात्मक नियोजन आणि कृतीसंगम, प्रकल्प प्रगती व आढावा डॅशबोर्ड, धोरण निर्मिती व समस्या निवारण, नवीन प्रकल्पांची संकल्पना व आराखडा निर्मिती, माहिती व्यवस्थापन व नियंत्रण, शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यास वॉर रुमची महत्त्वाची भूमिका राहणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

# 'ओबीसींची जातनिहाय जनगणना करण्याचे सरकारच्या मनातच नाही'

**लोकसत्ता वार्ताहर**



**चंद्रपूर :** ओबीसी समाजाला वारंवार आश्वासने दिली जात असली, तरी प्रत्यक्ष निर्णय घेण्याची वेळ येताच त्यांच्या हक्कांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप काँग्रेस विधीमंडळ नेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. दुसऱ्या टप्प्यातील जनगणनेच्या राजपत्रात ओबीसींसाठी स्वतंत्र रकाना नसल्याने सरकारची ओबीसींची जातनिहाय जनगणना करण्याचे मनातच नसल्याची टीका केली आहे.

वडेट्टीवार यांनी चंद्रपूर येथे माध्यमांशी बोलत होते. जनगणनेच्या प्रत्यक्ष प्रक्रियेत ओबीसींसाठी स्वतंत्र रकाना ठेवण्यात आला नसल्याने या आश्वासनांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सरकारला ओबीसींची जातनिहाय जनगणना करायची असेल, तर त्यासाठी जनगणनेच्या प्रक्रियेत आवश्यक ती स्पष्ट आणि ठोस तरतूद करणे गरजेचे असल्याचे सांगण्यात आले. ओबीसी समाजाला केवळ आश्वासनांवर समाधान मानावे लागणार नाही. जातनिहाय जनगणनेचा निर्णय प्रत्यक्षात घेऊन त्याची अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. ओबीसींची लोकसंख्या, सामाजिक स्थिती आणि विकासातील सहभागाची वस्तुनिष्ठ आकडेवारी समोर आल्याशिवाय समाजाच्या प्रश्नांचे योग्य नियोजन करणे कठीण असल्याचेही नमूद करण्यात आले.

# बनावट कागदपत्रांच्या आधारे शासनाची दिशाभूल

## शिक्षण उपसंचालकांनी अहवाल मागितला

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** मानोरा तालुक्यातील उमरी बु. येथील श्रीमती वत्सलाबाई नाईक बालविकास मंडळ संचालित गजाधर राठोड विद्यालय तसेच कै. मातोश्री तान्हाबाई शिक्षण व क्रीडा प्रसारक संस्थेशी संबंधित हस्तांतरण प्रकरणाला आता वेगळे वळण मिळाले आहे. शासन निर्णयाच्या आधारे करण्यात आलेल्या हस्तांतरण प्रक्रियेत अनियमितता झाल्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर शिक्षण उपसंचालकांनी संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांकडून अहवाल मागितला.

रामराव प्रल्हाद आखरे यांनी यासंदर्भात तक्रार केली होती. त्यांच्या तक्रारीनंतर अमरावती विभागाचे शिक्षण उपसंचालकांनी संबंधित हस्तांतरणास दिलेल्या मान्यतेबाबत अहवाल मागवला असून प्रकरणाची सखोल पडताळणी सुरू केली आहे. शिक्षण उपसंचालकांनी २ जून रोजी जिल्हा परिषद, वाशीम येथील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना पत्र पाठवून तक्रारीची चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. तसेच आठ दिवसांत सविस्तर अभिप्राय सादर करण्यास सांगण्यात आले होते. मात्र, ऑगस्ट महिना सुरू होऊनही संबंधित समितीचा अहवाल प्राप्त झालेला नसल्याचे समोर आले आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी शिक्षणाधिकाऱ्यांनी स्वतंत्र समिती नियुक्त केली होती. मात्र, समितीचाही अहवाल अद्याप प्राप्त झाला नसल्याची माहिती शिक्षणाधिकाऱ्यांनी दिली. त्यामुळे अहवालानंतरच पुढील निर्णयाची दिशा स्पष्ट होणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

### नियमबाह्य हस्तांतरणाचा आरोप

या प्रकरणात नियमबाह्य पद्धतीने हस्तांतरण करण्यात आल्याचा आरोप यापूर्वीही करण्यात आला होता. शिक्षण विभागाच्या विविध स्तरांवर चौकशी सुरु झाल्याने आता नेमकी वस्तुस्थिती काय समोर येते आणि संबंधितांवर कोणती प्रशासकीय कारवाई केली जाते, याकडे शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे. समितीचा अहवाल लवकर प्राप्त करून त्याआधारे निर्णय घेण्याची मागणी होत आहे.

# दर्यापूर नगराध्यक्षांसह नगरसेवकांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश

**अमरावती :** दर्यापूर नगरपालिकेच्या काँग्रेसच्या नगराध्यक्षा मंदाकिनी सुधाकर भारसाकळे यांच्यासह काँग्रेसच्या नगरसेवकांच्या एका मोठ्या गटाने शिवसेना शिंदे गटात आज प्रवेश केला. दर्यापूरचे सहकार नेते सुधाकर भारसाकळे यांनी शिवसेना शिंदे गटात यापुर्वीच प्रवेश केला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत मुंबईत हा पक्षप्रवेश पार पडला. आमदार बच्चू कडू यांनी त्यासाठी पुढाकार घेतला होता. अमरावती जिल्ह्यात काँग्रेससाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.

शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणाऱ्यांमध्ये मंदाकिनी भारसाकळे, जुलेखाबाई अब्दुल मजीद घाणीवाले, वंदना विठ्ठलसिंह सोलंकी, मुनिफा बी. अय्युब शाह, हबिब खान असदउल्लाखान, कविता दिलीप गवई, रामेश्वर शंकर चव्हाण, रामेश्वर फकिरचंद तांडेकर, रेखा दिलीप चव्हाण, वर्षा विनोद बोरेकर, समीना परवीन सैय्यद नदीम, शेख नसीब शेख इस्माईल उर्फ वसीम शेख, मंदा दादा इंगळे, अहेमद खाँ सादतखॉ, उद्धव विश्वनाथ नळकांडे, स्नेहा देशमुख आदिंनी शिंदे गटात प्रवेश केला.

# लवकरच ३० हजार शिक्षकांची भरती - शिक्षणमंत्री भुसे

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**अकोला :** जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांची कमतरता लक्षात घेता पटसंख्येच्या आधारावर शाळांना आवश्यक शिक्षक उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. लवकरच ३० हजार शिक्षकांची मेगा भरती करण्यात येणार असल्याची माहिती शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी आज वाशीम येथे दिली.



### 'आयडॉल शिक्षकांचा' सन्मान

साखरा येथील अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळेतील मीना मापारी व विनोद झनक तसेच जिल्हा परिषद शाळा, तोंडगाव येथील संतोष इढोळे यांचा शिक्षणमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक शिक्षणाधिकारी विट्ठल भुसारे यांनी केले. डायटचे प्राचार्य डॉ. राजेंद्र महाजन आणि शिक्षणाधिकारी विट्ठल भुसारे यांनी सादरीकरणाद्वारे शैक्षणिक सद्यस्थिती, प्रगती आणि पुढील नियोजनाची माहिती दिली. सूत्रसंचालन उपशिक्षणाधिकारी गजानन डाबेराव यांनी केले.

वाशीम येथे शिक्षण विभाग व डायटच्यावतीने आयोजित शैक्षणिक आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी खा. संजय देशमुख, आ. अमित झनक, आ. श्याम खोडे, आ. भावना गवळी, आ. किरण सरनाईक, आ. धीरज लिंगाडे, नगराध्यक्ष अनिल केंदळे आदींसह अधिकारी उपस्थित होते. कामगिरी श्रेणी निर्देशांकांतर्गत देश, राज्य आणि वाशीम जिल्ह्याच्या कामगिरीचा तुलनात्मक आढावा घेण्यात आला. जिल्ह्याची शैक्षणिक कामगिरी उंचावण्यासाठी आवश्यक उपाययोजना तसेच संबंधित विभागांची जबाबदारी निश्चित करण्यावर चर्चा झाली. 'राष्ट्रप्रथम' उपक्रमांतर्गत आत्मरक्षा प्रशिक्षण, सैनिकी शिक्षण, योग शिक्षण व शैक्षणिक प्रबोधन यांचा आढावा घेण्यात आला.

# जलप्रकल्पांसाठी खासदार काळेंचा पाठपुरावा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वर्धा :** नवी दिल्ली येथे केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर. पाटील यांच्या उपस्थितीत महाराष्ट्रातील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाच्या खासदारांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमर काळे यांनी वर्धा व अमरावती जिल्ह्यातील रखडलेल्या जलजीवन मिशन, जलयुक्त शिवार आणि जलसंपदा प्रकल्पांचा विषय मांडला.

काळे यांनी यावेळी दिलेल्या माहितीनुसार, वर्धा जिल्ह्यात जलजीवन मिशनच्या मंजूर ८३९ योजनांपैकी ३०६ योजना निधीअभावी रखडल्या आहे. केंद्राचा ३४ कोटींचा हिस्सा प्रलंबित असून कंत्राटदारांची सुमारे ५४.७७ कोटी रुपयांची देयके थकीत आहे. पुढील कामांसाठी १४४ कोटींसह एकूण सुमारे १९८.७७ कोटी रुपयांच्या निधीची तात्काळ गरज आहे. याशिवाय जलयुक्त शिवार योजनेचे १९.४८ कोटी रुपये प्रलंबित आहेत.

अमरावती जिल्ह्यातही ५० योजना निधीअभावी रखडल्या असून कंत्राटदारांची ६२ कोटींची देयके बाकी आहेत. तसेच सिंचन प्रकल्पांसाठी ४०३.२० कोटी रुपयांची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. वेळेवर पैसे न मिळाल्याने कंत्राटदार आर्थिक अडचणीत सापडले असून कामाचा थेट फटका ग्रामीण जनतेला बसत आहे, असा मुद्दा मांडत त्यांनी एका कंत्राटदाराच्या आत्महत्येच्या गंभीर घटनेकडेही लक्ष वेधले. कंत्राटदारांची थकीत बिले तातडीने अदा करून केंद्र व राज्य शासनाने समन्वय साधत हे सर्व प्रकल्प वेळेत पूर्ण करावे, अशी मागणी काळे यांनी केली.



# कर्जमुक्तीचा लाभ मिळवून देण्याची प्रक्रिया पूर्ण करा

## कृषिमंत्री भरणे यांचे प्रशासनाला निर्देश

**अकोला :** नियोजनानुसार सर्व विकासकामे पूर्ण करण्यासाठी प्रशासकीय व तांत्रिक मान्यतांची प्रक्रिया तत्काळ पूर्ण करावी. कुठलाही निधी अखर्चित राहता कामा नये. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेत पात्र शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण बाकी असल्यास प्रशासनाने ती प्रक्रिया पूर्ण करून त्यांना लाभ मिळवून द्यावा, असे स्पष्ट निर्देश कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज येथे दिले.

वाशीम जिल्हा वार्षिक योजनेची बैठक पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. खा. संजय देशमुख, खा. अनुप धोत्रे, आ. श्याम खोडे, आ. भावना गवळी, आ. अमित झनक, आ. सई डहाके, आ. बाबू सिंग महाराज राठोड, आ. किरण सरनाईक, आ. धीरज लिंगाडे, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्यासह अधिकारी व विभाग प्रमुख उपस्थित होते. बैठकीत ३० एप्रिल रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तातील मुद्द्यांवरील कार्यवाही अनुपालन अहवाल, इतिवृत्त कायम करणे, जुलै २६ अखेर खर्चाचा आढावा घेण्यात आला.

जिल्हा वार्षिक योजनेत रस्ते, पूल, पाणीपुरवठा, जलसंधारण, दवाखाने, क्रीडांगण, पर्यटनक्षेत्र, शाळा, व्यायामशाळा विकास आदी अनेक विकासकामांचा समावेश केला आहे. नियोजनानुसार अनेक कामांची प्रशासकीय व तांत्रिक मान्यतांची कार्यवाही अद्याप पूर्ण झालेली नाही. ती तत्काळ पूर्ण करून घ्यावी आणि विकासकामांना चालना द्यावी. जिल्ह्यात कुठलाही निधी अखर्चित राहू नये. विकासकामे गुणवत्तापूर्ण व विहित वेळेत पूर्ण व्हावीत, असे निर्देश त्यांनी दिले. जिल्हा वार्षिक योजनेत ३४१ कोटी रु मंजूर नियतव्यय असून, बीडीएसवर २०४ कोटी ६० लक्ष रु निधी प्राप्त आहे. ३४ कोटी २४ लक्ष रु. निधीची प्रशासकीय मान्यतेची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. अनुसूचित जाती उपयोजनेसाठी ७६ कोटी व आदिवासी उपयोजनेसाठी १५ कोटी तरतूद आहे.

# आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना पंधरा दिवसांत पलंग?

**चंद्रपूर :** जिल्ह्यातील ३२ आश्रमशाळांमधील तब्बल ८ हजार ४४२ विद्यार्थी जमिनीवर गाद्या टाकून झोपत असल्याची बाब समोर आल्यानंतर प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. अनुदानित आश्रमशाळांच्या संस्थाचालकांनी विद्यार्थ्यांसाठी १५ दिवसांत पलंग उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिल्याची माहिती एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार यांनी दिली. त्यामुळे आता विद्यार्थ्यांना झोपण्यासाठी पलंग उपलब्ध होणार आहे.

गडचिरोली जिल्ह्यात सर्पदंशाची घटना घडल्यानंतर चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व आश्रमशाळांची तपासणी सुरू करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या निवास व्यवस्थेसह चहा, नाश्ता, भोजन, अंघोळीची सुविधा, स्वच्छतागृहे तसेच अन्य मूलभूत सुविधांची पाहणी केली जात आहे. चंद्रपूर प्रकल्पांतर्गत आठ शासकीय, २५ अनुदानित आश्रमशाळा आणि एक एकलव्य निवासी शाळा कार्यरत आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत सुरक्षित व सुविधायुक्त निवास व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी पायाभूत सुविधांच्या कामांना गती देण्यात आली आहे. जिवती येथील शासकीय आश्रमशाळेत सर्वाधिक विद्यार्थी संख्या आहे.

# आश्रमशाळांतील ५८४ विद्यार्थ्यांच्या मृत्यूला जबाबदार कोण?

**लोकसत्ता वार्ताहर**

**चंद्रपूर :** आदिवासी विकास विभागाच्या वतीने राज्यात चालविल्या जाणाऱ्या १ हजार ५६ आश्रमशाळांमध्ये दोन वर्षांत ५८४ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे. या मृत्यूंना जबाबदार कोण, असा थेट सवाल काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते तथा माजी मंत्री आमदार विजय वडेट्टीवार यांनी राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांना केला. त्यावर 'आश्रमशाळा तुमच्याही आहेत', असे प्रत्युत्तर डॉ. उईके यांनी दिले.

**वडेट्टीवारांचा आदिवासी विकास मंत्र्यांना सवाल. त्यावर 'आश्रमशाळा तुमच्याही आहेत', असे डॉ. उईके यांचे प्रत्युत्तर.**





### मंत्र्यांनी उत्तर द्यावे

आश्रमशाळा कुणाच्या आहेत, यापेक्षा गेल्या दोन वर्षांत मृत्यू झालेल्या ५८४ विद्यार्थ्यांच्या मृत्यूला जबाबदार कोण, तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार, याचे उत्तर आदिवासी विकास मंत्र्यांनी द्यायला हवे, असेही वडेट्टीवार म्हणाले.

गडचिरोली जिल्ह्यातील जपतलाई आश्रमशाळेत सर्पदंशामुळे तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर राज्यातील आश्रमशाळांमधील गैरव्यवस्था पुन्हा एकदा ऐरणीवर आली आहे. त्यातच 'लोकसत्ता'ने राज्यातील आश्रमशाळांमध्ये गेल्या दोन वर्षांत ५८४ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची आकडेवारी समोर आणली आहे. या पार्श्वभूमीवर चंद्रपुरात वडेट्टीवार यांनी डॉ. उईके यांच्यावर निशाणा साधला.

'आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या मृत्यूची जबाबदारी कोणावर निश्चित करणार? संबंधित अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार?' असा सवाल वडेट्टीवार यांनी केला. सरकारकडून प्रत्येक विद्यार्थ्यामागे दोन हजार रुपये दिले जातात. त्याऐवजी पाच हजार रुपये द्यावे. आश्रमशाळा संचालकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना द्याव्यात, अशी मागणीही त्यांनी केली. 'आश्रमशाळांच्या तपासणीदरम्यान काही अधिकारी पैसे घेऊन सर्व काही ठीक असल्याचे दाखवतात. त्यामुळे आदिवासी विकास मंत्र्यांनी या प्रकरणात कठोर भूमिका घेत धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे. लेचेपेचे करून काम होणार नाही,' अशी टीका वडेट्टीवार यांनी केली.

# गडचिरोलीतील २० पोलिसांना शौर्य पदक

लोकसत्ता वार्ताहर

**गडचिरोली :** नक्षलविरोधी अभियानात धाडसी कामगिरी बजावणाऱ्या गडचिरोली पोलीस दलातील २० अधिकारी आणि अंमलदारांना यंदाचे राष्ट्रपती पोलीस शौर्य पदक जाहीर झाले आहे. याशिवाय एका अधिकाऱ्याला गुणवत्तापूर्ण सेवेसाठी राष्ट्रपती पदक जाहीर झाले आहे. स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला शुक्रवारी या पदकांची घोषणा करण्यात आली.

### पोलीस अधीक्षकांकडून अभिनंदन

२५ वर्षांहून अधिक काळ निष्कलंक सेवा बजावलेल्या २७ अधिकारी-अंमलदारांना अतिउत्कृष्ट सेवा पदक, तर १५ वर्षांहून अधिक काळ निष्कलंक सेवा बजावलेल्या तीन अधिकारी-अंमलदारांना उत्कृष्ट सेवा पदक जाहीर करण्यात आले आहे. पदकप्राप्त सर्व अधिकारी आणि अंमलदारांचे गडचिरोलीचे पोलीस अधीक्षक एम. रमेश यांनी अभिनंदन केले.

देशभरात यंदा २७२ पोलीस शौर्य पदके आणि ६०६ गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पदके जाहीर झाली आहे. गडचिरोली पोलीस दलाला त्यापैकी २० शौर्य पदके आणि एक गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पदक मिळाले आहे. गेल्या पाच वर्षांत दलातील अधिकारी आणि अंमलदारांना तीन शौर्यचक्र, २३७ पोलीस शौर्य पदके आणि सात गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पदके मिळाली आहेत.

राष्ट्रपती पोलीस शौर्य पदक मिळालेल्यांमध्ये तत्कालीन अपर पोलीस अधीक्षक (अभियान) आणि सध्या पालघरचे पोलीस अधीक्षक यतिश देशमुख, सहाय्यक पोलीस निरीक्षक राजू गवळी, सहाय्यक पोलीस निरीक्षक वासुदेव मडावी यांच्यासह दिलीप आत्राम, मासा आत्राम, विजय कोडापे, दशरथ मडावी, अजय मडावी, गणेश डुब्बुला, विजय मडावी, भूपेश जुमनाके, राकेश बेडकी, सुधाकर पोरतेट, श्रीनिवास निष्ठुरी, गणेश गंजीवार, नितेश टेंभेकर, शिवाजी हिचामी, संजय कंकाबंडावार, राजेश किरंगे आणि दलसु बोगामी यांचा समावेश आहे.

सन २०२३ मध्ये भामरागड तालुक्यातील केडमारा आणि २०२४ मध्ये कंत्रनगट्टा येथे झालेल्या नक्षलवादी चकमकींमध्ये सुरक्षा दलाने सहा नक्षलवाद्यांचा खात्मा केला होता.

# पोलीस उपअधीक्षक प्रमोद लोखंडे यांना 'अति-उत्कृष्ट सेवा पदक'

लोकसत्ता वार्ताहर

**चंद्रपूर :** भारत सरकारच्या गृह मंत्रालयातर्फे पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दीर्घकालीन आणि निष्कलंक सेवेची दखल घेत प्रदान करण्यात येणारे 'अति-उत्कृष्ट सेवा पदक' (२५ वर्षे सेवा पूर्ण) भारत राखीव बटालियन-४, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १७, चंद्रपूर येथील पोलीस उपअधीक्षक तथा समादेशक सहायक



प्रमोद हरीराम लोखंडे यांना जाहीर झाले आहे.

लोखंडे यांनी ३५ वर्षांच्या सेवाकाळात उत्कृष्ट कामगिरी बजावत ६४८ बक्षिसे आणि १६० प्रशंसापत्रे मिळविली आहेत. तसेच राज्य व राष्ट्रीय स्तरावरील विविध २५ प्रशिक्षणक्रम पूर्ण केले असून प्रशिक्षण अधिकारी म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पाडली आहे. गडचिरोलीतील सिंदसूर येथे २६ ऑगस्ट १९९४ रोजी झालेल्या नक्षलविरोधी कारवाईत त्यांनी धैर्याने सहभाग घेत दोन नक्षलवाद्यांना ठार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रातही लोखंडे यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या दीर्घकालीन आणि गुणवत्तापूर्ण सेवेला मान्यता देत केंद्र सरकारकडून त्यांना 'अति-उत्कृष्ट सेवा पदका'ने सन्मानित करण्यात येणार आहे.

# अमरावती विभागात सोयाबीनचे वर्चस्व कायम

## पारंपरिक तृणधान्यांची पीछेहाट, मक्याचा आलेख उंचावला

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**अमरावती :** अमरावती विभागात यंदाच्या खरीप हंगामात सोयाबीन या रोख पिकाचे वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध झाले असून, विभागातील सरासरी क्षेत्राच्या तुलनेत तब्बल ९२ टक्के क्षेत्रावर सोयाबीनची पेरणी पूर्ण झाली आहे. दुसरीकडे, ज्वारी आणि बाजरीसारख्या पारंपरिक तृणधान्यांच्या पेरणीत कमालीची घट नोंदवण्यात आली असून, मका पिकाकडे शेतकऱ्यांचा कल वाढल्याचे स्पष्ट चित्र पेरणी अहवालावरून समोर आले आहे.

अमरावती विभागात सोयाबीनचे सरासरी क्षेत्र १४ लाख ६३ हजार हेक्टर असून त्या तुलनेत यंदा १३ लाख ४२ हजार हेक्टरमध्ये सोयाबीनची लागवड करण्यात आली आहे. सर्वाधिक सोयाबीनचा पेरा बुलढाणा जिल्ह्यात झाला असून ४ लाख ४४ हजार हेक्टर क्षेत्र सोयाबीन पिकाखाली आले आहे. म्हणजे ११२ टक्के क्षेत्रात लागवड झाली आहे. दुसरीकडे, अमरावती विभागात कापसाचे सरासरी क्षेत्र १० लाख ९२ हजार ६१० हेक्टर आहे. प्रत्यक्षात १० लाख ८० हजार ३६५ हेक्टरवर (९९ टक्के) कापूस पिकाची पेरणी झाली आहे. यवतमाळमध्ये ४.८७ लाख हेक्टर (१०३ टक्के) आणि अमरावतीमध्ये २.६७ लाख हेक्टर (१०० टक्के) पेरणी पूर्ण झाली आहे. बुलढाण्यात मात्र हे प्रमाण ६८ टक्क्यांवर राहिले आहे.

### खरीप ज्वारीचे क्षेत्र घटले



कधीकाळी पश्चिम विदर्भाचे मुख्य अन्नधान्य असलेल्या खरीप ज्वारीचे क्षेत्र कमालीचे आकुंचित झाले आहे. विभागातील २९ हजार ८५६ हेक्टर सरासरी क्षेत्रापैकी अवघ्या २ हजार ८३५ हेक्टरवर (केवळ ९ टक्के) ज्वारी पेरली गेली आहे. ५३७ हेक्टर सरासरी क्षेत्रापैकी अवघ्या १० हेक्टरवर बाजरीची पेरणी झाली आहे.

तृणधान्यांच्या लागवडीत मोठी विषमता दिसून येत आहे. अमरावती विभागात मक्याचे सरासरी क्षेत्र ४५ हजार ४६२ हेक्टर असताना प्रत्यक्षात ६८ हजार ६५२ हेक्टरवर (१५१ टक्के) पेरणी झाली आहे. कडधान्य पिकांमध्ये तुरीने आपले स्थान मजबूत ठेवले असले तरी अल्पमुदतीच्या मूग व उडदाला पावसाच्या विलंबाचा फटका बसला आहे. विभागात ४ लाख ४९ हजार ६७६ हेक्टर सरासरी क्षेत्रापैकी ४ लाख २९ हजार ८५६ हेक्टरवर (९६ टक्के) तुरीची पेरणी झाली आहे.

कापूस व सोयाबीनमध्ये आंतरपीक म्हणून तुरीला पसंती कायम आहे. ३५ हजार ६३ हेक्टर सरासरी क्षेत्राच्या तुलनेत अवघ्या ५ हजार ७८९ हेक्टरवर (१७ टक्के) मुगाची पेरणी झाली. ३१ हजार ३२७ हेक्टर सरासरी क्षेत्रापैकी ६ हजार ३५६ हेक्टरवर (२० टक्के) उडदाची पेरणी मर्यादित राहिली आहे.

# सर्पदंश प्रकरणात दोषींना वाचवण्याचा प्रयत्न

## अंबादास दानवेंचा आरोप; मृत विद्यार्थिनींच्या कुटुंबीयांची भेट

लोकसत्ता वार्ताहर

**गडचिरोली :** जपतलाई आश्रमशाळेतील सर्पदंशाच्या घटनेनंतर संस्थाचालकांवर कारवाई करून प्रशासनातील जबाबदार अधिकाऱ्यांना वाचवण्याचा प्रयत्न सरकारकडून सुरू आहे, असा गंभीर आरोप शिवसेना (उबाठा) गटाचे नेते तथा आमदार अंबादास दानवे यांनी शुक्रवारी केला. दानवे यांनी जपतलाई येथे जाऊन आश्रमशाळेची पाहणी केली तसेच मृत विद्यार्थिनींच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

१० ऑगस्टला पहाटे आश्रमशाळेतील विद्यार्थिनींना सर्पदंश झाला. उपचारादरम्यान तीन विद्यार्थिनींचा मृत्यू झाला असून दोन विद्यार्थिनींवर अद्याप उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर मुख्याध्यापक आणि अधीक्षकांवर कारवाई करण्यात आली. मात्र, आश्रमशाळांची नियमित पाहणी करण्याची जबाबदारी असलेले प्रकल्प अधिकारी आणि वरिष्ठ अधिकारी अद्याप कारवाईच्या कक्षेबाहेर असल्याचा आरोप दानवे यांनी केला. '८५० चौरस फुटांच्या खोलीत तब्बल ११० मुलींना झोपवण्यात येत होते. ही आश्रमशाळा नसून कोंडवाड्यासारखी अवस्था होती,' असे सांगत दानवेंनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. प्रकल्प अधिकाऱ्यांनी दर आठवड्याला आश्रमशाळांची पाहणी करून संस्थेला आवश्यक सूचना देणे आणि विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे अपेक्षित होते, असे ते म्हणाले.

जपतलाईकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था असल्याने सुमारे ४५ किलोमीटर अंतर कापण्यासाठी दोन तास लागतात. त्यामुळे विद्यार्थिनींना वेळेत उपचार मिळण्यास विलंब झाल्याचा आरोपही दानवेंनी केला. संस्थाचालक आणि अधिकाऱ्यांनी संगनमत करून आश्रमशाळांना 'भ्रष्टाचाराचे अड्डे' बनवले असून, अनुदानाचा पैसा कुठे गेला, याची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.



### मुख्यमंत्र्यांसह आदिवासी विकास मंत्रीही जबाबदार

२३५ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होईल, या कारणाने आश्रमशाळा बंद करण्याचा निर्णय चुकीचा असल्याचे दानवे म्हणाले. शाळेत प्रशासक नेमून व्यवस्था सुधारावी. या प्रकरणातील फिर्यादीच पहिला आरोपी ठरतो, अशी टीका करत प्रशासन काही अधिकाऱ्यांना वाचवत असल्याचा आरोप त्यांनी केला. मुख्यमंत्री तथा पालकमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांचीही या प्रकरणात जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

# तरुणावर तलवारीने हल्ला



लोकसत्ता वार्ताहर

**भंडारा :** शहरातील शुक्रवारी चौक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संत जगनाडे चौक परिसरात शुक्रवारी दुपारी अमित उर्फ विकी सुधाकर चोपकर (२०) याच्यावर तलवारीने पाच ते सहा तरुणांच्या टोळीने हल्ला केला. अमित याला परिसरात ह्यकचरा शेठह्ण या नावाने ओळखले जाते. अमित हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. गंभीर जखमी अवस्थेत त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हा हल्ला जुन्या वादातून झाल्याचा प्राथमिक अंदाज असून नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नाही.

# कर्जमुक्तीचे पाच ते १० हजार कोटी जमा होणार

## कृषिमंत्र्यांची माहिती; याद्या अद्ययावत होताच लाभ

लोकसत्ता खास प्रतिनिधी

**अकोला :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत 'ॲग्रीस्टॅक' पोर्टलच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यांची पडताळणी केली जात आहे. शासनाकडे पैसा उपलब्ध असून येत्या दोन ते चार दिवसांमध्ये शेतकऱ्यांच्या खात्यात पाच ते १० हजार कोटी रुपये जमा केले जाणार आहे, अशी माहिती राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज वाशीम येथे दिली.

वाशीम जिल्हा दौऱ्यावर आले असतांना त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी कर्जमुक्ती योजनेवर महत्त्वपूर्ण भाष्य केले. कृषिमंत्री म्हणाले, लाभार्थ्यांनी आपला विशिष्ट क्रमांक व आधार क्रमांक प्रमाणीकरण करून घ्यावा. सध्या योजनेच्या अंमलबजावणीची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्ती दिली जात आहे. पुढील दोन ते चार दिवसांत शेतकऱ्यांच्या कर्जखात्यामध्ये पाच ते दहा हजार कोटी रुपये जमा होणार आहेत. 'ॲग्रीस्टॅक' पोर्टलच्या माध्यमातून कर्जमुक्तीच्या याद्या पडताळण्याचे काम प्रगतीपथावर आहे.



पत्रकार परिषदेत बोलताना कृषिमंत्री भरणे.

### 'त्या' शेतकऱ्यांनाही कर्जमुक्ती

सातबारा उताऱ्यावर किंवा इतर अधिकारात नोंद नसलेल्या दोन लाख ३१ हजार शेतकऱ्यांना अधिकृत महसूल दस्तऐवजावर आणून 'ॲग्रीस्टॅक' नोंदणी करण्यात येणार आहे. यामुळे त्यांना कर्जमुक्तीसह विविध शासकीय योजनांचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे, असे कृषिमंत्र्यांनी सांगितले.

# कोठी-कोरणार पूल प्रकरणी कारवाई केव्हा होणार?

## अधीक्षक अभियंता ठाकरेंचा अतिरिक्त पदभार १५ दिवसानंतर काढला

लोकसत्ता वार्ताहर

**गडचिरोली :** एटापल्ली तालुक्यातील कोठी-कोरणार येथील कोट्यवधी खर्चून बांधण्यात आलेला पूल खचल्याच्या प्रकरणाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण केले असतानाच अधीक्षक अभियंता नीता ठाकरे यांच्याकडील गडचिरोलीच्या अधीक्षक अभियंता पदाचा अतिरिक्त कार्यभार काढून घेण्यात आला आहे. १२ ऑगस्ट रोजी काढण्यात आलेल्या आदेशानुसार, पुढील आदेशापर्यंत चंद्रपूरच्या अधीक्षक अभियंता सोनाली चव्हाण यांच्याकडे गडचिरोलीचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे.

कोठी-कोरणार येथील या पुलाचे उद्घाटन १५ ऑगस्ट २०२३ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले होते. अवघ्या तीन वर्षांच्या आत ३१ जुलैच्या मुसळधार पावसामुळे पूल खचल्याने बांधकामाचा दर्जा, तांत्रिक नियोजन आणि देखरेखीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.



विशेष म्हणजे, पुलाची मूळ मंजूर किंमत सुमारे चार कोटी नऊ लाख रुपये असताना डिझाईनमध्ये बदलाच्या नावाखाली खर्च जवळपास आठ कोटी रुपयांपर्यंत गेला असून डिझाइन बदल, सुधारित अंदाजपत्रक आणि वाढीव खर्चाची स्वतंत्र चौकशी तसेच विशेष लेखापरीक्षणाची मागणी आझाद समाज पक्षाने केली आहे. पूल खचून अनेक दिवस उलटूनही थेट निलंबनाची कारवाई न झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित होत होते. त्यातच ठाकरे यांचा गडचिरोलीचा अतिरिक्त पदभार काढून घेण्यात आल्याने या प्रशासकीय निर्णयाकडे संशयाच्या पार्श्वभूमीवर पाहिले जात आहे.

ठाकरे यांच्याकडे जून २०२६ पासून गडचिरोलीच्या अधीक्षक अभियंता पदाचा अतिरिक्त कार्यभार होता. त्यांच्याकडे गडचिरोलीसह नागपूर, भंडारा आणि गोंदिया या जिल्ह्यांचा अतिरिक्त भार असल्याचा मुद्दाही यापूर्वी उपस्थित करण्यात आला होता. केवळ पदभार काढण्यापुरतीच ही कारवाई मर्यादित राहणार की निकृष्ट बांधकामाच्या मुळाशी जाऊन जबाबदारी निश्चित केली जाणार, याकडे आता लक्ष लागले आहे.

# बोरगाव धरणात दोन विद्यार्थिनी बुडाल्या

**यवतमाळ :** येथील वाधवानी फार्मसी कॉलेजमध्ये शिकणाऱ्या दोन विद्यार्थिनी जवळच असलेल्या बोरगाव (ता. जि. यवतमाळ) येथील धरण परिसरात पर्यटनासाठी गेल्या असता धरणाच्या पाण्यात बुडाल्याची दुर्दैवी आणि खळबळजनक घटना घडली. आज, शुक्रवारी दुपारी ४ वाजेच्या सुमारास ही घटना घडल्याची माहिती समोर आली आहे.

अमृता अशोक खेडकर (रा. महात्मा फुले कॉलेजसमोर, धामणगाव रोड, यवतमाळ) आणि मोहिनी गौत्रे (रा. भोसा रोड, यवतमाळ) अशी पाण्यात बुडालेल्या विद्यार्थिनींची नावे आहेत. प्राथमिक माहितीनुसार, दोन्ही विद्यार्थिनी कॉलेजमधून बोरगाव धरण परिसरात फिरण्यासाठी गेल्या होत्या. फिरत असताना त्या धरणाच्या पाण्यात उतरल्या; मात्र पाण्याच्या खोलीचा योग्य अंदाज न आल्याने त्या अचानक खोल पाण्यात ओढल्या गेल्या आणि बुडाल्याची माहिती निष्पन्न होत आहे. दोन्ही विद्यार्थिनींचा शोध घेण्यासाठी धरण परिसरात शोध व बचाव मोहीम राबवण्यात येत आहे. अद्याप मुली सापडल्या नाही.



# उद्योगांसाठी पोषक वातावरण – पालकमंत्री

लोकसत्ता वार्ताहर

**बुलढाणा :** जिल्ह्यातील औद्योगिक विकासाला गती देण्यासह गुंतवणुकीसाठी अत्यंत पोषक आणि सकारात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी शासन स्तरावर सर्वंकष प्रयत्न सुरू आहेत. उद्योगांना आवश्यक पायाभूत सुविधा पुरवण्याबरोबरच १ ते सव्वा लाख कोटी रुपये खर्चाच्या 'वैनगंगा' (गोसीखुर्द) जलप्रकल्पाच्या माध्यमातून विदर्भातील आठ जिल्ह्यांचा आणि पर्यायाने बुलढाण्याचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवला जाईल. जिल्ह्यात गुंतवणूक करणाऱ्या उद्योजकांच्या पाठीशी प्रशासन खंबीरपणे उभे असून, त्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घेतली जाईल, अशी ग्वाही राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद पाटील यांनी दिली.

उद्योग आयुक्तालय आणि जिल्हा उद्योग केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने बुलढाणा रेसिडेन्सी क्लब येथील सभागृहात आयोजित 'बुलढाणा जिल्हा गुंतवणूक परिषद २०२६' मध्ये ते बोलत होते. या परिषदेस केंद्रीय आयुष राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव, आमदार संजय गायकवाड, आमदार श्वेता महाले, आमदार मनोज कायंदे, आमदार सिद्धार्थ खरात, ॲड. नाझर काझी, जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे, उद्योग व सेवा सहआयुक्त नीलेश निकम, राज्यकर आयुक्त संदीप शेलार, सहायक आयुक्त प्रमोद लांडे आणि मैत्री सेलचे सागर अवटी उपस्थित होते.

# साहित्य हे सर्व विचारांना सामावून घेणारे व्यासपीठ

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**अमरावती :** साहित्य आणि संस्कृतीशी संबंधित जीवनविषयक दृष्टिकोन विचारात घेता, साहित्य हे सर्व विचारांना सामावून घेणारे एक मोठे व्यासपीठ आहे. साहित्य ही सर्व विचारांना कवेत घेऊन चालणारी मोठी संस्था आहे, असे प्रतिपादन मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांनी केले.

रिद्धपूर येथील मराठी भाषा विद्यापीठात 'दीक्षारंभ' संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. अधिष्ठाता डॉ. कोमल ठाकरे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

### रिद्धपूर येथील मराठी भाषा विद्यापीठात 'दीक्षारंभ' संवाद कार्यक्रमात डॉ. आवलगावकर यांचे प्रतिपादन.

डॉ. आवलगावकर म्हणाले की, विद्यार्थ्यांचा विचार प्रगल्भ व्हावा आणि ज्ञानार्जन हे त्यांचे पहिले उद्दिष्ट असावे, शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये योग्य समन्वय असणे आवश्यक आहे. जीवनाचा प्रवास खडतर असून अनेक संकटांचा सामना करावा लागतो. यातूनच विद्यार्थ्यांमध्ये ऊर्जा निर्माण होणे गरजेचे आहे. विद्यापीठ एका कुटुंबाप्रमाणे कार्य करत असून, विद्यार्थ्यांना कोणत्याही बाबतीत कमी पडू देणार नाही. ज्ञानार्जन ही एक पूजा असून, ध्येयवेडे होऊन जगण्याचा आनंद घेता आला पाहिजे, असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमात बीए आणि एमए अभ्यासक्रमांसाठी नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

अधिष्ठाता डॉ. कोमल ठाकरे यांनी मराठी साहित्याच्या अभ्यासक्रमातून मानवी जीवनदृष्टी प्राप्त होऊन व्यक्तिमत्त्व प्रगत होते, असे सांगितले. विविध विभागप्रमुखांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमांविषयी माहिती दिली. यामध्ये डॉ. मनोज उज्जैनकर (नाट्यशास्त्र), प्रा. डॉ. मनोज मुनेश्वर (मराठी), प्रा. अजय पटिले (पत्रकारिता आणि जनसंवाद) आणि प्रा. राहुल राठोड (इंग्रजी) यांचा समावेश होता.

यावेळी विद्यार्थ्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्रेयस कोल्हेकर यांनी केले, तर प्रा. प्रियंका तायडे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. प्रा. आशालाता गुट्टे, डॉ. प्रा. पल्लवी मावंदे, डॉ. प्रा अर्चना आखरे, डॉ. प्रा नितीन रामटेके, डॉ प्रा स्वप्निल मून यांच्यासह कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चंद्रपूरच्या कलावंतांना मोठे व्यासपीठ मिळावे – मुनगंटीवार

लोकसत्ता वार्ताहर

**चंद्रपूर :** चंद्रपूर आणि विदर्भातील नवोदित कलावंतांच्या प्रतिभेला वाव देणारे दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध करून देत व्यापक सांस्कृतिक चळवळ उभी राहावी, हे आपले स्वप्न आहे. कला, आवाज आणि चित्रफितींमध्ये समाजमन बदलण्याची मोठी शक्ती असून, अवघ्या दीड मिनिटांची लघुपटही कधी कधी दीड हजार पानांच्या पुस्तकापेक्षा अधिक प्रभावीपणे आशय आणि भावना पोहोचवू शकतो, असे प्रतिपादन माजी सांस्कृतिक कार्यमंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

एस.के. फिल्म प्रोडक्शनच्या वतीने मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'उत्कृष्ट शॉर्ट फिल्म व रील स्पर्धा २०२६'च्या बक्षीस वितरण समारंभात ते बोलत होते. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी सार्वजनिक वाचनालयात हा कार्यक्रम झाला. यावेळी आयोजक देवा बुरडकर, गणेश साळवे, सुदेश भालेकर, प्रीतम खोब्रागडे, चंद्रकांत गुंडावार, राजेश्वर सुरावार, रामपाल सिंग, डॉ. जयश्री कापसे उपस्थित होते.



स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सुमारे १५० ते २०० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला असून, त्यापैकी ७० स्पर्धकांची निवड करण्यात आली. प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांचा यावेळी गौरव करण्यात आला. चंद्रपूरची ओळख केवळ कोळशाच्या खाणींपुरती मर्यादित राहू नये. या खाणींतून निघणारे खरे 'कोहिनूर' म्हणजे जिल्ह्यातील कलाकार, कलावंत आणि प्रतिभावंत आहेत. त्यांच्या कलेला योग्य व्यासपीठ आणि संधी मिळाल्यास चंद्रपूरचा आवाज देश-विदेशात पोहोचेल, असे मुनगंटीवार म्हणाले.

सांस्कृतिक कार्यमंत्री असताना कलावंतांच्या मानधनात वाढ, पेन्शन तसेच वयोमर्यादेत बदल करण्याचे निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले. चंद्रपूरसह विविध ठिकाणी नाट्यगृह उभारण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. २०२७ मध्ये यापेक्षा मोठी आणि दर्जेदार स्पर्धा आयोजित करण्याचे नियोजन करावे, असे आवाहन मुनगंटीवार यांनी आयोजकांना केले.

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती
चतुरंग
WWW.LOKSATTA.COM
आपल्या प्रतिक्रिया व सूचना देण्यासाठी chaturang@expressindia.com
शनिवार, १५ ऑगस्ट २०२६


प्रीती पवार

# लहरा दो... लहरा दो...

**आज भारतीय स्त्री खेळाडू केवळ पदके जिंकत नाहीत, तर त्या भारतीय क्रीडाजगताचे भविष्य घडवत आहेत. प्रत्येक पदकविजेत्या स्त्री खेळाडूच्या गळ्यातील पदक आणि हातातील तिरंगा भारतीय स्त्रीच्या जिद्दीचे, सामाजिक परिवर्तनाचे आणि नव्या भारताच्या उंच भरारीचे प्रतीक आहे. नुकत्याच झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत भारताला मिळालेल्या एकूण १३ पैकी तब्बल ८ सुवर्णपदके स्त्री खेळाडूंनी मिळवून भारताचा झेंडा उंच फडकवला आहे. त्यानिमित्ताने... लहरा दो...**

**अनुपमा गोखले**


मीराबाई चानू

'भारतीय ऑलिम्पिक संघटने'च्या पहिल्या स्त्री अध्यक्ष पी.टी.उषा यांनी नुकत्याच ग्लासगो येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाच्या प्रसंगी भारताचा तिरंगा आणि बॅटन मीराबाई चानू आणि लवलीना बोरगोहेन या स्त्री खेळाडूंकडे मोठ्या विश्वासाने सोपवला होता. एखादी प्रतीकात्मक कृती दिसायला छोटी असली तरी त्यात खूप लोकांना प्रेरित करण्याची ताकद असते. स्त्री खेळाडूंना सन्मान आणि समानता बहाल करण्याची ही सुवर्णसंधी स्वतः गतकाळच्या प्रथितयश खेळाडू असल्यामुळे उषा यांनी अंमलात आणली. स्त्री खेळाडूंच्या मनाची स्पंदने ओळखून अधिकारपदावर असलेल्या व्यक्तींनी त्याचा योग्य तो आदर करणे हा दुग्ध-शर्करा योग त्यामुळे साधला. स्पर्धेच्या अखेरीस भारताला मिळालेल्या एकूण १३ सुवर्णपदकांपैकी तब्बल ८ सुवर्णपदके मिळवण्याचा महत्त्वाचा वाटा भारतीय स्त्री खेळाडूंनी उचलून उषा यांचा विश्वास सार्थ ठरवला.

वास्तविक २०२६च्या राष्ट्रकुल स्पर्धा ऑस्ट्रेलियामध्ये घेण्याचे सुनिश्चित होते, परंतु ऑस्ट्रेलियाने आर्थिक अडचणींमुळे या स्पर्धा घेण्याबाबत असमर्थता दर्शविली. शेवटच्या घटकेला ग्लासगोने या स्पर्धांचे यजमानपद स्वीकारले. एवढ्या मोठ्या प्रमाणात स्पर्धा घेणे हे मोठे जिकिरीचे काम असते आणि त्यासाठी खूप पूर्वतयारी आवश्यक असते. ती ग्लासगो येथे आयत्या वेळी करणे शक्य नव्हते. त्यामुळे या स्पर्धांमधील पूर्वनियोजित १९ खेळांऐवजी काटछाट करून फक्त १० खेळांचा स्पर्धेत समावेश करण्यात आला. यामुळे भारतीय क्रीडाप्रेमींची स्पर्धेच्या सुरुवातीला खूप निराशा झाली. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे स्पर्धेतून काढून टाकलेले खेळ पारंपरिकदृष्ट्या भारतासाठी भरपूर पदके मिळवून देणारे होते. कुस्ती, बॅडमिंटन, टेबल टेनिस, नेमबाजी, तिरंदाजी, हॉकी, क्रिकेट यासारखी भारताची बलस्थाने स्पर्धेतून बाद झाल्यामुळे भारत पदकतालिकेत खालच्या स्थानावर फेकला जाण्याची शक्यता सर्वांना भेडसावत होती. गेल्या वेळच्या राष्ट्रकुल स्पर्धेत भारताच्या एकूण पदकांपैकी जवळपास अर्ध्या पदकांचा वाटा या खेळांतून आला होता. पण यंदा सर्वच भारतीय खेळाडूंनी प्रयत्नांची पराकाष्ठा करत १३ सुवर्णपदकांसहित एकूण ३९ पदके मिळवली आणि पदक तक्त्यात मानाचे चौथे स्थान मिळवले. ॲथलेटिक्स, बॉक्सिंग, ज्युडो आणि वेटलिफ्टिंग हे खेळ या वेळच्या राष्ट्रकुल स्पर्धेत पदकांच्या बाबतीत भारताचे तारणहार ठरले.

साधारणपणे परदेशात जाऊन तेथील स्पर्धांमध्ये पदके मिळविणे थोडे जास्त अवघड असते. दीर्घकाळ विमान प्रवासानंतर होणारा जैविक चक्रावरील परिणाम, बदललेले अन्न, स्पर्धेचे वेळापत्रक या सर्व परिस्थितीशी जुळवून घेत मानसिक दबावाखाली सर्वोत्कृष्ट कामगिरीचे प्रदर्शन करणे खूप कठीण असते. त्यात ग्लासगो येथील बोचऱ्या थंडीचा सामना खुल्या मैदानात होणाऱ्या खेळांमधील खेळाडूंना करावा लागला. यावर मात करत भारतीय स्त्री खेळाडूंनी जिद्द, चिकाटी, कौशल्य आणि आत्मविश्वासाच्या जोरावर आपल्या क्रीडा सामर्थ्याचे जोरदार प्रदर्शन केले. आपल्या देशासाठी या स्पर्धेतील पहिले सुवर्णपदक मिळवून भारताची सोनेरी सुरुवात करून दिली ती मीराबाई चानूने! या स्पर्धेत बाकी स्पर्धकांपेक्षा कितीतरी सरस वजन उचलून तिने बाकीच्या स्पर्धकांना जवळपाससुद्धा पोचू दिले नाही.

मीराबाई मूळची मणिपूरमधील इंफाळपासून २० किलोमीटर लांब एका गावात राहणारी. तिचे वडील बांधकाम मजूर होते, तर आई चहाचे छोटेसे दुकान चालवून संसाराला हातभार लावत असे. सहा भावंडांमधील सर्वात धाकटी मीराबाई जवळपासच्या जंगलात भावंडांबरोबर लाकूडफाटा गोळा करायला जात असे. एके दिवशी सोळा वर्षांच्या भावाला उचलायला कठीण झालेली लाकडाची मोळी बारा वर्षांच्या मीराबाईने लीलया डोक्यावर उचलून घेतली आणि दोन किलोमीटर डोंगराळ भागातून सलग चालत घरी घेऊन आली. या प्रसंगामुळे तिच्या कुटुंबीयांना तिच्या या लीलया वजन उचलण्याच्या कौशल्याची जाणीव झाली आणि तिथेच तिच्या वेटलिफ्टिंग कारकीर्दीचा श्रीगणेशा झाला. सरावासाठी करावा लागणारा खडतर प्रवास, अपुरी साधने, सुरुवातीचे अपयश हे सर्व पचवून मीराबाईने जागतिक विजेतेपद आणि ऑलिम्पिक रौप्यपदक अशा उत्तुंग शिखरांना गवसणी घातली आहे.


शर्मिला धनखड

जागतिक स्तरावर सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मीराबाईच्या दृष्टीने राष्ट्रकुल स्पर्धेतील सुवर्णपदक मिळविणे हा डाव्या हातचा मळ होता.

या राष्ट्रकुल स्पर्धेत बॉक्सिंगमध्ये भारतीय स्त्री खेळाडूंनी आपला जोश दाखवला. प्रीती पवार, जास्मिन लाम्बोरिया, साक्षी चौधरी, प्रिया घंघास आणि अरुंधती चौधरी या वाघिणींनी आपल्या मनगटाची ताकद दाखवत एकट्या बॉक्सिंग या खेळात तब्बल पाच सुवर्णपदके खेचून आणली. प्रथितयश खेळाडूंना मिळालेली प्रसिद्धी खेळाडूंची पुढची पिढी कशी घडवू शकते याचे ठळक उदाहरण म्हणजे प्रीती पवारचे या स्पर्धेतील यश! हरयाणातील भिवानी येथून आलेल्या प्रीती पवारचे वडील हरयाणा पोलीसमध्ये नोकरी करीत असत. ते स्वतः कबड्डी खेळत, तर काका राष्ट्रीय पातळीवरचे मुष्टियोद्धा होते. तिचे पणजोबादेखील कुस्तीपटू होते. परंतु या मैदानी खेळांची आवड जोपासणाऱ्या कुटुंबात घरातील मुलीला मैदानी खेळात उतरविण्याची कल्पना या कुटुंबाला सुचली ती 'दंगल' चित्रपटातील 'हमारी छोरीया छोरों से कम हैं के?' या वाक्याने! पुढे हरयाणाच्या साक्षी मलिकने भारतासाठी कुस्तीतील स्त्रियांचे पहिले ऑलिम्पिक पदक मिळविल्यावर तर प्रीतीला मैदानी खेळात उतरविण्याचे विचार तिच्या कुटुंबात प्रकर्षाने चर्चेस येऊ लागले. काका मुष्टियोद्धा असल्याने १३ वर्षांच्या प्रीतीला त्यांनी थोडेफार प्राथमिक धडे देऊन बॉक्सिंगच्या रिंगणात उतरवले. शांत स्वभावाची प्रीती गांगरून गेली आणि तो सामना हरली. पण त्यामुळे तिच्या मनात भीती उत्पन्न न होता, आपण हे शिकले पाहिजे, बॉक्सिंग वर मेहनत घेतली पाहिजे अशी ईर्षा उत्पन्न झाली. प्रचंड मेहनतीनंतर प्रीतीने राष्ट्रकुल स्पर्धेतील सुवर्णपदकाचा मुक्काम गाठला आहे. आता विविध जागतिक दर्जाच्या स्पर्धांसाठी तिची जोरदार तयारी चालू आहे. फोगट भगिनींवर बेतलेल्या 'दंगल' चित्रपटाने आणि साक्षी मलिकच्या यशाने प्रेरित होऊन मैदानात उतरलेल्या प्रीतीच्या रूपाने भारताला आणखी एक गुणी युवा खेळाडू मिळाली आहे.

अस्मिता डे हिने या स्पर्धेत भारतासाठी ज्युडोत मिळविलेले पहिलेवहिले राष्ट्रकुल सुवर्ण पदक विशेष महत्त्वाचे आहे. ज्युडो, जलतरणसारख्या काही खेळांमध्ये भारतासाठी पदकांची वानवा असते. त्यामुळे जितक्या अधिकाधिक खेळांमध्ये भारताला पदके मिळतील, तेवढ्या या दुर्लक्षित खेळांचा पाया देशात विस्तारायला मदत होईल. त्रिपुरामधील एका लहान गावातून आलेल्या अस्मिताचे वडील सायकल दुरुस्तीचा व्यवसाय करून कसाबसा चरितार्थ चालवत असत. पण घरची बेताची परिस्थिती त्यांनी अस्मिताच्या खेळाच्या सरावा आड येऊ दिली नाही.


अरुंधती चौधरी

राष्ट्रकुल स्पर्धांच्या निवड चाचणीच्या काही दिवस आधी अस्मिताचा हा आधारस्तंभ काळाने हिरावून घेतला तेव्हा तिला खूप मोठा धक्का बसला. परंतु अस्मिताच्या आईने त्यांच्या शेवटच्या इच्छेचा आदर करीत अस्मिताला वडील गेल्यानंतर दहाच दिवसांनी सराव सुरू करायला उद्युक्त केले. आपल्या वडिलांची इच्छा काही अंशी पुरी केल्याचा आनंद अस्मिताला या सुवर्ण पदकामुळे झाला असेल.

या राष्ट्रकुल स्पर्धेत शर्मिला धनखड आणि शिल्पा शैला या भारतीय स्त्री दिव्यांग खेळाडूंनी प्रथमच गोळा फेक या क्रीडाप्रकारात एकाच वेळी अनुक्रमे सुवर्ण पदक आणि कांस्य पदक पटकाविण्याचा आगळा-वेगळा पराक्रम केला. आयुष्यात जरी अनेक वेळा नियतीने अडथळे उभे केले तरी खचून न जाता पुनःपुन्हा उभारी घ्यायचे शिकावे ते सुवर्ण पदक विजेत्या शर्मिला धनखडकडून! वयाच्या दुसऱ्या वर्षांपासून पोलिओमुळे आलेल्या अपंगत्वाला सोबत घेऊन बालपण घालवावे लागलेल्या शर्मिलाने तरुणपणी आयुष्याकडून मौजमजेच्या अपेक्षा ठेवल्या तर त्यात गैर नव्हते. पण लग्नानंतर बघितलेली तिची स्वप्ने वैवाहिक आयुष्यात झालेल्या शारीरिक आणि मानसिक छळामुळे उद्ध्वस्त झाली. दोन मुलींना घेऊन घर सोडावे लागलेल्या शर्मिलाची आर्थिक स्थितीसुद्धा साधारणच होती. पण हिंमत न हरता शर्मिलाने संसाराचा दुसरा डाव मांडला. या वेळी मात्र तिला समजून घेणारा जीवनसाथी भेटला. आर्थिक चणचण असूनसुद्धा तिच्या दुसऱ्या पतीने तिला वयाच्या तेहतिसाव्या वर्षी गोळाफेक खेळण्यास प्रवृत्त केले आणि खेळात खूप प्रोत्साहन दिले. ज्या वयात खेळाडू निवृत्तीचा विचार करतात, त्या वयात शर्मिलाने खेळ शिकायला सुरुवात केली. सुरुवातीच्या स्पर्धांमध्ये पदक मिळविण्यात अपयश आले तरी खचून न जाता शर्मिला धनखडने प्रयत्न सोडले नाही. राष्ट्रकुल स्पर्धेतील भारताची पहिली सुवर्ण पदक विजेती दिव्यांग खेळाडू होऊन इतिहास रचण्याचा मान तिने ग्लासगोला मिळवला. शर्मिलाच्या कहाणीने प्रेरित होऊन, कौटुंबिक छळाला सामोरे जावे लागणाऱ्या स्त्रियांना पुन्हा जगण्याची ताकद मिळावी आणि या पदकामुळे तिच्या कुटुंबाला हक्काचे घर घेता यावे अशी तिची इच्छा आहे.

पुढच्या राष्ट्रकुल स्पर्धांचे आयोजन करायची संधी भारताला मिळाली आहे. २०३० मध्ये अहमदाबाद येथे नियोजित या स्पर्धांमध्ये घरच्या मैदानावर खेळण्याचा फायदा भारतीय खेळाडूंना मिळेल. पण तोपर्यंत आशियाई गेम्स, विविध खेळांतील जागतिक अजिंक्यपद स्पर्धा, ऑलिम्पिक अशा अनेक स्पर्धांमध्ये भारतीय खेळाडूंची ▸ पान २ वर

---

# खगोलयात्री

**अवकाश विज्ञानात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या संशोधकाला देण्यात येणारा 'कॉस्पर विक्रम साराभाई पदक' हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार यंदा प्रथमच एका भारतीय स्त्री वैज्ञानिकाला, डॉ. अन्नपूर्णी सुब्रमणियम यांना प्राप्त झाला आहे. खगोल भौतिकशास्त्र हा अनोखा विषय निवडून त्यातच संशोधन करण्याचा निर्णय घेणाऱ्या डॉ. अन्नपूर्णी यांनी अनेक आंतरराष्ट्रीय खगोल भौतिकी प्रकल्पांमध्ये प्रमुख भूमिका स्वीकारून खगोलशास्त्राच्या संशोधनात मोलाची कामगिरी बजावली आहे. त्यांच्याविषयी...**

**रुचिरा सावंत**

४ ऑक्टोबर १९५७ रोजी सोव्हिएत युनियनने 'स्पुतनिक १' या पहिल्या मानवनिर्मित कृत्रिम उपग्रहाचं प्रक्षेपण केलं आणि अवकाशयुगाला खऱ्या अर्थानं सुरुवात झाली. याच पार्श्वभूमीवर अवकाश संशोधनाला चालना देण्यासाठी, सहकार्य आणि सामूहिक प्रगतीची वाट धरण्यासाठी, एका अराजकीय, जागतिक मंचाची आवश्यकता लक्षात घेऊन ३ ऑक्टोबर १९५८ रोजी 'इंटरनॅशनल काउन्सिल ऑफ सायन्स युनियन' (आताचं 'इंटरनॅशनल सायन्स काउन्सिल') या आंतरराष्ट्रीय संस्थेनं 'COSPAR' (कमिटी ऑन स्पेस रिसर्च)ची स्थापना केली. शीतयुद्धाच्या काळात देशांमध्ये सहकार्याची भावना वृद्धिंगत करणं हा या समितीच्या स्थापनेमागचा उद्देश होता. यामध्ये सहभागी देशांची सभा १९७९ पर्यंत दरवर्षी एका मोठ्या वार्षिक परिषदेच्या रूपात होत असे. पुढे मात्र दर दोन वर्षांनी ही परिषद वेगवेगळ्या सहभागी देशांमध्ये होऊ लागली. २०२६ मध्ये परिषदेची ४६वी आवृत्ती नुकतीच १ ते ९ ऑगस्ट २०२६ दरम्यान युरोपातील इटलीमधील फ्लोरेन्स शहरात आयोजित करण्यात आली होती. सोमवारी, ३ ऑगस्ट रोजी सर्व भारतीयांना अभिमान वाटेल अशी घटना या परिषदेमध्ये घडली.

भारतीय अवकाश विज्ञान कार्यक्रमाचे पिता म्हणून ओळखले जाणारे डॉ. विक्रम साराभाई यांच्या स्मरणार्थ 'भारतीय अंतराळ संशोधन संस्था' (इसरो) आणि 'कमिटी ऑन स्पेस रिसर्च' (COSPAR) यांनी संयुक्त विद्यमाने 'COSPAR विक्रम साराभाई पदक' पुरस्काराची घोषणा १९९० मध्ये केली. विकसित देशांतील अवकाश विज्ञान कार्यक्रमाच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या वैज्ञानिकांना हा पुरस्कार दर दोन वर्षांच्या अंतराने प्रदान करण्यात येतो. २०२६ पूर्वी हा पुरस्कार प्राप्त करणाऱ्या आंतरराष्ट्रीय नावांच्या यादीत
डॉ. यू. आर. राव (१९९६),
डॉ. गुरुबक्ष सिंग लखीना (२०१४)
आणि डॉ. अनिल भारद्वाज (२०२४)
या तीन भारतीय व्यक्तींचा समावेश होता. आनंदाची बाब अशी की, २०२४ मध्ये डॉ. भारद्वाज यांना हा पुरस्कार मिळाल्यानंतर लगेच २०२६ मधील पुरस्कारही एका भारतीय व्यक्तीला मिळाला आहे. इतकंच नाही तर २०२६ मधील हा पुरस्कार प्राप्त करणारी ही व्यक्ती जागतिक स्तरावर तिसरी स्त्री आणि पहिली भारतीय स्त्री ठरली आहे. त्या आहेत, डॉ. अन्नपूर्णी सुब्रमणियम.

केरळमधील पलक्कड येथे अन्नपूर्णी यांचा जन्म झाला आणि तिथेच बालपण गेलं. त्यांचे आईवडील दोघेही संगीतसाधना करत. कर्नाटकी शास्त्रीय संगीत सादर करणाऱ्या आपल्या पालकांकडून संगीतसाधनेचा त्यांना वारसा मिळाला. त्या फार सुरेख व्हायोलिन वाजवत. आपल्या वडिलांना सादरीकरणात सोबत म्हणून व्हायोलिनवादन करण्यासाठी त्या हमखास जात. पलक्कडचे भौगोलिक स्थान आणि तेथील वातावरण लक्षात घेता केरळ राज्यातील काही सर्वाधिक उष्ण वातावरण असणाऱ्या प्रदेशांपैकी ते एक शहर. तेथील असह्य उष्णतेमुळे अभ्यासात व्यत्यय येऊ नये म्हणून छोट्या अन्नपूर्णीने यावर एक तोडगा काढला.

रात्रीच्या प्रहरी किंवा पहाटे जेव्हा सूर्य आग ओकत नसतो, वातावरण थंड आणि शांत असतं अशा वेळी त्या अभ्यास करायच्या. त्या वेळी आकाशातील लुकलुकणारे तारे त्यांना सोबत करायचे. शीतल प्रकाश देणाऱ्या या खगोलांविषयी त्यांना त्या वयात खूप कुतूहल वाटायचं. पण त्याविषयी प्रश्न विचारता येतील, चर्चा करता येईल असं कुणीच त्यांच्या अवतीभोवती नव्हतं. ते कुतूहल शमवण्यासाठी त्या वाचनालयामध्ये जाऊन वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणारी तारे व नक्षत्रांच्या माहितीची कात्रणं घरी आणण्याची परवानगी मिळवण्यासाठी धडपडायच्या. परवानगी मिळाली की मग रात्रभर त्या कात्रणांच्या मदतीनं आकाशातील नक्षत्रं ओळखण्याचा प्रयत्न करायच्या.

आईवडिलांचा सांगीतिक वारसा पुढे नेऊन त्यात करिअर करण्याचा विचार अन्नपूर्णी यांच्या मनात अनेक वेळा डोकावला तरी प्रत्येक वेळी विज्ञानप्रेमामुळे, आकाशातील ताऱ्यांविषयी आणि अज्ञाताचा शोध घेण्यासाठी असणाऱ्या कुतूहलामुळे त्या कायमच्या विज्ञानाकडे परतल्या. भौतिकशास्त्र विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर त्या संशोधनाकडे कशा वळल्या ही गोष्ट रंजक आहे. पदव्युत्तर शिक्षणानंतर आता पुढे काय, हा विचार करत असताना त्यांना शिक्षकी पेशा स्वीकारण्याचा पर्याय दिसत होता, पण हा पर्याय त्यांना पुरेसा आकर्षित करत नसल्यामुळे त्यांनी या विचाराला डावलून आपल्या लहानपणीच्या आवडीच्या विषयात म्हणजेच खगोलशास्त्र विषयात पीएच.डी. करायचं ठरवलं.

आपली मुलगी ताऱ्यांचा अभ्यास करणार आहे असं समजल्यावर ती तिचं पुढचं आयुष्य अडनिड्या गावातील दूरच्या कुठल्या तरी वेधशाळेमध्ये रात्री जागवत काढेल या विचाराने भांबावलेल्या त्यांच्या आईने त्यांना ''त्यापेक्षा तू सूर्याचा अभ्यास का बरं करत नाहीस? तो दिवसाउजेडी दिसतोसुद्धा.'' असा निरागस सल्ला दिल्याचं त्या हसत सांगतात. १९९० मध्ये जेव्हा त्यांनी खगोल भौतिकशास्त्रासारख्या नव्या विषयात संशोधन करायचं ठरवलं तेव्हा हे क्षेत्र प्रसिद्ध नव्हतं.

पुढे जाऊन या क्षेत्रात उपलब्ध संधी काय असतील याची फारशी कल्पनाही तेव्हा नव्हती. या क्षेत्राला आता आहे तशी मागणीही नव्हती. अशा वेळी केवळ विषयावर असणारं प्रेम, स्वतःवरील विश्वास आणि शोध घेण्याची वृत्ती या जोरावर त्यांनी या क्षेत्रात ठेवलेलं पाऊल म्हणजे अंधारात तीर मारण्यासारखंच होतं. अर्थात अशा वेळी ''हे क्षेत्र मला आनंद देतं म्हणून मला इथे ▸ पान ४ वर



छायाचित्र डॉ. अन्नपूर्णी यांच्या 'एक्स' अकाउंटवरून साभार

'ॲस्ट्रोसॅट' या अवकाश कार्यक्रमातील डॉ. अन्नपूर्णी यांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. या अनुभवाच्या पायावर त्या सध्या INSIST (Indian Spectroscopic and Imaging Space Telescope) या प्रकल्पाच्या प्रमुख संशोधक म्हणून कार्यरत आहेत. INSIST हा भारताचा प्रस्तावित भविष्यवेधी अल्ट्राव्हायोलेट-ऑप्टिकल अवकाश टेलिस्कोप आहे. प्रोफेसर सुब्रमणियम यांनी Thirty Metre Telescope (TMT) प्रकल्पातही महत्त्वाची भूमिका बजावली आहे. TMT हा जगातील सर्वात मोठ्या आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र सहकार्य प्रकल्पांपैकी एक आहे. या प्रकल्पात भारत सहभागी देशांपैकी एक आहे, आणि भारतीय खगोलभौतिकी संस्था (Indian Institute of Astrophysics) ही भारताची समन्वयक केंद्र म्हणून काम पाहत आहे. 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ॲस्ट्रोफिजिक्स' येथे पीएच.डी.साठी दाखल झालेल्या डॉ. अन्नपूर्णी २०१९ मध्ये याच संस्थेच्या पहिल्या स्त्री संचालक म्हणून नियुक्त झाल्या. डॉ. अन्नपूर्णी यांनी 'भारतीय खगोल भौतिकी' संस्थेत तारकासमूह (स्टार क्लस्टर्स) आणि मॅगेलॅनिक क्लाउड्स (आकाशगंगेभोवती फिरणाऱ्या दोन लघु आकाशगंगा) यांचा अभ्यास केला. ताऱ्यांचं जीवनचक्र समजून घेण्यासाठी त्यांचं संशोधन महत्त्वाची भूमिका बजावतं.

# ...तया जाऊन सुखवावे ॥

**आज राज्यात सुमारे दोन कोटी वृद्ध राहतात. यापैकी १०-१५ टक्के वृद्धांना राज्य वा केंद्र सरकारचं आणि ५-७ टक्के वृद्धांना खासगी क्षेत्रातून निवृत्तिवेतन मिळतं. मात्र स्वतःचं कोणतंही उत्पन्न नसणारे वृद्ध आहेत ४०-४५ टक्के, तर दारिद्र्यरेषेखाली आहेत २०-२५ टक्के वृद्ध. कित्येक जण तर एकाकी आहेत. 'जयांना ना कोणी जगती, तया जाऊन सुखवावे' या भावनेने अनेक साठी-सत्तरी-ऐंशीतले स्त्री-पुरुष या वृद्धांचा आधार होताना दिसतात. त्या 'सुखावणाऱ्या' अनेकांविषयी...**



## पालकांचं पालकत्व

मेधा कुळकर्णी



शनिवारी सदरातला लेख प्रसिद्ध झाला की, ई-मेल्सचा भडिमार होतो. तितक्या वेगाने सगळ्यांना उत्तरं देता येत नाहीत. या साऱ्या शंभर टक्के अनोळखी व्यक्ती. मात्र, काहींचे प्रतिसाद वाचून त्यांची ओळख करून घ्यावीशी वाटते. उदाहरणार्थ, पुण्याचे विद्याधर जोशी. नामांकित बँकेतून निवृत्त झाले आणि समाजसेवा करण्यासाठी त्यांनी 'वृद्धांची काळजी' हे क्षेत्र निवडलं. एका वृद्धाश्रमात जाऊन तिथल्या गरजेनुसार काही वर्षं मदत केली. गेली बारा वर्षं ते 'माया केअर फाउंडेशन'मध्ये स्वयंसेवक म्हणून विनामूल्य काम करतात. ही संस्थासुद्धा वृद्धांना मोफत सेवा देते.

विद्याधर जोशी हा पंचाहत्तरीचा स्वयंसेवक अन्य वृद्धांना मदत करतोय. वृद्धाश्रमात राहणाऱ्या आशाबाई. त्यांच्या मुलाने बारा वर्षांत आईचं तोंड पाहिलं नव्हतं. आशाबाईंकडे स्वतःच्या मुलाचा ना संपर्क क्रमांक, ना ठावठिकाणा. विद्याधर यांनी महिनोन् महिने प्रचंड चिकाटीने, दीर्घ परिश्रमाने, विविध यंत्रणांकडे पाठपुरावा करून त्याला शोधून काढलं आणि आईची जबाबदारी घ्यायला भाग पाडलं. मेरीआजींना भावाने ढापलेली त्यांच्या हक्काची मालमत्ता मिळवून देण्यासाठीही हेच सगळं तितक्याच चिकाटीने विद्याधर यांनी केलं. त्यांच्याकडे अशा अनुभवांचा साठाच आहे. श्वास घ्यावा इतक्या सहजपणे ते हे काम करत असतात. 'जयांना ना कोणी जगती, तया जाऊन सुखवावे' या भावनेने वृद्धांचा आधार होणारे असे साठी-सत्तरी-ऐंशीतले स्त्री-पुरुष कित्येक ठिकाणी दिसतात. या पृथ्वीतलावरचं थोडं तरी दुःख कमी होतं, ते यांच्या भलेपणामुळे.

'माया केअर फाऊंडेशन'ची मुंबईची तरुण प्रतिनिधी सविता सुभेदार. घाटकोपरला रमाबाई आंबेडकर नगरात राहते. लहानपणी पोलिओ झाल्यापासून बरीच आव्हानं पेलत ती संस्थेतली विश्वासू आणि महत्त्वाची व्यक्ती बनली आहे. आजोबांचे सगळे नैसर्गिक विधी स्वतःच्या हाताने स्वच्छ करताना, त्याचवेळेस अर्धांगवायूचे तीन झटके आलेल्या आईला सांभाळताना अशा वयातल्या ज्येष्ठांना साथ दिली पाहिजे, हा सविताचा विचार पक्का होत गेला. मोठाल्या इमारतींमध्ये राहणाऱ्यांच्या तुलनेत मुंबईतल्या वस्त्यांमधल्या कुटुंबांमध्ये वृद्धांचा सांभाळ ममत्वाने केला जातो, असं तिचं निरीक्षण आहे. सविताप्रमाणेच अभिजित माळी, ज्योती मोरे हे अपंग युवक-युवती 'माया केअर फाऊंडेशन'चीजबाबदारी सफाईदारपणे सांभाळतात. भारतातल्या सहा मोठ्या रुग्णालयात ही संस्था 'मे आय हेल्प यू' सेवा देते. ३१ जानेवारी २०२६ पर्यंत या सेवेद्वारे २८,८८४ रुग्णांना मदत केली. संस्थेच्या स्वयंसेवकांची संख्या ३,१२८. त्यांनी दिलेल्या गृहभेटी ५,११२. भारतात आज ७० पेक्षा जास्त ठिकाणी संस्थेची सेवा दिली जाते. संस्थेचा हेल्पलाइन क्रमांक आहेः १८००५७२१३४३.

सामाजिक संस्था ही महाराष्ट्राची परंपरा आणि ओळख. १६३ वर्षांपूर्वी ९ ऑगस्टला सरदार किबे, रास्ते आणि नातू यांनी पुण्यात 'निवारा' ही वंचितांना आधार देणारी संस्था सुरू केली. गोपाळ कृष्ण गोखले आणि महादेव गोविंद रानडे हेही या कामात सहभागी झाले. ना नातलग, ना घर, ना पैसा अशा वृद्धांसाठी 'निवारा' आहे. 'निवारा'त सध्या ६० ते ९५ वयोगटातले ११७ वृद्ध (७९ स्त्रिया, ३८ पुरुष) राहतात. संस्थेच्या विश्वस्त विनया देशपांडे यांनी सांगितलं की, वृद्धाश्रमात प्रवेश देताना त्या वृद्ध व्यक्तीला खरोखरच कुणीही नाही, याची आम्ही खात्री करून घेतो. कारण, काही वेळा मुलंच त्यांच्या आई-बापांना बळजबरीने पाठवतात. मुलं किंवा अन्य कुणी नातलग असलेल्यांना आम्ही इथे प्रवेश देत नाही. समाजाचा पाया डळमळीत झाल्याने कुटुंबं विस्कळीत झाली आहेत. आणि वृद्ध नकोसे होत चाललेत, असं त्यांचं म्हणणं. पालक-पाल्य संबंधांमधला बिघाड वृद्धाश्रमांच्या चालकांइतका आणखी कुणाला समजणार?

आजघडीला महाराष्ट्रात सुमारे दोन कोटी वृद्ध राहतात. यापैकी फक्त १०-१५ टक्के वृद्धांना राज्य/ केंद्र सरकारचं तर ५-७ टक्के वृद्धांना खासगी क्षेत्रातून नियमित निवृत्तिवेतन मिळतं. स्वतःचं कोणतंही उत्पन्न नसणारे वृद्ध तर ४०-४५ टक्के आहेत तर, मिळकतीसाठी अजूनही काम करणारे २५-३० टक्के आणि दारिद्र्यरेषेखाली जगणारे २०-२५ टक्के वृद्ध आहेत. वार्धक्य आणि गरिबी अशी दुहेरी उपेक्षा यांच्या वाट्याला येते. सेवासुविधांपासून ते दूरच राहतात. म्हणूनच गरीब वर्गासोबत काम करणारा डॉ. बेनझीर पाटील यांनी सुरू केलेला 'वृद्धमित्र' हा उपक्रम महत्त्वाचा आहे.

प्रत्येक वृद्ध व्यक्तीला आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यापर्यंत आपल्या घरात, कुटुंबासोबत सन्मानाने आणि सुरक्षितपणे राहता यावं हा 'वृद्धमित्र'चा उद्देश. घरोघरी जाऊन वृद्धांना मदत मिळवून देणारा हा उपक्रम पुणे शहरातल्या जवळपास सर्वच वस्त्यांमध्ये, मुंबईत मानखुर्द- मंडाला इथल्या वस्त्यांमध्ये आणि देशातल्या काही शहरात सुमारे साठ हजार वृद्धांपर्यंत पोचला आहे. नियमित औषधं, वस्तीत आरोग्य शिबिरं, व्हिडीओ कॉलद्वारे डॉक्टरांचं मार्गदर्शन, पोषणशिधा/ ताज्या जेवणाचा डबा, गरजेनुसार डायपर, व्हीलचेअर, वॉकर, कमोड चेअर, श्रवणयंत्र, चष्मे यांसारखी साधनंही दिली जातात. वृद्धांना रुग्णालय, बँक किंवा इतर आवश्यक कामांसाठी घेऊन जाणं, त्यांना निवृत्तिवेतन, शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याचे प्रयत्न, त्यासाठीची कागदपत्रं, आधार, शिधापत्रिका किंवा ओळखपत्रांमधील दुरुस्त्या करून घेणं, बंद बँक खाती पुन्हा सुरू करून देण्यासाठीही मदत केली जाते.

'वृद्धमित्र' उपक्रमाच्या सल्लागार अनुप्रिता दीक्षित यांनी सांगितलं की, इथेही पालक-पाल्य नातेसंबंध ताणाचे असतात. वस्त्यांमध्ये पालक-पाल्य एकत्र राहतात. पण आर्थिक चणचण, व्यसनाधीनता, जागेची कमतरता, खासगीपणाचा अभाव यामुळे वृद्धांची काळजी घेण्याला मर्यादा येतात. वृद्ध आई-बापांना जेवणखाणं वेळेवर न देणं, त्यांच्या आजाराकडे दुर्लक्ष, औषधोपचारांत चालढकल आणि मानसिक-शारीरिक छळदेखील इथे होत असतो. पाल्यांची कामं बांधकाम मजुरी, घरकाम, सुरक्षारक्षक, लहान व्यवसाय, हातगाडी/ रिक्षाचालक, भाजी-फळंविक्री अशी. खासगी क्षेत्रात नोकरी करणारे थोडेच. उत्पन्न अनियमित. कुटुंबाचा रोजचा खर्च कसाबसा भागण्याइतपत. खरं तर, गरीब वृद्धांच्या अख्ख्या कुटुंबासाठीच मदतीची गरज आहे.

७४ वर्षांच्या शांताआजी. रोजची कामं स्वतः करणाऱ्या. पण व्यसनाधीन मुलामुळे एकाकी पडलेल्या. मांडीच्या हाडाला गंभीर 'फ्रॅक्चर' झाल्यावर त्या शरीर-मनाने खचल्याच. 'वृद्धमित्र'ने मदत केली. यशस्वी शस्त्रक्रियेनंतर घरी परतल्यावर त्यांच्या देखभालीसाठी घरात कोणीच तयार नव्हतं. डायपर बदलणं, अंघोळ घालणं, फिजिओथेरपी याची जबाबदारी 'वृद्धमित्र'ने घेतली. शांताआजींच्या विवाहित मुलीला समजावून सांगितलं. मुलगी आईची काळजी घेण्यासाठी नियमित येऊ लागली. मात्र, त्यामुळे कुटुंबात तणाव वाढला. शांताआजींना शारीरिक हिंसाचारालाही सामोरं जावं लागलं. त्या पुन्हा पडल्या. आणखी एक शस्त्रक्रिया करावी लागली.

'वृद्धमित्र'ने मानसोपचारतज्ज्ञांची मदत घेतली. घरातल्या परिस्थितीत बदल झाला नसला तरी जेवणाचा डबा, नियमित भेटी-संवाद, फिजिओथेरपी यामुळे त्या बऱ्या होऊ लागल्या. आज शांताआजींना हवा असलेला आपलेपणा 'वृद्धमित्र'कडून मिळतोय. आर्थिक सुस्थितीतले अनेक वृद्ध एकटं राहण्याइतके धडधाकट असतात. मात्र, त्यांना अधूनमधून मदत, सोबत लागते. काही तासांसाठी बाहेर जायला, घरातली आवराआवर करायला, सामान आणायला, घरातच काही वेळासाठी सोबत करायला वगैरे.

अंत्यसंस्कार ही सेवादेखील यात आहे. अशा २०-२५ सेवा पुण्यात, मुंबईत, नागपूरमध्ये देणारी 'आश्वस्त' संस्था, पुण्यात या सेवा देणारी 'सिटी शेर्पा' कंपनी आहे. अन्य जिल्ह्यांतून पुण्यात शिकायला येणाऱ्या मुलं-मुली प्रशिक्षण घेऊन हे काम करतात. त्यांचं हे कमाईचं साधन आहे, होऊ शकतं. 'बीइंग विथ यू फाऊंडेशन' संस्था एकट्या राहणाऱ्या ज्येष्ठांसाठी सोबती पाठवते. २०१९ पासून अनेक ज्येष्ठांनी, रुग्णांच्या नातेवाईकांनी त्यांच्या मोफत तीन तासांच्या सेवेचा लाभ घेतला आहे. संचालक माधवी ठाकुरदेसाई सांगतात की, परदेशातल्या मुलांना इथे असणाऱ्या पालकांची काळजी असते. म्हणून ते आमच्यासारख्या संस्थांची मदत घेतात. भारतातही पालक आणि मुलं स्वतंत्र राहताना दिसतात. त्यात बहुतेक वेळा लांब राहून नात्यात गोडवा राखण्याचा प्रयत्न असतो, हे त्यांचं निरीक्षण.

मनोविकारतज्ज्ञ शुभा थत्ते आणि दिवंगत डॉ. आनंद नाडकर्णी यांनी ठाण्यात सुरू केलेला 'सप्तसोपान' हा ज्येष्ठ नागरिकांना नवीन गोष्टी शिकण्यात गुंतवून ठेवणारा उपक्रम आहे. यापासून प्रेरणा घेऊन गौरी जोशी यांनी संगीता जोशींच्या मदतीने पुण्यात सुरू केलेला 'सुखसोपान' हा उपक्रम म्हणजे ज्येष्ठांची सांस्कृतिक शाळाच. मेंदूचं आरोग्य राखणाऱ्या, भावनांचं पोषण, स्मृतिवर्धन करणाऱ्या नाटक, नृत्य, संगीत, खेळ, ओरिगामी, भाषा, कथाकथन, अभिवाचन, कोडी, फोटोग्राफी, रील्स अशा अनेक कल्पक गोष्टींची रेलचेल 'सुखसोपाना'त असते. पाल्य आपल्या वृद्ध पालकांना आवर्जून इथे पाठवतात. वृद्ध इथे रमतात, नवं शिकतात, एकमेकांना मदत करतात.

गौरीचा समुपदेशन, वृद्धकल्याणशास्त्र या विषयांचा अभ्यास आहे. तिचा स्वतःच्या कुटुंबातल्या वृद्धांशी उत्तम संवाद आहे. तिचे आई-वडील, सासू-सासरे आणि दोन आजेसासूबाई यांच्याबद्दल ती भरभरून बोलली. लग्न होऊन सासरच्या घरात गेली, तेव्हा सासू-सासऱ्यांसह नवऱ्याच्या दोन्हीकडच्या आज्याही होत्या. सुरुवातीचं दडपण कुठच्या कुठे पळालं, इतकं आमचं एकमेकांशी जुळलं, असं गौरी सांगते. गौरीला मुलगी झाली तेव्हा त्या बाळीला दोन-दोन आजी-आजोबांबरोबर दोन पणज्यादेखील मिळाल्या. गौरी म्हणाली, ''नातवंड-पतवंडांमुळे कुटुंबातले ताण बाजूला पडतात आणि वातावरण प्रसन्न होऊन जातं. कारण बालकांना आनंदी ठेवण्यासाठी मोठी माणसं आपापले अहंकार बाजूला ठेवतात. तेच आमच्या घरात झालं. आता मुलगी मोठी झाली. तर, आज्या-पणज्या नूडल्स-पास्ता-पिझ्झा आवडीने खातात आणि माझ्या लेकीला त्यांच्या हातच्या चवळी-माठ-चाकवताच्या भाज्या हव्या असतात. घरात चारही पिढ्या निश्चिंत, एकमेकांच्या भरवशावर राहतात.''

गौरी तिच्या समुपदेशनात वडीलधाऱ्यांना आग्रहाने सांगते की, वयोमानानुसार हालचाली/काम करताना मर्यादा येणं म्हणजे हतबलता समजण्याची गरज नाही. रिकाम्या वेळेचं काय करू, असा प्रश्न पडत असेल तर कुटुंबीयांसोबत अधिक वेळ घालवा. नव्या पिढीशी संवाद वाढवायचा तर, स्वतःमध्येही थोडे बदल घडवायला तयार राहा. तुम्ही नातवंडांच्या अभ्यासात मदत करू शकणार नाही. पण इतर कुणीही देऊ शकणार नाही, असा काही वारसा नातवंडांना तुम्ही देऊ शकता. तुमच्यावर मदत मागायची वेळ येणं, म्हणजे स्वातंत्र्याचा संकोच झाला, असं मानायची गरज नाही.

घरात मुलं-सुनांची, मुली-जावयांची, नातवंडांची मदत घ्या, मोकळेपणाने मदत मागा. कुटुंबातल्या वृद्धांसोबत राहण्याचा इतका रसरशीत अनुभव असल्याने गौरी वडीलधाऱ्यांना जे सांगतेय, ते गंभीरपणेच घ्यायला हवं.

◆ kulmedha@gmail.com

# समानता नांदते घरी

**समानता घरापासून सुरू होत असते नंतर ती समाजात झिरपते. चंद्र आणि सूर्य या दोन इमारतीतील महिला मंडळाने 'समानता नांदते घरी' या विषयावर चर्चा आयोजित केली आणि समानतेचा खरा अर्थ तिथल्या अनेक सासू-सुनेच्या जोडीला कळला.**

सुजाता आ. लेले



चंद्र आणि सूर्य सोसायटी दोन इमारती असल्या तरी त्या दोघांमधील रहिवाशांचं चांगलंच साटंलोटं होतं. या दोन्ही सोसायटीच्या स्त्रियांनी एकत्रित 'स्नेह महिला मंडळा'ची स्थापना केली होती. दरवर्षी दोन्ही इमारतीतल्या लोकांचा स्नेह मेळावाही आयोजित करण्यात येई. वक्तृत्वाव्यतिरिक्त इतरही कला तसेच जुने खेळ यांच्याही स्पर्धा होत असत. शेवटच्या दिवशी विजयी स्त्रियांना बक्षीस देण्याचा कौतुक समारंभ पार पाडला जाई.

यंदाचं सगळ्यांना आकर्षण होतं एका परिसंवादाचं. त्याचा विषय होता 'स्त्री-पुरुष समानता.' गंमत म्हणजे स्पर्धेत सासू- सुनेची जोडी प्रतिस्पर्धी म्हणून भाग घेणार होती. पहिली जोडी होती मंगलाताई आणि त्यांची सून शैला ही. शैलाने सुरुवात केली, ''आमच्या घरी तरी अजून समानता पूर्णपणे सत्यात उतरलेली नाही. मी सून आहे याची जाणीव पदोपदी करून दिली जाते. घर सांभाळून मी नोकरी करते. थकून घरी येते पण आल्यावर आयता चहासुद्धा कधी मिळत नाही.नवरा नोकरीवरून दमून घरी येतो तेव्हा त्याच्या बॅगेतला डबा काढून मी घासायला टाकायचा. 'हल्ली करतातच मुली नोकऱ्या! घरी आल्यावर घराकडेच लक्ष दिलं पाहिजे.' असं सासूबाईंचं म्हणणं.''

असं म्हणून ती खाली बसली त्यानंतर तिच्या सासूबाई मंगलाताई बोलू लागल्या. ''आमची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. तरीसुद्धा हिला नोकरी करायचीच होती, मग आम्हीसुद्धा तिला अटी घातल्या. त्या तिने तेव्हा मान्य केल्या होत्या, आता कशाला तक्रार? मी खोटं बोलत नाही, विचारा की तिला?'' परीक्षकांनी सुनेला विचारलं तशी ती म्हणाली, ''होय, मी अटी मान्य केल्या, पण म्हणून थोडीसुद्धा मदतीची अपेक्षा ठेवायची नाही का?'' हे ऐकून परीक्षक म्हणाले की, याचा निर्णय नंतर देऊ या.

पुढची सासू-सुनेची जोडी होती, सुनिधी आणि विजयाताईंची. सुनिधी म्हणाली, ''आमचा प्रेमविवाह झाला आहे. मी खेळाडू आहे. लग्न झाल्यावरसुद्धा मला खेळायची परवानगी दिली पाहिजे या अटीवर मी लग्न केलं. आमची मुलगी वर्षाच्या आतली होती तोपर्यंत मी परदेशातच काय अगदी भारतातसुद्धा खेळले नाही आता लेक एक वर्षाची होऊन गेलीय तरीदेखील मला सासरकडून खेळायची परवानगी मिळत नाही. अशा वेळेस मी माझ्या लेकीला माहेरी आईवडिलांकडे ठेवते.'' त्यावर विजयाताई म्हणाल्या, ''आम्ही हो म्हणालो खरं, पण आमचं म्हणणं आहे की, नात तीन वर्षाची झाली की मग जा. 'आईच हवी' असं म्हणत रडू लागली तर आई कुठे गेलीय हे समजून सांगण्याचं तिचं वय नाही याकारणासाठी आम्ही तिला जाऊ देत नाही, यात समानतेचा प्रश्न येतो तरी का? आमच्याजवळ असते त्यावेळी तिला आई दिसत असते, पण दिवसभर दिसलीच नाही तर मात्र रडून- रडून दमून काहीही न खाता झोपून जाते. सांगा तुम्हीच आता!'' परीक्षक म्हणाले, ''आम्ही यावर विचार करून निर्णय देऊ. चला, पुढची जोडी, राधा आणि सुमनताई यांनी यावं.'' राधा बोलू लागली, ''माझ्या मुलाची सुमीतची सकाळची शाळा असते, नवऱ्याला ऑफिसला जायची घाई असते. या दोघांसाठी डबा करून देण्यासाठी माझी धांदल उडालेली असते. या धांदलीत तीन वर्षांची छोटी सुलूही लवकर उठून बसते. माझी उडालेली धांदल पाहून सासूबाई मला मदत करायच्या ऐवजी देवपूजा करायला बसतात. त्यांना म्हणते की, सुलूला मांडीवर घेऊन जप कराल का? तर सरळ नाही म्हणतात. सासऱ्यांना सांगून बघितलं की ''तुम्ही मार्निंगवॉकला नंतर जाल का?'' तर ते म्हणतात की, आमच्या मित्रांची हीच वेळ आहे भेटण्याची. आम्ही दोघांनी मुलं सांभाळूनच नोकरी केली. आता आम्हाला आमच्या मनासारखे वागू देत. काय बोलणार?'' त्यावर सासूबाई सुमनताई म्हणाल्या, ''रोज संध्याकाळी पाच वाजता दोन्ही नातवंडांना घेऊन आम्ही इथल्या बागेतल्या झोपाळा, घसरगुंडीवर खेळायला घेऊन जातो. हे सगळं कशासाठी करतो? तर दमून आलेल्या मुलाला आणि सुनेला निवांतपणा मिळावा म्हणूनच ना? यात काय चुकीचं वागतोय का आम्ही?''

पुढच्या पाच सासू-सुनेच्याही थोड्याफार अशाच प्रकारच्या तक्रारी होत्या. जवळ जवळ सगळ्याजणीच या विषयावर तावातावाने बोलत होत्या. शेवटची नावे उच्चारली गेली होती ती, सुमा आणि तिच्या सासूबाई वंदनाताई यांचं. पण सुमा म्हणाली की, ''मी तर या स्पर्धेसाठी माझं नावच दिलं नव्हतं मग नाव कसं काय वाचलं गेलं?'' त्यावेळी मंडळाच्या सचिव रेणुका म्हणाल्या, ''आजवरच्या सर्व स्पर्धांमधे तू भाग घेत आली आहेस त्यामुळे यंदाही भाग घेशीलच असा विचार करून तुला न विचारताच तुझे नाव घातलं. सुमा व्यासपीठावर आली. व्यासपीठ, परीक्षक आणि सर्वांना नमस्कार करत म्हणाली, ''आपल्या स्पर्धेचा विषय आहे, 'स्त्री-पुरूष समानता'. माझ्या माहेरी काय अन् सासरी काय मला स्त्री-पुरुष समानता हवी हे कधीच लक्षातही आलं नाही. माहेरी होते तेव्हा वरच्या मजल्यावर पाणी चढायचं नाही, मग माझे भाऊ पंपाने हापसून पाणी भरत असत. अगदी दळण आणायलासुद्धा आम्हाला पाठवत नसत तेच आणत. आम्ही आणि आमचे आईवडीलसुद्धा आपापले कपडे, जेवणाचे ताट, वाटी, भांडे धुवून टाकायचो. केरसुद्धा वेळ मिळेल तो काढत असे. माझे वडील नोकरी करत होते तरीदेखील आईला घरकामात मदत करत. माझं लग्न झाल्यावर माझ्या सासूबाई मला म्हणाल्या होत्या, '' एखाद्या दिवशी भांडी साफ करणाऱ्या मावशी आल्या नाहीत तर घरातले सगळेजण आपापले ताट, वाट्या, भांडे धुवून टाकतात अगदी आम्ही दोघेसुद्धा. स्वयंपाकाची भांडी आपण दोघी मिळून घासून टाकू हाच नियम केर काढणाऱ्या मावशी आल्या नसतील तेव्हासुद्धा लागू होतो बरं! त्यामुळे मला माहेरी काय अन् सासरी आल्यावर काय स्त्री-पुरुष समानता हवीच हे कधी जाणवलंच नाही. माझं लग्न झाल्यावर माझी नणंद म्हणजे नवऱ्याची धाकटी बहीण, त्यावेळी तिचं लग्न व्हायचं होतं. पण आमचं नातं अगदी मैत्रिणींसारखंच होतं आणि आजही अगदी तसंच आहे. मग सुमाच्या सासूबाई वंदनाताई सर्वांना नमस्कार करत म्हणाल्या, ''खरंतर, सुमाच्या घरी आम्ही पहिल्यांदाच गेलो होतो तेव्हा तिचे भाऊ-भावजय, आई-वडील सर्वजण एकत्रित कामं करत होती म्हणजे एका भावाने आम्हाला पाणी आणून दिलं तर दुसऱ्यानं पोहे दिले. त्यावेळी भावजया, हिची आई आमच्याशी गप्पा मारत बसल्या होत्या. नंतरचा चहा हिच्या वडिलांनी आणून दिला हे पाहून आम्ही आश्चर्यचकितच झालो. विचारलं तेव्हा कळलं की पोहे, चहा आदी सकाळची तयारी घरातील स्त्री वर्गाने केला होता, त्यामुळे घरातील पुरुषांनी ते देण्याचं काम केलं. आम्ही घरी आलो अन् यावर विचार केला आणि आम्हाला ही समानता आवडली. माझ्या सुनेकडून आम्हाला खूप शिकायला मिळतं, याचा आम्हाला कमीपणा कधीच वाटला नाही.?'' त्या आनंदाश्रू टिपत खाली बसल्या.

यावेळच्या परीक्षक म्हणून सासू-सुनेचीच जोडी होती. सून वैभवी म्हणाली, ''आपल्या स्पर्धेच्या विषयावर आम्ही मत व्यक्त करण्यापेक्षा सुमा आणि तिच्या सासूबाई वंदनाताई यांनी त्यांच्या घरातील समानतेविषयी जी मतं व्यक्त केली आहेत. हा आदर्श तर आहेच पण स्त्री-पुरुष समानतेचा एक उत्तम संस्कारही आहे. त्यामुळे योग्य जोडी कोण हे सांगायची गरजच नाही. बाकीच्या जोड्यांचे काय चुकले हे सांगण्याचीसुद्धा गरज नाही. तुमच्या प्रत्येकीच्या घरात सुमा-वंदनाताईंसारखी समानता नांदेल यात शंकाच नसेल. तर दुसऱ्या परीक्षक वैभवीच्या सासूबाई म्हणाल्या, ''मला एक गोष्ट आवर्जून सांगायची आहे ती म्हणजे वंदनाताईंनी मोकळेपणाने सुमा आणि तिच्या माहेरच्यांचे सर्वांसमोर केलेले मनापासून कौतुक, यासाठी खूप मोठं मन लागतं आणि सुमानंसुद्धा माहेरचाच आदर्श सासरच्यांनी घेतला आहे, याचा चुकूनसुद्धा उल्लेख केला नाही. याच कारणासाठी या जोडीला आदर्श सासू-सुनेची जोडी हे खास बक्षीस!'' हे ऐकल्यानंतर सोसायटीच्या हॉलमध्ये फक्त टाळ्यांचा कडकडाट ऐकू येत होता.

◆ sujataalhad@gmail.com

# लहरा दो...

पान १ वरून

कसोटी लागेल. राष्ट्रकुल स्पर्धेचा दर्जा या स्पर्धांच्या मानाने थोडा कमी मानला जातो. त्यामुळे या खेळाडूंनी व त्यांच्या चमूने या स्पर्धेतील कामगिरीवर संतुष्ट न राहता आशियाई आणि जागतिक पातळीवर सर्वोत्कृष्ट कामगिरी कशी करता येईल याकडे लक्ष देणे श्रेयस्कर ठरेल. आपल्या खेळाचे प्रशिक्षकांबरोबर विश्लेषण करणे, लागेल तशी वैज्ञानिक मदत घेणे, पुढचे ध्येय ठरवून त्या दिशेने अथक प्रयत्न करणे हे कोणत्याही खेळाडूला सतत करावे लागते. प्रत्येक पदकासाठी मोठे



साक्षी चौधरी

आर्थिक पाठबळ लागते. जरी यासाठी बऱ्याच सरकारी योजना राबविल्या जात आहेत, तरी लक्ष्मी ज्यांच्यावर प्रसन्न आहे अशा दानशूर व्यक्तींनी आणि संस्थांनीसुद्धा या कामासाठी पुढे येण्याची जरूर आहे. योग्य वयात गुणवत्ता हेरणे, त्याचे संगोपन करणे, खेळाडूंना खेळ संपल्यावर आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण आणि अर्थपूर्ण आयुष्य जगण्याची सोय अशी समाजपद्धती भारतात निर्माण होण्याची गरज आहे.

राष्ट्रकुल पदक विजेत्यांचे वाजत-गाजत झालेले स्वागत, प्रसारमाध्यमे व समाजमाध्यमे यांनी त्यांना दिलेली प्रसिद्धी, अनेक स्तरांवर मिळालेली कौतुकाची थाप, त्यांना जाहीर झालेली बक्षिसे या सर्वांचा भारतीय क्रीडाक्षेत्रावर नक्कीच सकारात्मक परिणाम होईल. आजच्या घडीला, ज्या खेळांची पाळेमुळे भारतात रुजली आहेत अशा खेळांमधून प्रत्येकी जेमतेम दोन-तीन युवा स्त्री खेळाडू पुढे येताना दिसतात. भविष्यात अशा खेळाडूंची फळी निर्माण होण्यासाठी या प्रसिद्धीचा फायदा होऊ शकतो. तसेच जे खेळ आजवर भारतात दुर्लक्षित आहेत, त्यात भविष्य घडवण्याची जिद्द एखाद्या मुलीत यामुळे निर्माण होऊ शकते. कदाचित यशस्वी खेळाडूंच्या कहाण्या वाचून लहान गावातील अथवा सर्वसाधारण आर्थिक परिस्थितीतील कुटुंबे, दिव्यांग मुलींची कुटुंबे आपल्या मुलींना क्रीडाक्षेत्रात जाण्यासाठी पाठिंबा देण्यास प्रभावित होऊ शकतील.

प्रीती पवार प्रमाणे यशस्वी खेळाडूंच्या अशा कौतुकामुळे खेळाकडे वळलेल्या आणि यशस्वी ठरलेल्या आणखी एका स्त्री खेळाडूचे उदाहरण आपल्याला या राष्ट्रकुल



प्रिया घंघास

स्पर्धेतच बघायला मिळेल. ते आहे पाकिस्तानसाठी बॉक्सिंगमध्ये स्त्रियांसाठी पहिले राष्ट्रकुल पदक मिळविणाऱ्या फातिमा झाहरा हिचे! पाकिस्तानातील पंजाब प्रांतातून आलेली फातिमा केवळ दहा वर्षांची असताना सुप्रसिद्ध भारतीय मुष्टियोद्धा मेरी कोम हिच्या आयुष्यावर आधारित हिंदी चित्रपट पाहून इतकी प्रभावित झाली की मेरीला आदर्श मानून तिने बॉक्सिंग हे तिचे ध्येय ठरवले. तिच्या अडथळ्यांना कुटुंबातील विरोधापासून सुरुवात झाली. पण मेरीने जशी सर्व अडथळ्यांवर मात केली, तशीच आपण करायची या जिद्दीने प्रेरित झालेल्या बावीस वर्षीय फातिमाने कठोर सरावाअंती या राष्ट्रकुल स्पर्धेत कांस्य पदक पटकावले. आज प्रथितयश भारतीय स्त्री खेळाडू भारतातीलच नव्हे तर जगभरातील मुलींच्या प्रेरणास्थान बनल्या आहेत ही भारताच्या दृष्टीने निश्चित अभिमानाची बाब आहे.

◆ gokhale. anupama@gmail.com



## लोकसंस्कृ‘ती’

■ डॉ. तारा भवाळकर

# स्त्री सखा श्रावण

**स्त्रियांना एकदा लग्न होऊन सासरी आलं की बाहेर पडायला, मनमोकळं, मुक्तपणे नाचायला, गायला सहसा मिळत नसे. त्या काळातले, श्रावणातील असे अनेक सण स्त्रियांना अभिव्यक्त व्हायला निमित्त व्हायचे. श्रावणातल्या कहाण्या, मंगळागौर, नागपंचमी असो किंवा नारळीपौर्णिमा... फुगड्या, झिम्मा, फेराची गाणी यांनी अंगण दणाणून जायचं. अनेक खेळ, विविध प्रकारच्या फुगड्या... दंड फुगडी, धसर फुगडी, अगोटा-पागोटा, खुंटण मिरची असे नानाविध खेळ खेळताना श्रावणच स्त्रियांचा सखा होऊन जातो.**

आषाढाच्या पावसाचे धारा नृत्य आता मंदावलेले असते. श्रावणसरीचा ऊन-पावसाचा खेळ सुरू झालेला असतो. महिना-दीड महिना जोरदार झालेल्या पावसामुळे जलाशय तुडुंब भरलेले असतात. जमीन भिजलेली असते. पिकं बहरायला लागलेली असतात. ओला गारठा हवेमध्ये साचून राहतो आणि त्याच सुमारास श्रावण येतो...

श्रावण महिन्यासाठी लागणाऱ्या गोष्टींची बरीचशी तयारी स्त्रिया आधीपासूनच करून ठेवायच्या. भाजण्या भाजून ठेवणं, नागनरसोबाच्या चित्राचे कागद आणून ठेवणं, श्रावणी अमावास्येच्या दीपपूजनासाठी समया उजळणं, काही फराळाच्या वस्तूंची तयारी करून ठेवणं, श्रावणातल्या कहाण्यांची पुस्तकं शोधून ठेवणं अशी निरनिराळ्या प्रकारची पूर्वतयारी स्त्रिया करायच्या. श्रावणात मुलं-बाळं झोपेतून उठण्याआधी स्त्रिया उठून कामाला लागलेल्या असायच्या किंवा त्यांची कुठलीशी पूजा चालू असायची. श्रावणामधला आठवड्यातला प्रत्येक दिवस महत्त्वाचा. श्रावणात उपवास भरपूर, म्हणजे सोमवारचा उपवास सगळ्यांना असायचाच, शुक्रवारचा उपवासही स्त्रिया करायच्या, शनिवारचा उपवास अगदी मुला-बाळांसोबत सगळेच करायचे आणि त्यासाठी फराळाचे पदार्थ खूप करायला लागायचे.

त्यातले काही उपवास मजेशीर असायचे, त्याला ‘धान्य फराळ’ असं म्हणायचे. धान्य-फराळ म्हणजे भाजणीचे पदार्थ. धान्य भाजून किंवा त्याचं पीठ भाजून केलेले पदार्थ. मग ती दशमी किंवा भाकरी असली तरी चालायची, पण पीठ भाजलेलं असलं पाहिजे. थालीपीठं पुष्कळ प्रकारची असायची आणि त्यामुळे धान्य-फराळाला असे बरेच पदार्थ असायचे. एरवीचे उपवास तर असायचेच, शिवाय श्रावणी सोमवार, शुक्रवार, शनिवार हे सगळ्यांच्या उपवासाचे दिवस.

आम्हीसुद्धा करायचो.

स्त्रियांच्या कहाण्या सुरू असायच्या. दररोज एका देवाची खास पूजा असायची. पहिल्यांदा गणपतीची कहाणी सांगितली जायची. एक स्त्री कहाणी वाचायची, बाकीच्या ऐकायच्या. बहुतेक सगळ्यांना कहाण्या पाठच असायच्या. गणपतीची कहाणी सुरू व्हायची, निर्मळ मळे, उदकाचे तळे, बेलाचा वृक्ष, सुवर्णाची कमळे, विनायकाची देवळे रावळे, अशी टप्प्याटप्प्याने छोटी-छोटी वाक्ये ज्याला ताल-लयीचे घुंगरू बांधून भाषा पुढे चालावी अशा प्रकारच्या त्या कहाण्या असायच्या. छोटी-छोटी वाक्ये आणि नेमकं वर्णन करणारी स्त्रियांच्या बोलण्याची शैली. ‘‘मनाचा गणेश मनी वसावा. हा वसा कधी घ्यावा? श्रावण चवथीला घ्यावा, माही चवथीला पूर्ण करावा,’’ अशी ती कहाणी असायची. ती सगळी काही आता सांगत नाही, पण त्याचा शेवट ‘अल्पदान महापुण्य असा गणराज मनी ध्याईजे, मनी पाविजे, मनोकामना पूर्ण करीजे, हे साठा उत्तराची कहाणी साठा उत्तरी सुफळ संपूर्ण.’ असा असायचा. आणि ‘साठा उत्तरी सुफळ संपूर्ण’ हे वाक्य प्रत्येक कहाणीच्या शेवटी येतंच.

सोमवार झाला की मंगळवार. मंगळवारी, ब्राम्हण समाजातील त्या वर्षीची जी नवरी मुलगी असेल, तिची मंगळागौर असायची. त्याच्या आधी सोमवारच्या दिवशी नववधू शंकराच्या देवळात जाऊन शिवामूठ वाहात असत. शिवामूठ म्हणजे, काही ठरलेली धान्य असतात, तांदूळ, उडीद किंवा तीळ वगैरे ते शंकरापुढे वाहायचं आणि त्याच्यासाठी त्या म्हणायच्या,

‘‘शिवा शिवा महादेवा
माझी शिवामूठ ईश्वरादेवा,
सासू-सासऱ्या दिरा जावा नणंदाभावा
भरतारा सगळ्यांना सुखी ठेव रे देवा
नावडती आहे ती
आवडती कर रे देवा.’’

असं म्हणून ती शिवामूठ वाहायची. असं केल्यानं काय होतं? तर नावडती, आवडती होते, शिवशंकर तिला प्रसन्न होईल असा तिला विश्वास असायचा. मंगळागौरीला तिच्या आरतीमध्येच वर्णन केल्याप्रमाणे ‘‘नानापरीची पत्री, जाई, जुई, अबई (म्हणजे अबोली), शेवंती, नागचाफा, पूजेला गं आणती, आरती मंगळागौरी...’’ असं मंगळागौरीमध्ये वर्णन केलं जातं. श्रावणात खूप प्रकारची पानं, फुलं फुललेली असतात, ती सगळी पूजेला आणतात, पत्री (पाने) फुले आणून मंगळागौरीची पूजा सजवली जाते.




श्रावणात जिवती आणि नागनरसोबाच्या कागदांची पूजा केली जाते

सत्यनारायणाच्या पूजेसारखा चौरंग मांडला जातो. तसा या पूजेला मांडला जातो. त्याच्यात देवीची स्थापना केली जाते. तिची साग्रसंगीत पूजा होते. पुरोहित संकल्प सांगत असतात. मुली भोवताली बसलेल्या असतात. मुली म्हणजे लग्न होऊन पाच वर्षं पूर्ण न झालेल्या नव्या नवऱ्या. नटून-थटून येतात. त्या सगळी पूजा करतात, शेवटी आरती करतात. नैवेद्य दाखवतात आणि दुपारी सगळ्यांचं जेवण होतं. कोणी उपवासाचं धान्य-फराळ घेते.

मंगळागौरीचं आणखी एक महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे रात्रीचं जागरण. अनेक स्त्रियांच्या सणांमध्ये जागरण आणि खेळ हा महत्त्वाचा मुद्दा आहे. म्हणून आजही त्याला ‘मंगळागौरीचे खेळ’ असं म्हणतात. ते मंगळागौरीचे असतात, नागपंचमीचे असतात, दुसऱ्या कुठल्याही उत्सवाचे असतात, संध्याकाळ झाली की, स्त्रिया अंगणामध्ये जमतात आणि फुगड्या, झिम्मा, फेराची गाणी म्हणणं सुरू होतं. आणि त्या फुगड्यांमध्ये निरनिराळ्या प्रकारचे उखाणे घेतले जातात. त्यात नागपंचमीचेही खेळ असतात. ग्रामीण भागामध्ये नागपंचमीचं महत्त्व अशासाठी असायचं की, नव्या नवरीला माहेरी न्यायला कोणी सारखं सारखं यायचं नाही. म्हणून माहेरून बहुधा भाऊ तिला नेण्यासाठी येत असे. त्याला मुराळी म्हणायचे. तिचा मुराळी, तो तिचा भाऊ असेल, काका असेल किंवा आणखी कोणी असेल. त्याचं वर्णन स्त्रिया निरनिराळ्या गाण्यांमधून किंवा ओव्यांमधून करताना म्हणतात,

*‘‘मी गं भैयाला सांगईते
बारा सणाला नेऊ नको,
पंचमीला रे ठेवू नको.’’*

थोडक्यात, ‘‘मला बारा सणांना नाही नेलं तरी चालेल पण पंचमीला मात्र मला नेल्याशिवाय राहू नकोस.’’

त्यानंतर गोकुळाष्टमी येते. त्यावेळी नारळीपौर्णिमा, रक्षाबंधन, नागपंचमी असे सगळे सण एकापाठोपाठ येत असतात, त्यामध्ये ‘नागचौथ’ हा प्रकार, म्हणजे नागपंचमीचा आदला दिवस. बहिणीने त्या दिवशी डोक्यावर पाणी घेऊन अंघोळ करायची नाही. दर शुक्रवारी जिवतीची पूजा असते, तिला ‘जीवंतिका’ असं म्हणतात. बाळांना आणि बाळंतिणींना सुखरूप ठेवणारी ही देवता, ती जिवती आणि तिचे नागनरसोबाचे रंगीबेरंगी कागद असतात. त्याच्याभोवती बसून लेकुरवाळ्या स्त्रिया तिची पूजा करतात. अशा प्रकारची व्रत-वैकल्ये श्रावण महिन्यात चालू असतात. ६४ योगिनींचा कागद लावून त्याचीही पूजा होत असे. अखेर नागपंचमी यायची.

*‘‘आली आली गं पंचमी.
आली आली गं पंचमी,
भाऊ आला गं मुराळी,
बंधू आला गं मुराळी,’’*

स्त्रिया या दिवशी वारुळाला जायला निघतात कारण वारुळामध्ये नाग असतो. त्याच्या घराची म्हणजे वारुळाची पूजा करायची त्यामुळे ती गाणी असायची,

*‘‘चल गं सये वारुळाला
नागोबाला पूजायाला.’’
पृथ्वी झेली नागराज,
त्याची पूजा चाले आज’’*

तेव्हा जणू काही तो पृथ्वी झेलणारा नागराज आहे, कारण शेषाच्या फण्यावर पृथ्वी उभी आहे, असा समज आहे.

निरनिराळ्या फुगड्या, झिम्मा, गाणी यांनी अंगण दणाणून जाते आजही. त्यात ‘नाव घेणं’ हा एक छान कार्यक्रम असायचा. म्हणजे नवऱ्याला नावाने हाक मारायची नाही. पूर्वी असा समज होता की, आपल्या प्रिय माणसाला त्याच्या पाळण्यातल्या नावाने हाक मारली की, त्याचं आयुष्य कमी होतं. त्यामुळे नवऱ्याला त्याची बायको त्याच्या नावाने हाक मारत नसे. म्हणून विशेष प्रसंगी उखाणा घेऊन त्यात नवऱ्याचं नाव गुंफून त्या ते घ्यायच्या. शिक्षण घेतल्यानंतर काही जणी मजेशीर उखाणे घ्यायला लागल्या. नमुना म्हणून सांगते. ‘खुंटण मिरची’ नावाचा खेळ असायचा, म्हणजे बायकांनी गोलाकार उभं राहायचं. आणि त्यामध्ये एका नव्या नवरीला घेऊन प्रश्न विचारायचे,

*‘‘खुंटण मिरची, जाशील कैशी?
खुंटण मिरची, जाशील कैशी?’’*

तिथून सुटण्यासाठी तिने उखाणा घ्यायचा. मग एखादी मुलगी छोटासा उखाणा घ्यायची, ‘‘द्राक्षाच्या वेलाला त्रिकोणी पान, पंचमीच्या सणाला, अमक्या-तमक्याचं नाव घेऊन राखते सर्वांचा मान.’’ बायकांना थोडं इंग्रजी यायला लागलं, त्यावेळी त्या आपलं इंग्रजी ज्ञान पाजळत म्हणायला लागल्या, ‘‘इंग्रजीमध्ये चंद्राला म्हणतात मून, अमक्या-तमक्याचं नाव घेते, अमक्या-तमक्याची सून.’’ तर खेड्यातली बाई लांबलचक उखाणा घ्यायची. ज्यामध्ये नवऱ्याचं नाव नेमकं कुठे आलं ते कळू नये. त्यातला एक नमुना ‘‘अजगरात माजघर, माजघरात स्वयंपाकघर, स्वयंपाकघरात चूल, चुलीवर तवा, तव्यात परात, परातीत भात, भातावर तूप, तुपासारखं रूप, रूपासारखा चीरेबंदी वाडा, उठा उठा राव, (नवऱ्याचं नाव) उठा उठा राव, पंचमी आली, काम सोडा आणि आधी मला माहेरी धाडा.’’ किंवा काही बायकांच्या उखाण्यात रखुमाई म्हणते, ‘‘विठ्ठल देवा, काम सोडा, आणि आधी मला माहेरी धाडा,’’ असं करून त्या नवऱ्याचं नाव घ्यायच्या.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे पंचमीला झाडांना झोपाळे बांधायचे आणि त्यावर मनसोक्त झोके घ्यायचे, हे बायकांच्या मन मोकळं करण्याचं, शरीर मोकळं करण्याचं, बाहेरचा आनंद लुटायचं एक साधन असतं. पण या नागपंचमीच्या कहाणीमध्ये सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे नागपंचमीतील जे नाग आहेत, ते आपले बंधू आहेत अशा प्रकारची भावना. त्याची एक कहाणी आहे, एक तरुणी होती. एक दिवस तिचे वडील शेत नांगरायला लागले. नांगरता नांगरता तिथल्या वारुळाला नांगराचा धक्का लागून त्यामधली नागाची पिल्लं मारली गेली. त्यामुळे पिल्लांची आई, नागीण संतापली आणि म्हणाली, ‘‘ज्यांनी कोणी माझी मुलं मारलेली आहेत, त्याचा मी निर्वंश करीन.’’ असं म्हणून तो नाग, नागीण त्या लोकांना शोधायला निघाले. त्यावेळी त्या शेतकऱ्याची मुलगी नागोबाची पूजा करत होती. पाटावर रांगोळीचे नाग काढले होते. काही ठिकाणी भिंतीवर गंधाने नाग काढले होते. पूजा करताना ती सांगत होती, ‘‘माझे लांडोबा-पुंडोबा भाऊ जिथे कुठे असतील तिथे सुखात ठेव.’’ त्याच वेळी नाग, नागीण तिथे पोहोचले. त्यांनी ती प्रार्थना ऐकली. नाग-नागिणीच्या लक्षात आलं की, हिला आपल्या वंशाबद्दल आदर आहे. तिच्या वडिलांच्या हातून चुकून आपली पिल्लं मारली गेली. आपण त्यांचा निर्वंश करायला नको. नाग-नागीण प्रसन्न झाले. अशा तऱ्हेने त्या मुलीने आपल्या वडिलांचा वंशही वाचवला आणि नागाला कायमचा बंधू करून ठेवला.

नागपंचमीनिमित्ताने नाग बंधू म्हणून स्त्रीच्या जीवनामध्ये आला, त्याची अनेक गाणी आणि कथा भारतीय परंपरेमध्ये आहेत.

◆ chaturang@expressindia.com

---



## गुप्त तिची सावली

■ अपर्णा देशपांडे

# स्वातंत्र्यदेवतेसाठी हेरगिरी

**सर्वात कमी वयाच्या भारतीय गुप्तहेर ठरलेल्या सरस्वती राजमणी. खूप लहानपणीच नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा विश्वास संपादन करून त्या ‘आझाद हिंद सेने’त काम करू लागल्या. यातूनच त्यांनी एकदा नेताजींचे प्राणही वाचवले. त्यांच्याविषयी...**



‘स्वातंत्र्य देवता चिरायू होवो! भारत माता की जय!’ अशा घोषणा देणाऱ्या आपणा सर्वांना ही जाणीव नक्कीच हवी की हे सार्वभौमत्व आपल्याला अलगद आंदणात मिळालेलं नाही. किती लाख भारतीयांनी त्यासाठी कसं आणि कुठल्या प्रकारचं बलिदान दिलं आहे याची कल्पना आपल्याला येऊ शकत नाही. आपल्या वैयक्तिक आयुष्याचा पूर्णपणे त्याग करून फक्त देशासाठी वाहून घेणारे लोक होते म्हणून देश स्वतंत्र झाला, असे लोक होते आणि आहेत म्हणून आज आपण निवांत सुखाचा घास खातोय.

देशासाठी फक्त लढणाऱ्याच नाही तर ब्रिटिशांच्या तळात जाऊन हेरगिरी करणारी एक असामान्य स्त्री म्हणजे सरस्वती राजमणी! १९२७ चा काळ. भारतात स्वातंत्र्यसंग्रामाने वेग घेतलेला होता. तेव्हा बर्मामधील (सध्याचं म्यानमार) तत्कालीन यंगून (रंगून) शहरात, ११ जानेवारीला एका श्रीमंत तमिळ देशभक्त कुटुंबात एका तेजस्वी मुलीचा जन्म झाला. मुलीचं नामकरण झालं, राजमणी! त्यावेळी ब्रिटिशांपासून बचाव करण्याच्या उद्देशाने तिच्या वडिलांनी त्यांचा व्यवसाय भारतातील त्रिचुर येथून बर्मा येथे स्थलांतरित केला होता. त्याकाळात भारतीय लोक मोठ्या संख्येने बर्मा येथे स्थलांतरित झाले होते. (१९८९ मध्ये बर्माचं अधिकृतपणे म्यानमार असं नामकरण करण्यात आलं.)

स्वातंत्र्यसंग्रामात आपलं योगदान म्हणून ते भारतीय सेनानींना फार मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत करत असत. अशा कुटुंबात जन्म घेतलेल्या राजमणीला देशभक्तीचं बाळकडू घरातूनच मिळालं होतं. आपल्यावरील परकीय सत्ता उलथवून टाकल्याशिवाय देशाला मुक्ती नाही हे त्यांच्या मनात पक्कं झालं होतं. एकदा महात्मा गांधी रंगून येथे आले असताना राजमणीच्या वडिलांना भेटायला आले होते. घरातील सगळी मंडळी त्यांच्याभोवती जमा झालेली असताना छोटीशी राजमणी मात्र अंगणात बंदूक घेऊन नेम साधण्याचा सराव करत होती. गांधीजींनी तिला कारण विचारलं, तेव्हा ती म्हणाली की, आपल्या भगतसिंग, राजगुरू यांना मारणाऱ्या ब्रिटिशांना ठार मारण्यासाठी मी हा सराव करतेय. त्यावेळी ती केवळ दहा वर्षांची पोर होती. त्यानंतरच्या काळात राजमणी यांनी रेडिओवर नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे समाजाला पेटून उठवणारे भाषण ऐकले. त्यांचे काही छापून आलेले लेखही वाचले आणि त्या प्रचंड प्रभावित झाल्या. आता आपलं उर्वरित आयुष्य त्यांच्या कार्यात हातभार लावण्यासाठीच असेल हे त्यांनी ठरवून टाकले. नेताजींनी स्थापन केलेल्या ‘आझाद हिंद सेना’ (इंडियन नॅशनल आर्मी’साठी जनतेकडून मदतीचे आवाहन करण्यात आले तेव्हा क्षणाचाही विचार न करता त्यांनी आपले स्वतःचे सगळे दागिने सेनेला देऊन टाकले. नेताजींना जेव्हा याबद्दल समजलं तेव्हा ते त्यांच्या घरी गेले आणि ते दागिने परत घेण्याबद्दल विनंती केली. आपण ज्यांना आपला आदर्श मानतो असे नेताजी खुद्द घरी आलेले बघून त्या कोण हरखल्या, परंतु दागिने परत न घेता त्यांनी उलट नेताजींनाच त्यांच्या ‘आझाद हिंद सेने’त मला सामील करून घ्या अशी विनंती केली. इतक्या कोवळ्या वयात या मुलीचा प्रखर राष्ट्रवाद त्यांना अचंबित करून गेला. ते म्हणाले, ‘‘एखाद्याच्या आयुष्यात संपत्ती म्हणजे लक्ष्मी कायम वास करून राहीलच असं नाही, पण सरस्वती म्हणजे विद्या आणि ज्ञानाचा वास मात्र कायम असतो म्हणून आजपासून तुझं नाव सरस्वती.’’ अशा प्रकारे त्या बनल्या, ‘सरस्वती राजमणी’.

सरस्वती यांनी लवकरच आपले प्रशिक्षण पूर्ण करून ‘आझाद हिंद सेने’साठी अनेक कामं केली. त्यांचे चातुर्य, धाडस आणि समर्पणभाव बघून नेताजींनी त्यांच्यावर एक मोठी कामगिरी सोपवली. त्या काळात बर्माच्या रणभूमीवर दुसऱ्या महायुद्धाची धग वाढली होती. एका बाजूला ब्रिटिश फौज तर दुसऱ्या बाजूला स्वातंत्र्य लढा धगधगत असताना ‘आझाद हिंद सेना’ त्यांची पूर्ण ताकद लावून इंग्रजांशी लढत होती. ‘आझाद हिंद सेने’साठी गुप्तपणे जाऊन ब्रिटिशांच्या गोटातून अत्यंत महत्त्वाची बातमी आणि त्यांच्या पुढील योजना याबद्दल माहिती काढून आणण्याची जबाबदारी त्या, नीरा आर्य (याच सदरातील ‘नागीण’ या लेखात आपण त्यांच्याबद्दल जाणून घेतलं आहे.) आणि त्यांच्या सोबत त्यांची मैत्रीण दुर्गामल गोरखा यांच्यावर सोपवण्यात आली. थोर स्वातंत्र्यसेनानी डॉ. पवित्र मोहन रॉय यांनी त्यांच्या गुप्तचर विभागात या मुलींना भरती करून प्रशिक्षण दिलं होतं. त्यानंतर हेरगिरीसाठी केस कापून मुलग्याचा वेश धारण करून त्यांना सफाई कर्मचारी आणि ब्रिटिश अधिकारी यांचे स्विय मदतनीस म्हणून सरळ सरळ ब्रिटिश छावणीत पाठवण्यात आलं. मुलग्याच्या वेशातील सरस्वती यांचे नाव होतं, मणी. कामगिरी अत्यंत जोखमीची होती. त्यांना जराही संशय आल्यास संपूर्ण ‘आझाद हिंद सेना’ धोक्यात येण्याची शक्यता होती.

सरस्वती अशा धडाडीच्या कामगिरीची वाटच बघत होत्या. ब्रिटिश अधिकाऱ्यांचे बूट पॉलिश करणं, पलंगावरील चादरी बदलणं, परिसर स्वच्छ करणं, चहा किंवा पेय नेऊन देणं, अशी कामं जाणीवपूर्वक स्वीकारून अनेक आतल्या गोटातील गोपनीय बातम्या आणि माहिती त्या ‘आझाद हिंद सेने’कडे पोचवत असतं. अधिकाऱ्यांच्या घरात काय चर्चा होत असे? ते अधिकारी गणवेश घालून कुठं जाणार आहेत? शस्त्र साठा कुठे असणार आहे? अशा चर्चा होत असताना ती माहिती मिळणं फार महत्त्वाचं होतं. शत्रूच्या गुप्त बातम्या मिळतात तेव्हा कमी ताकदीत जास्त परिणामकारक विजय मिळत असतो, हे इतिहासानं वारंवार सिद्ध झालं आहे.

मदतनीस म्हणून अधिकाऱ्यांच्या घरात वावरताना त्यांना जराही शंका न येऊ देता हेरगिरी चालू ठेवणं सोपं नक्कीच नव्हतं. जीवाची पर्वा न करता त्या अधिकाऱ्यांच्या अवतीभवती राहून त्यांच्या पुढील हल्ल्याची आणि योजनेची माहिती मिळवत. थोडाथोडका नाही तर जवळपास दोन वर्षांचा काळ त्यांनी हेरगिरी केली. कधी नर्तकी, तर कधी तृतीयपंथी व्यक्ती असे वेशांतर केल्याचेही उल्लेख आहेत. ‘आझाद हिंद सेना’ इंग्रजांसाठी मोठी डोकेदुखी ठरत होती. त्यामुळं १९४३ मध्ये नेताजींच्या हत्येचा विचार इंग्रजांच्या मनात येणं यात आश्चर्य कोणतं? नेताजी भारतीय सीमेजवळ येणार ही बातमी ब्रिटिशांना मिळाली तेव्हा त्यांना संपवण्याची योजना आखण्यात आली होती. त्यांच्या हत्येच्या कटाविषयी चर्चा होत असताना त्याची कुणकुण पुरुष वेशातील सरस्वती यांच्या कानावर पडली. रात्रीच्या वेळी काम आटोपून त्यांनी धावत मोठं अंतर कापून ती बातमी त्यांच्या गोटापर्यंत पोचवली होती. त्यावेळी त्यांच्या तीक्ष्ण बुद्धीनं वेळीच धोका ओळखला म्हणून नेताजी सावध झाले आणि घातक हल्ल्यापासून वाचले. (पुढे नेताजींवर हल्ला करण्यासाठी आलेल्या स्वतःच्या पतीस नीरा आर्य यांनी संपवलं होतं हेही आपण सदरातील आधीच्या लेखात वाचलं आहेच.)

हे सगळं करताना एक दिवस ज्याची भीती होती ते घडलं! हेरगिरी करताना सरस्वती यांची साथीदार दुर्गामल इंग्रजी शिपायांच्या ताब्यात सापडली. सरस्वती तिथून शिताफीने निसटल्या, पण आपली साथीदार दुर्गामल यांना सोडवण्याचा त्यांनी निश्चय केला. बर्मा येथील रहिवासी असलेल्या ‘आझाद हिंद सेने’च्या एका विश्वासू माणसाला सोबत घेऊन वेशांतर करून त्या आणि नीरा पुन्हा ब्रिटिश छावणीत गेल्या. ब्रिटिशांची नजर चुकवून दुर्गाच्या कोठडीपर्यंत पोहोचल्या देखील. आपल्या कुशाग्र बुद्धीचा वापर करून त्यांनी दुर्गाला कोठडी बाहेर काढलं. (कदाचित पाण्यातून हलकी गुंगी आणणारे द्रव्य दिलं असावं) त्या थोडं पुढे चालत जात असतानाच ब्रिटिश पोलिसांच्या नजरेस पडल्या. तेव्हा त्यांनी तिथून पळ काढला. त्यांना ठार करायला बंदूकधारी सैनिक मागे धावले. कोवळ्या वयातील पोरी, धावून किती धावणार? मागून आलेली बंदुकीची गोळी सरस्वती यांच्या पायात घुसली, पण त्या थांबल्या नाहीत. नीरा यांनी एका बाजूनं खांद्याचा आधार देऊन त्यांना मदत केली. पण वेदना सहन करत त्या धावत राहिल्या आणि शिताफीने एका झाडावर चढल्या. विना अन्न-पाण्याचे तब्बल दोन दिवस त्यांनी झाडावर काढले. पायातून वाहात असलेलं रक्त खाली सांडून सैनिकांना दिसू नये यासाठी कपडा दाबून धरला होता. दोन दिवसांनी त्या खाली उतरल्या. कसंही करून त्यांना आपल्या तळावर पोहोचायचं होतं. तशा जखमी गलितगात्र अवस्थेतही सरस्वती यांनी हार न मानता आपला तळ गाठला आणि प्रचंड थकव्याने त्या तिथेच कोसळल्या.

हा अद्भुत पराक्रम करणारी ही भारतीय गुप्तहेर तेव्हा अवघी सोळा सतरा वर्षांची होती. म्हणूनच त्या सर्वात कमी वयाच्या भारतीय गुप्तहेर म्हणवल्या जातात. या कामगिरीनंतर त्यांना ‘राणी झाशी रेजिमेंट’मध्ये लेफ्टनंटपद मिळालं. सरस्वती यांच्या अतुलनीय हेरगिरी आणि शौर्याबद्दल जपानच्या सम्राटाकडून बहादुरीचं पदक आणि बक्षीस मिळालं होतं हे त्यांनी तमिळनाडूमधील एका मुलाखतीत सांगितलं होतं, ते व्हिडीओ समाजमाध्यमांवर उपलब्ध आहेत.

१९४५ मध्ये दुसरं महायुद्ध संपलं. जपाननं शरणागती पत्करली त्यानंतर ‘आझाद हिंद सेना’ बरखास्त झाली. तोपर्यंत त्या सेनेबरोबर राहिल्या. विशेष बाब म्हणजे युद्धानंतर त्या कुटुंबासोबत भारतात आल्या तेव्हा त्यांच्या वडिलांनी त्यांची सगळी संपत्ती देशासाठी दान केली. (त्यांच्या आई-वडिलांच्या शेवटच्या काळाबद्दल माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.)

अशा धनिक कुटुंबातील निःस्पृह आणि कट्टर देशभक्त सरस्वती यांच्या उत्तर आयुष्याबद्दल ऐकून मात्र मनाला यातना होतात. स्वातंत्र्यानंतर अनेक वर्षं त्यांना अनेक अडचणींना समोरं जावं लागलं. ‘आझाद हिंद सेने’च्या स्वातंत्र्यसैनिक निवृत्तिवेतनासाठी त्यांना बराच काळ संघर्ष करावा लागला. इतक्या महान गुप्तहेराबद्दल आपणा भारतीयांना फारशी माहिती नाही ही अत्यंत दुर्दैवाची बाब आहे. २००५ मध्ये म्हणजे त्या ७८ वर्षांच्या असताना तमिळनाडूच्या तत्कालीन मुख्यमंत्री जयललिता यांच्या कानावर सरस्वती यांची कहाणी आली. त्यावेळी त्यांनी सरस्वती यांना चेन्नईमधील रोयापेट्टा येथे एक विनामूल्य घर दिलं आणि आर्थिक सहाय्य केलं. त्यावेळी एका पडीक खोलीत राहणाऱ्या या स्त्रीस हक्काचं छत मिळालं. तशातही त्यांनी सेवेचं व्रत सुरूच ठेवलेलं होतं. २००६ मध्ये आलेल्या तुफानी त्सुनामीमुळे ग्रस्त झालेल्यांना त्यांनी त्यांच्या तुटपुंज्या वेतनातून जमेल तितकी मदत केली. त्यांना कोवळ्या वयात पायावर बंदुकीची गोळी लागून झालेल्या दुखापतीचा त्यांना शेवटपर्यंत त्रास सहन करावा लागला.

आज आपण अशा सेवा, समर्पण आणि त्यागाची कल्पना तरी करू शकतो का? त्यानंतर २००८ मध्ये त्यांनी त्यांचा आर्मी गणवेश आणि बिल्ला कटक येथील ‘नेताजी सुभाषचंद्र बोस संग्रहालया’ला भेट दिले. आणि अखेर चेन्नई येथे वयाच्या ९१ व्या वर्षी, १३ जानेवारी २०१८ रोजी त्यांचं निधन झालं.

अशा महान आणि सर्वात तरुण भारतीय स्त्री गुप्तहेरास समस्त भारतीयांकडून कोटी कोटी मानवंदना. जय हिंद!

(त्यांच्यावरील साहित्य : ‘हार नही मानुंगी’ हे आत्मचरित्र ‘आझादी का अमृत महोत्सव’च्या संकेत स्थळावर देवयानी आणि शिवरांजनी या जुळ्या बहिणींनी दहाव्या वर्षी लिहिलेलं चित्रमय ई-बुक पाहायला मिळतं.)

◆ adaparnadeshpande@gmail.com

# निर्णय



लघुकथा

■ नीता देशपांडे

**चिन्मय बऱ्याच वर्षांनी आजोळी आला होता. त्याचा मामेभाऊ अमोल आणि त्याची घट्ट मैत्री होती. त्यातलाच एक त्यांचा लहानपणीचा मित्र शौर्य सैन्यात भरती झालेला होता. त्याच्या 'कामगिरी'ने चिन्मयला आयुष्यातला महत्त्वाचा निर्णय घेता आला...**

पहाट झाली. चिमण्या उठल्या. मावळती पाठ फिरवू लागली. आकाशात रंगांची उधळण सुरू झाली. फटफटायला लागलं. आंबेगाव. शे-दीडशे वस्तीचं खेडेगाव. आंबेगावच्या शांतीआजीची आज पहाटेच लवकर लगबग सुरू झाली. त्याचं कारणही तसंच होतं. तिची मुलगी वसुधा आणि नातू चिन्मय येणार होते.

पहाटेच आजीनं अंगणात सडा टाकला. ओसरी शेणानं सारवली. माजघर आणि स्वयंपाकघरात फरशी बसवली होती. चुलीच्या जागी गॅस आला होता. आजीची सून वनिता आणि मुलगा अप्पासुद्धा गडबडीत होते. त्यांचा तरणाबांड मुलगा अमोल मात्र स्वतःची छबी सारखी आरशात पाहत होता. उन्हापाण्यात रापलेल्या चेहऱ्यावर पावडर फासत होता. जसजशी ते दोघे येण्याची वेळ जवळ येत होती, तशी त्याचीही उत्सुकता वाढत होती. त्याच्या एकुलत्या एक लाडक्या आत्याची तो वाट पाहत होता.

शेवटी प्रतीक्षेची घडी संपली. एक लांबसडक मोटार धुरळा उडवत आली. शांतीआजीच्या घरासमोर उभी राहिली. अजून शहराचा गंध नसलेली किंवा थोडीफार माहिती असलेली अशी सर्व छोटी-मोठी मंडळी गाडीभोवती गोळा झाली होती. वृद्ध लोकांच्या डोळ्यात माहेरवाशिणीबद्दलचं प्रेम दिसत होतं, तशीच चिन्मयवरची माया. तरुणांना तो आता कसा दिसत असेल त्याबद्दल उत्सुकता आणि बच्चे कंपनीला हे सगळे नवीन होतं. ते हळूच गाडीला हात लावून बघत होते.

चिन्मय बऱ्याच वर्षांनी गावाकडे आला होता. लहानपणी दरवर्षी उन्हाळ्याच्या सुट्टीत आजोळी जायचा. अमोल आणि तो जवळपास एकाच वयाचे. त्यामुळे त्यांची चांगलीच गट्टी होती. मामाचा तो चांगलाच लाडोबा. दिवसभर उनाडक्या करायचे दोघं. ट्रॅक्टरवरून मामाबरोबर शेतात जायचं. तिथं झाडावर चढणं, बोर विहिरीचं पाणी काढणं, नांगरणी, भांगलणी, तोडणी कशी असते ते आवडीनं पाहणं, असा त्याचा दरवर्षीचा उद्योग असायचा. रोज संध्याकाळी गाईचं दूध काढल्यानंतर सर्वांना मोठ्या पितळेच्या पेल्यातून ते ताजं, निरसं, फेसाळलेलं दूध देणं हे मामीचं काम असायचं. नाही म्हणायची हिंमत नव्हती. घरच्या गोठ्यात गायी-म्हशीशी खेळणं हा त्याचा आवडता छंद. एकदा दूध काढायचं त्याच्या मनात आलं आणि तो गायीच्या कासेला धरून ओढायला लागला. तसं गायीनं जोरात लाथ मारली. हा चपळाईनं मागे झाला. नाही तर जोरदार मार बसला असता. त्या आठवणीनं अजूनही त्याला सगळे खूप चिडवतात. त्या महिनाभरात खूप सारी ऊर्जा घेऊन चिन्मय पुण्यात परतायचा.

पण दहावीनंतर त्या दोघाचं इथं जाणंच झालं नाही. नंतर तो पुढील शिक्षणासाठी अमेरिकेत गेला. काही दिवसांसाठी तो भारतात आला. आणि आज एका आठवड्यासाठी या सर्वांना भेटायला आंबेगावात आला. गाडीतून दोघे उतरले. त्या उंचपुऱ्या, तरण्याबांड, तांबूस गोऱ्या चिन्मयला पाहून जमलेली जनता अवाक झाली. शांतीआजीने दोघांना जवळ घेतलं. आनंदाश्रूंचा पूर लोटला. दोघांनी आजीला वाकून नमस्कार केला. चिन्मय मामाला नमस्कार करण्यासाठी वाकला तसा मामाचा बांध कोसळला. त्याने त्याला मिठीत घेतलं. अमोल आत्याजवळ गेला. तिचीही अवस्था तीच झाली. शेवटी मामी आली. दोघांना दाराबाहेर उभं केलं. भाकर-तुकडा दोघांवरून ओवाळून टाकला. पायावर पाणी घातलं आणि नंतर दोघांना घरात घेतलं. गर्दीही पांगली. अमोलला अजून हवा तसा मोकळेपणा वाटत नव्हता. आपला हा बालमित्र आता कसा वागेल याची कल्पना येत नव्हती. ''काय रे अमोल्या, कसा आहेस? बाकी तब्येतीवरून झकासच दिसतोयस,'' असं विचारल्यावर मात्र अमोल एकदम मोकळा झाला. ''अरे मी तर मस्तच आहे. तू कसा आहेस. बाकी अगदीच काडी पैलवान झालास चिन्या तू.''

''हो रे तिथं कुठं पेल्यातून दूध मिळणार? मग असाच राहणार.'' असं म्हणून दोघंही सैलावले. चिन्मय मग आजीशी तिच्या तब्येतीविषयी बोलला. याही वयात तिची लगबग पाहून तिला हसत हसत हात जोडले. नंतर त्यानं आपला मोर्चा मामीकडे वळवला, ''मामी तुझ्या हातचा गावाकडचा सगळा मेवा खायचा आहे. तसा झणझणीत बेत रोज मला करून घाल. मिळमिळीत खाऊन कंटाळलो.''

''बरं बाळा तसंच करू या,'' असं म्हणून ती आत गेली. ''मामा आणि अमोल्या, मी रोज तुमच्याबरोबर शेतात येणार. आपल्या पूर्वीच्या मित्रांकडेही जाऊ आपण.'' ते दोघेही यासाठी तयारच होते. मग काय. रोजच ते दिवसभर नुसते उंडरायचे. आज या मित्राकडे तर उद्या दुसऱ्या. मामा-मामी त्यांच्या सरबराईत. आणि मायलेकीचं गुळपीठ चालायचं. आजी आणि मामी त्या दोघांना परत जाताना देण्यासाठी रोज काही तरी वानवळा काढून ठेवायच्या. त्याने कोठीची खोली भरत आली होती. मजेत दिवस चालले होते. जाण्याचा दिवस जवळ येऊ लागला. आता अगदी दोन दिवस राहिले. सगळ्यांना हुरहूर वाटायला लागली.

आज चिन्मय आणि अमोल त्यांच्या एका मित्राकडे जाणार होते. तो मित्र गावात राहत नव्हता. ५० किलोमीटर लांब होतं त्याचं घर. त्यामुळे सकाळी लवकर निघून संध्याकाळी येणार होते दोघे. चिन्मयला भेटून त्या मित्राच्या आई-वडिलांनाही खूप आनंद झाला. सगळ्या पूर्वीच्या गोष्टी आठवल्या. दिवस अगदी चांगला गेला. घरी येण्यास त्यांना रात्र झाली. गाव जसजसं जवळ येऊ लागलं, तसं अमोलला काही तरी वेगळं वाटू लागलं. तो चिन्मयला म्हणाला, ''काही तरी वेगळं वाटतंय गड्या, बैचेन वाटतंय.'' चिन्मयला काहीच कळलं नाही. अमोल बाइकचा वेग वाढवून तडक घराकडे आला. मामी वाटच पाहत होती. अमोलनं विचारलं, ''आई काय झालंय?''

''मी काय सांगते आहे ते अगदी शांतपणे ऐकून घे. अरे, खालच्या आळीतला तुझा परममित्र शौर्य आज सकाळी सीमेवर शहीद झाला. उद्या सकाळी त्याला आणणार आहेत. तुझे बाबा आणि आजी तिकडेच गेले आहेत.'' हे ऐकताच अमोल तसाच धावत घराबाहेर पडला. त्याच्यामागे चिन्मयही. चिन्मय त्याला ओळखत होताच. संपूर्ण गाव लोटलं होतं. त्या रात्री गावात चूल पेटली नाही. गावाचा सुपुत्र होता शौर्य. शौर्यचं लग्न होऊन दीड वर्षच झालं होतं. त्याला चार महिन्यांची मुलगी होती. त्याची आई कमलाबाई आणि पत्नी भारती यांच्या डोळ्यांतून पाणी खळत नव्हतं. छोटी ईशा काकूजवळ होती. गावात भयानक भीषण शांतता पसरली होती. कोणी कोणाशी बोलण्याच्या मनःस्थितीत नव्हतं. फक्त वाट पाहणं एवढंच सर्वांच्या हातात होतं. खूप रात्र झाली तसे बरेच लोक घरी परतले. शांतीआजी आणि चिन्मय घरी आले. मामा आणि अमोल तिथंच थांबले. त्या दिवशीची रात्र संपता संपत नव्हती. आजची सकाळ काही चांगली नव्हती. गावातल्या सगळ्यांची कामं कृत्रिमरीत्या चालली होती. कोणाचंच कामात लक्ष नव्हतं. साधारण अकरा वाजता शौर्यचं पार्थिव विमानानं येणार असं कळलं. दहा वाजताच सगळा गाव त्याच्या घरी जमला. चिन्मयचा अप्पामामा आणि इतर काही जण मनावर दगड ठेवून पुढील तयारीला लागले होते. आता कधीही तो नकोसा क्षण येणार होता...

आणि... वर आकाशात घरघर होऊ लागली. हेलिकॉप्टर दिसायला लागलं. क्षणभर गावकऱ्यांच्या हृदयाचा ठोका चुकला. हेलिकॉप्टर अलगदपणे जमिनीवर उतरलं. प्रथम मुख्यमंत्री उतरले. त्यानंतर चार सैनिक शवपेटी घेऊन उतरले. गावाचे सरपंच मुख्यमंत्र्यांना भेटले आणि ते सगळे शौर्यच्या घराकडे निघाले. मुख्यमंत्र्यांनी शौर्यच्या आईची, पत्नीची विचारपूस केली, त्यांचं सांत्वन केलं, धीर दिला. शवपेटीतून शौर्यचं कलेवर बाहेर काढण्यात आले आणि एकच आक्रोश आसमंतात घुमला. शौर्यच्या आई धावतच त्याच्या जवळ जाऊन त्याच्या तोंडावरून हात फिरवून म्हणाल्या, ''किती गुणांचा माझा बाळ. देशासाठी प्राण दिलेस. नावाप्रमाणे जगलास रे माझ्या राजा. खूप त्रास झाला का रे बाळा तुला? मला खूप अभिमान वाटतो बघ तुझा. आता माझी, भारतीची आणि ईशाची अजिबात काळजी करू नकोस. सगळा गावं आहे आपला आमच्याकडे बघायला.'' भारतीही शौर्यजवळ बसून मूक रुदन करत होती. सैनिकांनी तीन तोफांची सलामी दिली. राष्ट्रगीत वाजवलं गेलं. आणि आदरपूर्वक शौर्यचा देह गावाच्या ताब्यात दिला गेला. इतका वेळ देहभान हरपून हा सोहळा... हो, सोहळाच गावकरी पाहत होते, आपल्या सुपुत्राचा एवढा मान याची देही याची डोळा पाहत होते. आता त्याच्या शेवटच्या प्रवासाची तयारी करायची होती. गाडी सजविण्यात आली. केळीचे खुंट बांधण्यात आले. अतिशय सन्मानपूर्वक त्याचा अंत्यविधी करण्यात आला.

हळूहळू सगळे घराकडे परतले. अगदी जवळचे नातेवाईक फक्त थांबले होते. चिन्मय हा सगळा प्रसंग पाहत होता. या प्रसंगानंतर चिन्मय एकदम अबोल झाला. कोणाशीच बोलेना. उद्या बोलेल. आज जरा मन अस्थिर असेल, असं वाटून कोणी फार त्याच्याशी बोललं नाही. पण रात्रभर तो झोपला नाही. एकदम आजारीच पडला. तेव्हा मात्र मामानं डॉक्टरांना बोलावलं. ''त्याच्या मनाला हा प्रसंग फार लागला आहे. उपचारांची गरज आहे, त्याला पुण्याला त्याच्या घरी नेलं तर उत्तम,'' असं सांगून त्यांनी त्याला एक इंजेक्शन देऊन पूर्ण विश्रांती घेण्यास सांगितलं. आजचा दिवस थांबून उद्या सकाळी निघायचं असं ठरलं. इंजेक्शनचा परिणाम म्हणून त्याला थोडी झोप लागली. नंतर तो बऱ्यापैकी ताजातवाना झाला. सगळ्यांची काळजी जरा कमी झाली. चिन्मय आणि अमोल शौर्यच्या आठवणीत रमले. शौर्य कसा सैन्यात गेला, ते त्यानं चिन्मयला सांगितलं. चिन्मय तसेच अमोलच्या सुद्धा मनावरील ताण या बोलण्यानं थोडा हलका झाला.

उद्याच निघायचं नक्की झाल्यामुळे आजीची आणि वनिता मामीची चांगलीच धावपळ झाली. कोठीच्या खोलीतील तो वानवळा पाहून चिन्मय म्हणाला, ''आजी हे सगळं न्यायचं आहे का? तसं असेल तर मला आणि आईला वर टपावर बसावं लागेल. कमी कर काही तरी.'' त्याच्या पाठीत धपाटा घालून आजी म्हणाली, ''बरोबर बसवते बघ मी. तू नको काळजी करू.'' वसुधा म्हणाली, ''गाडीवरून बरं आठवलं, चिन्मय, अरे पुण्याहून ड्रायव्हर बोलवायचा का? तुला ड्राइव्ह करण्याची ताकद आहे का?'' चिन्मय म्हणाला, ''मी आता ठीक आहे. नको काळजी करूस.'' रात्री सगळे बराच वेळ गप्पा मारत बसले.

सकाळी अंमळ थोडी उशिराच जाग आली. वसुधा चिन्मयला उठवायला आली. तो जागाच होता. आईला म्हणाला, ''आई बसतेस का थोडा वेळ. मला बोलायचं तुझ्याशी.''

''का रे बरं वाटत नाहीये का?'' तिनं काळजीनं विचारलं.

''नाही आई, मी बरा आहे. पण मी एक मोठा निर्णय घेतो आहे. मी अमेरिकेला जाणार नाही. इथंच भारतात राहून समाजाची जास्तीत जास्त सेवा करण्याचं ठरवलं आहे. शौर्यचा चेहरा डोळ्यासमोरून हलतच नाहीये. खूप अस्वस्थ वाटतंय. काल रात्री मी बाबांशी बोललो. त्यांना आवडला माझा निर्णय. तुला काय वाटतं?'' वसुधाच्या डोळ्यात पाणी आलं. तिनं त्याला जवळ घेतलं. ती काहीच बोलू शकली नाही. तिची मूक संमती त्याच्यासाठी खूप बोलकी होती. चिन्मयचा हा निर्णय तिनं सगळ्यांना सांगितला. मामा आणि अमोल खूषच झाले. आजीनं त्याच्या चेहऱ्यावरून हात फिरवून बोटे मोडली. मामीनं शाबासकी दिली.

निघायची वेळ झाली, तसा चिन्मय अमोलला घेऊन शौर्यच्या घरी आला. त्याच्या आई आणि पत्नीचा निरोप घेतला. छोटीची पापी घेतली. शौर्यच्या फोटोला वाकून नमस्कार केला. फोटोतील हाराच्या मागून शौर्य हसल्याचा भास झाला.

neetardeshpande@gmail.com






# खगोलयात्री

▶ पान १ वरून / काम करायचं आहे आणि तेच या क्षेत्रात काम करत राहण्यासाठी पुरेसं कारण आहे हे आधी स्वतःला पटवून द्यायला हवं आणि त्यानंतर आपल्यासाठी महत्त्वाच्या असणाऱ्या मोजक्या माणसांना. त्यापलीकडे इतर लोक आपल्या कामाविषयी काय विचार करतात याने आपल्याला मुळीच फरक पडत कामा नये,'' असं त्या आवर्जून अधोरेखित करतात.

बंगळूरुच्या 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ॲस्ट्रोफिजिक्स'मधून पीएच.डी. करत असतानाच त्यांचं लग्न झालं. आपल्या या क्षेत्राच्या करिअर निवडीविषयी स्पष्टीकरण द्यावं न लागलेली एकमेव व्यक्ती आपल्याला भेटली, असं त्या मिश्कीलपणे सांगतात. लहानपणी स्वच्छ आकाशात उघड्या डोळ्यांनी दिसणारी आकाशगंगा पाहून अन्नपूर्णी यांचं अवकाशाचा अभ्यास करण्याचं स्वप्नं दृढ झालं होतं. अन्नपूर्णी यांनी 'भारतीय खगोल भौतिकी' संस्थेत तारकासमूह (स्टार क्लस्टर्स) आणि मॅगेलॅनिक क्लाउड्स (आकाशगंगेभोवती फिरणाऱ्या दोन लघु आकाशगंगा) यांचा अभ्यास केला. ताऱ्यांचं जीवनचक्र समजून घेण्यासाठी त्यांचं संशोधन कार्य मोलाची भूमिका बजावतं.

'ॲस्ट्रोसॅट' या अवकाश कार्यक्रमातील त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. या अनुभवाच्या पायावर त्या सध्या INSIST (Indian Spectroscopic and Imaging Space Telescope) या प्रकल्पाच्या प्रमुख संशोधक म्हणून कार्यरत आहेत. INSIST हा भारताचा प्रस्तावित भविष्यवेधी अल्ट्राव्हायोलेट-ऑप्टिकल अवकाश टेलिस्कोप आहे. प्रोफेसर सुब्रमणियम यांनी Thirty Metre Telescope (TMT) प्रकल्पातही महत्त्वाची भूमिका बजावली आहे. TMT हा जगातील सर्वात मोठ्या आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्रीय सहकार्य प्रकल्पांपैकी एक आहे. या प्रकल्पात भारत सहभागी देशांपैकी एक आहे, आणि भारतीय खगोलभौतिकी संस्था (Indian Institute of Astrophysics) ही भारताची समन्वयक केंद्र म्हणून काम पाहत आहे. 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ॲस्ट्रोफिजिक्स' येथे पीएच.डी.साठी दाखल झालेल्या डॉ. अन्नपूर्णी २०१९ मध्ये त्याच संस्थेच्या पहिल्या स्त्री संचालक म्हणून नियुक्त झाल्या. त्यांच्या योगदानामुळे संस्थेच्या अध्यक्षपदी तब्बल दोन वेळा त्यांची निवड झाली आणि संस्थेसोबतचे त्यांचे ऋणानुबंध अधिक घट्ट झाले.

एक संशोधिका म्हणून तसेच क्षेत्रातील नेतृत्व म्हणून कार्यरत असताना स्त्री म्हणून आपण आपल्या गरजा, अपेक्षा स्पष्टपणे मांडणं, आपल्या मर्यादा आणि सीमा न्यूनगंड न मानता ठरवणं या जोडीनेच आपल्याला काय स्वीकारार्ह नाही याची यादी स्पष्ट करणंसुद्धा तितकंच आवश्यक असल्याचं त्या म्हणतात. आपण सगळंच करू शकत नाही हे स्वीकारणं ही या प्रवासाची पहिली पायरी आहे. अशा नियमांची आखणी करणं म्हणजे केवळ स्वप्रेम नाही तर आपल्या कुटुंबाला त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून देणंसुद्धा आहे असं त्या सांगतात. त्यासाठी त्या आपल्या आयुष्यातील एक लहानसं उदाहरण देतात. त्यांच्या घरी प्रत्येक जण स्वतःची न्याहरी स्वतः तयार करतं. यामुळे प्रत्येकाला आपल्या जबाबदारीची जाणीव असते. प्रत्येक जण एकमेकांना मदत करतं आणि एकमेकांच्या कामाचा आदर यातून आणखी घट्ट होतो तर अवांतर अपेक्षा कमी होतात. यामुळे प्रवास करताना, आपल्या करिअरला, संशोधनाला प्राधान्य द्यायला घरातील स्त्रीला कमीपणा वाटत नाही.

त्यांचा खगोलशास्त्रातला एकूणच यशस्वी प्रवास म्हणजे केवळ स्वतःला ओळखणं नव्हे, तर आपल्या गरजा स्पष्टपणे मांडण्याचं धैर्य दाखवणं आणि अधिक समानता व समजूतदार समाजासाठी प्रयत्न करणं, भूमिका घेणं याचं प्रेरणादायी उदाहरण आहे.

◆ postcardsfromruchira@gmail.com







# श्रवणदोष आणि संगीताचा आनंद



**डॉ. कल्याणी मांडके**

PhD, AuD, CCC-A, Clinical Audiologist, ASHA Fellow (USA)

"डॉ. कल्याणी मांडके या प्रतिष्ठित श्रवणतज्ज्ञ असून भारतातील श्रवण विज्ञान क्षेत्रात त्यांनी अमूल्य योगदान दिले आहे. अमेरिकेच्या फेलोशिप मिळवणाऱ्या त्या पहिल्या भारतीय ठरल्या आहेत. त्यांच्या मांडके हिअरिंग सर्व्हिसेस् या संस्थेने ७५,००० पेक्षा जास्त लोकांना योग्य निदान व उपचार दिले आहेत. श्रवण तज्ज्ञांसाठी संशोधन आणि सामाजिक कार्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे."

मांडके हिअरिंग सर्व्हिसेस्

ई-मेल:mandkehearingservices@gmail.com
औध शाखा : ८१, मिथिला अपार्टमेंट, आनंद पार्क, औंध, पुणे-०७. संपर्क : -९१ ९५९५६०९५४६

हेड ऑफिस: ९६४, सदाशिव पेठ, ब्राह्मण मंगल कार्यालयाच्या समोर, पुणे ३०.
संपर्क : ४-९१ ९४२२०३७७९२

जाहिरात

संगीत हे आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. लहानपणीची बडबडगीते, अंगाईगीते, आरत्या, अभंग, भावगीते, चित्रपटातील गाणी अशा अनेक स्वरूपांत संगीत आपल्या आयुष्यात सतत सोबत असते. आनंद, दुःख, प्रेम, भक्ती अशा प्रत्येक भावनेशी संगीत जोडलेले असते. वय वाढले आणि ऐकण्याची क्षमता कमी झाली तरी मनातली संगीताची ओढ कमी होत नाही.

संगीतामुळे मन शांत होते, ताण कमी होतो, एकटेपणा दूर होतो आणि जुन्या आठवणी जाग्या होतात. म्हणूनच आज संगीताला उपचारपद्धतीचाही एक भाग मानले जाते. मात्र श्रवणदोषामुळे अनेक ज्येष्ठ व्यक्ती हळूहळू संगीतापासून दूर जातात.

श्रवणदोषाची सुरुवात हळूहळू होते. अनेकांना कमी ऐकू येते हे जाणवत नाही, पण गाणी बेसूर किंवा अस्पष्ट वाटू लागतात. काही वारंवारिता (Frequency) नीट ऐकू येत नसल्याने बासरीचे सूर हरवतात, तर तबल्याचा ठेका ऐकू येतो. गाण्याचा आवाज वाढवला तर तो मधुर न वाटता कर्कश वाटू लागतो. त्यामुळे आवडती गाणीही पूर्वीसारखा आनंद देत नाहीत.

घरातील लोकांना वाटते की ज्येष्ठांची संगीताची आवड कमी झाली आहे, पण प्रत्यक्षात त्यांच्या मनातील संगीतप्रेम कायम असते. जुनी परिचित गाणी शब्दांसह आठवत असल्यामुळे ती अर्धी ऐकू आली तरी मनाला पूर्ण आनंद मिळतो.

कुटुंबीयांनी अशा व्यक्तींना भजन, अभंग किंवा आवडती गाणी त्यांच्या लयीत म्हणू द्यावीत. ताल, लय आणि सूर यांचा सराव मनाला उभारी देतो आणि जुन्या आठवणींना उजाळा मिळतो. विशेषतः स्पष्ट शब्दोच्चार असलेली भावगीते, भक्तिगीते आणि कमी वाद्यसंगीत असलेली गाणी समजायला सोपी जातात.

मोबाईलवर YouTube वर गाणी ऐकताना Subtitles वापरल्यास शब्द समजायला मदत होते. कानाने काही भाग ऐकला आणि डोळ्यांनी शब्द वाचले, तरी गाण्याचा आनंद अधिक चांगला मिळू शकतो.

आधुनिक तंत्रज्ञानावर आधारलेले श्रवणयंत्र संगीताचा आनंद पुन्हा अनुभवण्यास मदत करू शकते. संवादासाठी आणि संगीतासाठी वेगवेगळे प्रोग्रॅम असलेली अत्याधुनिक श्रवणयंत्रे उपलब्ध आहेत. Bluetooth सुविधेमुळे मोबाईलवरील गाणी अधिक स्पष्ट ऐकता येतात.

श्रवणयंत्र वापरण्यास सुरुवात केल्यानंतर दररोज २०-३० मिनिटे शांत वातावरणात परिचित गाणी ऐकण्याचा सराव करावा. दोन्ही कानांत श्रवणयंत्र वापरल्यास मेंदू आणि कान यांच्यातील समन्वय अधिक सहज होतो आणि संगीताचा आनंद पुन्हा अनुभवता येतो.

संगीताचा हरवलेला आनंद उच्च तंत्रज्ञानाच्या श्रवणयंत्राने पुन्हा मिळू शकतो.